म. ग्रं. …ठाणे
ग्रंथप्रकार
अ. क्र. …३५

# गोंधळ

गोपालकृष्ण भोबे



REFBK-0014256
REFBK-0014256

# असा आहे माझा गोमंतक

संस्कृति - साहित्य - कला

REFBK-0014256
REFBK-0014256

गोपालकृष्ण भोबे

प्रथम आवृत्ति १९६४

सर्व हक्क लेखकाधीन

मुखपृष्ठ : दीनानाथ दलाल

**किंमत साडेसात रुपये**

प्रकाशक :
न. पु. सुकेरकर
सरचिटणीस
महाराष्ट्र साहित्य संमेलन
अधिवेशन ४५ वें
मडगांव, गोवा

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

*कालचक्राच्या कित्येक अवस्थांतरांतून*
*ज्यांनीं आमच्या संस्कृतीचा ठेवा प्राणाची*
*कुरवंडी करून जतन करून ठेवला*
*त्या ज्ञात-अज्ञात पूर्वजांना*

## विषयसूचि


| | | |
|---|---|---|
| १ | तलवार आणि क्रूस | १ |
| २ | माझें घर | १८ |
| ३ | माझा गांव | ३३ |
| ४ | विद्येचें माहेर मठग्राम | ५१ |
| ५ | राजधानी पणजी | ६६ |
| ६ | रंगेल आणि रंगेल म्हापसें | ८१ |
| ७ | माझें गोवें | ९० |
| ८ | इये मराठीचिये नगरीं | १०० |
| ९ | संगीत आणि साधना | १११ |
| १० | नादलुब्ध गोमंतक | १२३ |
| ११ | जीवनाचें अंग नाटक | १३० |
| १२ | चित्रकार आणि शिल्पकार | १३८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३६७०३ दि: भूमवास
३३५ नों: दि: २५.८.६४.

# साथ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें

एखाद्या कीर्तनकाराचे ठराविक साथीदार असतात. श्री. गोपालकृष्ण भोब्यांच्या पुस्तकाच्या बाबतींत माझी आणि चित्रकार दलालांची अशीच काहीशी अवस्था झाली आहे. त्यांच्या पहिल्या पुस्तकाची प्रस्तावना मींच लिहिली आणि दलालांनीं कुंचलीचे अलंकार चढविले. त्यावेळीं भोब्यांनीं आपल्या अंगभूत लीनतेला साजेल अशा शब्दांत आम्हीं त्यांच्या पुस्तकाला कवचकुंडलें घातलीं असें लिहिलें होतें. भोब्यांचें बोट धरून त्यांना आम्हीं मोठा वडील-कीचा आव आणून ग्रंथकारांच्या मैफलींत आणून बसवलें हें खरें. पण आतां भोबे त्या मैफलींतले बुजुर्ग झाले आहेत. आतां त्यांचे वाचकच त्यांना 'इत इतो भवान्' म्हणूं लागले आहेत. संगीतसमीक्षक म्हणून भोब्यांनीं मानाचें पान मिळवलें आहे. एका सुवर्णपदकाचे ते मानकरीहि झाले आहेत. कलावंत मंडळी आतां 'आइये भोबेजी' म्हणून त्यांना बैठकींत पुढें ओढून घेतात. अशा वेळीं भोब्यांनीं प्रस्तावनेसाठीं पुन्हा मलाच सुपारी देण्याचें कारण नव्हतें. पण त्यांच्या पुस्तकाच्या पहिल्या प्रस्तावनेंत मीं 'उद्यां गोपालकृष्ण भोबेबुवांचें कीर्तन आहे असें ऐकलें तरी आश्चर्य वाटणार नाहीं' म्हटलें होतें. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे भोब्यांनीं केलेलें त्यांच्या गोमंतकाचें कीर्तन आहे. माझी भूमिका त्यांच्या पाठीशीं उभा राहणाराची असली तरी बुवांच्या सुराला सूर देणाराची आहे. गोमंतकाच्या ह्या कीर्तनांत टाळ घेऊन उभें राहण्याचा मला वारशानें प्राप्त झालेला हक्क

आहे. माझें कुलदैवत मंगेश आहे. आणि त्या देवालयाच्या अति रम्य परिसरांतच माझ्या कुलपुरुषाची समाधि आहे. हें माझ्या कुलभूमीचें कीर्तन आहे. तिथें उभें राहण्याचा माझा हक्क आहे—नव्हे, तें माझें कर्तव्य आहे.

'गोवें' हा भोवे म्हणतात त्याप्रमाणें साऱ्या जगाच्या कुतूहलाचा विषय होऊन बसला. पोर्तुगीजांनीं गिळलेला हा सुंदर प्रदेश हिंदुपदपातशाहींत पुन्हा मिळवून घेण्याचें शिवरायाचें स्वप्न प्रत्यक्षांत यायला विसावें शतक उजाडलें. ज्या सप्तकोटेश्वराच्या मूर्तीची विहिरीच्या रहाटाला नेट देण्यासाठीं पायाचा दगड म्हणून अप्रतिष्ठा केली त्या धर्मांधांचा 'क्षयो' झाला! 'उदंड जाहलें पाणी स्नानसंध्या करावया' ह्या ओळींचा अर्थ पोर्तुगीजांच्या टाचेखालीं क्षणोक्षणीं तुडवल्या जाणाऱ्या गोमंतकीय हिंदूंना जसा कळला तसा ब्रिटिश राजवटींत राहिलेल्यांना कळला नाहीं. ब्रिटिश हे पोर्तुगीजांच्या मानानें कितीतरी सहिष्णु. पोर्तुगीजांचा धार्मिक रानटीपणा हा औरंगजेबाच्या जातीचा. माणुसकीला पारखा. खिस्ताची शिकवण अजिबात न कळलेले हे खिस्ती. हिंदूंचा अनन्वित छळ करून खिस्ताच्या प्रेममार्गाचीं स्तोत्रें गाणारे त्यांचे ते संत आणि साधु! रावणाच्या लंकेंत सीता होती तशी ही गोमंतभूमि ह्या पोर्तुगीज अंमलांत वनवास भोगत राहिली. वनवासाचे दिवस संपले आणि दुर्दैवानें अग्निदिव्याचे सुरू झाले आहेत. माणसांप्रमाणें एखाद्या भूमीलाहि प्राक्तन असतें कीं काय कोण जाणे. अजूनहि तिचें नष्टचर्य संपत नाहीं. निवडणुकीचें अग्निदिव्य झालें. तिचें मराठी कुलशील सिद्ध झालें; तरी देखील अजूनपर्यंत ती नजरकैदेंतच आहे.

भोब्यांनीं पुढल्या पानांत ह्या भूमीचें तें मराठीपण सिद्ध केलें आहे. मराठी भूपाळ्यांनीं गोमंतभूमि पहाटे जागत आली आहे. सकाळपासून मध्यरात्रींपर्यंत ही देवभूमि मराठी संतांच्या वाणींत न्हाऊन निघत आहे. हें वाचल्यावर वऱ्हाडांतला, खानदेशांतला आणि मराठवाड्यांतला मराठी माणूस म्हणणार 'अरे, हें वर्णन तर माझ्याच गांवाचें आहे. आम्हीं देखील देवळांतल्या घंटांच्या गजरांत 'उठा उठा हो सकळीक' च ऐकत उठतों. आणि भजनी-मंडळाच्या मुखांतून तुकयाची वाणी ऐकतच थकली पाठ पथारीला लावतों. गोवें आमच्यापासून काय निराळें आहे? कांहीं नाहीं!' हेंच उत्तर आहे. मऱ्हाट संस्कृतीचें म्हणजेच अस्सल भारतीय संस्कृतीचें जतन गोमंतकीयांनीं

अधिक निष्ठेनें केलें. पुढलीं पानें हा एक मनस्वी जिद्दीचा—दमदार श्रद्धेचा इतिहास आहे. बुटाच्या टांचेखालीं ज्या जिद्दीनें एखादें हिरवें तृणपर्ण जमिनींतलीं आपलीं पाळेंमुळें घट्ट धरून राहतें त्या हिरव्यागार, चैतन्यमय तृणपर्णाची ही कथा आहे. बूट बदलले ह्या तृणपर्णाची जिद्द हरणार नाहीं. मराठी संतांच्या मराठी वाणीचें अमृत प्यालेली ही भूमि, भारतीय संगीताच्या सुराला घट्ट बिलगलेली आणि लयकारीच्या बिकट वाटेला पकडून राहिलेली ही भूमि, मराठी नाटकांची कृष्णंभट बांदकरांनीं उभवलेली ही सृष्टि, सोहिरोबांनीं पेटविलेला हा 'अंतरींचा ज्ञानदिवा' असा काय कोणी कागदी करामती करून सहजासहजीं विझवेल ?

एकोणीसशें एक सालांत जिथल्या एका वैद्याची बायको 'हळदकुंकू' नांवाचें मराठी मासिक काढते, जिथें गाईच्या गोठ्यांत मराठी अक्षराची धूळपाटी गिरवली जाते, जिथें असहिष्णु परधर्मीयाचें राज्य असतांना रामनवमीचा सुंठवडा चुकत नाहीं—कृष्णजन्माचा काला होतो—पंढरीच्या वारकऱ्याचें स्वागत गांववेशीवर होतें, तिथल्या लोकांच्या संस्कृतीविषयींची चर्चा फक्त भारतीय संस्कृतीचा पट हा हिंदु तत्त्वज्ञान्यांच्या, संतांच्या आणि कलावंतांच्या जीवनसूत्रांनींच विणला गेला आहे हें क्षुद्र राजकीय हेतूंपोटीं अमान्य करणारांच्यांतच संभवतें. आम्ही सहिष्णु आहोंत एवढाच काय तो आमचा दोष. आमच्या सहिष्णुत्वाची पराकाष्ठा व्हायला लागली आहे. ह्या देशांत राहूं इच्छिणाऱ्यांनीं माझ्या गंगेला, माझ्या यमुनेला पवित्र मानून राहिलें पाहिजे. महाराष्ट्रांत राहून पंढरीच्या विठ्ठलाला आणि शिवनेरीच्या शिवरायाला मानणार नाहीं म्हणून चालायचें नाहीं. हें वेड लागत नसेल तर लावून घेतलें पाहिजे. आमच्या ओसरीवर सर्वांच्या पथारीला वाव आहे. परंतु आमच्या वास्तूच्या कुलपुरुषाला दंडवत घालून सभ्यतेपोटीं फार स्पष्ट न बोलण्याचा आम्हीं प्रमाद केला. सभ्यतेला आणि सौजन्याला दुबळेपणा आणि लाचारी समजणारांना त्यांना समजणाऱ्या शब्दांत शिकवण्याचा प्रसंग परमेश्वरकृपेनें न येवो. त्या कार्यांत निष्कारण शक्तिपात होतो. धार्मिक सवलतींचा केवळ स्वार्थ आणि अडवणूक यासाठींच उपयोग करणारांना धर्म या शब्दाचा अर्थच कळला नाहीं, तो कळवून देण्याचा प्रसंग त्यांनीं आणतां कामा नये. सामान्यजनांना असले द्वेष नसतात.

गोव्यांत ज्ञानेश्वरी वाचा हें सांगायला शेंकडों वर्षांपूर्वी कुणी संयुक्तमहाराष्ट्रवादी गेला नव्हता. त्यांच्या हातच्या जुन्या पोथ्या हिसकावून कुणीं त्यांच्याशीं नवी पोथी वाचण्याचे करार केले नाहींत. संतवाणीचा सुगंध महाराष्ट्रांत दरवळला. गोमंतक हा त्याच महाराष्ट्राचा भाग. तिथें तो पोहोंचल्याशिवाय कसा राहील ? धार्मिक कार्यांत विघ्नें आणणारे, होमहवनालाहि सरकारी परवाने मागणारें धर्मांध पोर्तुगीज सरकार कुठें आणि मुसलमानांच्या मशिदींना वर्षासनें देणारें शिवप्रभूंचें सहिष्णु हिंदुराज्य कुठें ? 'काय वाटेल तें माग' म्हणणाऱ्या पोर्तुगीज कप्ताना-कडे म्हाम्माय कामतीनें शंख तेवढा मागितला. देव्हाऱ्यांतल्या देवाचें स्नान यथासांग होत नव्हतें. धर्मभूमींत रुजलेलीं चैतन्यमय तृणपर्णें तीं हीं ! आपली सारी भारतीय संस्कृति देवालयांच्या परिसरांत वाढली. सारें शिल्प, नाट्य, चित्र, नृत्य, संगीत, पुष्पोद्यानें ह्यांचा उगम आणि विकास इथें ! कलावंतांनीं आपली कथा देवाच्या चरणीं वहायची. षोडशोपचारपूजा म्हणजे काय तें गोव्यांत पाहावें. धर्म ही सर्वांत मौल्यवान गोष्ट गोमंतकीयांना वाटली याचें कारण प्राणाचें मोल देऊन ती त्यांना जतन करावी लागली. ह्या देवालयांच्या भक्तांनीं व पुजाऱ्यांनीं मरण आणि धर्मांतर ह्यांतून मरण निवडलें होतें. त्यामुळें देवाच्या सेवेंतला प्रत्येक क्षण हा न जाणों 'शेवटला दीस' असेल असें त्यांना वाटायचें. तो शक्य तितका गोड व्हावा म्हणून पूजाविधींत यत्किंचितहि हयगय झाली नाहीं. 'नैवेद्यार्थे अक्षता—पुष्पार्थे अक्षता' असल्या पळवाटा आल्या नाहींत. 'माल्यादीनि सुगंधीनि' म्हणजे खरोखरीचीं सुगंधी फुलें, वेधक माळा आणि मोहक पुष्पसज्जा ! गोमंतक ही तर हिंदु देवदेवतांनीं स्वतःचे अपरिमित लाड करून घेण्यासाठींच निर्माण केलेली भूमि ! बारमाहा फुलणारीं तऱ्हेतऱ्हेचीं सुगंधी फुलें, स्नानासाठीं तुडुंब भरलेलीं तळीं, मधुर फळें, नितान्त श्रद्धायुक्त अंतःकरणाचे भक्त, प्रासादिक वाणीचे कथाकार, चतुर गायकगायिका, उदार धनिक अशी ही देवालयमय सृष्टि आहे. माझ्यांतलें जें उत्तम असेल तें दान देवासाठीं म्हणणाऱ्या ह्या जिद्दी भक्तांनींच गोमंतकांत आपली संस्कृति पोर्तुगीजांच्या कराल दाढेंतून टिकवली. त्यांतलीं कच्चीं होतीं, स्वार्थी होतीं किंवा भित्रीं होतीं तीं खाविंदचरणीं मिलिंदायमान झालीं आणि परलोकाचें हवें तें होईना, इहलोकीं कल्याण करून घेऊन मोकळीं झालीं.

अशाच वृत्तीच्या लोकांनीं आतां महाराष्ट्राशीं दुस्वास धरला आहे. पण

गोव्याची संस्कृति ही पोर्तुगीजांच्या आगीचे घोट पिऊन उरलेली आहे. शिवाजी, ग्यानबा, तुकाराम, समर्थ ह्यांचें नातें ती सांगते. कोंकणी बोली बोलणारांनीं मान्यता मिळवली मराठी साहित्याच्या दरबारीं; कारण माझ्या अंतरींचा भाव मराठी वाचकच जाणील ह्याची त्या कवीला–कथाकाराला खात्री होती. आज मराठींतल्या कविपंचकांत बोरकरांसारखा कवि मानानें बसतो, नाटककारांत रांगणेकर. गायक, चित्रकार, शिल्पकारांचा तर प्रश्नच नाहीं. ‘महाराष्ट्र गोमंतकाच्या गळ्यानें गातो’ हें आचार्य अत्र्यांचें सुप्रसिद्ध वाक्य आहे. भोब्यांनीं गोव्यांतल्या ह्या कर्तबगार महाराष्ट्रीयांचें आदरानें स्मरण केलें आहे.

स्वतः गोपाळकृष्ण भोबे हेच मुळीं गोमंतकीय पीळ असलेल्या अस्सल मऱ्हाटी माणसाचे प्रतिनिधि आहेत. त्यांच्या भाषेंत संत आणि पंत कवि गाभाऱ्यांतल्या वासासारखा आपल्या अस्तित्वाचा साक्षात्कार घडवून जातात. साहित्य, संगीत आणि चित्र अशा तिन्ही अंगांचा आस्वाद घेत जगणाऱ्या गोमंतकीयाचे सारे गुण आणि परंपरेला चिकटून राहण्याची जिद्द भोब्यांच्यांतहि आहे. नव्या औद्योगिक युगाच्या दर्शनानें ते भयभीत होतात. त्यांच्या पुस्तकांतला एक मुद्दा लक्षांत आणून द्यावासा वाटतो. पारतंत्र्यांत पोर्तुगीजांनीं खोट्या स्वस्ताईची—परदेशी मालाच्या रेलचेलीची खोटी भूलभुलावणी उभी केली. स्वातंत्र्यानंतर जे भारतीय अधिकारी गेले त्यांच्याविषयींहि फारसें चांगलें ऐकिवांत येत नाहीं. कसलीं भ्रष्ट माणसें अधिकारी म्हणून तिथें गेलीं कोण जाणे! त्यांनीं तर ‘देवा, पोर्तुगीज बरे’ म्हणायची पाळी आणली म्हणतात. भ्रष्ट अधिकाऱ्यांची आपल्याला आतां संवय व्हायला लागली आहे. देशाच्या सर्वनाशाची नांदी व्यापारी आणि भ्रष्ट अधिकारी मिळून म्हणत असतात. परदास्यांतल्या अंधःकारांत राहिलेल्या गोमंतकीयांना सुंदर स्वप्नें पडत होतीं. सत्य निराळें भासलें. माणसें भ्यालीं. निराश झालीं.

मऱ्हाटी माणसें म्हणतांना त्यांत गोवा सहजतेनें यावा. पुणें, नाशिक किंवा सोलापूर म्हणतांना ज्या सहजतेनें महाराष्ट्र असा निराळा उल्लेख आपण करत नाहीं, त्या सहजतेनेंच म्हापश्याचा आणि पणजीचा उल्लेख व्हावा. मी म्हणेन अधिक आवर्जून व्हावा. गोव्याच्या दुःखांच्या निराकरणाला महाराष्ट्रानें अग्रहक्क दिला पाहिजे. गोव्याचे महाराष्ट्रावर अनंत उपकार आहेत. मराठी

संस्कृतीचा एका लोकविलक्षण निष्ठेनें जतन करून ठेवलेला वारसा आतां महाराष्ट्रानें गोव्याकडून घ्यायचा आहे. कारण त्यांनीं सारे कुळाचार अधिक कसोशीनें पाळले. त्यांना अप्रूपपणामुळें त्यांची अधिक किंमत होती.

पोर्तुगीजांनीं आणि त्यांच्या पायाशीं लोळण घेऊन केवळ स्वार्थ साधणारांनीं गोव्याविषयीं भारतांत आणि भारताबाहेर भरपूर गैरसमज पसरवला. पोर्तुगीजांच्या उष्ट्याचीं मद्यें प्यालेल्या ज्या लोकांच्या तोंडावरची घाण अजून गेलेली नाहीं तसलीं माणसें महाराष्ट्राला भारतीयत्वाच्या उपदेशाचे घोट पाजायला लागलेलीं आहेत. भले भरडायचे आणि खोटे कंठीं धरायचे असा हा विपरीत काळ आला आहे. गोमंतकाचें नष्टचर्य संपूर्णपणें संपलें नाहीं. तें संपणार. त्याला लढा हा अटळ आहे असें मात्र मला वाटत नाहीं. उलट तो द्यावा लागणें हें दुर्भाग्य म्हणावें लागेल. सामान्यांना जें कळतें तें असामान्य अनेक कारणांमुळें कळवूनच घेऊं इच्छीत नाहींत, आणि मग निष्पाप जिवांचे मुडदे पडतात. महाराष्ट्राला मुंबई देतांना सत्ताधीश विवेकभ्रष्ट झाले म्हणूनच ना निरपराध मातांना पुत्रशोक करावा लागला—अश्राप स्त्रियांना वैधव्य भोगावें लागलें! मराठी मनाचें हें दुःख भारतीय संस्कृतींचा विलक्षण अभिमान बाळगणारें मराठी मनच जाणतें.

गोमंतकांत महाराष्ट्र साहित्य संमेलन भरतें आहे. अशा ह्या शुभ वेळीं भोब्यांनीं आपल्या प्रासादिक मराठी शैलींत केलेलें हें संकीर्तन प्रसिद्ध होत आहे. कीर्तनाच्या शेवटीं ‘गुण गाईन आवडी हेचि माझी सर्व जोडी’ हेंच दान मागितलें जातें. भोब्यांनीं गोमंतकाचे-गोमंतकीयाचे म्हणजे पर्यायानें महाराष्ट्राच्या ह्या लोभसवाण्या प्रदेशाचे गुण गायिलेले आहेत. मीं भोबेबुवांच्या बरोबर फक्त ध्रुपद धरलें. पण कीर्तनाला माझा थोडासा हातभार लागला. ज्या गोमंतकांत माझे पूर्वज नांदले त्या पूर्वजांचें ऋण अल्पांशानें फेडण्याचा मला योग आणून दिल्याबद्दल माझ्या ह्या गुणी मित्राचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

**पु. ल. देशपांडे**

# अवधान दीजें

जें पाहिलें आणि अनुभवलें त्याचाच केवळ आढावा पुढील बारा प्रकरणांत मीं घेतलेला आहे. फक्त पहिल्याच प्रकरणांतील कांहीं घटनांना पूर्वसूरींच्या संशोधनाचा आधार आहे. माझ्या मर्यादित लेखणीला प्रतिकूल असलेल्या राजकारण व अर्थकारण या अंगांना मीं इथें फाटा दिलेला आहे. (गोमंतकांतील व बृहन्महाराष्ट्रांतील सर्व वृत्तपत्रांतून या विषयाचीं नित्य सालपटें काढण्यांत येतच असतात.) गोमंतकांतील खानेसुमारी, आयातनिर्यात, भूपट्टीचें मोजमाप इत्यादि इत्यादि माहिती देणारीं व अनेक हातांनीं रचलेलीं पांच-सहा पुस्तकें आहेत. जुजबी माहिती हवी असलेल्या जिज्ञासूंनीं तीं पुस्तकें अवश्य पाहावींत.

गोमंतकांतील साहित्य-संस्कृति व कला हे विषय टीकेच्या चौकटींतून विस्तारानें ग्रंथरूप व्हावेत; श्री. महादेवशास्त्री जोशी, कविवर्य बोरकर, कविवर्य कारे, बा. द. सातोस्कर, लक्ष्मणराव सरदेसाई, जयवंतराव सरदेसाई या विचारवंतांनीं एकत्र बसून यावर खूप चर्चा करावी; एका बाजूला बसून मीं ती ऐकावी, टिपून ठेवावी; व यानंतर प्रत्येकानें एक एक विषय हाताळून, गोमंतकांतील निसर्गा-इतकीच सुंदर अशी एक अक्षर कलाकृति निर्माण व्हावी;—अशी फार दिवसां-पासून इच्छा होती. पण वरील सर्व सद्गृहस्थांना आपापल्या क्षेत्रांत 'रात्र थोडी सोंगें फार' अशी परिस्थिति असल्यानें माझी ती इच्छा कधींच पुरी झाली

नाहीं. एकाएकीं ही सर्व जबाबदारी माझ्यावर टाकली गेली. आणि एकाकी अवस्थेंत व अल्पावधींत मला ती कशीबशी पुरी करावी लागली.

या पुस्तकांत चर्चिलेले तीनहि विषय माझ्या अत्यंत आवडीचे. माझ्या अंतर्मनांत ते व्यापून राहिलेले आहेत. केव्हां केव्हां ते घुमूं लागतात. तऱ्हे-तऱ्हेच्या सुश्राव्य नादाचीं आवर्तनेंच्या आवर्तनें उमटतात. कित्येक उत्कट प्रसंग दृष्टीसमोरून तरळूं लागतात. कैफ वाढत राहतो. हें सांगितलें पाहिजे, सांगितलें पाहिजे असें मन घोकत राहतें; परंतु या पुस्तकांत त्या विषयांची भावचित्रें रेखाटतांना काळमर्यादेची व स्थलमर्यादेची रेषा सतत दृष्टीसमोर राहिल्यानें मनांतल्या हुरहुरीला आटोकाट बंधन घालावें लागलें.

प्रभुकृपेनें मला लाभलेली प्रतिभाशक्ति मर्यादित आहे. मजहून थोर प्रतिभावंत व्यक्ति गोमंतकांत आहेत. हें वास्तविक त्यांचें काम होतें. राजकारणी महत्त्वाकांक्षा, कारस्थानें, मुत्सद्दीपणा, उलटसुलट पवित्रे, वादविवाद इत्यादि 'श्रेष्ठ गुण' माझ्या पिंडांत नसल्यानें, आजच्या गोमंतकाचें यथातथ्य दर्शन मला घडवितां आलें नाहीं असें कुणीं म्हटलें तरी मला त्यांत वाईट वाटणार नाहीं. माझ्या प्रतिभाशक्तीला जें पेललें तेवढ्याचेंच—लेखनस्वातंत्र्याचा दुरुपयोग न करतां—मीं चित्रण केलेलें आहे. तें वाचतांना कांहीं तरी गवसल्याचा भास होऊन एखादा सुज्ञ वाचक थोडा वेळ जरी थबकला तरी सतत पस्तीस दिवस केलेल्या मेहनतीचें सार्थक झालें असें मला वाटेल. या पुस्तकांतील 'माझें घर' व 'माझा गांव' हीं दोन प्रकरणें केवळ माझ्याच घराचीं व गांवाचीं वर्णनें नाहींत. 'माझें' व 'माझा' हे शब्द केवळ नाममात्र. त्यांत अनेक गांवांचें व घरांचें सामाईक वर्णन आहे. पुस्तक छापल्यानंतर चुका या राहावयाच्याच. पृष्ठ पांसष्ट वर शेवटून तिसऱ्या ओळींत डॉ. राम कृष्ण नायक असें छापलें गेलेलें आहे. तें डॉ. राम कृष्ण हेगडे असें वाचावें.

या गोमंतक संकीर्तनाला साथ करण्याकरितां अनेक प्रसंगांत मला धीर देणाऱ्या आणि मजहून कितीतरी पटीनें श्रेष्ठ असलेल्या माझ्या दोन आधारांना मीं विनंती केली. त्यांपैकीं चित्रकार दीनानाथ दामोदर दलाल यांची मडगांव ही जन्मभूमि आणि सिद्धहस्त लेखक श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांची गोमंतक ही कुलपुरुषाची देवभूमि असल्यानें दोघांनींहि ती तत्काळ मानली आणि या पुस्तकाच्या बाबतींत आपला अभिमान सिद्ध केला. सुप्रसिद्ध चित्रकार

रघुवीर शंकर मुळगांवकर यांनीं आपलें एक सुंदर चित्र देऊन हातभार लावला. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार श्री. रायू खवळनाथ प्रभु यांनीं व एक हौशी छायाचित्रकार श्री. व्यंकटेश पै आंगले यांनीं आपआपलीं छायाचित्रें देऊन पुस्तकाला शोभा आणली याबद्दल त्यांचे आभार मानतों. गोमंतकांतील कांहीं थोर पुरुषांचीं व कलावंतांचीं छायाचित्रें देण्याची फार इच्छा होती; पण वेळेच्या अभावीं तें शक्य झालें नाहीं.

'मौज प्रिंटिंग ब्यूरो'चे मालक व माझे बंधुतुल्य स्नेही श्री. विष्णुपंत भागवत यांनीं आपल्या अफाट व्यापांत वेळ काढून हें पुस्तक सुबकपणें तयार करून दिल्याबद्दल, मौजेच्या कामगार बंधूंनीं आपुलकीनें सर्व कामें केल्याबद्दल व रंगीत चित्रांची सुंदर छपाई आशा प्रिंटरीचे श्री. मालपेकर यांनीं केल्याबद्दल या सर्वांचा मी आभारी आहें.

१५९ गिरगांव रोड
मुंबई ४

**गोपालकृष्ण भोबे**



**जत्रा**

चित्रकार : दीनानाथ दलाल



"कल्लि आसा गॉ ?"



"आतां करूं लावणी"

# तलवार आणि क्रूस

गोमंतक—नव्या युगाच्या, नव्या तेजाच्या, नव्या धारणेच्या महाद्वाराजवळ उभी असलेली अवघ्या बासष्ठ मैल लांबीची आणि चाळीस मैल रुंदीची ही भूमि. या भूमीबद्दल साऱ्या भारतवर्षांत—नव्हे पंचखंडांत आज अमाप कुतूहल उत्पन्न झालेलें आहे. कुण्या महान योग्याच्या शापानें या भूमीला साडे-चारशें वर्षांएवढा प्रदीर्घ काल परदास्यशृंखलांत अडकून पडावें लागलें कोण जाणे! का ऋषीश्वरांच्या यागाला लागणारें साहित्य हिनें पुरविलें नाहीं; का शिबिगौतमांसारख्यांना आपल्या तपाचरणाला हिनें स्थान दिलें नाहीं; का यक्ष-किन्नरांच्या साधनेंत हिनें विघ्न आणलें! काय असें झालें तरी काय, कीं ज्यायोगें या रमणीय अशा पाचूच्या भूवर शापभ्रष्ट होण्याचा प्रसंग यावा; आणि तिच्यावर सैतानांचीं पावलें उमटावीं!

असें सांगतात कीं एके काळीं धेनु-वत्सांनीं ही भूमि गजबजलेलीहोती. असंख्य गाई-

वासरांचें पालन करणाऱ्या आणि प्रतिगोकुळ असलेल्या या भूभागाला आर्यांनीं 'गोमंत' असें नांव दिलें. पुढें कालांतरानें कलात्मक दृष्टीच्या कुणा बुद्धिमंतानें लाडिकपणानें त्या शब्दाला 'क' प्रत्यय जोडून त्याचें 'गोमंतक' हें गोड नामाभिधान रूढ केलें. कांहींहि असो; पण स्थितिकर्त्याच्या वरदानानें हिरव्यागार चिरयौवनानें मुसमुसलेल्या, आपल्या विविध रंगगंधाचें संतत आव्हान करून सुबुद्धांना प्रभावित करणाऱ्या या भूमीला—थोडींथोडकीं नव्हे, साडेचार शतकें भ्रष्टाचारांत लोळावें लागलें; परंतु ती शापदग्ध अवस्था संपली. सतत शापणाऱ्या त्या यातनेंत देखील येथील मानवानें आपली शक्ति पणाला लावून अनलसपणें, अनन्यभावानें सत्य-शिव-सुंदराच्या उपासनेंत खंड पडूं दिला नाहीं. त्रिमूर्तीला करुणा आली. आणि स्वातंत्र्यदेवतेची कृपादृष्टि वळली. त्याच क्षणीं तिच्या परदास्यशृंखला खळखळा तुटल्या. अवघ्या चोवीस तासांच्या आंत तिची मुक्ति झाली.

ही भूमि चमत्कारांची आहे. आश्चर्यानें थक्क व्हावें असे चमत्कार या इवल्याशा भूप्रदेशावर घडले. खिस्तपूर्व कालीं तिची काय स्थिति होती, यावर तिच्या अनेक सुपुत्रांनीं संशोधन करून अनेक प्रकारचीं मतें व्यक्त केलेलीं आहेत, तिच्या कुशींत जन्म घेऊन सार्थक केलेलें आहे. सर रामकृष्णपंत भांडारकर, श्री. शेळडेकर, श्री. वर्दे वालावलकर, प्रा. पिसुर्लेकर प्रभृति स्वनामधन्य विचारवंतांनीं या भूमीचा इतिहास काय होता यावर अनेक प्रकारचीं भाष्यें केलेलीं आहेत. तो विषय मोठा गहन आणि अफाट. जितकें जावें तितकें खोल नेणारा. त्याला अंत नाहीं.

कुणी म्हणतात आज आहे त्यापेक्षां या भूप्रदेशाचें क्षेत्रफळ फार मोठें होतें. उत्तरेस दमणगंगा आणि दक्षिणेस गंगावली या दोन नद्यांच्या मध्यें अंतर्भूत होणाऱ्या सबंध प्रदेशपट्टीला तत्कालांत कोंकण असें म्हणत असत. आणि या कोंकणांत असलेल्या अनेक कीर्तिमान शहरांपैकीं गोमंतक हेंहि शहर कीर्तिमान होतें. या प्रदेशावर खिस्तपूर्व पहिल्या शतकापासून तों इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंत अनुक्रमें मौर्यांनीं

राज्य केलें, शातवाहनांनीं राज्य केलें, कदंबांनीं, शिलाहारांनीं व यादवांनींहि राज्य केलें. इतिहासकारांना त्यांच्या खुणा सांपडलेल्या आहेत.

शतकाशतकानें काळ पुढें सरकला आणि सद्धर्म थोडा काल विश्रांति घेऊं इच्छूं लागला. त्याच वेळीं भरतभूला यवनांचे पाय लागले. ते पाय गोमंतकापर्यंत पसरले. कोण्या कुयोगावर ते पाय लागले होते कोण जाणे; पण पंधराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत सुंदोपसुंदांच्या तावडींत सांपडलेल्या तिलोत्तमेसारखी गोमंतकाची अवस्था झालेली होती. एकाच्या हातून दुसऱ्यानें हिसकावून घेणें; दुसऱ्याचा खून करून तिसऱ्यानें घेणें; तिसऱ्याकडून चौथ्याकडे असें सारखें चाललें होतें. यवनाच्या सत्तेखालीं गोमंतक असतांनाच आणखी एक दुर्घटना घडली. वर्णानें गोऱ्यापान पण अंतरंगांत हालाहल ठेवून आलेल्या पुर्तुगाल देशांतील दर्यावर्दी आरमारी लोकांनीं इसवी सन १५१० च्या फेब्रुवारी महिन्यांत गोमंतकाच्या बंदरावर पाऊल ठेवलें. येथील तत्कालीन दुर्बल व विलासी यवन सुभेदार या शत्रूंशीं दोन हात करण्याऐवजीं पळून गेला आणि आरमारप्रमुख आफाँस द् आल्बुकॅर्क यानें एखादें फळ उचलून खिशांत टाकावें इतक्या सहज गोव्यावर कबजा केला. सुभेदाराचा वाडा ताब्यांत घेऊन त्यांतील सर्व स्त्रियांना कैद करून आपल्या आरमारावरील वखवखलेल्या शिपायांशीं त्यानें त्यांचीं लग्नें लावून दिलीं; आणि त्या संकरापासून आज गोमंतकांत 'मेस्तीस' या नांवानें ओळखली जाणारी प्रजा जन्माला घातली. या आल्बुकॅर्कनें गोमंतक हातांत येतांच पहिल्याप्रथम तिथली संस्कृति नामशेष करण्याचा प्रयत्न केला. तिथलें दिसेल तें देऊळ मोडून त्या ठिकाणीं चर्च उभारणें हें त्याचें पहिलें दुष्कृत्य. आणि 'सुलभ होईल त्या स्थानिक स्त्रीशीं संबंध जोडून संसार थाटा' हा आपल्याबरोबर आलेल्या नाविकांना त्यानें दिलेला गुप्त संदेश म्हणजे त्याचा दूरदर्शी मतलबीपणाचा महान डाव होता. या गुप्त संदेशांत सबंध गोमंतक पुर्तुगालरूप करणें हा आल्बुकॅर्कचा मुख्य हेतु होता.

आणि त्याचा तो हेतु त्याच्या इच्छेबरहुकूम सफल करण्याचें काम त्याच्यानंतर सोळाव्या शतकाच्या मध्यावर ख्रिस्ती धर्मप्रसारक सांतु

फ्रांसिस्कु शाव्हियॅर यानें मोठ्या हिरिरीनें केलें. हर हर! अनन्वित दुराचार, जुलूम, जबरदस्ती, जाळपोळ, मारहाण इत्यादि दहशतवादी प्रकारांनीं धर्मांतराचें भूत नाचूं लागलें. जो धर्मांतर करायला नाकबूल होई त्याला जिवंत जाळण्यांत येई. त्याकरितां एक धार्मिक न्यायसभाच स्थापन झाली होती. त्या न्यायसभेंत होणाऱ्या चौकशीला 'इंकिजिसांव' असें नांव होतें. हें नांव उच्चारलें कीं थरकांप होई. त्याच्या नुसत्या नामोच्चारानें अनेक लोकांना सहजपणानें बाटविण्यांत आलें. अशा दुर्धर परिस्थितींत हिंदुधर्माच्या अभिमान्यांना एकच मार्ग मोकळा होता तो म्हणजे गोमंतक सोडून जाणें आणि शेजारच्या मुलुखांत जाऊन आश्रय घेणें. त्यांनीं तोच मार्ग आचरला आणि धर्मरक्षणासाठीं मिळेल त्या वाटेनें गोमंतभूमि सोडली. या कालांत जवळजवळ बारा हजार हिंदु कुटुंबांनीं गोमंतक सोडला आणि तीं सारीं त्रावणकोरपासून कोचीनपर्यंत पसरलीं.

बाटाबाटींत यश मिळूं लागलें तसें आणखी एक नवें फर्मान निघालें—पाखंडी लोकांचीं देवळें मोडा आणि त्याच जागीं 'इगर्जी' (चर्च) बांधा असा आदेश पुर्तुगालहून देण्यांत आला. मग काय विचारतां सैतानाचा नंगानाच सुरू झाला. बार्देश महालांतलीं तीनशें देवळें भुईसपाट झालीं. सासष्टींतलीं दोनशें जमीनदोस्त झालीं; दानवाचा विजय होत चालला आणि देवांना मात्र मातीखालीं स्वतःला गाडून घ्यावें लागलें. त्या हाहाःकाराचें वर्णन शेषाच्या सहस्र जिभांनीं करावें; मानव तिथें असमर्थ ठरेल. 'मी धर्मांतर करणार नाहीं' असें उत्तर देणाऱ्याला अधिकाऱ्यानें दिलेल्या मारानें मृत्यु आला तर त्याला मुक्ति मिळावी म्हणून हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें त्याचें दहन न करतां त्याला कैदखान्यांतच पुरण्यांत येई. असे असंख्य लोक जिवंतपणींहि पुरले गेले. हें सारें 'शतकृत्य' करूनहि 'संत' म्हणून ख्रिस्ती जगाला जो ललामभूत झाला त्याचेंच नांव 'सांतु फ्रांसिस्कु शाव्हियॅर' ऊर्फ सेंट झेव्हियर. त्याचें शव गोव्यांत आहे असें सांगण्यांत येतें. ती शवपेटी दर्शनार्थ्यांना ज्या ज्या वेळीं उघडण्यांत येते त्या त्या वेळीं जगांतले अनेक ख्रिस्ती त्याच्या दर्शनासाठीं गोव्यांत येत असत—अजूनहि येतात.

या महाभयानक धर्मच्छलांतहि ज्या महात्म्यांनीं आपल्या प्राणाची पर्वा न करतां हिंदु संस्कृतीच्या खुणा जतन करून ठेवल्या ते त्रिवार धन्य होत. कालचक्राच्या फेऱ्यांचीं अनेक अवस्थांतरें होत गेलीं; पण धर्म आणि संस्कृतीचा तो ठेवा आजपर्यंतच्या पिढ्यांनीं अफाट निष्ठेनें आणि नाना युक्त्याप्रयुक्त्यांनीं जोपासला. जिवाचें रान करून वाढविला. असो. साडेचारशें वर्षांच्या पुर्तुगेजांच्या राजकीय कारकीर्दींत गोमंतक त्यांच्या हातून सोडवून घेण्याचेहि अनेक प्रयत्न झाले. मुसलमानांनीं केले. थोडेसे मराठ्यांनींहि केले. मराठ्यांचा हल्ला मात्र जबरदस्त होता. तो इतका, कीं तत्कालीन हतबल झालेल्या व्हाइसरॉयनें आपला राजदंड झेव्हियरच्या थडग्यावर टाकूनहि दिला होता; पण संकट टळलें. आणि पुर्तुगेजांचें आसन स्थिर राहिलें. तेव्हांपासून नव्या गव्हर्नरनें सत्ता ग्रहण करतांना त्या थडग्यावरूनच राजदंड उचलण्याची वहिवाट चालू झाली होती.

खुद्द गोमतकांत अनेक बंडें झालीं. पाद्र्यांचें बंड हें पहिलें बंड. त्यानंतर झालेलीं बंडें हीं ‘राण्याचीं बंडें’ या नांवानें प्रसिद्ध आहेत. हे राणे म्हणजे गोमंतकाच्या पूर्वेकडील सत्तरी प्रांतांतील डोंगराळ भागांत राहणारे वतनदार मराठे होत. सत्रोजी हा त्यांचा मूळपुरुष. या मूळपुरुषानें राजपुतान्यांतून दक्षिणेंत येऊन सत्तरी हा महाल जिंकून तिथें वसाहत केली. आणि प्रसंग येईल त्याप्रमाणें अनेकांचीं वर्चस्वें मान्य करूनहि त्यानें आपली सत्ता या प्रांतावर अबाधित ठेवली होती; सत्तरी महाल पुर्तुगेजांनीं काबीज केल्यानंतर देखील राण्यांच्या हक्कावर त्यांनीं गदा आणली नाहीं; पण कालांतरानें त्यांना दिल्या गेलेल्या सर्व सवलती हळूहळू कमी करण्यांत येऊन त्यांचे हक्कहि काढून घेण्यांत येऊं लागले. तेव्हां ही राणे जमात चवताळली आणि प्रतिकारार्थ सज्ज झाली. त्यांनीं चौदा वेळां स्वातंत्र्याचे प्रयत्न केले; परंतु आपसांतील दुहीमुळें ते चौदाहि प्रयत्न निकामी ठरले. असंख्य माणसें यांत कामीं आलीं. कित्येक

हद्दपार झाले. दिपाजी राण्याचा उठाव हा या स्वातंत्र्ययुद्धांतला सर्वांत मोठा उठाव. त्यानें गनिमी काव्यानें लढून पुर्तुगेज सरकारला त्राहि भगवन् करून सोडलें होतें. साडेतीन वर्षें पुर्तुगेज सैन्याच्या तोंडाला त्यानें फेस आणला. त्याला पकडण्याकरितां खुद्द गव्हर्नरांना स्वतः मोठ्या सैन्याचें नेतृत्व करीत वणवण हिंडावें लागलें, पण तो बहाद्दर कांहीं त्यांच्या हातीं लागला नाहीं.

दिपाजी राण्याच्या बंडाचें शमन करण्याच्या प्रयत्नांत पुर्तुगेज सरकारची गंगाजळीदेखील संपुष्टांत आली. सरकारनें तत्कालांत कर्ज उभारलें; पण तें कुणी घेईना म्हणून जबरदस्तीनें तें विकत घ्यायला भाग पाडावें लागलें. गव्हर्नरानें नाना तऱ्हेचीं कवटाळें केलीं, पण दिपाजी त्याला बधला नाहीं. दिपाजीनें अनेक गांवें आपल्या सत्तेखालीं आणलीं. लोकांनीं स्वखुशीनें त्याला आपला स्वामी मानलें. गव्हर्नर कंटाळला. तो राज्यकारभार सोडून पुर्तुगालला निघून गेला. पुढें राजकारभार चालविणाऱ्या समितीनें दिपाजीच्या सर्व अटी मान्य करून त्याच्याशीं तह केला.

दिपाजीच्या बंडानंतर कुष्टोबा नांवाच्या मराठ्यानेंहि बंड केलें. दादा राणे यांनीं केलेल्या बंडांतदेखील पुर्तुगेज सरकार बरेंच हवालदिल झालें होतें. त्यांची राजसत्ता सर्वतोपरी खिळखिळी करण्याचें श्रेय या बंडवाल्यांनीं मिळविलें होतें; पण आपआपसांतील दुही आणि क्षुल्लक मतभेद यांनीं जरी त्यांचा नाश केला तरी गोमंतक परसत्तेंतून मुक्त व्हावा यासाठीं त्यांनीं केलेले प्रयत्न सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्याइतके मोठे आहेत.

१५१० सालीं पुर्तुगेजांनीं गोमंतकांत प्रवेश केला तेव्हां त्यांच्या सत्तेखालीं बार्देश, मुरगांव व साष्टी हे तीनच महाल होते; परंतु आजच्या १४७२ चौरस मैलांचें क्षेत्रफळ असलेल्या गोमंतकावर आपली सत्ता प्रस्थापित करायला त्यांना थोडाथोडका नव्हे पावणेतीनशें वर्षें एवढा अवधि लागला. युरोपांतील बहुतेक राष्ट्रांनीं तर इतर चार खंडांतील दुर्बल राष्ट्रांवर स्वामित्व गाजवायचा विडाच उचललेला होता. ज्याला जें मिळालें तें तो गिळंकृत करीत होता. इंग्रज त्यांत मुख्य होते;

परंतु द्रव्यशोषण हें इंग्रजांचें किंवा इतर राष्ट्रांचें एकमेव तत्त्व होतें, तसें पुर्तुगेजांचें नव्हतें. ते लोक केवळ संपत्ति मिळते एवढ्यावरच समाधान मानणारे नव्हते. त्यांचा मुख्य उद्देश स्वतःची संस्कृति इतरांवर लादून सर्वत्र पुर्तुगेजमय करावें हा होता. पुर्तुगालपासून सात हजार मैलांच्या अंतरावर असलेली गोमंतभूमि आमरण पुर्तुगेजांच्याच ताब्यांत राहावयाची असेल तर भाषा, संस्कृति आणि पुर्तुगेज राष्ट्राभिमान हीं त्रिसूत्रें येथील जनतेच्या रोमरोमांत भिनून आम्ही रक्तानें पुर्तुगेज आहोंत असें येथील आम जनतेनें जगाला ओरडून सांगावें अशी त्यांची इच्छा होती. भारतीय संस्कृतीविषयींची जाणीव तर राहोच—उलट तिरस्कार उत्पन्न व्हावा म्हणून त्यांचे आटोकाट प्रयत्न चालले होते. आपल्या वसाहती हे आपल्या राज्याचे अविभाज्य घटक आहेत आणि तेथील लोकांनींहि ते मानावे यासाठीं त्यांचा सारा खटाटोप होता. आधीं त्यांनीं येथील स्त्रियांशीं विवाह करायचा सपाटा लावला. ती प्रथा सार्वत्रिक व्हावी याबद्दलहि प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यासाठीं त्यांनीं विवाह संस्कारावर कायद्यानें बंदी घातली. पुजारी, भट, वैदिक इत्यादि लोक गुप्तपणें विवाहसमारंभ घडवून आणायचा प्रयत्न करतांना आढळ-ल्यास 'इंकिजिसांव' संघटनेंत त्याची चौकशी होई, म्हणजे प्रत्यक्ष काळाच्या दाढेंतच त्यांची रवानगी होत असे.

बाप वारलेल्या हिंदु मुलांमुलींची आई किंवा नातेवाईक हयात असतांना किंवा त्यांचें संगोपन करायला तीं माणसें समर्थ असतांना देखील, अनाथ या शिक्क्याखालीं त्यांना बळजबरीनें ताब्यांत घेऊन ख्रिस्ती करावें असा दुसरा हुकूम जारी झाला होता. १५८७ सालांत तर हिंदूंना जानवें घालायची बंदी करण्यांत आली होती. त्याआधीं म्हणजे देवालयें जमीनदोस्त करणें, उत्सवास मनाई करणें, देवांच्या मूर्ति तयार करणाऱ्यांस हात तोडण्यापर्यंत कडक शासन करणें, धर्मग्रंथ बिशपांसमोर रचून त्यांत पाखंडी मतें आहेत म्हणून ते जाळण्याचा उत्सव करणें इत्यादि हुकूम हे कायदेशीर हुकूम म्हणून प्रस्थापित झाल्यानंतर १७०५ सालीं आणखी एक विचित्र जुलमी कायदा काढण्यांत आला. तो कायदा म्हणजे प्रत्येक

हिंदूच्या शेंडीवर सालीना आठ रुपये एवढा कर बसविण्यांत आला. हा पराकाष्ठेचा जुल्म एका बाजूनें चालू असतांनाच दुसऱ्या बाजूनें नाना तऱ्हेचीं प्रलोभनेंहि दाखविण्यांत येत होतीं. सारांश 'येनकेन प्रकारेण' आपला धर्म रुजावा ही पुर्तुगेजांची मनीषा होती; परंतु या सर्व यमयातना साहून, हालांत दिवस काढीत, चोरांसारखे लपून छपून काल कंठीत, रानावनांतून वणवण फिरत, सर्वस्वत्याग पत्करून आपला देव, आपला धर्म, आपले आचारविचार, आपली भाषा यांचें ज्यांनीं रक्षण केलें त्यांना त्रिवार वंदन असो ! जगांतलीं सर्व सत्यें त्यांचें नांव अमर करोत ! पुढच्या कित्येक पिढ्या त्यांचे सहस्रशः नव्हे परार्धशः आभारी राहतील, ऋणी राहतील. कोटि कोटि प्रणाम करूनहि त्यांचें ऋण फिटलें जाणार नाहीं.

सबंध जग पालटूं लागलें त्याबरोबरच पुर्तुगाललाहि आपला काया-पालट करणें भाग पडलें. १९१० सालीं पुर्तुगाल हें राष्ट्र प्रजासत्ताक राष्ट्र झालें आणि त्यावेळीं म्हणजे चारशें वर्षें उलटल्यानंतर येथील हिंदूंना तात्पुरतें धार्मिक स्वातंत्र्य मिळालें. बाटग्या खिश्चनांची पायाची तिडीक मस्तकाला गेली खरी पण याहून म्हणजे त्यांनीं संतापानें जळून जावें अशी आणखी एक घटना घडली. आणि ती म्हणजे सरकारची संपूर्ण सहानुभूति हिंदूंना मिळाली. लोकसभेसाठीं खिश्चनांनीं उभा केलेला प्रतिनिधि आपटला जाऊन हिंदूंनीं उभा केलेला प्रतिनिधि निवडून आला. आणि गोमंतकीय हिंदूंना आपला उत्कर्ष साधून घ्यायला पूर्ण वाव दिला गेला. चमत्कार झाला खरा पण तो सत्य होता. कारण जो खिस्ती झाला तो पुर्तुगेज झाला. पुर्तुगेजांच्या वांट्याला येणाऱ्या सर्व सवलती त्याला मिळायच्या. जेत्यांच्या वांट्याला येणारीं सर्व सुखें त्याच्याभोंवतीं पिंगा घालायचीं. आजवर तो करील ती पूर्व, अशी अवस्था असतांना हें घडलें कसें याकडे सर्व बाटगा खिस्ती समाज डोळे फाडफाडून बघूं लागला. खिस्ती धर्मरक्षकांनीं या प्रसंगीं अकांडतांडव केलें; बहिष्काराची

दहशतहि घातली. पण हिंदूंचा तो प्रतिनिधि लोकसभेंत जाऊन बसलाच. राजकीय स्पर्धेत विजयाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

प्रजासत्ताक स्थापन झाल्यानंतर पुर्तुगालनें 'धार्मिक बाबतींत आम्ही तटस्थ राहूं व सर्व धर्मांस सारखी वागणूक देऊं' अशी घोषणा केली. हिंदू लोकांच्या आनंदाला त्यामुळें पारावार राहिला नाहीं. पंचप्राणाची कुरवंडी करून चार शतकें जपून ठेवलेला संस्कृतीचा ठेवा आतां उघडपणें मस्तकावर घेऊन मिरवायची संधि त्यांना मिळालेली होती. शतकानुशतकें कोंडून ठेवलेला आनंद उफाळून आला आणि जो एक उत्सव झाला त्याला सीमा नाहीं. नंतरच्या अठरा वर्षांत झपाट्यानें प्रगति होत राहिली. ती इतकी पुढें गेली कीं, जबरीनें बाटविलेल्या आदिवासींचें शुद्धीकरण करून त्यांना परत हिंदुधर्मांत घ्यायचे प्रयत्न गुप्तपणें सुरू झाले. शेंकडों गावड्यांना यथाविधि हिंदु करून सर्वतोपरी त्यांच्या संरक्षणाची जबाबदारीहि तें सत्कृत्य करणाऱ्या धुरीणांनीं स्वीकारली. सरकारच्या कानापर्यंत या गोष्टी गेल्या. कांहीं पोटजाळ्या हिंदु लुब्र्यांनींच तत्कालांत ही चुगली केली; पण सरकार या बाबतींत तटस्थ राहिलें. १९१७ सालीं तर कळस झाला. प्रांतिक मंत्रिमंडळांत बहुसंख्य हिंदु उमेदवार निवडून आले आणि ख्रिस्त्यांचा प्रचंड पराभव झाला. ख्रिस्ती धर्ममार्तंडांची त्यामुळें पुरेपूर खात्री झाली कीं, आपण समजतों त्याप्रमाणें गोमंतकांतील हिंदुसमाज मेला नाहीं. तो जिवंत आहे. धुमसणाऱ्या ज्वालामुखीसारखा जागृत आहे. जितक्या जोरानें चिरडला, त्याच्या दुप्पट जोरानें तो फोफावलेला आहे.

'सरशी तिथें पारशी' अशी एक म्हण आहे. ख्रिस्त्यांचेंहि तसेंच. जे एके काळीं जेत्यांच्या मग्रुरीनें वागत होते तेच तावडतोब दासानुदासाच्या दीनतेनें वागूं लागले. हिंदूंच्या घरांत जायचें म्हणजे भ्रष्टाकार मानणारे तीच गोष्ट सोवळी समजूं लागले. आपल्या हितासाठीं असंख्य खेपा घालूं लागले. 'इर्मांव, इर्मांव' (भाई भाई) म्हणूं लागले. विसाव्या शतकाचीं पहिलीं दोन दशकें सरायच्या आंतच सर्व सरकारी खात्यांत हिंदूंना प्रवेश मिळाला. आपल्या तीक्ष्ण बुद्धीच्या जोरावर मुलकी

व्यवस्थेच्या खात्यांत, जकातखात्यांत, तारखात्यांत, टपालखात्यांत, आरोग्य, जमीनमोजणी, प्राथमिक शिक्षण, विश्वविद्यालय इत्यादि सर्व ठिकाणीं हुद्दयाच्या जागा हिंदूंना मिळाल्या. त्यांच्या सल्लयाशिवाय कांहीं चालूंच नये अशी परिस्थितीहि निर्माण होऊं लागली; पण हें सर्व घडत असतांनाच सबंध भारतवर्षांत गुप्तपणें पसरत असलेल्या स्वातंत्र्य चळवळीकडेहि स्वातंत्र्यप्रेमी गोमंतकीयांचें लक्ष होतें. बंगालमध्यें काय घडत आहे, पंजाबांत काय घडत आहे, महाराष्ट्र काय करीत आहे हें सर्व वर्तमान अनेक मार्गांनीं गोमंतकांतील जागृत हिंदूला कळत होतें. असंतोषाच्या उसळत्या लाटांचे तुषार गोमंतकावर अजाणतां पडत होते. जसजसा हिंदुस्थानांतील चळवळीला जोर येऊं लागला आणि ती चळवळ दडपून टाकण्याकरितां इंग्रज सरकारची शक्ति खर्च होऊं लागली तसतशी पुर्तुगेज सरकारचीहि चिंता वाढूं लागली. 'आसेतुहिमाचल' पेटलेल्या क्रांतीची धग गोमंतकाला लागल्याशिवाय राहायची नाहीं या भीतीनें हिंदूंच्या वाढत्या सवलतींवर लगेच बंधनें घालण्यांत आलीं. पुन्हा ख्रिश्चन धर्मप्रसारकांना अग्रपूजेचा मान देण्यांत आला. त्यांच्या प्रचाराला सरकारी तिजोरीचीं द्वारें मुक्त झालीं. पुन्हा 'क्रुज' आणि तलवार यांची दिलजमाई होऊन ते हातांत हात घालून चालूं लागले.

गोमंतकांतील हिंदनिष्ठ हिंदूंना हें सारें पूर्वीपेक्षांहि तापदायक वाटूं लागलें. त्यांतून केवळ पुर्तुगेजनिष्ठ राहणें एवढ्यापुरतेंच असतें तर गोष्ट वेगळी होती; पण श्रद्धास्थानांवर व त्यांच्या पूजाअर्चेवरहि बंधनें घातलीं गेलीं तेव्हां मात्र स्वस्थ राहणें अशक्य झालें. प्रगत झालेल्या विज्ञान-युगांत राहणाऱ्यांना तें मुकाट सोसणें म्हणजे रानटीपणाचें लक्षण होतें. हिंदुस्थानांतील एखाद्या थोर माणसाचें पुण्यस्मरण करणें हेंदेखील नियमबाह्य ठरविण्यांत आलें. सभा किंवा जमाव यावर कायमची बंदी घालण्यांत आली. सांस्कृतिक कार्य करणाऱ्या लहानसहान संस्थांनीं सरकारची नवी नियमावली मान्य केलीच पाहिजे न पेक्षां संस्था बंद कराव्या असें फर्मान काढण्यांत आलें. आपसांत कुजबुजणाऱ्या चारचौघांना दहशतवादी समजण्यांत येऊं लागलें. पूर्वीं सुलभपणें चालू असलेल्या मराठी शाळांना

आपला प्रपंच चालविणें कठीण झालें. लेखन व मुद्रण यांवर तर विलक्षण व विचित्र बंधनें लादलीं गेलीं. साधी लग्नपत्रिका किंवा एखादी कार्यक्रमाची जाहिरात छापतांना देखील तिचा तपशील महत्प्रयासानें पास करून घ्यावा लागूं लागला. छापायचा कोणताहि मजकूर तो कोणत्याहि अन्य भाषेंत असला तर त्याच्या दुसऱ्या बाजूस पुर्तुगेज भाषेंत त्याचा अनुवाद असलाच पाहिजे; शिवाय तपासणी अधिकाऱ्यांच्या तो किंचितहि संशयास पात्र झाला तर तो रद्द समजण्यांत येत असे. स्थानिक मराठी वृत्तपत्रांना दहा हजार रुपयेपर्यंत रक्कम अनामत म्हणून ठेवणें भाग पाडण्यांत आलें.

दुसरें महायुद्ध सुरू होईपर्यंत गोमंतकाचा अन्नवस्त्राचा आधार सर्वस्वीं हिंदुस्थान हाच होता; परंतु महायुद्ध सुरू होतांच खुद्द हिंदुस्थानांतच त्याचा तुटवडा भासूं लागल्यानें ब्रिटिश सरकारनें त्यावर नियंत्रणें घातलीं. इतर देशांप्रमाणें गोमंतकांतहि शिधापद्धति चालू झाली. एके काळीं ज्या हिंदी चलनाला किंमत होती ती किंमत एकाएकीं नाहींशी होऊन शंभर हिंदी रुपयांची किंमत गोमंतकांत ८५ रुपये झाली. शिवाय सरकारमान्य दुकानांत वा सरकारी कचेऱ्यांत पुर्तुगेज नाणेंच घेतलें जाईल असाहि एक नवा फतवा निघाल्यामुळें सरकारी अधिकारी आणि काळाबाजार करणारे यांच्यांत सामान्य लोकांना गांजण्याची चुरस लागली. नागरिक स्वातंत्र्याची सर्वत्र क्षेत्रांत गळचेपी झाल्यामुळें संधिसाधूंचें फावलें. त्यांनीं त्यांत हवा तसा हात धुवून घेतला.

तिकडे हिंदुस्थानांत असहकारितेच्या चळवळीचा डोंब जोरानें पेटला होता. त्याच्या ज्वाळा गगनाला भिडूं पाहात होत्या. महायुद्ध पेटत होतें तशी हिंदवी स्वातंत्र्याची चळवळहि पेटत होती. श्रीमंत आईवडिलांचा एकुलता एक लाडका मुलगा असो, नुकताच बोहल्यावर चढलेला तरुण असो, कॉलेजांत शेवटच्या वर्षांत शिकणारा आणि कुटुंबाचा एकमेव असा आधार असो किंवा सरकारी नोकरीशीं आयुष्याचें भविष्य निगडित असलेला एखादा गृहस्थ असो; अजून जिची हळद उतरली नाहीं अशी नवोढा असो, किंवा प्रणयाच्या स्वप्नरंगांत कालपर्यंत रंगणारी एखादी

तरुणी असो-सर्वांनींच ऐहिक सुखावर लाथ मारून हिंदुस्थान स्वतंत्र करायच्या इच्छेनें असहकारितेच्या चळवळींत उडी घेतली होती. महान् महान् नेते तुरुंगांत धाडले जात होते. कित्येक लाठीमारांत मेले, कित्येक बंदुकांच्या गोळ्यांना बळी पडले, कित्येक मारतां मारतां मेले; पण स्वातंत्र्याची चळवळ मंदावली नाहीं. कॉंग्रेसची एक शाखा गोमंतकांतहि स्थापन झाली होती; पण दडपशाहीच्या परिस्थितींत तिचें कार्य मर्यादित होतें. कॉंग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनास गुप्तपणें गोमंतकातर्फे प्रतिनिधीहि पाठविला जात होता. श्री. त्रिस्तांव ब्रागांस द् कुन्या व श्री. व्यंकटेशराव सरदेसाई हे दोघे स्वातंत्र्यप्रिय गृहस्थ ही संस्था चालवीत होते, तिचें कार्य निष्ठेनें करीत होते. पुढें या संस्थेची एक शाखा मुंबईत स्थापन होऊन बिनधोकपणें तिचें कार्य चालू राहिलें. या मुंबईतील शाखेनें इंग्रजींत कांहीं पुस्तकें प्रसिद्ध करून गोव्याचें सत्य स्वरूप आणि तेथील अंधाधुंदी सर्व जगाच्या निदर्शनास आणून दिली. १९४२ सालीं जें प्रचंड आंदोलन झालें त्या आंदोलनांतील अनेक क्रांतिवीरांना गोमंतकीय स्वातंत्र्येच्छूंनीं फार मोठा धोका पत्करून संरक्षण दिलें होतें.

१९४५ साल संपेपर्यंत असहाय गोमंतकीय स्वातंत्र्यप्रेमी हिंदूंनीं पुर्तुगेजांच्या असह्य जुलुमाला कसेंबसें तोंड दिलें; पण १९४६ च्या जून महिन्यांत डॉ. राममनोहर लोहियांनीं नागरिक स्वातंत्र्यनियंत्रणाचा कायदा मोडला. आणि १८ जून रोजीं मडगांवच्या महापालिकेसमोरच्या मैदानावर जाहीर भाषण करून लोकांच्या मनांत अपूर्व अशा स्फूर्तीची प्रेरणा केली. 'जयहिंद' या महामंत्राचा गगनभेदी उच्चार झाला, आणि तिरंगी झेंडा ठिकठिकाणीं फडकूं लागला. सैतानाचें माथें भडकलें. त्यानें हातांत शस्त्र घेऊन नंगानाच सुरू केला. त्याच्या शस्त्राचा मारा दिसेल त्याच्यावर चालला. स्त्रिया आणि लहान मुलें असा भेदभाव त्यानें केला नाहीं. इथून चळवळ पेटली, दिवसेंदिवस फोफावत राहिली. अनेक सुशिक्षित स्त्रीपुरुषांनीं स्वेच्छेनें तुरुंगवास पत्करला. वकील, डॉक्टर, व्यापारी, सरकारी नोकर, विद्यार्थी, गृहिणी, विद्यार्थिनी सर्वांनींच या सत्याग्रहांत भाग घेऊन—'चालते व्हा' असा खणखणीत आदेश

पुर्तुगेजांना दिला. सव्वाचारशें वर्षांच्या कारकीर्दीत राण्यांच्या बंडानंतर असा जबरदस्त धक्का पुर्तुगेज राज्यकर्त्यांना कुणीं दिला नव्हता. ही लढाई शस्त्रांना शस्त्रें भिडवून होत नव्हती. ती तशी असती तर ज्या वेळीं संघर्ष घडला त्याच वेळीं निर्णय लागला असता. जेते थै थै नाचले असते आणि जित सर्वस्व हरून बसले असते. परंतु हा संग्राम एका अतिप्रचंड अदृश्य शक्तीशीं होता. या शक्तीला ठेचायचा प्रयत्न करणारेच ठेचले जात होते. पुर्तुगेजांना वाटलें. इंग्रज लोक मूर्ख होते. त्यांना महात्मा गांधीसारख्या एका शरीरानें दुबळ्या असलेल्या मनुष्यप्राण्याला सहज गोळी घालून मारतां आलें नाहीं. तसें तें ठिकठिकाणीं बोलूनहि दाखवीत. प्रत्येक चर्चमध्यें धर्मगुरूंना बोलायला लावीत. भारतीय पुढाऱ्यांची यथेच्छ निंदाहि करीत. त्यांनीं 'जयहिंद' हा शब्द उच्चारण्याची बंदी केली. तो शब्द उच्चारणाऱ्यांना घोर शिक्षा केल्या. सत्याग्रह करणाऱ्यांना जास्तींत जास्त कडक शिक्षा फर्माविल्या. आणि आयुष्यांत पुन्हा डोकें वर काढतां येऊंच नये अशा रीतीनें जायबंदी करण्याचे प्रयत्न केले. सत्याग्रहींना शिक्षा करण्याकरितां कांहीं उलटया काळजाच्या पशुवृत्तीच्या लोकांची नेमणूक केली. हेतु हा कीं या भीतीनें ही चळवळ कायमची दडपली जाईल; पण हा काळ 'इंकिजिसांव'चा काळ नव्हता. चार शितें विहिरींत टाकल्यानें आजचा हिंदु बाटत नव्हता. आजचा हिंदु हा खिश्चनाकडचें खाऊन आणि पिऊनहि पुन्हा हिंदूच राहात होता. कांहींनीं खिस्ती तरुणींशीं लग्नेंहि केलीं होतीं आणि 'बाटणें' हा शब्द कायमचा गाडून टाकला होता. धार्मिक भयाचें भूत केव्हांच पळून गेलें होतें. म्हणून लढा चिरडून टाकण्याचे पुर्तुगेज सरकारचे आडदांड प्रयत्न निकामी ठरले. अदृश्य शक्ति दिवसेंदिवस अधिकाधिक वाढूं लागली.

१९४७ सालीं हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळालें. आतां आपलें स्वातंत्र्य फारसें दूर नाहीं, तें दारापर्यंत येऊन ठेपलें असें गोमंतकीय स्वातंत्र्यवाद्यांना वाटणें स्वाभाविक होतें. त्यांनीं उघड उघड स्वातंत्र्याचा पुरस्कार करायला सुरुवात केली. आणि पुर्तुगेजांनीं दिलेल्या हद्दपारीच्या शिक्षाहि शेंकडों तरुणांनीं हांसत हांसत पत्करल्या. भारत सरकार येऊन

नाबडतोब आपली आणि आपल्या प्रिय भूमीची सुटका करील अशी त्यांना आशा वाटत होती; पण घडलें कांहीं निराळेंच. भारतसरकारचें आस्तेकदम धोरण कोठवर आणि कोणत्या स्वरूपाची मजल गांठणार आहे हें कुणाला कळेना. शिक्षा भोगणारे निव्वळ शिक्षा भोगतच राहिले आणि यांतून कांहीं निष्पन्न होतच नाहीं असा निष्कर्ष निघूं लागल्याचें दिसतांच गोमंतकांतली चळवळ बंद पडली; पण गोमंतका-बाहेर ती मुंगीच्या पावलांनीं चालू राहिली. 'भारतसरकार इथें येत नाहीं, येऊंच शकत नाहीं.' असा प्रचार पुर्तुगेजांनीं दाही दिशांनीं सुरू केला. कालांतरानें भारतसरकारशीं असलेले राजनैतिक संबंधहि त्यांनीं तोडून टाकले. 'गोमंतक हा पुर्तुगालचाच एक भाग आहे. गोमंतकीय हे सारे पुर्तुगेज आहेत' असा घोष सातत्यानें चालू राहिला. पुन्हा दोनशें वर्षांपूर्वीची री ओढली गेली. अत्यंत सामान्यांतल्या सामान्य माणसाला सुखी करण्याचे प्रयत्न चालू झाले. पोस्टाच्या शिपायाचा पगार सहापटीनें वाढला आणि पुर्तुगेज प्राथमिक शाळेंतल्या शिक्षकाचा पगार साठ रुपयांवरून सहाशें रुपयांवर नेण्यांत आला. लोक संतुष्ट झाले. भारतांतल्या लोकांपेक्षां आम्ही कितीतरी पटींनीं सुखी आहोंत अशी त्यांची दृढ भावना झाली. त्यांतच आणखी एक चमत्कार घडला. गोमंतभूमींत अफाट खनिज संपत्ति असल्याचा शोध जपान आदि देशांना लागला आणि त्यांनीं पुर्तुगेज सरकारशीं देवाण-घेवाणचा करार करून ही खनिज संपत्ति खणून काढण्यापासून आपल्या देशांत नेण्यापर्यंतची सर्व व्यवस्था करण्याचें पत्करलें. या खनिज संपत्तीच्या निर्यातीमुळें गोमंतकाचा विलक्षण कायापालट झाला. मध्यमवर्गीत रंकांचे राव झाले. आणि रावांचे त्याहून थोर झाले. पांचहि खंडांतल्या मूल्यवान चैनीच्या वस्तूंची आयात गोमंतकांत होऊं लागली. गरीब धाकटा चकचकीत मोटार वापरूं लागला. छनछनाट, किणकिणाट, घमघमाट असा सारा बेफाम थाटमाट जिकडेतिकडे दिसूं लागला. तो सोनेरी झगमगाट पाहण्याकरितां अनेक देशांतील लोक तळमळूं लागले.

जो जो भारताचा शत्रु तो तो पुर्तुगेजांचा मित्र झाला. बिगरपरवाना

चोरून आयात-निर्यात करणाऱ्यांचें गोमंतक हें केंद्र बनलें. त्यांच्यापासून लाग साधणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या खिशांत सोन्याच्या मोहरा खुळखुळूं लागल्या. ही सारी मायावी परिस्थिति होती, ती क्षणभंगुर होती हें स्थितप्रज्ञांना कळत होतें; पण त्यांना तोंड दाबून स्वस्थ बसण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. डोळे असून पाहूं नये, कान असून ऐकूं नये, तोंड असून बोलूं नये असा दंडकच त्यांनीं आपल्यावर लादून घेतला. अशा या बेगडी वातावरणामुळें चैनी आणि गरजा यांची बेसुमार वाढ झाली. श्रध्देला तडा जाऊं लागला. सारा सुज्ञ समाजहि सवंग प्रलोभनाला भुलून परंपरेची कास सोडायच्या काठावर येऊन उभा राहिला. नवी पिढी एक विचित्र रूप घेऊन वावरूं लागली. ‘गोमंतक हा भौगोलिक दृष्ट्या भारताला सलग असला तरी धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या तो पूर्णपणें पुर्तुगेज असून पुर्तुगालचा तो अविभाज्य भाग आहे’ अशी ओरड पुर्तुगेज अधिकारी साऱ्या जगांत करूं लागले. जगांतील मुत्सद्द्यांना पाचारून ती परिस्थिति दाखवूं लागले. जुन्या पिढीला ‘धाव रमापति ज्ञानविलासा’ असा धावा करण्याखेरीज आणि सुटकेची वाट पाहात बसण्याखेरीज दुसरा उपाय राहिला नाहीं. ‘अरे, या मायावी आभासापेक्षां स्वातंत्र्याची किंमत फार मोठी आहे रे!’ हें ते सांगत होते; पण कुणाला तें ऐकूंच जात नव्हतें.

पुर्तुगालच्या अन्यायाला भारतानें निषेध व्यक्त करणें आणि पुर्तुगेजांनीं तो निषेधाचा खलिता केराच्या टोपलींत फेकून देणें, आणि वर मग्रुरीची भाषा बोलणें, याव्यतिरिक्त १९४७ पासून १९६१ च्या डिसेंबर महिन्यापर्यंत चौदा वर्षें कांहींच घडत नव्हतें. नाहीं म्हणायला महाराष्ट्रांतील धडाडीच्या पुढाऱ्यांनीं गोव्याच्या सीमेवर जाऊन सत्याग्रहींसह गोमंतकांत प्रवेश करायचा प्रयत्न केला; पुर्तुगेजांनीं केलेल्या गोळीबारांत अनेक सत्याग्रहींनीं धारातीर्थीं देह ठेवला. पुढाऱ्यांना गोमंतकांत पुर्तुगेज तुरुंगांत खितपत पडावें लागलें. कांहीं गुप्त संघटनांनीं दहशतवादी कृत्येंहि केलीं. कुठें चौकीवर छापा घालून तेथील दारूगोळा हस्तगत कर, कुठें एखाद्या दुष्ट पुर्तुगेज अधिकाऱ्याचा प्राण घे, अशी चळवळ

चालू राहिली; पण तेवढ्याशा चळवळींनें आजूबाजूच्या निरपराध लोकांचा पुर्तुगेज अधिकारी विनाकारण छळ करीत. अखेरीस १९६१ चा डिसेंबर महिना उजाडला. दुर्जनांचे शंभर अपराध भरलेले नियतीनें पाहिले. तिनें भारतीय राज्यकर्त्यांना प्रेरणा दिली; आणि दिनांक १९ डिसेंबर रोजीं भारतीय शूर सैन्यानें गोमंतकांत प्रवेश करून काय झालें हें तेथील लोकांना कळायच्या आधींच सूर्योदयाबरोबर भारताचा विजयी तिरंगा पणजीच्या राजधानीवर फडकविला. साडेचारशें वर्षे उराशीं जपलेल्या स्वप्नाचें सत्यस्वरूप दृष्टिगोचर झालें. सज्जनांनीं सुटकेचे निःश्वास सोडले. काय करूं आणि काय नको असें त्या महन्मंगल दिवशीं होऊन गेलें. त्या स्वातंत्र्याला पंचप्राणाच्या पंचारतीनें त्यांनीं ओवाळलें. चारशें एकावन्न वर्षे क्रूर साम्राज्यवादी अजगराच्या विळख्यांत खुरटलेल्या देहांत त्राण राखून सर्व तऱ्हेचे जाच सहन करीत करीत त्यांनीं तिची मार्गप्रतीक्षा केली होती, ती स्वतंत्रता अखेर आली होती.

त्या दिवशींचा आनंद काय वर्णावा! ब्रह्मा-विष्णु-महेशादि सर्व देवांचे दीपस्तंभ आपले लक्ष दिवे उत्स्फूर्तपणें उजळून स्वातंत्र्यदेवीच्या स्वागतासाठीं सज्ज झाले. सर्व नद्या जणूं चिरंतन पावन झाल्यासारख्या दुथडी भरून वाहूं लागल्या आहेत असा भास झाला. गोमंतकाचा निसर्ग त्या दिवशीं असा फुलला कीं जणुं जाई-जुई-बकुल-चंपकादि फुलांची कुसर असलेला तो निसर्गसुंदर हिरवा शालूच गोमंतभू त्या स्वातंत्र्यदेवीला अर्पण करीत होती. आम्र-फणसादि तरु बहरलेल्या मोहरांच्या चवऱ्या ढाळीत उभे होते. कल्पतरूंचे सुधाकुंभ तृषा शमविण्याकरितां अधीर झाले होते. भाग्य फक्त एकच, कीं आपल्या पशुतुल्य कृत्यांनीं आपला धर्म बळजबरीनें दुसऱ्यावर लादत असतांना देखील, शासनकर्त्या नरपशूंच्या नाकावर टिच्चून, ज्यांनीं गुप्त रीतीनें शेंकडों बाटविलेल्या कुणब्यांच्या मनावर संस्कार करून त्यांना हिंदु करून घेतलें, ती पिढी हें स्वातंत्र्य पाहायला पूर्वपुण्याईनें हजर राहिली त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले होते. त्यांचे ओठ कांहींतरी पुटपुटत होते. जणूं त्यांना म्हणायचें होतें—'हे स्वातंत्र्य देवते, तुझ्या उदयानें



शिवशक्ति

चित्रकार : रघुवीर मुळगांवकर



सोनेरी शरद



नित्यक्रम

सर्व विघ्नांचा आतां नाश झाला आहे. सर्व पापी बुडाले आहेत. अभक्तांचा क्षय झालेला आहे. धर्मच्छल करणाऱ्या नष्ट चांडाळांचा संहार झालेला आहे. जिवाचें रान करून आजवर जपून ठेवलेला हा कैवल्याचा मुकुट तुझ्या मस्तकीं धारण कर आणि या गोमंतभूमींत तूं चिरकाल राहा !!!'

# माझें घर

माझ्या घराभोंवतीं आणि माझ्या गांवाभोंवतीं माझ्या कितीतरी मौल्यवान स्मृति गुंफलेल्या आहेत. एखाद्या वेळीं या स्मृति एकवटतात आणि माझ्या गात्रागात्रांतून बाहेर फुटूं पाहतात! त्या स्मृतींचा सुवास माझ्या सर्व चित्तवृत्ति चेतवतो; मला बेचैन करतो. संस्कृतीचें किती भव्य आणि उदात्त स्वरूप मीं पाहिलें! तें स्वरूप माझ्या दृष्टीसमोर कायमचें रेंगाळत आहे! पळापळाला मी त्या स्मृतींच्या मधुर रसांत मिसळत आहें! कारण त्या स्मृतींचें सुख अजर आहे, अमर आहे! किती निरागस, निर्मल आणि निश्चित होतें तें जीवन!

पहाटेला मला जाग येई ती एका लयबद्ध वजनदार अशा नादमधुर स्तोत्राच्या श्रवणानें ...."हरि ॐ विश्वं विष्णुर्वषट्कारो भूतभव्य-भवत्प्रभुः। भूतकृद्भूतभृद्भावो भूतात्मा भूतभावनः॥ भूतात्मा परमात्मा च मुक्तानां परमा गतिः। अव्ययः पुरुषः साक्षी क्षेत्रज्ञोऽक्षर एव च॥" विष्णुसहस्र नामांतला 'चुकलों' दिव्यसहस्र-

नामांतला; (कारण माझे वडील त्या स्तोत्राला नुसतें विष्णुसहस्रनाम असें म्हणत नसत. 'श्रीविष्णोर्दिव्यसहस्रनाम' असें म्हणायचें) सर्व पापांचा नाश करणारा एकेक गोळीबंद शब्द कानावर आदळूं लागला, कीं तीं सहस्रनामें संपेपर्यंत पुन्हा झोप म्हणून येत नसे. त्यांतले सुंदर अनुप्रास तर पुन्हा पुन्हा ऐकावेसे वाटत. अजून ते तशाचे तसेच आठवतात—"श्रीदः श्रीशः श्रीनिवासः श्रीनिधिः श्रीविभावनः। श्रीधरः श्रीकरः श्रेयः" .... अहाहा — स्तोत्राच्या रचियेत्यासमोर जणूं प्रत्यक्ष शंख-चक्रगदा-पद्म-हातीं घेतलेली श्रीविष्णूची मूर्तीच उभी होती. प्रेरणा देऊन तीच तें स्तोत्र वदवत होती.

त्या स्तोत्राच्या गुंगींत पुन्हा डोळ्यांवर झांपड रेंगाळूं पाहे; पण घरांतल्या जाणत्या माणसानें 'उठा उठा हो सकळिक' म्हणत घराचा मुख्य दरवाजा अडसर काढून उघडल्याचें 'करकर्र कडामधुम' असे आवाज येत. घराचा मुख्य दरवाजा एकदां पहाटे उघडला तो पुन्हा रात्रीं सर्व सामसूम झाल्यावर 'कोण बाहेर गेला आहे का?' वगैरे चौकशी होऊन अकराच्या सुमाराला बंद व्हायचा. सकाळीं उघडलेला दरवाजा मधल्या वेळीं कधींहि बंद करीत नसत. दारें चांगलीं वीत-वीत रुंदीचीं भक्कम, त्यामुळें वाऱ्यानें बंद व्हायची भीति नव्हती. सोसाट्याच्या वाऱ्याची देखील छाती नव्हती. दिवसा दरवाजा बंद होणें हें अशुभ मानलें जाई. आमच्या म्हणजे गोमंतकांतील हिंदु मध्यमवर्गाच्या घरांची रचना देखील विचारपूर्वक आणि कांहीतरीं दूरदृष्टि ठेवून केलेली. प्रत्येक घराच्या दर्शनी भागाला एक 'बलकांव' (ओटा) असतेंच. त्या बलकांवाला मजबूत बांधणीचे सोपे असतात. बाहेरून आलेल्या कुणींहि पाहुण्यानें प्रथम त्या सोप्यावर बसायचें. बलकांवाच्या आंतमध्यें ओसरी. ओसरीला लागून एक लहानशी कमी उंचीची माडी. ओसरी ओलांडली कीं राजअंगण असलेली चौखी. (अंगणाच्या चारी बाजूंना असलेल्या छपराखालच्या जागेला चौखी म्हणतात.) या अंगणांत तुळशीवृंदावन असतें. चौखीच्या डाव्या हाताला देवघर आणि माजघर. माजघराला लागून मोठें स्वयंपाक-घर व कांहीं खाजगी खोल्या आणि अंगणाच्या उजव्या बाजूला

न्हाणीघर, कोठी आणि आणखी कांहीं लहान लहान स्वयंपाकघरें. माजघराला लागून असलेल्या स्वयंपाकघरांत सारें कांहीं सोवळें तेवढें शिजवायचें आणि बाहेरच्या स्वयंपाकघरांत मासळी खाणाऱ्यांचा स्वयंपाक व्हायचा.

घराच्या उजव्या हाताला मोठें परसूं आणि डाव्या हाताला लहान परसूं. मोठ्या परसाच्या एका कोंपऱ्यांत वास्तुदेवतेची प्रतिष्ठा असल्यानें त्या परसांत अपवित्र असें कोणतेंहि कृत्य केलें जात नाहीं. एखाद्या लहान मुलानें चुकून जरी तिथें लघुशंका केली तरी ती जागा शेणाचा सडा वगैरे टाकून तुळशीपत्रानें पाणी शिंपडून पवित्र केली जाते. या परसांत कांहीं फळझाडें, फुलझाडें असलीं तरी त्या झाडांना खतें वगैरे घातलीं जात नाहींत. प्रभुकृपेनेंच तीं वाढायचीं आणि तशीं ती कित्येक दशकें वाढत आहेत. कांहीं केळीचीं झाडें, एक दोन आंब्याफणसाचीं झाडें, पंधरावीस माड, एक आंबाड्याचें झाड, एक पारिजातक, आणि देवपूजेला लागणाऱ्या फुलांचीं फुलझाडें, जास्वंदी, शेवंती, अनंत वगैरे. बागेंतलीं छेलछबेलीं रंगीबेरंगी फुलें या परसांत दिसणार नाहींत.

घराच्या डाव्या हाताला जें परसूं असतें तें मात्र साऱ्या ओवळेपणासाठींच. उष्टींखरकटीं टाकायची जागा, शौचकूप, सांडपाण्याची मोरी, माशांचे खवले आणि कांटे वगैरे टाकायची इथें सोय केलेली असते. दोन्ही परसांचा आवार झांकून घेणारा पुरुषभर उंचीचा एक मोठा तट. डाव्या हाताच्या परसांत कोपऱ्याला गुरांचे गोठे. दोन्ही परसांच्या मधोमध विहीर. अशी एकंदर या घरांची रचना. शेंपाऊणशें माणसांना सुखानें सहज राहतां येईल अशीं हीं घरें. असल्या या घरांपैकीं कांहींनीं दीड शतक ओलांडलें आहे, कांहींनीं दोन; तर कांहीं हीरकमहोत्सवाच्या पायरीवर आलेलीं. पण बहुतेक घरांनीं पन्नाशी तरी ओलांडलेली असेलच. एकत्र कुटुंबपद्धति इथें नांदली तशी कलहानें पेट घेऊन एका कुटुंबाचीं दहा शकलें देखील इथें सुखानें नांदताहेत. पस्तीस वर्षांपूर्वीं आमच्याच घरांत सात चुलतभावांचीं सात बिऱ्हाडें होतीं. या सात बिऱ्हाडांचीं मिळून पंचाहत्तर-ऐंशीं माणसें होतीं. 'बहु धन असो

नसो परि एक असावें गृहीं गृहीं दुभतें' या तत्त्वाला अनुसरून पन्नाससाठ गुरें होतीं. गाय व्याली आणि पाडा झाला तर दोन वर्षेपर्यंत त्याला वाढवून विनामूल्य तो गांवच्याच एखाद्या हिंदू शेतकऱ्याला देऊन टाकायचा आणि वासरूं झालें तर मात्र घरीं ठेवून घ्यायचें, अशी पूर्वापार चाल होती. असो! हें विषयांतर झालें. आतां मूळ मुद्दयाकडे वळूं.

करकर असा मुख्य दरवाजा उघडतांना आवाज झाला कीं ओसरीवर किंवा आडोशाला बांधून ठेवलेलीं वासरें हंबरत. मग गोठ्यांतल्या गाई त्यांना साद देत. गाईचें तें पाडसाच्या ओढीनें हंबरणें आलें, कीं वासूदादा घरांतून साद देत—'आलों ग यमुना! आलों आलों हं!' मग ते वासराला सोडून एका हातांत वासराची दोरी आणि दुधाची चरवी घेऊन वासरामागून धावत जात आणि तशा त्या शांत वेळीं चरवींत चुळ्ळ चुळ्ळ असा होत असलेला दुधाळ नाद मन प्रफुल्लित करी. अरुणोदय व्हायच्या आंत सगळीं गुरें रानांत जात आणि घरांतलीं माणसें नित्यकर्माला आरंभ करायचीं. चहा, कॉफी असल्या 'मादक' वस्तु वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत मीं पाहिल्या नाहींत. कॉफी नांवाचें जवमिश्रित तपकिरी रंगाचें पाणी असायचें, तें थोडेंसें सकाळीं देत असत; पण नऊ-साडेनऊच्या सुमारास आंघोळ करून आम्हीं 'पेज' जेवत असूं. त्या पेजेला कांहींतरी झणझणीत तोंडींलावणें असे. घरांतलीं कांहीं थोडींच व्रतस्थ माणसें ही पेज जेवत नसत; परंतु बायका जेवायच्या आणि दुपारच्या जेवणाच्या तयारीला लागायच्या. दुपारचीं जेवणें दोन ते अडीच वाजतां होत. कारण आमच्या घरांत शाळिग्रामाची षोडशोपचार पूजा नित्य असायची. श्रीविष्णोर्दिव्यसहस्रनामाप्रमाणेंच ही ठळकपणानें होत असलेली षोडशोपचारपूजा देखील कानावर पडूनपडून मला पाठ झालेली आहे.

देशकालादींचा सविस्तर उच्चार झाल्यानंतर पंचायतनपूजेच्या आधीं एक संकल्प असतो. "मम अत्मनः श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थम्, अस्माकं सर्वेषां सहकुटुंबानां क्षेम-स्थैर्य-विजय-अभय-आयुरारोग्य-ऐश्वर्याभिवृद्ध्यर्थं...." आणि "द्विपदचतुष्पदसहितानां" म्हणजे स्वतःचें, स्वतःच्या कुटुंबाचें आणि स्वतःजवळ पाळलेल्या पशुपक्ष्यांचेंहि कल्याण

त्या संकल्पांत मागितलेलें आहे. किती सुरांत आणि एका विशिष्ट वजनांत म्हणायचे पूर्वींचे लोक हा संकल्प. अंगावर कांटा उभा राहायचा तो ऐकतांना. सर्व देवतांचें स्मरण, शंखपूजा, घंटापूजा, दीपपूजा आदि सर्व पूजा झाल्यानंतर पंचारती आणि पुनः प्रार्थना होऊन "अकालमृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनम्" म्हणून तें 'विष्णुपादोदक तीर्थ' जठरांत धारण करीपर्यंत जठरांत भुकेनें कावळे ओरडत असायचे. त्यानंतर वैश्वदेव, काकबली होई, आणि नंतर आमचें दुपारचें जेवण होई; परंतु त्या जेवणांत मात्र परमावधीची तृप्ति असायची. कांहींतरी प्रचंड कर्तव्यपूर्तीचें समाधान असायचें. "उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म" हें खरें वाटायचें. याशिवाय आमच्या घरांत गीतापाठ, गुरुचरित्र, शिवलीलामृत इत्यादि नित्यनेमानें ग्रंथहि वाचले जात. व्यंकटेशस्तोत्र सर्वांच्याच तोंडीं त्रिकाळ असे.

तिन्ही काल अमंगल बोलायचें नाहीं. घरांतील वास्तुदेवता आपल्या मुखांतून सतत 'तथास्तु, तथास्तु' असा उच्चार करीत असते अशी शिकवण असे.

रात्रीं रामायण, महाभारत या ग्रंथांचें वाचन असे. भावार्थरामायणाचें पारायण मीं सतत तीन वेळां ऐकलेलें आहे. छत्तीस हजार ओव्यांचा हा ग्रंथ संपायला सव्वा ते दीड वर्ष लागत असे. दोन ओव्या वाचून झाल्या कीं वाचणारा त्याचा रसाळपणानें अर्थ सांगे. त्यांतील अध्यात्मावरील चर्चेंत घरांतल्या मोठ्या बायकाहि भाग घेत. रामायण चालू असतांना घरांतलीं सर्व माणसें त्यांत इतकीं विलीन होत, कीं दुसऱ्या दिवशीं चौखेवर बसून तांदूळ निवडतांना—आज मारुती काय करणार आणि सीतेची अशोकवनांत काय परिस्थिति आहे यावर घरांतल्या बायका चर्चा करीत. जणूं तो प्रसंग कुठेंतरी घडत आहे अशा भावनेनें त्या बोलत असत. महाभारतांतील वनपर्वांत पांडवांना धौम्यांनीं सांगितलेलीं, राजा हरिश्चंद्राच्या सत्यशीलतेचें, पुण्यश्लोक नळराजाच्या तत्त्वनिष्ठेचें, अशीं चरित्रें ऐकतांना सगळेच स्त्री-पुरुष ओक्साबोक्शीं रडत असत. पारायण संपतें त्या दिवशीं घरांत समाराधना असे. प्रत्येक व्रत आमच्या घरांत अगदीं चोखपणें पाळलें जाई.

लहानसहान धार्मिक कार्यांना आमच्या घराण्याच्या पुरोहितांकडून भटजी पाठविला जाई; परंतु तशाच एखाद्या मोठ्या कार्याला पुरोहित येत असत. पुरोहितांना मान अगदीं राजासारखा असे. ज्या बैलगाडींतून ते येणार असत त्या गाडीच्या बैलांच्या गळ्यांतील घुंगूर ठराविक अंतरावरून ऐकूं येतांच, बलकांवांत वसलेलीं सर्व जाणतीं माणसें उठून उभीं राहात. पुरोहित गाडींतून उतरले, कीं माझे वडील छत्री घेऊन त्यांना सामोरे जात असत. तो दिवस आमच्या घरांत महद्भाग्याचा समजला जाई. सर्व धार्मिक बाजूंचा निर्णय, कांहीं चुकल्यामाकल्याचा निर्णय त्या दिवशीं त्यांनीं द्यायचा, अपराधाच्या परिमार्जनाला उपाय सांगायचा आणि त्यांनीं सांगितल्याप्रमाणें यथासांग व्हायचें. महिन्यांतल्या दोन्ही पंचम्या, दोन्ही एकादशा, विनायकी, संकष्टी आणि अमावास्या हीं सर्व तिथि-व्रतें कडक पाळलीं जात. मला स्वतःला अंगारकी आवडायची. म्हणजे मी तें व्रत पाळीत असे असें नव्हे. त्या दिवशीं आमच्या घरांत गणपतीच्या नैवेद्याला पुरणाचे मोदक करीत असत. रात्रीचीं साडेदहा-वाजेपर्यंत महापूजा चालायची. त्यामुळें तो नैवेद्य कांहीं रात्रीं मला मिळत नसे; अकरा वाजेपर्यंत जागणें शक्य होत नसे. पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते मोदक खातांना दर महिन्यांत अंगारकीच यावी असें मला वाटे.

वटसावित्री आणि आषाढी एकादशी झाली कीं व्रतराज श्रावणाची चाहूल लागे. घरांत कोण धांदल, कोण गडबड असायची. श्रावण प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत नवविधाभक्तीचें सत्रच चालू असायचें. गणेशचतुर्थी हा मोठा सण. त्याच्या आधीं दोन दिवस घरांतल्या नव्या आणि जुन्याहि सुनांच्या माहेराहून फराळाचीं ओझीं घेऊन गडी यायचे. त्यांत फराळाच्या जिनसांबरोबर माटवीला (मंडपीला) बांधण्यासाठीं नानातऱ्हेची फळफळावळ यायची. सून एखाद्या कुळागराशेजारची किंवा अंत्रुज महालांतली असली तर ही फळफळावळ रंगीबेरंगी असे. हरितालिकेचें व्रत घरांतल्या स्त्रिया आणि मुलें कडक रीतीनें पाळायच्या. चतुर्थीच्या दिवशीं सगळें घर माणसांनीं गजबजलेलें असे. घराबाहेर किंवा नोकरीला असलेले सर्व लोक त्या सणाला घरीं यायचे. चतुर्थीचे

तीन दिवस सर्वांचा स्वयंपाक आणि जेवण एकत्र व्हायचें. प्रत्येकजण त्या विघ्नहर्त्याकडे भक्तिभावानें एकटक पाहत राही. पंचमीच्या दिवशीं उत्तरपूजेच्या आधीं गणपति जाणार म्हणून प्रत्येकाच्या पापण्या ओल्या होत असत.

शारदीय नवरात्रांतले नऊ दिवस आमच्या घरांत कांदादेखील खात नाहींत. घटस्थापना वगैरे सर्व विधि कुलाचाराप्रमाणें पाळले जातात. एखाद्याचा जीव माशांसाठीं तडफडला तर त्यानें घराच्या डाव्या बाजूला असलेल्या धाकल्या परसांत कुठें तरी कोपऱ्याला तीन दगड ठेवून ते शिजवून खावें; पण उंबरठयाच्या आंत कोणतीहि जीवहिंसा ते नऊ दिवस केली जात नाहीं. मुंबईंत किंवा महाराष्ट्रांतील बहुतेक परगण्यांत दिवाळीला फराळाचे जिन्नस करायची परंपरा आहे; परंतु गोव्यांत मात्र ती नाहीं. गोव्यांत दिवाळीच्या दिवशीं प्रत्येक हिंदूच्या घरांत पोह्यांचे वेगवेगळे पदार्थ करतात. नारळाच्या रसांतले पोहे, दुधांतले पोहे, ताकांतले पोहे, गूळपोहे, साखरपोहे, कढींतले पोहे असे पोह्यांचे विविध प्रकार करतात. फराळाची पद्धत अलीकडे कुणीं उचलल्यास माहिती नाहीं. अलीकडे बऱ्याचशा मुंबईकरांच्या 'फॅशनी' गोमंतकीयांनीं उचललेल्या आहेत. सत्यनारायणाला 'तीर्थप्रसादास' आणि लग्नमुंजींत 'पानसुपारीस' येणें अशी आमच्याकडे पद्धतच नव्हती. सत्यनारायणास आमंत्रण म्हणजे जेवणाचें आमंत्रण. जेवण करून तीर्थ-प्रसाद घेऊन चांगला भला मोठा बुक्याचा टिळा कपाळाला लावून घरीं येणें असा त्या आमंत्रणाचा अर्थ होता.

लग्नाचें आमंत्रण म्हणजे सकाळीं जाऊन रात्रीं घरीं परत येणें. गोरजमुहूर्तावर लग्न असलें तरी समारंभ दिवसभर असायचा. निमंत्रित पाहुणा गाडींतून आला तर तो उतरतांना त्याचें गाडीभाडें यजमानानें द्यायचें. अहेर काय तो जवळच्या नातलगांनीं द्यायचा आणि तिथल्या-तिथें सवाईनें घ्यायचा. परक्यांनीं अहेर द्यायची पद्धत नव्हती. त्यांनीं केवळ मंत्राक्षता टाकायचें महत्कार्य करावें; आणि कार्याला येऊन शोभा वाढविल्याबद्दल यजमानाला ऋणाईत करावें. लग्नें प्रत्येकाच्या ऐपती-

प्रमाणें तीन तीन दिवस चालत. फार काय फलशोभनालाहि गांवजेवण असायचें. पानसुपारी ही जेवणानंतर विड्याच्या रूपानें दिली जात असे.

गांवजेवणावरून आठवण झाली; गांवांत मुंबईहून हवापालट करण्यासाठीं एक कुटुंब आलें, आणि त्यांनीं सत्यनारायणाच्या पूजेचा संकल्प करून "तीर्थप्रसादास या" असें गांवांत आमंत्रण दिलें. लोक बिचारे नेहमींच्या सरावाप्रमाणें कोट-टोपी घालून बारा वाजतां पूजेच्या घरीं गेले; पण तिथें त्यांना 'तीर्थप्रसाद' संध्याकाळीं साडेपांच वाजतां आहे असें सांगून परत पाठविण्यांत आलें. या विचित्र चालीबद्दल गांवांत पुष्कळ हसूं झालें. अजूनहि गांवकऱ्यांत कुणी सत्यनारायणाला निमंत्रण द्यायला गेला तर "काय रे बाबा तो 'तसला' तीर्थप्रसाद तर नव्हे ना?" असें थट्टेनें विचारतात.

माझे एक वयोवृद्ध नातेवाईक सोयरीक कशी करावी याबद्दल मला कांहीं पूर्वकाळचे अनुभव सांगत. सून गरिबाघरची आणावी, पण जांवई श्रीमंत पाहावा असें त्यांचें पहिलें वाक्य असे. मग ते ज्या घरीं मुलगी द्यायची असेल त्या घराबद्दलची एकंदर माहिती कशी काढावी याबद्दल खुलासा करीत. अशा गोष्टी चतुर माणसांकडे सोंपविण्यांत येत. वेशानें बावळीं, पण नाना तऱ्हेच्या कूटसमस्या, भांडण तंटे, दुही इत्यादि गोष्टी सहज सोडविणारीं आणि हरघडी दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्यांतच आनंद मानणारीं अशीं हीं माणसें होतीं. गांवोगांवीं पूर्वीं अशीं माणसें असत. समजा, तुम्हांला सावईवेऱ्याला आपली मुलगी अमुक एकाच्या घरांत द्यायची आहे. हा चतुर माणूस काय करी, कीं तो त्या गांवांत रात्रीं सामसूम झाल्यावर प्रवेश करी आणि ज्या घरांत मुलीची सोयरीक करायची असेल त्या घराच्या आसपासच्या एखाद्या कुळवाड्याच्या घराच्या ओट्यावर आश्रयाला राही. असा आश्रय देणें आणि पांथस्थाची तहानभुकेची व्यवस्था करणें हें गोमंतकांतील गरीब धाकटा कुणीहि कुलाचाराइतकेंच श्रेष्ठ समजतो.

मग त्या घरांतला एखादा जाणता माणूस या पांथस्थाची विचारपूस करी. ती करतांना 'त्या तिकडच्या बामणाच्या घरांत तुमची जेवायची

वगैरे व्यवस्था करूं का?' असें विचारी; पण उपासाची सबब पुढें करून हळूहळू तो त्या बामणाच्या घराण्याबद्दल एक एक प्रश्न विचारून त्या घराण्याच्या बऱ्यावाईट स्थितीची आणि चालीरीतीची अटकळ बांधीत असे. तो कुणबीच सांगायचा—"पाहुणे, तुम्ही अनमान करूं नका बरं का, आमचे मलबा शणै मोठे उदार गृहस्थ आहेत. मध्यरात्रीं देखील वीसपंचवीस पाहुणे आल्यास त्यांच्याकडे मोठ्या आनंदानें व्यवस्था होईल. कसलीच चिंता नको!" म्हणजे आमच्या पांथस्थाला त्या कुटुंबाच्या उदारपणाची कल्पना आली. पुढें तो कुणबीच म्हणायचा—"आणि त्या घरांतल्या सुना देखील मोठ्या उमेदी आणि उत्साही. केव्हांहि कांहींहि सांगा कपाळाला आंठी म्हणून नाहीं. जावा जावा कशा सख्ल्या बहिणी-सारख्या वागतात."....म्हणजे या घरांत मुलगी दिली तर निश्चितपणें सुखाच्या राशीवरच तिला नेऊन बसविल्यासारखें होईल याची पांथस्थाला पूर्णपणें कल्पना येते. आणखीहि कांहीं गोष्टींचा खुलासा तो करून घेतो. आणि मोकळ्या मनानें निद्रादेवीच्या आधीन होतो.

परंतु त्या कुणब्यानें सांगितलेल्या गोष्टींवरच तो विसंबून राहात नाहीं. सकाळींच तो मलबा शणैकडे जाई आणि तो दिवस त्यांच्याकडे राहून त्या घराण्याच्या आचारविचारांचें तो सूक्ष्म निरीक्षण करी. सोवळ्याच्या अनेक दांड्या पाहून तो तिथल्या शुद्धाचाराबद्दलची अटकळ बांधी. त्या घरांतल्या बायकांच्या मीठ वाढायच्या पद्धतीवरूनच त्यांच्या दानतीची कल्पना करी. अशा अनेक गोष्टी सूक्ष्म रीतीनें अवलोकून तो जाई आणि त्याच्या सल्ल्यावरच मग पुढची पायरी ओलांडीत असत. घरांत नवी सून आल्यावर तिची परीक्षा घेण्याची देखील साधी सुलभ पद्धत होती. आधीं तिला कांहीं काम करूं दिलें जात नसे. तिला अगदीं फुलासारखी वागवायची. मग तिला तिच्या आईवडिलांनीं कशी दीक्षा दिलेली आहे हें पाहण्यासाठीं घरांतील जाणत्या बाईनें नकळत तिला एक साधें काम सांगायचें. हें काम म्हणजे पापड भाजून आणायचें. गोमंतकांतील घराघरांतील चुलींत लाकडांचें जळण वापरतात. त्या चुलींत पापड भाजणें म्हणजे तें एक मोठें दिव्यच असतें. सरावाशिवाय या

गोष्टी नव्या आणि त्यांतल्या त्यांत अलीकडील शहरवासी फॅशनेबल मुलींना जमायच्या नाहींत. पेटतीं लाकडें व्यवस्थित बाहेर ओढून, एखादें धुरकटें लाकूड बाजूला करून मधल्या निखाऱ्यांवरच पापड कुशलपणें भाजावा लागतो. जिनें हें काम कधीं केलेलें नसेल, आणि माहेरीं केवळ 'पाटावरून ताटावर आणि ताटावरून पाटावर बसणें' असेंच आयुष्य जिनें घालविलें असेल, तिला हें काम जमणार नाहीं. तिनें पापड मध्यें करपवला तर ती नसत्या कारणांनीं चांगल्या संसाराला ग्रहण लावील ही अटकळ बांधायची. धुरकटवला तर ती प्रपंच नीट करणार नाहीं. घाईघाईनें अर्धकच्चा भाजला तर तें मडकें कच्चें आहे, आणि हात भाजला तर ती चतुर नाहीं, बावळट आहे असा समज व्हायचा, आणि व्यवस्थित भाजून आणला तर त्या एका क्रियेवर तिचा स्वभावाची आणि वागणुकीची रूपरेखा आंखायची अशी साधीसुधी पद्धत होती.

जावयाचें घरंदाज पाणी ओळखायचींहि कांहीं तंत्रें होतीं. त्यांतील एक सांगण्यासारखें आहे. जेवायच्या आधीं त्याला पीतांबर नेसायला देण्यांत येई. ज्याला तो नेसून जेवायला बसायची आधीं संवय आहे, तो सहजपणें मांडी घालून पाटावर बसेल; पण जो कधीं नेसलाच नाहीं तो तें रेशमी वस्त्र आसनमांडी घालतांना पावलांची माती लागून पीतांबर मळेल या भीतीनें मांड्यांपर्यंत वर ओढून घेऊन नंतर मांडी घालील. एका या क्रियेवरून त्याच्या घराण्यांतील चालीरीतींची कल्पना जाणत्या धूर्त बायका लांबून पाहून करीत असत. जांवयाच्या ताटाखालीं मोहरी पसरून ठेवणें, पाटाखालीं आणखी कांहीं घालून ठेवणें वगैरे गोष्टी त्याचा चतुरपणा अजमाविण्यासाठीं केल्या जात. सावध असलेला अलगद बसेल, ताटाला धक्का न लावतां अलगद जेवील; पण बेसावध पाटावरून घसरेल, जेवतांना ताट वारंवार हलवील. केवळ गंमत व आजच्या युगांत रंजक वाटतील म्हणून या गोष्टी सांगितल्या; पूर्वींच्या या चाली साध्या होत्या पण माणसांतला माणूसपणा पारखणाऱ्या होत्या !

नेटका प्रपंच आणि नेटका परमार्थ दोन्ही हातांत हात घालून एकाबरोबर कालक्रमण करतांना मीं पाहिलें. आमच्या घरांतल्या प्रत्येक दाराच्या चुन्याच्या गिलाव्यावर अमुक देवता प्रसन्न, तमुक देवता प्रसन्न असें लिहिलेलें आढळतें. जुन्या परंपरेच्या घरांत तर हें आढळतेंच. आमच्या घरांत तर गोमंतकांतल्या सर्व मुख्य दैवतांचीं नांवें आढळनात; पण 'श्रीव्यंकटेश प्रसन्न' या दैवताचें देवालय कुठें आहे हें मला माहीत नव्हतें. घरांत व्यंकटेशाच्या नामाचा त्रिकाळ उच्चार होई, पण या दैवताचा व आमचा संबंध काय हें कळत नसे. 'व्यंकटेश विजय' या ग्रंथाचें मुंज झाल्यानंतर एक तरी पारायण केलेंच पाहिजे असा दंडक होता. तिरुपतीच्या श्रीव्यंकटेशाच्या देवळांत कित्येकांच्या मुंजीहि झाल्याचें ऐकिवांत होतें. वाडवडिलांचें अस्थिविसर्जन तिरुपतीला जाऊन केलें म्हणजे त्यांच्या आत्म्यांना मुक्ति मिळते असेंहि ऐकिवांत होतें; पण तिरुपतीचा आणि आमचा संबंध काय हें मात्र कळत नव्हतें. माझ्या वडिलांनींहि मीं प्रत्येक वेळीं चौकशी केल्यानंतर 'तो फार मोठा इतिहास आहे, मागाहून सांगेन' म्हणून कित्येक दिवस तें सांगायचें पुढेंच ढकललें होतें; पण एकदा मात्र त्यांनीं मला तो सारा वृत्तांत सांगितला. खरोखर तो इतिहास विलक्षण होता.

सोळाव्या शतकांत पुर्तुगेजांनीं ज्यावेळीं बाटाबाटीचा हैदोस माजविला त्यावेळीं सुमारें बारा हजार हिंदु कुटुंबें गोमंतभूमि सोडून बाहेर गेलीं. त्यांतलीं बरीचशीं दक्षिणदिशेला गेलीं. तीं कोचीनच्या राजपट्टणापर्यंत जाऊन राहिलीं, कांहींनीं त्रावणकोरचे सोळा गांव वसविले. त्याच वेळीं एक संन्यासी तिथें आलेला होता. त्या संन्याशाजवळ व्यंकटेशाची एक मूर्ति होती. एका रात्रीं 'पै' आडनांवाच्या एका गृहस्थाला स्वप्नांत दृष्टांत झाला, कीं 'माझ्या भारंभार सोन्याच्या पुतळ्या त्या संन्याशाला देऊन तुम्हीं माझी त्याच्यापासून सोडवणूक करून, माझी इथें प्रतिष्ठापना करा. मी तुमचें कल्याण करीन. तुमचें धर्मरक्षण करून तुम्हांला तुमच्या पूर्वस्थळीं परत पाठवीन!' दुसऱ्या दिवशीं पै यांनीं त्या संन्याशाला तें वर्तमान कळवून दृष्टांतांत सांगितल्याप्रमाणें वर्तन

करून, त्याच्यापासून ती मूर्ति घेतली आणि तिच्यासाठीं देऊळ बांधून त्या व्यंकटेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. तिरुपति म्हणजे श्रीपति. या व्यंकटेशदेवानें खरोखरीच कृपा करून येथील लोकांना सुखी केलें आणि जे त्या देवाचा प्रसाद घेऊन परत गोव्यांत जाऊन राहिले त्यांना पुन्हा गोमंतक सोडावा लागला नाहीं. गोमंतकीय सारस्वतांनीं त्याला कुलदैवताचाच मान देऊन आपल्या देव्हाऱ्यांत त्याची कायमची स्थापना केली. मागाहून पै यांनीं स्थापन केलेल्या त्या व्यंकटेशाच्या देवालयावर व मूर्तीवर अनेकांनीं हक्क सांगितले. अनेकांची नजर त्या देवळांतल्या उत्पन्नावर गेली, आणि त्या साक्षात्कारी दैवताला तिथून चोरून न्यायलाहि कांहीं संस्थानाधिपतींनीं कमी केलें नाहीं; परंतु जिथें जिथें ती मूर्ति गेली तिथल्या तिथल्या लोकांचें तिनें तळभंजन केलें. त्यामुळें परत त्या मूर्तीला जिथून नेली तिथेंच आणून ठेवावी लागली. अशा अलौकिक चरित्राच्या या व्यंकटेशाला गोमंतकांतील बहुसंख्य सारस्वतांच्या घरांत कुलदैवताचा मान देण्याची पद्धत आहे. कित्येक लोक आपल्या मुलांचें मौंजीबंधन तिथें नेऊन करितात. आयुष्यांतून एकदां तरी तिरुपतीला जाऊन येणें हें काशी-गयेइतकेंच पुण्य समजतात.

घरांतील देवघर हें सर्वांचें श्रद्धास्थान. सर्वसंकटपरिहारार्थ तिथें सांगणें करायचें. पीडा, रोग, वारा शरीराला बाधूं नये म्हणून अनन्य-भावानें तिथें प्रार्थना करायची. कुठें दूर गांवीं जातांना घरांतल्या वडील बाईनें देवघरांतून अंगारा आणून लावायचा आणि 'कल्याण कर' म्हणून सांगणें करायचें. व्यापारांत यश तिथेंच मागायचें. घरावर कांहीं संकटाची छाया दिसतांच अधिकारी माणसानें नारळ हातांत घेऊन गाऱ्हाणें घालायचें आणि 'रक्षण कर रे बाबा!' असें म्हणून तो नारळ देवघराच्या दरवाज्यापासून जमिनीवरून देव्हाऱ्यापर्यंत घरंगळत जाईल अशा रीतीनें आंत सोडायचा. आश्चर्य असें कीं संकटाचें निरसन होई. सर्वजण समाधानाचा सुस्कारा सोडीत असत. अमाप श्रद्धा होती म्हणून हें सर्व यदृच्छेनें घडल्यासारखें घडत होतें. घाडी, भगत अशा आसुरी दैवतांवर विश्वास नव्हता. जें कांहीं मागायचें असेल तें त्या परंपरेनें नेमून दिलेल्या

कुलदैवताकडे. बुवा, जोगडा आणि तत्सम इतर भोंदूगिरी करणाऱ्यांवर अजिबात विश्वास नव्हता. एखादा महाराज उपटलाच तर त्याला दुरून नमस्कार करायचा, पण स्वतःचा कुळधर्म सोडून त्याच्या नादीं लागायचें नाहीं; असा नियम कडक रीतीनें पाळला जाई.

दर सोमवारीं तिन्हीसांजेच्या वेळेला वास्तुदेवतेच्या सन्मानार्थ तीन वातींचा दिवा पेटवून मुख्य स्वयंपाकघराच्या खिडकींत ठेवायची आमच्याकडे एक पूर्वापार चाल होती. माझी आई सर्वांत वडील बाई असल्यानें तिनें न चुकतां हा दिवा ठेवावा. एकदां कोणत्या तरी गडबडीच्या कारणानें ती हा दिवा पेटवायचें विसरली. नित्याप्रमाणें सर्व आवराआवर झाल्यावर ती झोपायला म्हणून खोलींत आली; आणि पाहते तर माझ्या मोठ्या भावाला हुडहुडी भरून ताप आल्यानें तो सारखा कण्हत होता. पांघरुणें मागत होता. मध्यरात्रपर्यंत आई त्याच्या उशाजवळ बसून होती. वडील व्यापारानिमित्त बाहेरगांवीं गेलेले होते. त्या कालांत घड्याळें फारशीं वापरांत नसल्यानें खिडकी उघडून आकाशाकडे पाहिल्यानें, आणि सप्तर्षींचा पुंजका क्षितिजापासून अमुक अंतर उंच आहे म्हटल्यावर, अमुक वाजले, असा अंदाज बांधीत असत. तो अंदाज बरोबर ठरे. आईनें पश्चिम क्षितिजाकडे पाहायला खिडकींतून बाहेर तोंड काढलें, परसांतल्या फणसाच्या झाडाच्या मुळाजवळ कुणींतरी कांबळ्याची खोळ घालून उभा आहे असा तिला भास झाला. तिच्या अंगावर कांटा उभा राहिला. तशा स्थितींत धीर करून तिनें विचारलें, “कोण, कोण थैं?” ताबडतोब उत्तर आलें, “हांव तॉ नासणॉ!” नाचण्या हा गुराखी, आमच्याघरचीं सर्व गुरें राखीत असे; पण ‘मी तो नासण्या’ असें त्यानें सांगितल्यावर तिचें भय कमी झालें. तशा स्थितींत तिनें चौकशी केली कीं तो एवढ्या रात्रीं तिथें कसा आला. कारण गुरें दावणीला बांधलीं कीं गवत टाकून तो जो एकदां आपल्या घरीं जाई, तो सकाळीं सहा वाजतां पुन्हा गुरांकडे येई. पण नाचण्याच पुढें म्हणाला, “आई, अग तूं सोमवारचा दिवा पेटवला नाहींस? जा पेटव ना तो!” आईच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. ती उठली. तिनें

दिवा तयार केला आणि थरथरत्या हातांनीं तो स्वयंपाकघराच्या खिडकींत ठेवून वास्तुदेवतेला नमस्कार करून ती परत आली. तिनें दादांच्या कपाळावर हात ठेवून पाहिला; आणि तिच्या हाताला त्याच्या कपाळावरचे दरदरून फुटलेले घर्मबिंदु लागले. दुसऱ्याच दिवशीं माझा भाऊ खडखडीत बरा झाला होता आणि नित्याप्रमाणें तो कामालाहि लागला होता. मागाहून आईनें नाचण्याजवळ त्या प्रसंगाची चौकशी केली; पण त्याला त्याची कांहींहि माहिती नव्हती. गुरांना दावणीला बांधून तो आपल्या घरीं जाऊन झोपला होता. अश्रुनीर-वाहत्या डोळ्यांनीं कित्येक वेळां ही साक्षात्काराची गोष्ट आई आम्हांला सांगायची.

आमची संस्कृति ही समतेवर आधारलेली संस्कृति आहे. पुनर्जन्मावर विश्वास, परलोकावर विश्वास, वर्णाश्रमधर्मानें सांगितलेलीं त्याग, दया, सत्य, दान, यज्ञ, संयम, तपाचरण, कर्मफलावर श्रद्धा, कर्तव्यपालन, ब्रह्मचर्य, भक्ति, प्रेम इत्यादि तत्त्वें मागील पिढींत निष्ठापूर्वक पाळलीं जात होतीं, अखंडितपणें शुचिर्भूततेनें दरवळलेलें वातावरण चहूं बाजूला दिसे. एकमेकांवर अपार विश्वास होता. आजच्या युगांत त्याला तोड नाहीं. एकाच्या घरीं दागिन्याचा डबा असला तर तो दुसऱ्या घरच्या मंगल कार्याला वापरण्याकरितां मोकळ्या मनानें देई; किंबहुना आपली तिजोरी उघडून तो घेऊन जायलाहि सांगे. आपण तो उघडून पाहून दिला, किंवा किती दागिने आहेत, कसले आहेत याची शहानिशा केली तर दुसऱ्या गृहस्थाचा अपमान होईल या शंकेनें त्याचें मन व्याकुळ होई. आणि तो डबा परत केला गेल्यावर उघडूनहि न पाहतां तसाच्या तसाच त्याच तिजोरींत परत ठेवीत असे. त्यांतील वस्तू गहाळ व्हायची त्याला धास्ती नव्हती. संशयहि नव्हता. इतका प्रगाढ विश्वास होता. जसा देवाधर्मावर तसाच शेजाऱ्यापाजाऱ्यावर !

अशा या श्रद्धेच्या, संस्कृतीच्या गोष्टी. त्यांची नुसती चुणुक म्हणून कांहीं चालीरीतीचे पैलू इथें सांगितले. महाराष्ट्रांतील कांहीं विद्वान लोक मला भेटतात त्यावेळीं गोमंतकाची संस्कृति आणि चालीरीती याविषयीं कुतूहलानें चौकशी करतात. म्हणूनच आमच्या श्रद्धा आणि आमची

संस्कृति यांचा एवढा ऊहापोह केला. तरीहि तो मर्यादित स्वरूपांत सांगितलेला आहे. माझ्या कांहीं खास मित्रांजवळ मी हा विषय तासन् तास बोलत राहतों. पूर्वस्मृतींनीं मला आनंद होतो. किती सांगूं आणि किती नको असें मला होऊन जातें. समुद्राच्या लाटांसारख्या स्मृतींच्या लाटा एकसारख्या हिसकळतात. जें पाहिलें आणि अनुभवलें तें सांगतांना मन पुनीत होतें.

संस्कृतीचीं पदचिन्हें सांगतांना आतांपर्यंत माझ्या सांगण्यांत केवळ भूतकाळच अधिक वावरतो आहे. यंत्रयुगांतला आजचा काल हा अधिक सावध आणि अधिक शहाणा आहे. पूर्वींसारखा तो भाबडा राहिलेला नाहीं, हेंहि मला कबूल केलें पाहिजे. पूर्वींचें जीवन विरक्तीनें भरलेलें होतें, आजचें जीवन आसक्तीची परमावधि गांठीत आहे; परंतु शतकानुशतकें मुरलेली ती शिवसंस्कृति सोडूं म्हटल्या सुटणार नाहीं. व्यक्तिजीवनाच्या कक्षा कितीहि वाढल्या तरी वाडवडिलांनीं जिवाची कुरवंडी करून जोपासलेल्या त्या संस्कृतीचें अवगुंठन कितीहि झगझगाट झाला तरी कायमच राहील. कारण तीं मूल्यें शाश्वत आहेत; चिरंजीव आहेत. म्हणूनच आजहि ‘टेरेलीन’ कापडाच्या पारदर्शक शर्टाच्या आंत कुठें तरी जानव्यांची गांठ दिसतेच.



गोमंतकाचे पहिले मुख्यमंत्री

**नामदार दयानंदराव बांदोडकर**



दूधसागर

ठाणें. स्वक्रमांक.
भूषणार्थ.
३६७०३
२५.८.६४.
३३५.

# माझा गांव

गोमंतकांतलीं बहुतेक गांवें टेकडीच्या पायथ्याशीं वसलेलीं आहेत. टेकडीच्या माथ्यावर उभे राहून खालीं गांवाकडे पाहिलें, कीं कल्पवृक्षांच्या हिरव्याजर्द छताच्या छायेंत तें मिसळून एकजीव झाल्यासारखें वाटतें. त्या शीतल छायेंत राहणाऱ्या माणसांचीं मनें देखील थंड आणि शांत. उच्छृंखलपणा कसा तो त्यांना ठाऊकच नाहीं. प्रत्येक गांव म्हणजे एक कुटुंब. माझ्याच गांवचें पहा ना—पूर्वेकडे टेकडी, पश्चिम व उत्तर दिशांना खाडी, आणि दक्षिणेकडे समुद्रपट्टा अशी आमच्या गांवची भौगोलिक परिस्थिति. आमच्या या गांवांत दहाबारा सारस्वतांचीं घरें, सहासात सोनारांचीं घरें, तीन सुतारांचीं, तीनशेंच्या आसपास भंडारी समाजाचीं आणि अंदाजें दोनशें ख्रिस्त्यांचीं असें एकंदर पांचसाडेपांचशें घरें असलेलें हें गांव. ख्रिस्त्यांचें आणि आमचें थोड्याशाच व्यवहारापुरतें नातें; पण बाकीचा सर्व हिंदुसमाज एकत्र कुटुंबासारखाच वागत होता.

एकमेकांबद्दल सर्वांनाच अभिमान होता. एकाला दुःख झालें तर तें सर्वांचेंच दुःख होतें. आणि सुख झाल्यास सर्व घरांत आनंदी मुद्रा दिसत. एकमेकांना मदत करण्यांत अपरंपार उत्साह होता. सारस्वत ब्राह्मणांतील दोन पोटजाती आमच्या गांवांत आहेत. स्मार्त आणि वैष्णव. जे शिव-पूजक ते स्मार्त आणि विष्णुपूजक ते वैष्णव. लहानपणीं स्मार्तांना आम्हीं 'भस्मासुर' म्हणत असूं; आणि स्मार्त आम्हांला 'बखाल' म्हणत असत. पूर्वकालीं स्मार्त-वैष्णवांत रोटीबंदी व बेटीबंदीपर्यंत वैमनस्यें होतीं असें सांगतात. माझ्या आयुष्यांत मीं तें पाहिलें नाहीं; थोडेंसें गंमत म्हणून एकमेकांना वेडावणें बाकी राहिलें होतें. पण एक मात्र निश्चित, कीं स्मार्तांच्या आणि वैष्णवांच्या स्वभावांत फरक आहे. डोळे असून पाहूं नये, कान असून ऐकूं नये आणि तोंड असून बोलूं नये या तीन सूत्रांचें पालन स्मार्तांत तंतोतंत केलें जातें. देश, काल, परिस्थिति पाहून योग्य त्या रीतीनें ते वागतील. गुणांची तोंड फाटेपर्यंत स्तुति करण्यांत स्मार्त माणूस तरबेज; पण एखाद्याचें दोषदिग्दर्शन त्या हिरिरीनें तो करणार नाहीं. आपलें दैन्य दीनवाणीनें तो दुसऱ्याजवळ उघडें करणार नाहीं आणि आपल्या वैभवाचीं प्रदर्शनेंहि दुसऱ्याच्या डोळ्यांना खुपतील अशा रीतीनें मांडणार नाहीं.

पण वैष्णवाचें तसें नाहीं. तो डोळे, कान आणि वाणी या देवानें दिलेल्या इंद्रियांचा पुरेपूर उपयोग करून घेईल. एखाद्याच्या झगझगीत गुणांत कुठें कमतरता आहे हें तो त्या गुणवान व्यक्तीचा स्वभाव न पारखतां मोकळ्या मनानें सांगेल; आणि दोषदिग्दर्शन करतांना कसलीच मुभा तो बाळगणार नाहीं. आपण करतों तें बरोबर कीं चूक याचा विधिनिषेध त्याला नाहीं. दैन्याचें आणि वैभवाचें दोन्ही प्रदर्शनें तो सारख्याच मापानें करील. किंबहुना त्याविषयींचें बोलणें कांकणभर अधिकच असेल. ज्याला आपण अघळपघळपणा म्हणतों त्याचा स्वभावाशीं ज्यास्ती संबंध. आंतली गांठ म्हणून नाहीं. थोडेंसें कामचलाऊ शिक्षण घेऊन किराणा-भुसारा मालाच्या व्यापारांत वैष्णव स्थायिक; तर दूरदृष्टीनें पदवीपर्यंतचें शिक्षण घेऊन सरकारदरबारीं मानमरातब मिळविण्यांत स्मार्त

पटाईत. अशी एकंदर परिस्थिति होती; परंतु आतां ती तशी नाहीं. आतां स्मार्त कोण आणि वैष्णव कोण हें ओळखणें देखील कठीण झालेलें आहे. पूर्वीं वैष्णव गृहस्थ पेहरावानें देखील वेगळा होता. म्हणजे कपाळाला उभा अंगारा, त्याखालीं अक्षताचा लाल टिळा, कानांत भिकबाळी, डोक्यावर लाल मखमलीची चौकोनी टोपी, अंगांत पांढरी शुभ्र बाराबंदी, ब्राह्मणी पद्धतीनें नेसलेलें निरीचें धोतर आणि पायांत पुणेरी जोडा, असा एकंदर थाटमाट असे. स्मार्त कपाळाला थोडेसें वक्राकृति आडवें गंध, डोक्याला रुमाल, बंद गळ्याचा कोट आणि वरील पद्धतीनें धोतर नेसून पायांत कोंकणी वहाणा घालीत असत. पण आतां गोमंतकांत तसलीं माणसें क्वचितच दिसतात. आतां सगळेच एकरूप झालेले आहेत. आडनांवावरून देखील अंदाज बांधणें कठीण वाटतें. फक्त कुळदेवाचें नांव सांगितल्यानंतर कदाचित् कळावें; पण गोव्याबाहेरील कांहीं 'पै' आणि 'कामत' आडनांवांचे लोक देखील आपलें कुलदैवत मंगेश-शांतादुर्गा असल्याचें सांगतात. त्यामुळें एकंदरींत तो सारा पोटभेदाचा प्रकार आतां लोप पावलेला आहे. शिव-विष्णूंत आतां भेद राहिलेला नाहीं. वैष्णव स्त्रिया पूर्वीं उभें कुंकूं लावीत आणि स्मार्त स्त्रिया आडवी चीर लावीत असत. आतां सगळेंच 'गोल' (नेसणेंदेखील) झालेलें असल्यानें स्मार्त स्त्री कुठली आणि वैष्णव कुठली कळणें मुष्किल.

मात्र स्मार्त आणि वैष्णवांचीं दोन वेगवेगळीं धर्मपीठें आहेत. स्मार्त-संप्रदायी गौड सारस्वतांच्या धर्मगुरूचें पीठ कवळें येथें आहे व आजच्या या मठाधिपतीची परंपरा जवळजवळ पंचाहत्तरावी आहे. वैष्णव संप्रदायाच्या धर्मगुरूचें पीठ गोकर्णजवळ पर्तगाळ येथें असून सारे मध्वमतानुयायी गौड सारस्वत याच मठाचे अनुयायी आहेत. चातुर्मासांत मठाधिपति आपापल्या मठांतून बाहेर पडतात. गोमंतकांतच त्यांचें वास्तव्य असल्यास आसपासचे सधन गृहस्थ किंवा एखाद्या गांवचे लोक मिळून आपापल्या घरीं किंवा गांवांत बोलवून श्रींची पाद्यपूजा करितात. तो एक अपूर्व सोहळाच असतो. असा सोहळा मीं माझ्या लहानपणीं पाहिला होता. 'मुद्राधारण' नांवाचा शुद्धीकरणाचा विधि या सोहळ्यांत असतो.

'मुद्राधारण' म्हणजे तप्तमुद्रेचे शिक्के श्रींच्या हस्तें शरिरावर विशिष्ट स्थळीं मारून घेणें. दोन्ही कानशिलें, कपाळ, छातीवर दोन्ही बाजूंना, दोन्ही दंडावर आणि नाभिस्थानीं अशा या मुद्रा मोठीं माणसें घेतात. जप घेणाऱ्या स्त्रियांनादेखील मुद्राधारणाचा अधिकार दिलेला आहे. मुद्राधारणेनें सर्व क्लेशांचा परिहार होतो असा समज आहे. लहानपणीं माझ्या नाभिस्थानावर सूर्यकिरणांकित मुद्रेचा शिक्का होता. वैष्णव संप्रदायांत हा मुद्राधारणाचा विधि करण्याची पद्धत आहे. स्मार्तांत असल्याचें पाहिलें नाहीं.

तशा सारस्वतांतच पांच पोटजाती आहेत : साष्टकर, शेणवी, बार्देस्थकर, कुडाळदेशकर आणि बालावलकर. (सहावी असल्यास मला माहिती नाहीं. आणि आतां तिची माहिती करून घ्यायचीहि इच्छा नाहीं.) परंतु या पोटजाती आतां पूर्वींसारख्या रोटीबंद-बेटीबंद राहिलेल्या नाहींत. या चारहि पोटजातींपैकीं कुणाच्याहि घरांत एखादा हुशार उपवर मुलगा असल्यास त्याला जांवई करून घ्यायची आज चढाओढ लागते. आमच्या गांवांत दुसरा संख्येनें मोठा समाज म्हणजे भंडारी समाज. भारतीय संस्कृतीच्या प्रत्येक तत्त्वाशीं एकनिष्ठ राहून सदाचरणानें प्रपंच करणारा; अडलेल्याला—मग तो शत्रु कां असेना—प्राणपणानें मदत करणारा आणि गरजा अत्यंत कमी असलेला असा हा समाज. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय; त्याशिवाय मासेमारी. आणि कोवळ्या माडापासून निरा काढून भट्टी लावून दारू तयार करणें हाहि एक व्यवसाय आहे. अशा दारूच्या भट्ट्या आमच्या गांवांत पुष्कळ होत्या. भट्टी लावणारा किंवा गुत्ता चालविणारा आमच्याकडे दारू पीत नाहीं.

दादी नाईकांनीं आयुष्यभर गुत्ता चालविला. सकाळीं गुत्ता उघडतांना त्यांचा थाट पाहण्यासारखा असे. आंघोळ करून व देवपूजा करून कपाळाला घसघशीत गंध लावून व फटाक फटाक खडावा वाजवीत ते आपल्या गुत्त्यावर येत. त्यांच्या गळ्यांत तुळशीमण्यांची माळ होती. तोंडांत तुकाराम-ज्ञानेश्वरांचा कोणतातरी एक अभंग. त्या अभंगाची ओळ जी सकाळीं ओठावर आली ती संध्याकाळपर्यंत त्यांच्या ओटावर तशीच असे.

नव्या पिणाऱ्या एखाद्या 'आवारा' पोराला ते धक्के मारून देखील बाहेर काढीत. 'पिईना का तो! आपल्याला त्याच्यापासून फायदा आहे ना? मग त्याला व्यसनाला अधिकाधिक प्रवृत्त कां करूं नये?' असे दादींचे विचार नव्हते. ते सिंहासारखे गर्जत "गाढवा, हें विष पिऊन संसाराची राखरांगोळी का करणार आहेस? जा हो बाहेर!" असें त्याला परोपरीनें सांगत आणि तो अधिकच चेंगटपणा करायला लागला तर त्याचा कान पिरगाळून धक्के मारून त्याला आपल्या गुत्त्यांतून हाकलवीत असत. "जा दुसरीकडे जाऊन मर; पण माझ्या इथं मी तुला असं कांहीं करूं देणार नाहीं!" पण अशा वृत्तीनें दादी नाइकांचें कांहीं नुकसान झालें का? मुळींच नाहीं. आपल्या मुलांची उत्तम व्यवस्था करून दादी गेला. दादींचें साधें बोलणें देखील उपमा-उत्प्रेक्षांनीं भरलेलें होतें. बरेंचसें संतवाङ्मय दादीला मुखोद्गत होतें. तबला, पेटी, घुमट, समेळ आदि वाद्यें तो वाजवायचा. नाटकांत कामेंहि करायचा. एका विडीशिवाय आयुष्यांत त्यानें दुसरें कोणतेंहि व्यसन केलें नाहीं. गांवांतल्या कुणाहि चुकणाऱ्या हिंदु मुलाचा कान धरायचा दादीला अधिकार होता. मग तो सारस्वत असो, सोनार असो, वाणी असो, कुणीहि असो!

आमच्या गांवचा भंडारी समाज हा अतिशय कर्मठ आणि सालस असा समाज. घरांत दारूची भट्टी असून तो दारू पीत नाहीं. आयुष्यभर मासेमारीचा धंदा करणारा, पण सोमवार, गुरुवार आणि इतर सणांच्या कोणत्याहि दिवशीं तो मासे व कांदा देखील खाणार नाहीं. व्रतस्थ असतांना तो पराकोटीचा शुचिर्भूतपणा पाळील. पापनाशनार्थ तो वर्षांतून एकदां अग्निदिव्यहि करतो. शिरगांव येथें देवी लयरायीचें देवालय आहे. प्रतिवर्षीं वैशाखांत या देवीची जत्रा असते. या देवीचें व्रत घेतलेल्या माणसानें त्या व्रताची सांगता अग्निदिव्य करून करायची असते. हें अग्निदिव्य अर्थातच थोडेंसें वेगळ्या प्रकारचें आहे. व्रतस्थानें अग्निराशी-वरून शंभर पावलें चालत जाणें असा आज शिरस्ता आहे. पूर्वकालीं कदाचित् याहून कडक दंडक असावा.

या अग्निराशीवरून चालत जाणाऱ्यांना आमच्याकडे 'धोण' असें

नामाभिधान आहे. व्रतस्थानें महिनाभर एकभुक्त राहून अत्यंत शुचिर्भूततेनें ब्रह्मचर्य पाळायचें असतें. जत्रेला जातांना त्याच्या हातांत ठिकठिकाणीं लाल लोकरीचे गोंडे लावलेली वेताची विणलेली काठी असते. एका बाजूला ती काठी झाऱ्यासारखी वळवतात. वेतकाठी हातांत घेऊन पायांतील दोन इंच तळाचें नवीन जुतें चर्रचर्र वाजवीत आमच्या गांवांतून हे व्रतस्थ सकाळींच जायला निघतात. त्यावेळीं त्यांना गांवच्या सीमेपर्यंत पोहोचवायला त्यांच्या घरचीं माणसें आणि गांवांतलींहि बरींच माणसें जात असतात. ज्यांनीं अत्यंत निष्ठेनें व्रतपालन केलें ते तें अग्निदिव्य करून सुखरूपपणें परत येतात. आणि नियमांत चूक झालेल्याचें त्या अग्निराशींत पतन होतें. त्याला मग इतरांनीं वांचवायचा आणि देवळांतील पुजाऱ्यानें त्याच्या अंगावर तीर्थ शिंपडायचें; परंतु जबर जायबंदी होऊन तो परत येत असे. व्रती गांवांत परत आले, कीं विजयी होऊन आलेल्या वीरांसारखा जो तो त्यांच्याकडे कौतुकानें पाही. हिंदुस्थानांत ही पद्धत फार थोड्या ठिकाणीं आहे.

आषाढी-कार्तिकीला आमच्या गांवांतून प्रतिवर्षी बरींच माणसें पंढरपूरला जातात. जन्माला येऊन एकवेळ तरी पंढरपूरची यात्रा करावी ही गांवांतल्या बहुसंख्य हिंदूंची इच्छा असते. काटकसरीनें प्रपंच करून आणि जमलेली गंगाजळी घेऊन चंद्रभागेत एक स्नान करून आलें कीं सर्व पितर स्वर्गाला जाऊन मोक्षमार्ग मोकळा केल्याचें समाधान आयुष्यभर लागत असतें. आतांशा वयानें मोठीं माणसेंच ही इच्छा धरतात; पण पूर्वीं या बाबतींत लहानमोठा असा भेद नव्हता. पंढरपूरच्या यात्रेहून गेलेलीं माणसें परत आलीं, कीं सारा गांव त्यांना सामोरें जातो; व हरिनामाचा गजर करून त्यांना गांवांत घेऊन येतो. कोणी तरी पुरुष माणूस हातांतल्या थाळींतला बुका नमस्काराला आलेल्या पुरुषांना आणि स्त्रिया स्त्रियांना कुंकू लावतात. एक माणूस प्रसादाच्या लाह्या वाटतो. जो नवा माणूस येतो तो त्या वारकऱ्याच्या पायांवर डोकें ठेवून नमस्कार करतो. समोर सुस्वर भजनाची दिंडी आणि पाठून विठ्ठलरखुमाईच्या प्रत्यक्ष दर्शनानें पावन झालेली वारकरी मंडळी. असा हा थाट जेव्हां गांवांत

प्रवेश करतो तेव्हां गांवांतलीं जाणतीं माणसें—जन्माला येऊन त्यांनीं सार्थक केलें अशा अर्थाच्या नजरेनें—त्या वारकऱ्यांकडे एकटक पाहात राहतात. दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं वारकऱ्यांच्या घरीं 'म्हामदें' असते; आणि सारा गांव तिकडे जेवायला जातो.

देवस्की, जडीबुट्टी आणि घाडी भगतांवर या समजाचा विश्वास होता, आणि अजूनहि आहे. आतां तेवढा तो तीव्र नाहीं. पूर्वीं घाडी भगतांचें प्रस्थ फार होतें. कित्येकांचा तो व्यवसायहि होता. असल्या व्यवसायाला पुर्तुगेजांनीं कायद्यानें बंदी घातली होती, त्यामुळें तो छुप्या रीतीनें चालत असे; पण त्याचा उपसर्ग नव्हता. तसा हा समाज उत्सवप्रिय. कोणताहि उत्सव जिवापाड मेहनत करून तो साजरा करील. पाहुण्याचें आदरातिथ्य तत्परतेनें करील. मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतच पूर्वीं शिक्षणाची मेघा होती. कांहींचीं चौदापंधराव्या वर्षींच लग्नें होत आणि मग ते घरच्या व्यवसायांत लक्ष घालीत असत; आतां या समाजाचीं मुलें पुढील शिक्षण घेत आहेत. प्रगतीचीं क्षितिजें त्यांनाहि दिसूं लागलेलीं आहेत.

आमच्या गांवांत चार वाडे आहेत. वाडा म्हणजे शें-सव्वाशें घरें असलेला एक लहानसा परिसर. या प्रत्येक वाड्याचें एरवीं तसें कोणतेंहि व्यावसायिक वैमनस्य नसलें, तरी वेगवेगळ्या उत्सवांत मात्र विनाकारण तेढीचीं प्रकरणें उद्‌भवत. प्रत्येक वाड्याचे म्हणून कांहीं सार्वजनिक उत्सव ठरलेले आहेत. सार्वजनिक सत्यनारायण, गणेशोत्सव, नामसप्ताह, शिमगोत्सव वगैरे. एका वर्षीं वरच्या वाड्यानें पांच दिवस गणपति ठेवायचा तर दुसऱ्या वर्षीं खालच्या वाड्यानें ठेवायचा. ज्या वर्षीं खालच्या वाड्याचा पांच दिवस असेल त्या वर्षीं वरच्या वाड्यानें दीड दिवस ठेवावा अशी कित्येक वर्षें प्रथा चालू आहे; पण समजा एखाद्यानें कांहीं आंगवण वगैरे करून गणपति सात दिवस ठेवला आणि आपल्या ऐपतीप्रमाणें तत्प्रीत्यर्थ कांहीं सत्यनारायण वगैरे करून एखाद्या चांगल्याशा कीर्तनकाराला बोलावून, कीर्तन वगैरे करून थाट उडवून दिला, तर तें इतरांना शल्यासारखें बोचे. आणि मग त्याच्या त्या

वैयक्तिक उत्सवांत व्यत्यय आणण्याकरितां त्याच्या घरापासून जवळच, तें कीर्तन चालू असतांना आणि लोक त्यांत रंगले असतांना, ढोल, ताशे, नगारे, इत्यादि वाद्यें वाजवून त्यांच्या नादानें अंबरहि कोंदीत असत. अशा रीतीनें त्या वाद्यांचें वादन चालू केल्यानें कोणता माणूस गप्प राहील? मग तेढ उत्पन्न होई. एकाच वाड्यांत दोन पक्ष निर्माण होत. त्याला आणखी वाडे मिळत. मारामारीपर्यंत प्रसंग येत. मग नव्या नव्या पक्षांचे नवे नवे उत्सवी उपक्रम होत; पण त्यामुळेंच गांवांत चैतन्य होतें. चढाओढीमुळें कांहीं तरी नित्य नवें घडत असे. एखाद्या वर्षी एका वाड्याचें शिमगोत्सवाचें नाटक चांगलें झालें, त्यांची वाहवा झाली तर दुसरे दुसऱ्या वर्षी अफाट मेहनत करीत. आधल्या वर्षापेक्षां सरस व्हावें म्हणून नाविन्याची खटपट करीत; पण चढाओढच नसली तर तिथें चैतन्य तरी कोठून असणार?

प्रतिवर्षी आंबे-फणस मक्त्यानें घेणें हा या समाजाचा आणखी एक उद्योग; परंतु पिकलेलीं पहिलीं फळें कितीहि भाव आला तरी तीं न विकतां आधीं तीं फळें तो ग्रामदेवतेच्या नैवेद्याला अर्पण करील आणि देवतेचा प्रसाद झाल्यानंतरच तो त्यानंतरचीं फळें विक्रीला घेऊन जाईल. कोणत्याहि कार्याला आरंभ करतांना—मग ती रांपण घालणें असो, शेताची ओंपणी असो, मशागत असो, मळणी असो, पाडाला आलेले आंबे काढणें असो, कांहींहि असो--देवाचा कौल घेतल्या-शिवाय तो त्या कार्याला हात घालणार नाहीं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे हीं सारीं पापभीरु माणसें. निर्व्याज दयाळूपणा असलेलीं, शुद्ध मनाचीं, रामायण-महाभारतांतील कथांच्या कीर्तनांत शुद्धबुद्ध विसरणारीं संकटाच्या वेळीं आपपरभाव विसरून जीव देणारीं अशीं कष्टाळू माणसें.

इतर हिंदु समाजापैकीं दैवज्ञ, वैश्य, नापित, धोबी आणि इतर जाति ह्या सर्व आपआपल्या पारंपरिक व्यवसायांत गर्क असलेल्या. आपआपल्या समाजोन्नतीच्या चळवळी त्यांच्यांतहि आहेत. त्यांचीं वेगळीं देवालयें आहेत, संस्था आहेत; पण विशेष असे तंटेबखेडे नसल्यानें आणि व्यावसायिक उत्कर्ष साधण्याकडेच त्यांचें लक्ष असल्यानें नसत्या

चळवळीचें वारें त्यांच्यांत नाहीं. मात्र कोणत्याहि उत्सवी कार्यक्रमांत पडेल तें काम करायची आणि प्रसंगीं खांद्याला खांदा लावून कार्यपूर्तीसाठीं सर्वस्व द्यायची त्यांची वृत्ति वाखाणण्यासारखी आहे. राहतां राहिला ख्रिस्ती समाज. या समाजावरच पूर्वीं राज्यकर्त्यांची कृपादृष्टि होती. त्यामुळें शिक्षणांत, संपत्तींत, अधिकाराच्या बाबतींत सर्व दृष्टीनें तो हिंदुसमाजापेक्षां वरचढ होता. गोमंतकांत असें एकहि गांव नसावें, कीं जिथें शें-सव्वाशें दगडी बांधणीचे क्रूस, पंचवीसतीस ख्रिस्ताच्या प्रतिमा असलेल्या लहान लहान देवळ्या आणि एक मोठें चर्च या गोष्टी नसतील. याशिवाय प्रत्येक ख्रिस्त्याच्या घरासमोर मजबूत बांधणीचा एक क्रूस असतोच. कोणत्याहि गांवांत जा, नजर फेकावी तिकडे शुभ्र चुन्याचा रंग लावलेले क्रूसच क्रूस दिसतील. धर्मप्रचारासाठीं केवढ्या या दूरदर्शी खुणा! सर्वांच्या नजरेंत भरावें अशा मध्यवर्ती ठिकाणीं चर्च बांधलेलें असतें. आणि त्याचा शुभ्र धवल रंग 'श्रांत पांथस्था, ये, मजकडे ये, इथें तुला शांति मिळेल' असें सतत आवाहन करीत असतो; परंतु मी ज्या पिढींत वाढलों त्या पिढीच्या आधीं कित्येक पिढ्या, ख्रिस्ती समाजाचा तो जेतेपणाचा अहंकारी स्वभाव, हिंदु समाजाच्या बुद्धिमत्तेच्या आणि सर्व क्षेत्रांतील कर्तबगारीच्या लखलखाटामुळें बराच नरमला होता; किंबहुना प्रत्येक बाबतींत त्यांना नमावें लागत होतें.

माझ्या गांवांतील ख्रिस्ती कुटुंबांतील बहुतेक मिळवते घटक दूरदेशीं असल्यानें, शिवाय त्यांच्याकडून येणाऱ्या पैशांवरच त्यांचें सारें जीवित अवलंबून असल्यानें, नित्याच्या गरजा भागविण्यासाठीं गांवच्या हिंदु समाजावरच विसंबून राहणें त्यांना भाग पडे. हिशोबांत डोकें मठ्ठ असल्यानें ख्रिस्ती कधीं किराणा-भुसार मालाचा व्यापारी होऊं शकला नाहीं. विलायती किंवा देशी दारूचीं दुकानें किंवा फार फार तर विलायती औषधांचें दुकान काढणें एवढीच त्याची मर्यादा होती. ख्रिस्त्यांत देखील अनेक पोटजाती आहेत; परंतु ब्राह्मण ख्रिस्ती आणि चाड्डे ख्रिस्ती या दोन जाती मुख्य आहेत. (ज्या क्षत्रियांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला ते चाड्डे या नांवानें ओळखले जाऊं लागले असाहि एक प्रवाद आहे.

असेल !) ब्राह्मण खिस्ती हे बहुधा घरच्या उत्पन्नावर म्हणजे खिस्ती धर्म स्वीकारल्यानंतर त्यांना मिळालेल्या प्रचंड मिळकतीवर अवलंबून असत. त्यांचा नोकरपेशा हा केवळ करमणुकीकरितां होता. परंतु चाड्डयांचें तसें नव्हते. एका बाजूला अस्सल पुर्तुगेजांचें वर्चस्व व दुसऱ्या बाजूला मिस्तिसांची सर्व बाजूंनीं कुरघोडी : या दोहोंच्या संघर्षांत चाड्डयांना अजिबात स्थान राहिलें नाहीं. त्यामुळें त्यांना आपल्या उद्धाराचा मार्ग शोधायला अनेक वाटा धुंडाळाव्या लागल्या. थोरांघरीं स्वैंपाकी, घरकामाचा गडी आणि इतर खालचीं कामें पत्करणें त्यांच्या नशिबीं आलें. त्यापुढची पायरी म्हणजे देश सोडून बाहेर जाणें होतें. मग कुठें आगबोटीवर, नाहींतर हॉटेलांत, एखाद्या क्लबांत मिळेल त्या ठिकाणीं आणि मिळेल त्या शहरांत जीवितरक्षणासाठीं त्यांनीं प्रयाण केलें. जगभर आज त्यांचा संचार आहे. त्यांतील कांहीं उपजतच चांगले कलावंत होते. त्यांच्या कलागुणांचा विकास करण्याचें शिक्षण त्यांना चर्चमधून फुकट देण्यांत येई. त्यामुळें थोडेंसें लिहिण्यावाचण्याचें प्राथमिक शिक्षण आणि तंतुवाद्यें, सुषीर वाद्यें व घनवाद्यें यांचें प्राथमिक ज्ञान एवढ्या सामुग्रीवर ही मंडळी गोमंतकाबाहेर पडली आणि कुठें वाद्य-वृंदांत नाहींतर सिनेमासृष्टींत वगैरे शिरकाव करून घेऊन आज नांव राखून आहेत. कांहीं थोड्या बुद्धिमान लोकांनीं कर्तबगारीहि गाजविली आहे.

कांहींहि न करतां आयुष्यभर बसून खाणारीं, आणि केवळ रविवारीं चर्चमध्यें जाऊन येण्यापुरतीं घराबाहेर पडणारीं अनेक ब्राह्मण खिस्ती कुटुंबें माझ्या माहितींत आहेत. आपल्या ऐसपैस घराची स्वच्छता ठेवण्यांतच त्यांचा दिवस उगवतो आणि मावळतो. जगांतील कोणत्याहि घटनेची दखल घेण्याची त्यांना गरज नाहीं. 'उद्जन बॉंब' निर्माण झाला काय किंवा माणसें चंद्रावर जाऊन पोहोंचली काय, त्यांना ना खेद ना खंत. कदाचित् पुर्तुगेज गोव्यांतून गेले हें देखील त्यांना माहीत नसावें. चारपांच भाऊ असले तर एखाद्यानेंच लग्न करणें, दुसऱ्या किंवा तिसऱ्यानें 'पाद्री' होणें आणि एकाहून अधिक बहिणी असल्या तर योग्य

वतनदार नवरा मिळत नाहीं म्हणून त्यांनी 'माद्री' (जोगिणी) होणें अशा घटना घडणें, हें या घराण्यांत नित्याचें. त्यांतलीं अनेक घराणीं नामशेष होत चाललेलीं आहेत. मडगांव आणि इतर सासष्टी प्रांतांत तर अशीं घराणीं कैक आहेत. बरें, या घराण्यांतील एखादा मुलगा बाहेरच्या जगांत गेला तर तो तिथेंच लग्न करून नवा संसार थाटून व्यवस्थित राहतो. दोनतीन वर्षांनीं एकदां आपल्या घरीं बदल म्हणून येतो; पण प्रपंच वाढल्यानंतर तो पुन्हा परत यायचें नांव काढीत नाहीं. आपल्या आईवडिलांनाच तो तिथें घेऊन जातो. अलीकडे पुष्कळ लोकांनीं आपलीं घरेंदारेंहि विकल्याचें नजरेस येतें.

चाड्यांत स्त्री-पुरुष संबंधाच्या मर्यादा किंवा इतर चालीरीतींच्या बाबतींत फारसा विधिनिषेध बाळगला जात नाहीं; पण बामण खिस्त्यांत मर्यादा मात्र सर्व आवर्जून पाळल्या जातात. बामण खिस्त्यांच्या मुली—विशेषत: खेडेगांवांतील—शीलाला अधिक जपतात. विवाहप्रसंगीं जबर हुंडा द्यावा लागत असल्यामुळें आणि घराण्याला साजेसा नवरा मुलगा योग्य वेळीं मिळत नसल्यानें या वर्गांतील मुलींना अविवाहित राहण्याचा प्रसंग येतो. याशिवाय वारसा हक्कानें प्राप्त झालेली बापाची इस्टेट दुसऱ्याला मिळूं नये म्हणूनहि कांहीं मुली मन मारून अविवाहित राहिलेल्या आढळून येतात. मग कुठें मास्तरीण किंवा एखाद्या सरकारी खात्यांत आयुष्यभर नोकरी करीत त्या दिवस काढतात. धर्म हेंच सर्वस्व असल्यानें यांतील शेंकडा दहा टक्के मुली 'माद्री'चा पेशा पत्करतात. आणि एकदां जोगीण झाली, कीं सर्व ऐहिक सुखांवर तिला तिलांजली द्यावी लागते. खिस्ती मुलापेक्षां खिस्ती मुलगी ही अधिक भावनावश, संवेदनाक्षम आणि स्वप्नाळूहि आहे. वयांत आलेल्या मुलीहि ठराविक दिवशीं 'कन्फेशन'-साठीं चर्चमध्यें जातील आणि मागच्या आठवड्यांत जें जें घडलें तें तें कोणताहि आडपडदा न ठेवतां पाद्रीकडे कबूल करतील; आणि दिलेली शिक्षा मुकाट्यानें भोगतील. प्रेमभंगाचें दु:ख आयुष्यभर भोगत राहिलेल्या आणि पुढें केव्हांहि प्रपंचांत न पडलेल्या कांहीं तरुणी माझ्या माहितींत आहेत. खेडेगांवांतल्या लग्न न केलेल्या मुली फ्रॉक किंवा परकर-पोलका

घालतात; आणि लग्नानंतर साडी नेसतात. शहरवासियांत मात्र दोन्ही पद्धति आहेत. एका साडीखेरीज मात्र विवाहसंस्काराचें कोणतेंहि खास चिन्ह ख्रिस्त्यांत नाहीं.

ख्रिस्त्यांचा स्वभाव उथळा नाहीं. ऊठ-सूट घे निर्णय अशी त्यांची वृत्ति नाहीं. प्रत्येक बाबतींत ते दीर्घ विचार करतील. सत्पात्रींच दान करतील. त्यांच्या प्रत्येक गोष्टींत मर्यादा असते. आपलें घर हेंच त्यांचें विश्व; तेंच त्यांचें सारसर्वस्व. आपलें घर अतिशय स्वच्छ ठेवणें, धर्मानें घालून दिलेल्या मर्यादांचें अखंडितपणें पालन करणें आणि संतुष्ट वृत्तीनें राहणें यांतच त्यांना आनंद आहे. दुपारीं बारा वाजतां, सायंकाळीं सहा वाजतां चर्चची घंटा वाजली कीं ख्रिस्त्याच्या हाताचा आंगठा आपल्या शरीरावर कपाळापासून हृदयापर्यंत उभा आणि दोन्ही खांद्यांना आडवा स्पर्शून आपोआप क्रूस काढील. मग तो एखाद्या समारंभांत असो, शेतांत असो किंवा आणखी कोणतेंहि काम करीत असो. क्रूस काढून झाल्यावर तो तोंडांतल्या तोंडांत एक लहानसें स्तोत्र म्हणतोच. आपल्या धर्माबद्दल त्याला अपार आदर. हिंदु माणूस आपल्या धर्मांतील कांहीं अवास्तव स्तोमांबद्दल आपली जीभ सैल सोडील; पण ख्रिस्ती माणूस आपल्या धर्माबद्दल बेसावधपणें देखील चुकून अनुदारपणाचे उद्गार काढणार नाहीं. जितकें उत्पन्न त्याचा अर्धा वांटा खर्च व अर्धा भाग पुढील तरतुदी-साठीं ठेवणें हें त्याचें जीवितकार्य. परसांतल्या पपईच्या झाडावरील पांच पपया पिकल्या तर त्यांतल्या चार तो विकणार, किंवा त्यांतली एखादी आपल्याला सदैव उपयोगी पडणाऱ्या हिंदु गृहस्थाघरीं भेट म्हणून पाठविणार. नसत्या प्रतिष्ठितपणाखालीं त्या पांचहि पपयांची नासधूस तो करणार नाहीं. प्रत्येक वस्तूचा मर्यादेनें उपभोग घेणें हें ख्रिस्त्याच्या रोमरोमांत भिनलेलें आहे.

दारू पिणें ही त्यांच्यांत धर्माज्ञा आहे. प्रत्येक घरंदाज ख्रिस्ती माणूस दारू पितोच; पण जेवणाआधीं ठरलेलें माप पितो. त्याच्याबाहेर तो जाणार नाहीं. कोणत्याहि परिस्थितीशीं ताबडतोब तादात्म्य होण्याची त्याची वृत्ति असल्यामुळें जगाच्या पाठीवर कुठेंहि गेला तरी तो यशस्वी

जीवन जगतो. आफ्रिका किंवा ब्राझिल वगैरे देशांत माझ्या गांवचे पुष्कळ तरुण ख्रिस्ती नोकरीसाठीं जाऊन राहिलेले आहेत. सातआठ वर्षांच्या कालावधींत एकदां तरी त्यांचें घरीं येणें असतेंच. त्या अवधींत एखाद्यानें लग्न केलें आणि आपल्या पत्नीला परत जातांना तो बरोबर नेऊं शकला नाहीं—आणि पत्नी गरोदर असली—तर आपल्या संततीची व पत्नीची खास व्यवस्था पाहण्यासाठीं तो आपल्या एखाद्या जिवाच्या स्नेह्याची नेमणूक करतो; त्याला 'कुंपार' अशी संज्ञा आहे. हा कुंपार त्या कुटुंबाला सर्वतोपरी मदत करीत असतो. माझ्या गांवांतून नशीब काढण्यासाठीं बाहेर गेलेल्या लोकांत जसे 'कुक-बटलर' आहेत तसेच चांभारकाम, शिवणकाम, खलाशीकाम, फिडलवादन, इंजिनियरिंग, डॉक्टरी, वकिली इत्यादि क्षेत्रांतहि यशस्वी रीत्या काम करणारे लोक आहेत.

आधीं हिंदु आडनांव लावून नंतर आपलें ख्रिस्ती आडनांव लावणारेहि अनेक आहेत. 'कामत सौजा', 'देसाई फेर्रांव', 'शेणवी पेरैरा' अशीं कित्येक आडनांवें आहेत. हिंदुधर्माच्या कांहीं खुणा पाळण्याचीहि कित्येकांत चाल आहे. कित्येक ख्रिस्ती देवळांत जाऊन प्रसाद घेतात. गोमंतकांतील कांहीं देवळांत तर प्रसादाचा पहिला मान ख्रिस्त्यांना आहे. त्यांचा मान झाल्याशिवाय इतरांना देवलिंगाचा प्रसाद होतच नाहीं. मडगांव शहरांत दर सोमवारीं सायंकाळीं प्रत्येक ख्रिस्ती घरांत ओसरीवर समयी पेटवून ठेवतात. एखादा अनोळखी इसम मडगांवांत सोमवारीं सायंकाळीं सूर्यास्ता-नंतर फिरायला बाहेर पडला तर ओसरींत ठेवलेल्या समयीमुळें ख्रिस्त्याचें घर कुठलें आणि हिंदूचें कुटलें असें त्याला कोडें पडल्यावांचून राहणार नाहीं. जशीं हिंदूंत तशींच ख्रिस्त्यांतहि कांहीं बुद्धिमान माणसें होऊन गेलीं. आपापल्या क्षेत्रांत त्यांनीं नांव गाजविलेलें आहे. जाणत्या माणसांच्या ओठावर त्यांचीं नांवें सदैव खेळत असतात.

जी कांहीं कर्तबगारी दाखवायची असेल ती आपल्या वास्तूच्या आसपास राहूनच दाखवावी अशी पूर्वीच्या लोकांची शिकवण होती. बाहेर कामा-साठीं गेलेला माणूस सूर्यास्तापर्यंत परत घरीं येत असे. त्यामुळें गोमंतकाची हद्द ओलांडणें हें भीतिदायक वाटत होतें. वाडवडिलांनीं एकदां मांडून

ठेवलेल्या चुलीवर जें कांहीं शिजेल तें खाऊन संतुष्ट राहावें, गांवाबाहेर अफाट संपत्ति असली तरी तिथें ढुंकूनहि पाहूं नये, अशी परंपरा होती; परंतु माझ्या गांवच्या अनेक ख्रिस्ती तरुणांनीं गोमंतकाची हद्द तर ओलांडलीच होती; पण हिंदुस्थानची हद्द ओलांडूनहि ते 'मॉंबासा', 'एडन' आदि ठिकाणीं जाऊन आपली कर्तबगारी गाजवीत होते. हिंदू तरुण कर्तबगारी गाजवायला गांवाबाहेर गेला तो त्यांच्यामागून.

मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतच माझें शिक्षण झालें. खास अशी मराठी शाळा माझ्या गांवांत नव्हती. कुठें एखाद्या पडक्या देवळींत, थोडींच माणसें राहणाऱ्या एखाद्या मोठ्या घराच्या निरुपयोगी जागेंत किंवा एखाद्या गोठ्यांत असें माझें आणि माझ्या समवयस्क मुलांमुलींचें शिक्षण झालें. भंडारी समाजांतील मुलें त्यावेळीं फारशीं शिकत नव्हतीं. शाळेंत सगळीं मिळून वीसबावीस मुलें होतीं. एवढ्याशा मुलांच्या फींतून मास्तरांचा महिन्याचा पगारदेखील भागविणें कठीण होतें. चर्चची शाळा गरीब ख्रिस्त्यांसाठीं होती. तिथें प्राथमिक पुर्तुगेज शिकविलें जात असे. पुढचें पुर्तुगेज शिक्षण देणारें स्कूल शासनसंस्थेकडून चालविण्यांत येत असे; त्याची स्वतंत्र सुबक इमारत डोंगराच्या पायथ्याशीं एका निवांत जागेंत आहे. पण मराठी शाळेला मात्र कसलाच आधार नव्हता. गांवच्या आठनऊ कुटुंबांनीं स्वखर्चानें मास्तर ठेवायचा व अशाच एखाद्या पडक्या जागेंत ती चालायची. या परिस्थितीमुळें मास्तर टिकत नसत. फार फार तर एकदोन वर्षें एखादा मास्तर टिकायचा. बारा वर्षांवरील मुलास पुर्तुगेज विश्वविद्यालयांत प्रवेश मिळत नसे. त्यामुळें कांहींना तिसऱ्या इयत्तेपर्यंत किंवा दुसऱ्या इयत्तेंतच शाळा सोडून पुर्तुगेज स्कूल-मध्यें प्रवेश करावा लागे.


माझ्या वेळीं मराठी शाळा काढणें किंवा अशा रीतीनें कायद्याबाहेर शिक्षण देणें हा गुन्हा होता; परंतु आम्हांला असें छुपें शिक्षण कां देण्यांत येत असे हें मात्र कोडें सुटत नाहीं. कांहीं कांहीं ठिकाणीं मोठ्या शाळा

होत्या. कुंभारजुवें, माशेल, फोंडें, पणजी, मडगांव, म्हापसें इत्यादि ठिकाणीं तेथील जबाबदार व्यक्तींनीं पुढाकार घेतल्यानें आणि सरकार-दरबारीं त्यांचें वजन असल्यानें, शिवाय तिथें बहुसंख्येनें ब्राह्मण किंवा सुशिक्षित हिंदु समाजाची वसति असल्यानें, त्या शाळांचें नांव गाजत होतें. दुर्दैव होतें तें आमच्यासारख्या लहान खेड्यांचें; परंतु नानातऱ्हेनें झीज सोसून लपतछपत कां होईना, माझ्यामागच्या पिढीनें अनेक प्रसंगांना तोंड देत चौथ्या इयत्तेपर्यंतचें मराठी शिक्षण आम्हांला दिलें. संतवाङ्मयाचा उद्घोष मात्र घराघरांतून रात्रंदिवस चालू होता. बोलण्या-चालण्यांत पंत कवींच्या काव्यांतील उपमा-उत्प्रेक्षा होत्या. कथा-कीर्तनें सातत्यानें रंगत होतीं. माझ्या गांवांतला एखादा अशिक्षित हिंदु माणूसहि उपमा देतांना अभंगांतून देई. "नाहीं निर्मळ जीवन काय करील साबण?" "अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ! त्याच्या गळां माळ असो नसो!"....शुद्ध उच्चारांनीं ते लोक उपमा देत असतांना आम्हीं ऐकल्या. आमच्या पिढीवर त्या बोलण्यानें संस्कार केले.

आर्याभारत या ग्रंथांतील शेंकडों आर्या कित्येकांना मुखोद्गत होत्या. "फारचि बरि निरयगती परवशता शतगुणें करी जाच" ही आर्या माझ्या वडिलांच्या ओठावर नेहमीं असे. त्याचा अर्थ मागाहून मला समजला. मोरोपंतांहून वामन श्रेष्ठ आहे, असा वाद आमचे शेजारी कृष्णप्रभू घालायचे; मग वादाचा समारोप करतांना माझे वडील म्हणायचे "आर्या आर्यांसि रुचे हीच्या ठायीं असे बहू गोडी!" एखादी कूट आर्या किंवा श्लोक सांगून त्याचा अर्थ सांगितल्यास अमुक बक्षिस देईन असें सांगून कृष्णप्रभू आम्हां मुलांना दोनदोन दिवस त्या आर्येचा अर्थ लावीत बसवून ठेवायचे. मग आम्हांला तो लागत नसल्यावर, "हरलों म्हण; शेण खाईन म्हण." असें सांगितल्यावर अर्थ जाणून घेण्याकरितां आम्ही सपशेल शरणचिठी देत असूं. मग ते आम्हांला अर्थाचें स्पष्टीकरण करून सांगायचे. शाळेपेक्षां मराठीचें खरें ज्ञान मिळालें तें अशा रीतीनें चर्चा करून, विनोद करून. संतवाङ्मय ही आमची ज्ञानगंगा होती. मी तरी त्यांत यथेच्छ डुंबलों.

'काय करायचें असेल, जी काय कर्तबगारी दाखवायची असेल तीं गांवांतच राहून दाखवावी!' असें आग्रहानें सांगणारे आमचे वाडवडील आम्हांला मराठी भाषेंत शिक्षण देण्यासाठीं एवढे कां धडपडत होते? मराठी भाषेचें त्यांना एवढें प्रेम कां होतें? कुणीं बळजबरीनें ती त्यांच्यावर लादली होती का? स्तवन मराठी, भजन मराठी, पूजन मराठी, पत्रलेखन मराठी, हिशोब मराठी, देवदेवतार्चनाची भाषा मराठी....कां? राज्य-कारभाराची भाषा पुर्तुगेज, व बोलीभाषा कोंकणी! या दोन भाषांवर सारें जीवन अधिष्ठित! मग मध्येंच ही तिसरी भाषा एकाएकीं प्रकटली का? असें त्या भाषेंत कोणतें सामर्थ्य आढळलें म्हणून समस्त गोमंतकीयांनीं तिची इतकी जिवापाड जोपासना करावी? तिच्या वाढीसाठीं तन, मन, धन अर्पण कां करावें? मला उत्तर सांपडत नाहीं. पुढील कांहीं वर्षांत कोंकणी आणि मराठी या दोन भाषांमध्यें वादंगें उत्पन्न होतील अशी त्या लोकांना कल्पना तरी होती का? असा विचार त्यांच्या स्वप्नांत देखील कधीं आला नसेल! अशी कल्पनादेखील त्यांच्या मनाला कधीं शिवली नसेल!

मला बाराव्या शतकांतील शिलालेखांच्या पुराव्यांकडे पाहायचें नाहीं, किंवा सोळाव्या शतकांतील मराठी ग्रंथरचनेकडेहि लक्ष द्यायचें नाहीं; परंतु गोमंतकाच्या स्वातंत्र्याचीं किंबहुना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचीं देखील ज्यांनीं कधीं स्वप्नें पाहिलीं नाहींत; दुष्टांच्या दंडनापासून स्वतःला वांचवणें आणि धर्मद्वेष्ट्यांपासून स्वतःची संस्कृति जोपासणें यांतच ज्यांचीं आयुष्यें वेंचलीं, त्यांनीं मराठी भाषेवर कोणत्या दूरदृष्टीनें प्रेम केलें? त्यांत त्यांचा कांहीं हेतु होता का? गेल्या अर्धशतकांत ज्या ज्या गोमंतकीयांनीं ग्रंथरचना केली ती मराठींतच कां? कवित्वरचना करून भक्तिमार्गाचा प्रचार केला तो मराठींतच कां? कोंकणी आणि मराठी भाषेंतील अंतर्गत संघर्षाची ठिणगी उडेल, त्यांत कांहीं अंतर्गत राजकारणहि निर्माण होईल याची त्या बिचाऱ्यांना कधीं जाणीवहि नव्हती. कृष्णभट बांदकरांनीं श्रीरामचंद्राची महती गातांना आणि सोयरोबानाथांनीं नाथसंप्रदायाचा महिमा गातांना आपापल्या संप्रदायाच्या प्रचारार्थ वास्तविक बोलीभाषेचाच



तांवडी सूर्ल येथील
हेमाडपंती बांधणीचें देऊळ



श्री शांतादुर्गा, संस्थान कवळें



मळणी



रांपण

आश्रय घ्यायला हवा होता. वांदकरांचीं कवनें जशीं गोमंतकीयांच्या ओठांवर खेळतात तशीं तीं गोमंतकाबाहेर महाराष्ट्रांत कुठेंहि खेळलेलीं विशेष आढळत नाहींत. किंबहुना इतर संतांसारखे ते कुणाच्या माहितींतहि नाहींत. असें असतांना त्या उभय संतांनीं आपलें रसाळ कवित्व मराठींतच कां रचावें? त्यांना त्या भाषेच्या प्रचारार्थ कुणीं नेमलें होतें का? का ती उपजत प्रेरणा होती? गेल्या पन्नास वर्षांतील शेंकडों गोमंतकीय प्रतिभावंत मराठींतच ग्रंथरचना करण्यासाठीं एवढे धडपडले कां? कां त्यांनीं जिवाचा एवढा आटापिटा केला?

भगवान वेदव्यासांपासून महात्मा गांधींपर्यंतचा प्रत्येक भारतीय तत्त्ववेत्ता सत्यान्वेषणासाठीं धडपडला. आणि त्यांच्या प्रत्येक तत्त्वप्रतिपादनाचा निर्णय कालानेंच दिला. त्याला अनुसरून वरील अनेक प्रश्नचिन्हांचें एवढेंच एक उत्तर सांपडतें कीं या भाषिक संघर्षाचें निर्णयात्मक उत्तर काल देईल! आज त्याच्यासंबंधीं सुज्ञांनीं चिंता करण्याचें कांहींएक कारण नाहीं. जें सत्य आहे तें अजर आहे, अमर आहे! माझ्या गांवांतील प्रत्येक हिंदु माणूस त्याच सत्याचा, त्याच अजर-अमरत्वाचा पूजक आहे.

हो, एक सांगायचें राहिलेंच. आमच्या गांवांत इतर मोठ्या गांवांप्रमाणेंच मराठी शाळेची एक स्वतंत्र इमारत असावी ही कित्येक वर्षांची मनीषा आमच्या लहानपणीं जरी पूर्ण झाली नाहीं तरी मागाहून मात्र ती पूर्ण झाली. गांवच्या दोनतीन ब्राह्मण सद्गृहस्थांनीं गांवच्या चर्चेसमोर एक विस्तीर्ण जागा विकत घेऊन तिथें शाळेची टुमदारशी एक इमारत बांधली. एकानें शाळेशेजारीं एक विहीरहि बांधून दिली, व तिचें श्रीशांतादुर्गा-विद्यालय असें नामकरणहि झालें. गांवच्या हिंदु समाजाचीं एकंदर अडीचशेंच्या आसपास मुलें या शाळेंत शिक्षण घेत होतीं. शाळेंत दोन शिक्षक होते. गोमंतक स्वतंत्र व्हायच्या पूर्वीं या शाळेला सरकारी मदतहि मिळण्याचें घाटत होतें; परंतु स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या दोन वर्षांत ज्या कांहीं विचित्र घडामोडी घडल्या त्यांत जातीयवादाचें भूत अकस्मात् उद्भवलें. तें कुणीं निर्माण केलें, कसें निर्माण झालें याची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. अनेक भुतें आज जिथें निर्माण झालेलीं आहेत त्यांतलेंच तें एक भूत.

वास्तविक आमच्या गांवांत आज-घडीला नांदतीं अशीं सहा-सातच ब्राह्मणांचीं घरें आहेत. या सहासात घरांतील वीसपंचवीस पुरुषांत आणि इतर हिंदु जातींत कोणत्याच तऱ्हेचें वैमनस्य नव्हतें. उलटपक्षीं सर्वजण एकमेकांशीं बंधुत्वाच्या नात्यानेंच वागत होते. गांवांत पाटील या पदवीचा पुरुष—ज्याला 'रेजिदोर' असें म्हणतात तो—नांवालाच होता. एखाद्याचें गुरूं दुसऱ्या एखाद्याच्या शेतांत जाऊन त्याचें नुकसान केलें तर त्या मुक्या प्राण्याला दोष न देतां नशिबाला दोष देऊन उदार मनानें तो शेतकरी त्या गुराला मालकाकडे आणून सोडीत असे; तसाच एखादा तिरसट असला तर त्याची एकदोन वेळां मनधरणी करावी लागे एवढेंच. परंतु जन्माचें हाडवैर असलेलीं माणसें गांवांत नव्हतींच म्हटलीं तरी चालेल. अशा या गांवांत कली शिरला आणि एक चालती शाळा बंद करून निघून गेला. या ठिकाणीं फक्त एवढेंच सांगायचें आहे, कीं आज त्या शाळेच्या इमारतींत कांही ख्रिस्ती धर्मप्रसारक जोगिणी राहातात. यापुढें काय काय चमत्कार घडणार आहेत हरि जाणे!

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९१२६८

## विद्येचें माहेर — मठग्राम

पणजीच्या पुर्तुगेज विश्वविद्यालयांत मला प्रवेश मिळेना म्हणून मीं मडगांव येथील शाखेंत प्रवेश मिळविण्याची खटपट केली. आणि माझ्या बहिणीचें घर तिथेंच असल्यानें माझी सर्व सोय होऊन वयाच्या तेराव्या वर्षी मी मडगांवीं दाखल झालों. तत्पूर्वी मडगांव मीं पाहिलें होतें; माझ्या बालबुद्धीला त्यावेळीं कांहीं कळलें नव्हतें; पण माझ्या खेड्यांतून एकदम इथें आल्यानें शहरी जीवन आणि तेथील हिंदु समाजानें करून घेतलेली आपली सर्वांगीण प्रगति या दोन गोष्टींचें दर्शन माझ्या मडगांवांतील तीनचार वर्षांच्या वास्तव्यांत मला घडलें. मीं सभा पाहिल्या नव्हत्या, संमेलनें पाहिलीं नव्हतीं, मिरवणुका पाहिल्या नव्हत्या, वाचनालयें पाहिलीं नव्हतीं, कसलेंहि भव्य स्वरूपाचें सांस्कृतिक दर्शन मला तोंपर्यंत घडलेलेंच नव्हतें. मडगांवांत मात्र या सर्व गोष्टी निरागस कुतूहलानें आणि असीम उत्सुकतेनें मीं पाहिल्या.

सारस्वत ब्राह्मण समाज, श्री दामोदर वाचन मंदिर, विठ्ठल मंदिर, श्री दामोदर विद्याभवन, दैवज्ञ समाजाचें वाचनालय, हरि-मंदिर, श्री दामोदराचें सभागृह अशीं हीं सात ठिकाणें म्हणजे सांस्कृतिक चळवळीचीं फार मोठीं केंद्रें होतीं. बृहन्महाराष्ट्रांतील महाराष्ट्र संस्कृतीचे अभिमानी असलेल्या व आपल्या बुद्धीची सर्वांगीण उन्नति केलेल्या बऱ्याच विद्वानांचें दर्शन अनायासें मला मडगांवांत घडलें. किती थोर थोर लोक पाहिले मीं ! साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकरांपासून तत्कालांतील नवतरुण पिढींतील आघाडीवर असलेल्या प्रा. अनंत काणेकरांपर्यंत अनेक विचारवंतांना मुग्ध होऊन मीं पाहिलें आणि ऐकलें. वाचनालयांतील दैनिकें, साप्ताहिकें, पाक्षिकें व मासिकें न्याहाळतां आलीं. सारस्वत ब्राह्मण समाज ही संस्था बरीचशी अद्ययावत् स्वरूपाची. त्या मानानें दामोदर वाचनालय ही संस्था किंचित् जुनाट वाटायची; पण कांहीं दुर्मिळ व उत्कृष्ट पुस्तकें दामोदर वाचनालयांत अधिक होतीं. दोन्ही वाचनालयांतील व्यवस्थापक आपल्या कामांत दक्ष व वाकबगार होते. दामोदर वाचनालय या संस्थेचे विश्वस्त श्री. दामू दलाल हे होते. आम्ही त्यांना दादा म्हणत असूं आणि त्यांच्या वशिल्यानें पुस्तकें वाचायला नेत असूं. चौदा वर्षांच्या आंतील मुलें कोणतीं पुस्तकें वाचतात यावर वाचनालयाच्या अधिकाऱ्याची नजर असायची. दामोदर वाचनालयांत मीं एकदोन वेळां नाटकाचीं पुस्तकें मागितलेलीं होतीं; पण "या वयांत विशेष नाटकें न वाचतां मी देतों तीं पुस्तकें वाच" असें जरा खडसावल्यासारखेंच बोलून मला तेथील अधिकाऱ्यानें 'पतित' या नांवाचें एक सुरेख पुस्तक दिलें; व तें मीं तीन दिवस मोठ्या आवडीनें वाचलें. तेव्हांपासून मला कादंबऱ्या वाचायची गोडी लागली. वाचनालयाच्या व्यवस्थापकालाहि वाचनांत चुकल्या पोराला दटावण्याचा अधिकार होता.

मडगांवला 'मठग्राम' असेंहि म्हणतात. तसें कां म्हणतात ही गोष्ट मला कळली नाहीं. कदाचित् पूर्वकालीं इथें हिंदु-धर्म-शास्त्राध्ययनाचे मठ असावेत आणि गोमंतभूमींतले विद्यार्थी त्या मठांत विद्यार्जन करीत असावेत. दुसरें अनुमान म्हणजे : श्री गौडपादाचार्य मठाधीशांचा एक फार

मोठा मठ इथें बाटाबाटीच्या कालापूर्वीं होता; परंतु ख्रिस्ती धर्मप्रचारकांनीं मठासह तेथील देवस्थानांचाहि विध्वंस केला; मठ गेला पण मठग्राम हें नांव मात्र राहिलें असावें. सुब्रह्मण्यानंदतीर्थांची समाधि व मठ मडगांवांत आहे. सुब्रह्मण्यानंदतीर्थांचें मूळ नांव सुब्राय लक्ष्मण नायक. गोमंतकांतील प्रतिष्ठित घराण्यांत देवघराच्या भिंतीवर त्यांचाहि एक फोटो असतो. हे गृहस्थ आर्यवैद्यकींत निष्णात होते, तसेंच जडजवाहिराची, रत्नाची परीक्षा करण्यांतहि ते निपुण होते. गोमंतकांतील मध्यम वर्गाला त्यांचा फार मोठा आधार होता. हिंदुस्थानांतून गोमंतकांत येणाऱ्या व्यापाऱ्याला वा प्रवाशाला त्यांच्याच घराचा आश्रय असे. श्रीमद्विवेकानंद ज्या वेळीं गोमंतकाच्या दौऱ्यावर आले होते त्या वेळीं त्यांचें वास्तव्य सुब्राय नायक यांच्याकडेच होतें. अखिल गोमंतकांत सुब्राय नायकांचें नांव एखाद्या पुराणपुरुषाइतक्याच आदरानें उच्चारलें जातांना मीं बालपणापासून ऐकलें. आमच्या देवघराच्या भिंतीवर असलेल्या त्यांच्या छबीवर 'श्री सुब्रह्मण्यानंदतीर्थ यति' असे शब्द लिहिलेले होते. आणि त्याखालीं सन १९११ संन्यासदीक्षा व सन १९१९ समाधिस्थ असें लिहिलेलें होतें. अविरतपणें परोपकार करीत राहिलेले आणि शेंकडों कुटुंबांकडून दुवा घेत असलेले सुब्राय नायक हे एक अत्यंत थोर पुरुष मडगांवांत होऊन गेले. अलीकडेच त्यांचें चरित्रहि प्रसिद्ध झालेलें ऐकिवांत आहे.

मीं पाहिलेलें मडगांव हें सभा, संमेलनें आणि सांस्कृतिक चळवळीचें आगर होतें. महाराष्ट्रांतून कुणीहि विद्वान आला तर त्याचें पहिलें कौतुक मडगांवकरांनीं करायचें. पहिलें व्याख्यान मडगांवांतच व्हायचें आणि नंतर इतर ठिकाणीं. गोमंतकांतील व्यासंगी व बुद्धिमान लोकांचा मेळावाहि मडगांवांतच जमायचा. त्यांच्या सभा, त्यांचीं संमेलनें मडगांवकरांच्या सहकार्यानें भरायचीं. शांबाराव सरदेसाई, व्यंकटेश विनायक सरदेसाई, दत्तात्रय व्यंकटेश पै, काशीनाथ दामोदर नायक, गुंडू सीताराम आमोणकर, प्रो. रामचंद्र शंकर नायक, सुब्राव रामकृष्ण सामंत,

प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर, नरसिंह पुरुषोत्तम सुकेरकर, भारतकार हेगडे देसाई प्रभृति सरस्वतीभक्त या सभांना आवर्जून हजर राहात. ह्या सर्वांची वाणी चांगली होती. आमोणकर, प्रो. नायक, सामंत यांचीं मराठी भाषणें ऐकावीशीं वाटत. प्रा. सावर्डेकर यांचें बहुधा चढाईचें धोरण असे. सगळी सभा ते दणदणून सोडायचे.

शांबाराव सरदेसाई यांचें विवेचन मार्मिक आणि मुद्देसूद असे. सभेची सुरुवात आणि शेवट बहुतेक वेळां सुकेरकर किंवा दत्तात्रय व्यंकटेश पै करायचे. दत्ता पै यांचें वक्तृत्व अस्खलित आणि मर्मग्राही असे, मडगांवांतील कोणत्याहि सार्वजनिक कार्यांत ते अग्रभागींच असायचे. मडगांवांतील अनेक सांस्कृतिक चळवळींचें नेतेपण श्री. पै यांच्याकडे असायचें म्हटलें तरी चालेल. 'हिंदु विद्यार्थी गृह' नांवाची विश्वविद्यालयीन शिक्षण खाजगी रीत्या देणारी त्यांची संस्था होती. पुस्तकी ज्ञानाव्यतिरिक्त त्यांच्या संस्थेंत अनेक तऱ्हेचें अन्य शिक्षण आपोआप मिळत असे. निदान माझ्यावर तरी पै यांनीं फार मोठे संस्कार केलेले आहेत. त्यांचें कोणतेंहि विवेचन अभ्यासपूर्ण, आणि तें प्रतिपादण्याची भाषा ओजस्वी होती. 'हिंदु' या नांवाचें साप्ताहिक त्यांच्या संपादकत्वाखालीं निघत होतें. आणि गोमंतकांत तोंपर्यंत निघालेल्या नियतकालिकांत गुणांच्या क्रमांकानें हिंदु पत्र अग्रेसर होतें. ठेंगणीशी मूर्ति; बुद्धिमान माणसांना बहुशः असतें तसें आणि पाहतांक्षणींच चटकन लक्षांत यावें असें चेहऱ्याच्या मानानें बरेंच मोठें नाक, गोलसर डोळे; डोक्याला खादीची टोपी, अंगांत सद्रा, किंवा रुमाल बांधलेला असल्यास बंद गळ्याचा कोट, धोतराचें तोकडेंसें नेसण व पायांत कोंकणी वहाणा असा त्यांचा साधा वेष होता.

राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक, वाङ्मयविषयक, शैक्षणिक, चरित्रात्मक इत्यादि सर्व विषयांत त्यांची वाणी आणि लेखणी एका आगळ्या विचारसरणीनें तळपली. इतकेंहि असून श्री. पै हे अत्यंत निगर्वी आणि अडल्यानडल्याला मदत करणारे होते. गरीब विद्यार्थ्यांचे कैवारी होते; मार्गदर्शक होते. महाराष्ट्रांतून चांगल्या चांगल्या समारंभांना व्याख्यानांचीं

आमंत्रणें त्यांनाच येत असत. ‘मठग्रामस्थ हिंदु सभा’ या संस्थेतर्फे भरविण्यांत आलेल्या (व फोंडें येथील आल्मैद सभागृहांत भरलेल्या) दुसऱ्या शिक्षण संमेलनाच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्यांचें अध्यक्षीय भाषण खूप गाजलें होतें. मडगांवांत तर ज्याच्या त्याच्या तोंडीं त्यांच्या भाषणाचा सारांश होता. त्याच्या वांटलेल्या छापील प्रतीहि पुष्कळांकडे होत्या. मलाहि त्यांतील एक प्रत मिळाली होती. त्यांच्या अध्यक्षीय भाषणांत ज्या विधानांना खडखडून टाळ्या मिळाल्या होत्या, तीं विधानें चर्चेचा विषय झालेलीं होतीं. बऱ्याच वृत्तपत्रांतून जाड ठशांत ती उद्धृत झालेलीं होतीं. श्री. पै यांचीं तीं वाक्यें अजून मला स्मरतात. ते म्हणाले होते—

> “*आपली मराठी मातृभाषा, विचारांचें वाहकत्व कशी उत्तम करूं शकते याचें अगदीं निकटवर्ती उदाहरण पाहायचें असेल तर कारे-बोरकर कवींकडे, लक्ष्मणराव–जयवंतराव सरदेसाई प्रभृति लघुकथा-लेखकांकडे नजर टाकावी. या तरुणांनीं सहा-सहा दहा-दहा वर्षें परभाषेचें (पुर्तुगेज) अध्ययन केलें असेल, आणि मातृभाषा मराठीचें त्यांचें शिक्षण त्याचा निम्मा कालहि झालें नसेल; असें असतां ते आपले विचार मराठी भाषेंतच कलापूर्ण रीतीनें व्यक्त करूं शकले; त्यांत प्रगतीहि दाखवूं शकले ! सर्व समाज उत्कर्षास आणायचा असेल तर तें मातृभाषेच्या आधाराविना एकजात अशक्य होय. राज्य आणि मातृभाषा यांपैकीं कोणत्या तरी एकाचा त्याग करायचा प्रसंग आला तर राज्यावर लाथ मारून भाषेला कवटाळा असाच हट्ट मी धरीन ! यापलीकडे मातृभाषेची महति मी अन्य कोणत्या प्रकारें गाऊं शकेन ?*”

१९३६ सालीं म्हणजे जवळ जवळ अठ्ठावीस वर्षांपूर्वी श्री. पै यांनीं काढलेले वरील उद्गार मुद्दाम येथें देत आहें.

आपली मातृभाषा मराठी कीं कोंकणी अशा शंकेची पुसट सावलीहि ज्या कालांत कुणाच्या मनांत नव्हती त्या कालांतील एका विचारवंत

गोमंतकीयाचे वरील उद्गार ज्या ध्येयवादी विद्यार्थीवर्गानें ऐकले असतील त्यांच्या मनाची काय प्रतिक्रिया झाली असेल? या व अशाच तऱ्हेच्या विचारांचें बालामृत माझ्या पिढीला मिळालें. त्याच बालामृतावर आमचा पिंड पोसला, तेंच बालामृत पचवून आमची बुद्धि परिपक्व झाली. आणि आतां एकाएकीं आकस्मिक रीत्या उत्पन्न झालेल्या भाषिकवादाच्या भुतानें माझ्यासारख्या अनेकांच्या मनांची अस्वस्थता वाढवून त्यांना चलविचल केलीं तर त्यांत दोष कुणाचा? दत्तात्रय व्यंकटेश पै गेले. त्यांना जाऊन दहाच्या वर वर्षें झालीं. मराठी दोन यत्तांच्या वर त्यांचें शिक्षण झालें नव्हतें असें ते सांगत असत. त्यांचें सगळें शिक्षण पुर्तुगेज भाषेंतच झालेलें होतें; असें असतांना उत्तम मराठी वक्तृत्व आणि मराठींतील प्रथम श्रेणीच्या लेखकांच्या पंक्तीला बसण्याइतपतची लेखनशैली त्यांना कशी प्राप्त झाली होती कळत नाहीं. शांबाराव सरदेसाई, यशवंतराव सरदेसाई, वि. स. सुखटणकर या थोर गोमंतकीय गृहस्थांनीं जें जें लिहिलेलें आहे तें तें शुद्ध आणि लालित्यपूर्ण मराठी भाषेंत. यशवंतराव सरदेसायांना तर ज्ञानदेवीच्या अंतरंगाचा साक्षात्कार झालेला होता. यशवंतरावांची गोष्टच सोडा, पण गोमंतकांत अशा कित्येक वयोवृद्ध मातोश्री आहेत कीं ज्या निरक्षर असूनहि ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीच्या अंतरंगाचें विवरण करूं शकतात, अमृतानुभवांतील श्लोकांचा स्पष्टार्थ सांगूं शकतात. मराठी वाङ्मयांत त्यांची नोंद झालेली आहे.

पुर्तुगेज लोकांनीं आपल्या पुर्तुगेज संस्कृतीची एक भव्य दगडी कोरीव मूर्ति पिढ्यान् पिढ्या अविरतपणें दृष्टीसमोर ठेवून हिंदु संस्कृतीच्या खुणा नामशेष करण्याचा प्रयत्न चार शतकेंपर्यंत केला असतांनाहि मी पाहिलेल्या पिढींतील दत्तात्रय व्यंकटेश पै, शांबाराव सरदेसाई, अ. का. प्रियोळकर, बा. बा. सांवर्डेकर प्रभृतींना आणि नंतरच्या पिढींतील महादेव-शास्त्री जोशी, वि. स. सुखटणकर, दामोदर अच्युत कारे, बाळकृष्ण भगवंत बोरकर, बा. द. सातोस्कर प्रभृतींना, हेवा करावा अशा विविध रंगांनीं नटलेल्या शुद्ध मराठी भाषेचें वरदान लाभलें कसें? अर्थातच हजारों वर्षें रुळलेली तशी कांहीं पूर्वपरंपरा असल्याशिवाय त्या भाषेशीं इतकें

घनिष्ठ नातें जुळणें शक्य असेल असें मला वाटत नाहीं. प्रत्येक पिढींत असा हा सुरेख आविष्कार घडवून आणणारी कांहीं तरी मूळ यंत्रणा या सहजस्फूर्तीमागें असली पाहिजे. एका पाशवी वरवंट्यानें तिला गाडून टाकण्यचा प्रयत्न केला, परंतु कोणत्या ना कोणत्या रुपानें ती आपलें अस्तित्व जाहीर करण्याचा प्रयत्न करीत असली पाहिजे.

मठग्रामस्थ हिंदु सभेनें भरविलेल्या पहिल्या शिक्षण संमेलनाचे अध्यक्ष प्रो. रामचंद्र शंकर नायक ऊर्फ राणू नायक हे होते. माझ्या पिढीला प्रो. राणू नायकांबद्दल अपार आदर होता व आहे. प्रत्येकजण त्यांच्याबद्दल फार चांगलें बोलत असे. मीं त्यांना अनेक वेळां दुरून पाहिलें; एक अत्यंत रसिक गृहस्थ म्हणून त्यांची ख्याति होती. त्यांचीं विनोदप्रचुर भाषणें मीं बरींच ऐकलीं. 'उनियांव आकादॅमिका' ही संस्था पणजींत उच्च शिक्षण घेणाऱ्या गोमंतकांतील कांही हुशार व बुद्धिमान तरुणांनीं स्थापन केली होती. तिचें नांव पुर्तुगेज होतें; पण अनेक हिंदु सांस्कृतिक चळवळींचें तें केंद्र होतें. त्या संस्थेचें कार्य निष्ठेनें करणाऱ्या बहुतेक तरुणांना मी ओळखत होतों. आज त्यांतले बरेच तरुण लौकिकवान झालेले आहेत, सुस्थिर झालेले आहेत. ही संस्था नांवारूपाला यावी म्हणून तिच्यासाठीं जिवापाड श्रम करणारे, आणि अल्पवयी असूनहि अनेक सार्वजनिक कार्यांत हिरिरीनें भाग घेऊन स्वतःच्या बुद्धिकौशल्यानें चमकणारे मडगांवचे एक अतिशय लोकप्रिय तरुण श्री. दत्ता काशीनाथ नायक हे मात्र अकालीं वारले. त्यांच्या निधनानें गोमंतकीय सुशिक्षित तरुण-वर्ग हळहळला. त्यांच्या आठवणीनें महिनेन् महिने डोळ्यांच्या पापण्या ओल्या होत राहिल्या. दत्ता नायक जगते-वांचते तर आज फार मोठे झाले असते. प्रो. राणू नायकांचीं कांहीं व्याख्यानें मी उनियांव आकादॅमिका या संस्थेंतहि ऐकलीं. खरोखर पणजींतली अशी ही एकमेव उमेदी आणि सातत्यानें कार्य करणारी संस्था. पुढें त्या संस्थेसारखी दुसरी संस्था निर्माण झाल्याचेंहि ऐकिवांत आलें नाहीं. प्रो. राणू नायकांनीं या संस्थेच्या कार्यकर्त्या तरुणांसाठीं एकदोन कोंकणी प्रहसनेंहि लिहून दिलेलीं होतीं. त्यांतील 'चवथीचॉ चंद्र' हें प्रहसन मीं

पाहिलें होतें. तीन तास सतत हसवत ठेवण्याचें सामर्थ्य त्यांच्या त्या प्रहसनांत होतें.

प्रो. राणू नायकांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत, गोमंतकीय गृहस्थांनीं दूरदृष्टि ठेवून आपल्या मुलांना पायाशुद्ध असें मराठी शिक्षण दिलें पाहिजे असें आवाहन केलें होतें. शिक्षक कसा असावा आणि जगांतील अन्य देशांत शिक्षकांबद्दल कोणत्या तऱ्हेच्या भावना आणि अपेक्षा यावरहि त्यांनीं सुरेख विवेचन केलेलें होतें. सर्वांत श्रेष्ठ व्यवसाय शिक्षकाचा असें आपलें मत प्रतिपादतांना सरंजामशाही समाजानें शिक्षकी व्यवसायाला कमी लेखूं नये असें कळकळीचें आवाहनहि केलेलें होतें.

१९३८ सालीं प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेलें तिसरें शिक्षण संमेलन खूप गाजलें. हें संमेलन म्हणजे साहित्य संमेलनासारखेंच सोहळेवजा झालें. तो सर्व सोहळा पाहण्याचें भाग्य मला लाभलें. सारस्वत ब्राह्मण समाजाच्या जागेंत उभारलेल्या आणि मंगल तोरणांनीं व पताकांनीं सजविलेल्या या मंडपांत गोमंतकांतील तत्कालीन प्रतिष्ठित नागरिक, साहित्यसेवक व शिक्षणाधिकारी इत्यादि मी तत्पूर्वीं न पाहिलेल्या अनेक मान्यवर लोकांचें दर्शन मला घडलें. स्वागताध्यक्षपदीं दत्तात्रय व्यंकटेश पै होते. त्यांनीं थोडेंच पण मुद्देसूद भाषण केलें. नरसिंह सुकेरकर, लक्ष्मीकांत व्यं. प्रभू भेंब्रे, जनाप्पा कामत वगैरे कार्यकर्ते या संमेलनांत घाम गाळून राबत होते. संमेलनाध्यक्ष बा. वा. सांवर्डेकरांनाहि मी प्रथमच पाहात होतों. डाव्याउजव्या बाजूला पीळ घातलेल्या करड्या मिशा, केसांचा मध्यें भांग, डोळ्यांवर रिम्लेस फ्रेमचा चष्मा आणि अद्ययावत् पोशाख यांमुळें त्यांची मूर्ति कैसरकालीन एखाद्या जर्मन तत्त्ववेत्त्यासारखी दिसायची. आपल्या धीरगंभीर आवाजांत त्यांनीं आपल्या भाषणांत मराठी भाषेचें महत्त्वाचें—विशेषत: गोमंतकांतील हिंदुधर्म शाश्वत राहण्यासाठीं मराठी भाषेच्या ज्ञानाचा गोमंतकीयाला झालेला उपयोग आणि मराठी भाषेची गोमंतकांतली जुनी परंपरा यांचें—ज्ञापक विवेचन केलें होतें. मराठीच्या उत्कर्षाला पुर्तुगेज शासन संस्थेचा पाठिंबा नसल्यानें, गोमंतकीय सुविद्य तरुणांनीं तिच्या

विकासाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांनीं कठोर टीका केली होती. आणि नंतर —"माझ्या तरुण मित्रांनो, गोमंतकाचा हा सारा भावी संसार आपलाच आहे, त्याची रेषा योग्य व इष्ट त्याच दिशेनें न जातां भलतीकडेच वळल्यास त्याचे परिणाम आपल्यालाच भोगावे लागतील!" असा खणखणीत इशारा अध्यक्ष सांवर्डेकरांनीं गर्जून दिला होता.

पुर्तुगेजांनीं अशीच परिस्थिति निर्माण करून ठेवलेली होती कीं, पुर्तुगेज प्राथमिक शाळेच्या मास्तराला त्या काळीं पंचावन्न रुपये पगार असला तरी त्याला विशिष्ट सामाजिक दर्जा प्राप्त करून दिला होता. तो मास्तर असला तरी त्याच्यामागें प्रोफेसर ही पदवी चिकटत होती, पण मराठी शाळेच्या मास्तराची अवस्था मात्र दयनीय होती. त्याला समाजांत तेवढें मानाचें स्थान नव्हतें. एखाद्या ध्येयवादी तरुणानें पदवी-परीक्षा पास होऊन विद्यादानाच्या इच्छेनें शाळामास्तराचा पेशा पत्करला तर त्याच्या पदवीपुरतें त्याला समाजांत स्थान मिळालें असतें; पण व्यावसायिक क्षेत्रांत मात्र त्याची किंमत शून्य ठरविण्यांत आली असती, किंबहुना कुणीहि त्याला आपली मुलगी दिली नसती. या उलट पुर्तुगेज प्राथमिक शाळेंत एखादा हिंदु मुलगा नोकरीला लागला रे लागला कीं अनेक वधूपित्यांची त्याच्या दारांत आपल्या मुलींच्या कुंडल्या घेऊन रांग लागत असे. अशा या सामाजिक विषमतेमुळें खुद्द गोमंतकांतील तरुणवर्ग मराठी शाळाशिक्षकाचा पेशा पत्करायला कधींहि तयार झाला नाहीं. शाळेच्या चार यत्ता शिकून तो जो एकदां बाहेर पडे तो पुन्हा आयुष्यांत त्या बाजूला फिरकत म्हणून नसे. परंपरेनेंच त्याच्या मनावर असे संस्कार केलेले होते. त्यामुळें मराठी मास्तरकी म्हटली कीं आपोआप त्या पेशाबद्दल कमीपणाची भावना त्याच्या मनांत निर्माण झाली.

परंतु अहिल्येसारखी शतकानुशतकें शिळा होऊन पडलेली मराठी भाषा मात्र समाजधुरीणांना सारखी चेतवीत होती. त्यामुळें साहित्य संमेलनें होत होतीं, शिक्षण संमेलनें होत होतीं, व्याख्यानमाला होत होत्या, कथाकीर्तनें होत होतीं, नुसती अक्षरओळख झालेल्यांनाहि

अर्थज्ञानांचा साक्षात्कार घडत होता. एकदोन इयत्ताच शिकलेले लोक देखील महाराष्ट्रशारदेच्या गळ्यांतील माळेंत आपला मणि ओवत होते. हें कसें घडत होतें अथवा ती कोणती प्रेरणा होती हें सांगतां येत नाहीं. तो ओवलेला मणि मात्र चमकत होता, साऱ्या महाराष्ट्राचें लक्ष चटकन वेधून घेत होता, हें खरें आहे.

या तिसऱ्या शिक्षण संमेलनांत अनेक तरुण साहित्यिकहि मीं पाहिले. कवि कारे, कवि बोरकर, कथालेखक लक्ष्मणराव सरदेसाई, जयवंतराव सरदेसाई, घोडे, कंटक इत्यादींना प्रत्यक्ष वावरतांना पाहिलें. मडगांवांतील एक तरुण व अत्यंत उमेदी कार्यकर्ते डॉ. दामोदर रायतुरकर हे सर्व कामांत उत्साहानें भाग घेत होते. डॉ. दामोदर खूप लोकप्रिय आणि लोभस व्यक्तिमत्त्वाचे होते. त्यांच्या गोड स्वभावाची थोडीशी ओळख झाली होती; पण नंतर मला ते कधींहि भेटले नाहींत. शीघ्रकवि ज. घ. मळकर्णेकर, प्रो. गुंडू सीताराम आमोणकर, लक्ष्मीकांत भेंब्रे यांच्या माझ्या ओळखी या संमेलनांत झालेल्या होत्या. आतां आम्ही एकमेकांना ओळखणारहि नाहीं इतका त्यांच्यांत व माझ्यांत बदल झालेला आहे. गुंडू सीताराम आमोणकर एक आदर्श व थोडासा बंडखोर तरुण म्हणून आम्हांला फार आवडत असे. त्यांची धोतराचा काचा मारलेली, केसांचा मध्यें भांग पाडून काळ्या गोल फ्रेमचा चष्मा लावलेली हसतमुख, शेलाटी काया अजून माझ्या नजरेसमोर आहे. कित्येक वर्षांनीं अलीकडेच ते मला भेटले.

मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठीं गोमंतकानें केलेले अविरत प्रयत्न सांगतांना राहून राहून एकच प्रश्न माझ्या मनाला जाचतो आहे, मला भ्रमांत टाकतो आहे, बेचैन करतो आहे. तो प्रश्न असा कीं, मुद्रण-कलेचा प्रचार होण्यापूर्वींपासून आणि मुद्रणकला अस्तित्वांत आल्यानंतर मराठी साहित्यनिर्मितीचा वारसा, ती आपली मातृभाषा आहे असें समजून, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे शेंकडों वर्षें चालत चालत आला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत तो एका अंतरंगांतून दुसऱ्या अंतरंगांत लपतछपत गेला. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत तो थोडा

निर्भयपणें वावरूं लागला. विसाव्या शतकाच्या पहिल्या पावशतकांतील डोंगरी येथील कृष्णभट बांदकर, वागाळी येथील जोयशी, माशेल येथील सत्संग मासिकाचे संपादक करंडेशास्त्री, असोळणें येथील शेळडेकर, केरीचे दादा वैद्य, पणजीचे शांबाराव सरदेसाई इत्यादि वाङ्मयसेवकांकडून तो वारसा प्रियोळकर, पिसुर्लेकर, सांवर्डेकर, दत्तात्रय व्यंकटेश पै इत्यादींनीं दिमाखानें पुढें चालविला. त्यांच्यापासून स्फूर्ति घेऊन तोच वारसा त्यापुढच्या पिढीनें म्हणजे दामोदर अच्युत कारे, महादेवशास्त्री जोशी, बा. भ. बोरकर, लक्ष्मणराव सरदेसाई, बा. द. सातोस्कर, सां. घ. कंटक, व्यंकटेश पै, रायकर, जयवंतराव सरदेसाई प्रभृतींनीं चालविला; आणि त्यांच्या पुढची पिढी त्यांच्या विलक्षण कर्तृत्वानें भारून जाऊन त्यांच्याकडे मार्गदर्शनाची आशेनें वाट पाहात असतांनाच त्यांतील कांहीं अग्रेसरांनीं भाषिकवादाचा सवता सुभा उभा करून अशा एका विचित्र ठिकाणीं नव्या पिढींतील होतकरूंना आणून ठेवलेलें आहे कीं काय निर्णय घ्यावा आणि कोणत्या वाटेनें जावें हें कळूंच नये. मागील अनेक पिढ्यांनीं निर्माण करून ठेवलेल्या त्या सरस्वतीमंदिरांत पुढच्या पिढीला भ्रमांत टाकणारे हे अध्वर्यु मात्र सुखानें नाचले; आणि नवी पिढी या मंदिराची पायरी चढते न चढते तोंच त्यांच्यापुढें अंधाराचें पटल निर्माण करून त्यांची दिशाभूल करण्यांत यांना कोणतें सुख मिळणार आहे? दुसऱ्या कोणत्या यशोमंदिराकडे हे तिला घेऊन जात आहेत? पुर्तुगेज आणि गांवठी साहेब मराठीला ज्या काळांत तुच्छ लेखीत होता आणि जिथें ठेंचतां येईल तिथें तिथें ठेंचून मूळ धरूं देत नव्हता त्यावेळीं—ती आपली मातृभाषा आहे म्हणून तिची जोपासना करण्याचें महत्कार्य कित्येक पिढ्यांनीं स्वावलंबनानें केलें; तिच्यावर होणाऱ्या जुलुमाचा सभा-संमेलनें भरवून निषेध केला; तिची कास धरून तिचा विकास घडविण्याचें वर्षानुवर्षें आवाहन केलें....कशासाठीं? दारोदार फिरून, मदत घेऊन, आपल्या चालत्या धंद्याकडे, प्रपंचाकडे दुर्लक्ष करून मराठी शिक्षणांत सुधारणा व्हावी म्हणून प्रतिवर्षीं शिक्षणसंमेलनें भरविलीं तीं कशासाठीं? जी जननी आहे म्हणून एकदां सांगितलेंत, तिच्या ओटींत घातलेंत, आणि

कित्येक वर्षें तिनें जोपासल्यानंतर, वाढविल्यानंतर, रोमरोमांत तिची ममता व्यापल्यानंतर आतां कसें सांगतां कीं 'छे छे, ती तुमची जननी नाहीं हो, ती मावशी आहे' म्हणून? या प्रश्नांचीं उत्तरें सुटत नाहीत आणि वृथा अधिकाधिक गुंता मात्र निर्माण होत जातो!

मडगांवांत मला सांस्कृतिक चळवळीचें खरें दर्शन घडलें. मराठी वाङ्मयाचा वृक्ष मला पाहतां आला. अनेक प्रदर्शनें मीं पाहिलीं. सेवा समितीचें 'आदर्श वनिता विद्यालय', समाज सेवा संघाचें 'महिला विद्यालय' या खास स्त्रीशिक्षणाच्या संस्था त्यावेळीं नुकत्याच भरभराटीस येत होत्या. या महिला विद्यालयांतील विद्यार्थिनी आज मोठमोठ्या विदुषी म्हणून महाराष्ट्रांत नांव गाजवून आहेत. त्यानंतर पणजी येथें खास महिलांसाठीं विद्यालयाची स्थापना झाली. महाराष्ट्रांतून नामांकित विदुषी या शाळांना भेट देण्याकरितां येत असत; पर्यायानें त्यांचीं व्याख्यानें किंवा परिचय-समारंभ सारस्वत ब्राह्मण समाजाच्या सभागृहांतच होत. महर्षि कर्वे, वामन मल्हार जोशी आणि स्त्रीशिक्षणतज्ज्ञ असे अनेक थोर लोक याच वेळीं पाहायला मिळाले.

'प्रागतिक संघ' हा एक गोमंतकांतील हिंदु समाजाच्या व मराठी भाषेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी तनमनधनानें झटणारा संघ होता. निरलसपणें कार्य करणाऱ्या त्यांतील मान्यवर गृहस्थांचें दर्शनहि मला वारंवार घडत होतें. केशव अनंत नायक, शांबाराव सरदेसाई, विठ्ठल स. सुखठणकर, शिवा फटु पै आंगले, काशीनाथ दामोदर नायक हे या संस्थेचे संस्थापक होते. या संस्थेनें अनेक व्याख्यानमाला घडवून आणल्या आणि मागील पिढींतील बहुतेक मराठी साहित्यकारांना दूर दूर ठिकाणांहून बोलवून आणून त्यांच्या परिपक्व विचारांचा लाभ गोमंतकीयांना दिला. मामा वरेरकर, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, न. चिं. केळकर प्रभृति थोर थोर साहित्यकारांचें दर्शन प्रागतिक संघामुळें घडलें होतें. प्रागतिक संघाची जोपासना केशव अनंत नायक व

काशीनाथ नायक अजून करीत आहेत; परंतु त्या वेळच्या उमेदी आतां वृद्ध झाल्या आहेत एवढेंच! जीवनांतल्या प्रत्येक शब्दाचें, प्रत्येक क्षणाचें, प्रत्येक प्रश्नाचें, परोपकाराचें, स्वाध्यायाचें किंबहुना पेहेराव्याचेंहि महत्त्व जाणणारीं प्रागतिक संघांतलीं तीं पांचसहा माणसें माझ्या स्मरणांत कायमचीं राहिलेलीं आहेत. सत्कर्म करणें हाच एक त्यांचा निदिध्यास होता. फलाची अपेक्षा त्यांनीं केली नाहीं. अजूनहि त्यांतलीं कांहीं माणसें दिसलीं कीं मूकपणें माझें मस्तक आपोआप नम्र होतें. श्री. नरसिंह पुरुषोत्तम सुकेरकर हे त्या वेळीं कोणत्याहि सांस्कृतिक चळवळीच्या अग्रभागीं असायचे. कित्येक सभा-संमेलनासारखे व्यापक समारंभ यशस्वी करून दाखविणें या गृहस्थाचा हातचा मळ होता आणि अजूनहि आहे. त्यांचा वाङ्मयीन व्यासंग प्रदीर्घ आहे. होतकरू तरुणांना उत्तेजन देऊन त्यांच्यांतील गुणांच्या विकसनाला हातभार लावण्यांत सुकेरकर घराण्यानें अनेक वेळां झीज सोसलेली आहे, असें त्यांची परिचित मंडळी नेहमीं सांगतात. सार्वजनिक संस्थांतलें कोणतेंहि लहानमोठें काम स्वतःच्या घरांतलेंच समजून करणारीं आणि कार्याच्या परिपूर्तींत—मानापमानाचा पगडा स्वतःच्या मनावर बसवूं न देतां—आनंद मानणारीं नरसिंह सुकेरकरांसारखीं फार थोडीं माणसें गोमंतकांत आढळतील.

माझ्या विद्यार्थीदशेंत मडगांव शहराला अस्ताव्यस्तपणा फार होता. घरांपेक्षां त्यांच्या आवाठाचे तट अजस्र होते. धूर्तपणें अडवून ठेवलेल्या आणि काबूंत येईल तेवढ्या जागांना हे तट बांधलेले दिसत होते. एकेका ख्रिस्त्याच्या घराचा तट अर्धा-पाव चौरस फर्लांग एवढा मोठा. अजूनहि त्यांतलीं शेंकडों घरें तशींच आहेत. नवा बाजार आणि जुना बाजार असे दोन टोकांना दोन बाजार, हरिमंदिर, विठ्ठलमंदिर व श्रीदामोदराचें सभागृह हीं तीन हिंदूंचीं सार्वजनिक श्रद्धास्थानें. श्रीदामोदर हें ग्रामदैवत असल्यानें मडगांवांतील हिंदु समाजांतील प्रत्येकाचीं कुलदैवतें वेगळीं असलीं तरी हांकेला 'दामोदर'च जवळचा वाटतो. त्या दैवताचें अधिक निकटचें नातें जोडायला कुणीं पूर्वजानें त्याला प्रेमानें 'दामबाब' म्हटलें व तेंच आज सर्वतोमुखीं आहे. महाराष्ट्रांत राव किंवा पंत ही जशी

बहुमानार्थी उपाधि जोडतात तशीच 'बाब' ही उपाधि गोमंतकांत सर्वत्र प्रचलित आहे. दामोदराचें स्थान पूर्वी मडगांवांतच होतें. बाटाबाटीच्या काळांत ग्रामस्थांनीं या दैवताला पळवून नेऊन त्याची रिवण गांवच्या जांबावली नांवाच्या वाड्यावर स्थापना केली. मागाहून पुर्तुगेजांनीं त्या देवालयाचा विध्वंस केला. पणजीहून मडगांवला येतांना उजव्या हाताला व डाव्या हाताला त्या देवळाच्या खुणा व बरीच मोठी एक तळी दिसते. पुष्कळ हिंदु तरुण तिथें पोहायला जातात.

दर सोमवारीं या दैवताच्या सन्मानार्थ तिन्हीसांजेच्या वेळीं समई पेटवून ठेवतात. शिवाय सोमवारीं रात्रीं दामोदर सभागृहांत भजनहि असतेंच. हिंदु घरांना—पूर्वाभिमुख ज्यांचे दरवाजे असतील त्यांना—सज्जाच्या माड्या बांधत नसत. त्यामुळें दामोदर दैवताचा अपमान होतो असा पूर्वापार समज आहे. ज्यांनीं ती कल्पना धुडकावून मुद्दाम सज्जा व माडी बांधली त्यांचा कुलक्षय झाल्याचीं उदाहरणें घडलीं होतीं. आतां मडगांवांत तशीं घरें बांधायला खुद्द देवानेंच मुभा दिली असावी. येथील इस्पितळाच्या बाजूला एक सुरेख झरा आहे. सहलीला जाण्यासारखी एक सुंदर टेकडीहि इथें आहे. आतां ती कापून तिथें इमारती उठविणार असल्यास किंवा उठविल्या असल्यासहि माहिती नाहीं. कारण आतां मडगांवांत जेवढीं माणसें तेवढीं अद्ययावत् घरें दिसतात. आणि तीं एकसारखीं वाढतहि आहेत. कार्तिकी एकादशीला हरिमंदिरांत दिंडीचा उत्सव होतो. महाराष्ट्रांतून नामवंत गायक-वादक या दिंडीला आणले जात. नामवंत पखवाजी, नामवंत कीर्तनकार या दिंडीच्या उत्सवानिमित्त मडगांवांत येऊन गेलेले आहेत. हरिमंदिरांतून ही दिंडी निघून नव्या बाजारांतून मिरवणुकीनें 'पेणी' करीत करीत (पेणी करणें म्हणजे जागजागीं थांबून कमी-ज्यास्ती वेळ बैठक करणें) ती दामोदरमंदिरांत येते आणि पहाटपर्यंत भजन करून तिथून परत हरिमंदिरांत जाऊन विसर्जन होते. या दिंडींत मीं सुरेख भजनें ऐकलीं.

दामोदर विद्याभुवनाचें सभागृह व सारस्वत ब्राह्मण समाजाचें (आतां विद्या-निकेतनचें) सभागृह अशीं हिंदु समाजाच्या सांस्कृतिक चळवळीचीं

दोन सभागृहें. इथें मीं अनेक गोष्टींचें अवलोकन केलें. माझ्या आयुष्याला फार मोठा लाभ झाला. हिंदु समाजाच्या मालकीचीं उत्साहानें सदा गजबजलेलीं अशीं सभागृहें मीं सबंध गोमंतकांत अन्य ठिकाणीं पाहिलीं नाहींत. आणि सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळींचा असा जागृत उद्घोष मला मडगांवशिवाय गोमंतकांत इतरत्र कुठेंहि आढळला नाहीं. म्हणूनच मी केव्हांहि आणि कुठेंहि मोकळ्या मनानें सांगतों—महाराष्ट्रांत जसें विद्येचें माहेर पुणें, तसेंच गोमंतकांत मडगांव. माझ्या या विधानाला कुणाचीहि हरकत नसावी! 'मठग्राम' हें आपलें नामाभिधान त्यानें सार्थ केलेलें आहे. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें पंधरावें अधिवेशन कै. वामन मल्हार जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं मडगांवांतच भरलें होतें. मडगांवकरांनीं तो सोहळा दीर्घस्मरणीय व नमुनेदार होण्याकरितां जिवापाड श्रम केले. संमेलन यशस्वी व्हावें म्हणून त्या कालांत झटलेले श्री. करंडेशास्त्री, विष्णु रामचंद्र नायक, गणपत विश्वनाथ लाड, बाबलॉ म. नाईक, प्रभृति आज हयात नाहींत. तें संमेलन मीं पाहिलें नाहीं; पण त्या पिढींतले ते दशपुरुष मात्र मी पाहिले. त्यांच्यापासून स्फूर्ति घेतलेले श्री. सुब्राय का. नायक, डॉ. काणे, रामकृष्ण नायक, दामोदर नायक गोमंतकाच्या स्वातंत्र्य लढ्यांत सर्वस्व अर्पण केलेले डॉ. राम कृष्ण नायक इत्यादि तरुण आज सार्वजनिक कार्याची धुरा वाहतात. मठग्रामाची आजवरीची परंपरा राखायला ही पिढी समर्थ आहे यांची मला खात्री वाटते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ३६५०३ ... दि: भूमवास
क्रमांक ...३३५... नों. दि: २५.८.६४

# राजधानी पणजी

पणजी हें कांहीं राजनिष्ठ हिंदु कुटुंबांचें आगर होतें म्हटलें तरी चालेल. इथल्या विहिरींचें पाणी बेचव; पण इथलीं माणसें स्वतःस भलतींच चविष्ट समजणारीं. कातडीबचाऊ मुत्सद्दीपणा इथल्या माणसांच्या अंगांत ओतप्रोत भरलेला आहे. त्या तसल्या मुत्सद्दीपणाशिवाय इथें वस्ती करणेंच अशक्य झालें असतें. पणजींतला पहिला हिंदु वस्तीदार मोठ्या हिमतीनें इथें वास्तु उभारून राहिला असला पाहिजे. बाटाबाटीच्या काळांत हजारों कुटुंबें गोमंतकाचा त्याग करून लगतच्या प्रांतांत आश्रय मिळेल तिथें पसरलीं. अशा रीतीनें लोंढ्याच्या लोंढ्यांनीं माणसें जाऊं लागलीं तशी गोमंतभूमि ओस पडूं लागली. पुर्तुगेज राजकर्त्यांच्या लक्षांत ही परिस्थिति बरीच उशिरानें आली. मागाहून त्यांनीं धांवपळ करून, धार्मिक छळवाद बंद करण्याचें अभिवचन देऊन, तसेंच मदतीचेंहि आश्वासन देऊन गोमंतक सोडून गेलेल्या कुटुंबांना परत बोलवायचा सपाटा चालविला. परत आलेल्या

कांहीं कुटुंबांनीं राजधानींत वस्ती केली. दिलेल्या वचनाप्रमाणें त्यांना बऱ्याच सवलती मिळाल्याहि.

तसें पाहिलें तर पणजी ही गोमंतकाची तिसरी राजधानी होय. संशोधकांच्या दृष्टीनें कदंबकालीन गोमंतकाची पहिली राजधानी 'चंद्रपूर' (किंवा आजचें चांदर) ही होती. चंद्रपुरांत जुने शिलालेखहि चौकस संशोधकांना सांपडलेले आहेत. आजचें जुनें गोवें ही त्यानंतरची राजधानी. तीहि बंदराच्या दृष्टीनें सोयिस्कर म्हणून कदंबांनींच स्थापिली. पुर्तुगेजांनीं एका मुसलमान सुभेदाराकडून प्रथम काबीज केली ती राजधानी म्हणजे जुनें गोवें हीच. कदंबकालीन कांहीं अवशेष जुन्या गोव्यासहि सांपडलेले आहेत. पुर्तुगेजांची तिथें राजधानी होती याचे पुरावे आजघडीलाहि जिवंत आहेत. कांही चांगल्या स्थितींतल्या व कांहीं मोडतोड झालेल्या पुर्तुगेज बांधावळीच्या अनेक इमारती जुन्या गोव्यांत आहेत. इ. स. १७६९ सालीं तिथें कसली तरी सांथ आली आणि शेंकडों माणसें त्या सांथींत बळी पडल्याकारणानें पुर्तुगेज शासन संस्थेंतील अधिकारी माणसें घाबरलीं; व तें शहर सोडून जाण्यास त्यांनीं आरंभ केला. ती सर्व मंडळी पणजी येथें येऊन स्थायिक होऊं लागली. आणि पुढच्या पस्तीस वर्षांत जुनें गोवें हें शहर ओस पडून पणजी हीच राजधानी ठरविण्यांत आली. सां फ्रांसीस्कु शाव्हियॅर या ख्रिस्ती धर्मप्रसारकाची शवपेटी जुन्या गोव्यांत असल्याने तें एक ख्रिस्ती धर्म-क्षेत्र म्हणून मात्र त्याचा लौकिक राहिला.

पणजी शहराला तशी दीडशें वर्षांचीच परंपरा आहे. १९१० सालांतील ऑक्टोबर महिन्याच्या पांच तारखेला पुर्तुगालांत क्रांति झाली व राजसत्तेला पदच्युत करण्यांत येऊन पुर्तुगाल हें प्रजासत्ताक राज्य म्हणून घोषित केलें गेलें. एक वर्षाच्या आंत नवी घटना मंजूर झाली आणि तींत पुर्तुगेज प्रजाजनांना प्रजासत्ताक राष्ट्रांत जे जे हक्क प्राप्त होतात ते ते सर्व मिळाले. व्यक्तिस्वातंत्र्य, आचार-विचार-उच्चारांचें स्वातंत्र्य, आणि संस्था स्थापण्याचे, वर्ण-धर्म-जातींच्या बाबतींत समानतेचे, प्रांतिक स्वायत्ततेचे इत्यादि सर्व हक्क मिळाले. याशिवाय दोन महत्त्वाच्या गोष्टींसंबंधीं पुर्तुगेज

सरकारनें एकदम उदार धोरण स्वीकारलें होतें. पहिलें म्हणजे धर्मकारण. सर्व धर्मियांना आपापले आचार-विचार मोकळेपणानें अंमलांत आणण्यास पूर्ण मुभा देण्यांत आली; फक्त 'रोमन कॅथॉलिक' हा पंथ सरकारी धर्म मानला गेला. आणि दुसऱ्याहि एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीचा पुरस्कार करण्यांत आला. ती गोष्ट म्हणजे सर्व प्रजाजनांना प्राथमिक शिक्षण मोफत देण्यांत येऊन तें सक्तीचें करण्यांत आलें.

जे धर्मानें ख्रिस्ती नाहींत त्यांना सज्ञान केल्यानें नसती अडचण उत्पन्न होऊं नये म्हणून ख्रिस्ती सोडून अन्य धर्मियांना शिक्षण न घेण्याचेंहि बंधन घालण्यांत आलें होतें. शक्य तों त्यांना अशिक्षित ठेवण्याचें धोरण होतेंच. ज्ञानदाते असे असंख्य धर्मग्रंथ जाळण्यांत आले होते. कथा कीर्तनांवर बंदी घालण्यांत आली होती. तसेंच मराठी शिक्षणा-वरहि बंदी घालण्यांत आली होती. प्रजासत्ताक राष्ट्रांतील नागरिकाला मिळणाऱ्या सर्व सवलती वास्तविक सर्व पुर्तुगेज वसाहतींना कित्येक वर्षें आधींपासून दिल्या गेल्या होत्या. त्यांची अंमलबजावणी मात्र होत नव्हती; त्या सवलती म्हणजे नुसता आभास होता. पण प्रजासत्ताकाच्या घटनेंत कायद्याच्या रूपानें त्यांचा अंतर्भाव झाल्यानंतर त्या प्रत्यक्ष अंमलांत येऊं लागल्या. गोमंतकांत मात्र त्यांत हवा तसा फेरफार तेथील अधिकारी करीत असत. आणि त्या अधिकाऱ्यांनीं तसें कांहीं केलें म्हणून कुणाचें कांहीं वांकडें होत नव्हतें. जो असह्य जुलूम चारशें वर्षें सोसला तो सोसतां सोसतां मनें मेलीं होतीं. धार्मिक स्वातंत्र्य मिळालें तरी कोणतीहि गोष्ट करतांना मन भीतच होतें. पुर्तुगेज मलिद्यावर पोसणारे बाटगे ख्रिस्ती त्यांत नाना तऱ्हेचीं विघ्नें आणीत होते. कुणाचा शिमगोत्सव बंद कर; कुणाचें होमहवन बंद कर; प्रत्येक धार्मिक कार्यांत ऐनवेळीं अनेक विघ्नें उपस्थित व्हायचीं. असल्या प्रत्येक गोष्टीला परवाना हवाच असे.

गांवपाटीलकी बहुतकरून ख्रिश्चनांकडेच असल्यानें हजार वेळां त्यांचे पाय धरावे लागायचे. नाना तऱ्हेच्या भेटी देऊन आणि वचनें देऊन त्याचें तोंड बंद करावें, तेव्हां कुठें एखाद्या उत्सवाला वा ललित

कार्यक्रमाला परवानगी मिळे. अशा परिस्थितींत स्वतंत्र आचार-विचारांचे हक्क दिले काय, न दिले काय, दोन्ही सारखेंच होतें; पण शिक्षण-स्वातंत्र्याचा फायदा मात्र गोमंतकीय हिंदु समाजापैकीं सारस्वत समाजानें आधीं घेतला. १८१९ ते १९१० या कालखंडांत शिक्षण-स्वातंत्र्याचें जें आमिष दाखविण्यांत आलें होतें त्यांत एक मोठी गोम होती. अन्य कोणत्याहि विषयांऐवजीं ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीचेंच प्राबल्य त्यांत अधिक होतें. अर्थातच सावध हिंदु समाज पुर्तुगेजांनीं उघडलेल्या शाळांकडे डोळसपणें लक्ष देत होता. प्रजासत्ताक राजवटींत शिक्षणक्षेत्रांतील धार्मिक स्तोम एकदम कमी करण्यांत आलें. तेव्हां मात्र हिंदु समाजांतील मुलांनीं तिथें मुसंडी मारली आणि जिथें तिथें त्यांची सरशी होऊं लागली. शिक्षणांत धार्मिक बाजू अधिक होती तेव्हांहि कांहीं हिंदूंचीं मुलें त्या विषयाला धूर्तपणें बगल देऊन शिकून मोठीं झालेलीं होतीं. आणि आपला तोल संभाळून ज्ञानार्जन केल्यास आपलें नुकसान न होतां फायदाच होतो हें त्यांनीं दाखवून दिलें होतें.

प्रत्येक गांवांत प्राथमिक पुर्तुगेज शिक्षणाची एक शाळा बांधण्यांत आल्यानें प्राथमिक शिक्षण पुरें होतांच, ज्यांना ऐपत होती त्यांना पुढील म्हणजे कॉलेजच्या शिक्षणासाठीं पणजीला जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. सबंध गोव्यांत एकच पुर्तुगेज कॉलेज होतें; व तेंहि पणजींत. त्यामुळें त्या कॉलेजच्या शिक्षणासाठीं म्हणून असो कीं शासनसंस्थेच्या कक्षेंतील सर्व खात्यांच्या मुख्य कचेऱ्या पणजींत असल्यानें तेथील नोकरीच्या निमित्तानें असो, हळूहळू पणजींत हिंदूंची वस्ती वाढली. ज्यांना खास पणजीकर म्हणावें अशीं मूळ घराणीं तिथें मोजकींच आहेत. पूर्वीं पणजीच्या आसपासचे लोक किंवा कॉलेजमध्यें शिकणारे विद्यार्थी सकाळीं पणजीला जाऊन दुपारीं दोन-तीन वाजेपर्यंत घरीं परतून जेवण करीत असत. तत्कालांत वाहनाची सोय विशेष नव्हती; पण दुपारीं घरीं परतण्यासारखी ज्यांची परिस्थिति नव्हती किंवा ज्यांचीं घरें पणजीपासून खूप दूर होतीं त्यांची मात्र फारच धांदल व्हायची. गोमंतकांत तत्कालांत दुपारच्या अन्नाला कुणालाहि मुक्तद्वार होतें. जेवण्याराहण्याच्या

सोयी असलेल्या खाणावळी चालत नव्हत्या; किंबहुना खाणावळींत जेवणें आणि चहाच्या दुकानांत जाऊन चहा पिणें हें लज्जास्पद तसेंच भ्रष्टाचाराचें लक्षण मानलें जाई. परंतु अशा निराधार होतकरू हिंदु मुलांची सोय त्यावेळीं पणजीपुरस्थ कांहीं उदार घराण्यांनीं केली. अशीं घराणीं तीन होतीं. श्री. हिरू नायक, श्री. म्हाम्माय कामत व श्रीमंत धेंपे यांची पेढी. श्रीमंत धेंप्यांचें मूळ घर पणजीपासून दोन मैलांवर असलेल्या कालापूर या गांवीं आहे; पण त्यांची पणजीला असलेली पेढी म्हणजे एखाद्या वाड्यासारखें शंभर माणसांची सोय होईल एवढें मोठें घरच आहे. या तीन घराण्यांनीं अनेक विद्यार्थ्यांवर त्या काळांत उपकार केलेले आहेत. अनेक मुलांनीं त्यांच्याकडे राहून आपला विश्वविद्यालयीन शिक्षणक्रम पुरा केला; व पुढें त्यांच्यापैकीं कांहीं बडे हुद्देदारहि झाले.

पणजीची ही एक बाजू आमचीं वडील माणसें गौरवून सांगत असत. केवळ विद्यार्थीच नव्हे तर राजधानींत कधीं सटीसमाशीं शासनसंस्थेच्या कक्षेंतील काम निघाल्यास त्या काळांत हीं घराणीं म्हणजे अडल्यानडल्याचा आधार होता. म्हाम्माय कामत घराणें हें पणजींतील आद्य घराण्यांपैकीं एक. या घराण्यांत उजवा शंख असून त्याची यथाविधि पूजा त्रिकाळ केली जाते. असा शंख असणें हें परमभाग्याचें लक्षण मानलें जातें. हा शंख गवसणें म्हणजे अनेक जन्मांच्या सुकृताचें फल असतें. म्हाम्माय कामतींच्या घराण्यांतील या शंखासंबंधीं लहानपणीं मीं एक कथाहि ऐकलेली होती. (ती दंतकथाहि असेल!) या घरांतील एका सच्छील पूर्वजानें पुर्तुगालहून आलेल्या एका दर्यावर्दी कप्तानाचें कांहीं तरी भलें केलें होतें. या कप्तानानें त्या उपकाराची फेड करण्यासाठीं कामतींना काय हवें तें मागायची विनंती केली. कामतींनीं ती मनावर घेतली नाहीं. केलेल्या उपकारांची फेड करून घेणें हें त्यांच्या घराण्याचें ब्रीद नव्हतें; परंतु त्या कप्तानानें केलेल्या एकसारख्या आग्रहामुळें कोपऱ्यांतल्या फळीवर ठेवलेला एक शंख त्यांनीं मागितला. अर्थातच कित्येक दिवस आधींपासून कामतींना त्या शंखानें साक्षात्कार घडविला असला पाहिजे. या बामणानें मागून मागून शंखासारखी निरुपयोगी वस्तु मागितली म्हणून साहेब

हसायला लागला. आणि त्यानें त्याबद्दल खुलासा विचारला. 'आमच्या देव्हाऱ्यांतील देवांना आम्ही शंखांतील पाण्यानें आंघोळ घालतों' असें सांगून साहेबानें दिलेला तो शंख घेऊन ते घरीं आले आणि पूर्वजन्मींच्या कोटि पुण्यांनीं लाभलेल्या त्या यशोदेवतेची त्यांनीं प्रतिष्ठापना केली. त्या दिवसापासून म्हाम्माय कामत घराण्याची अन्न-वस्त्र-उदकाची जन्माची ददात मिटली, अशी ही कथा आहे. भाद्रपदांतील 'अनंतचतुर्दशी'च्या दिवशीं या घरांत मोठा उत्सव असतो. गोमंतकांतील समस्त घराण्यांना त्या दिवशीं ब्रह्मभोजनाला आमंत्रण असतें. चौदा भाज्या, चौदा पक्वान्नें सर्व कांहीं चौदा प्रकारचें अन्न त्या देवदत्ताच्या नैवेद्याला शिजवावें लागतें व तें सारें या घराण्यांत यथासांग केलें जातें. त्या दिवशींच्या संधिकालीं त्याचें दर्शन लोकांना देतात; व शुचिर्भूततेनें तें घ्यावें लागतें. पूर्वींचे लोक मोठ्या भक्तिभावानें या देवदत्ताच्या दर्शनाला जात, व प्रसाद ग्रहण करून येत असत.

मच्छर आणि मेस्तीस हीं पणजींतलीं दोन मोठीं संकटें होतीं. मेस्तिसांनीं केलेल्या छळवादामुळें पूर्वी हिंदु विद्यार्थ्याला पणजींत राहणें अशक्य होऊन जात असे. पावलोपावलीं त्याला पाणउतारा सहन करावा लागत असे. पुर्तुगेज विश्वविद्यालय ही राज्यकर्त्या पुर्तुगेज मुलांची, मेस्तिसांची किंवा बाटग्या ख्रिस्त्यांची मिरास होती. हिंदूंना तिकडे शिक्षणाच्या सवलती मिळतांच हिंदु विद्यार्थ्यांचा लोंढा लिसेवमध्यें (विश्वविद्यालयांत) थडकला. लिसेवचीं तीन वर्षें शिकणाऱ्याला हमखास नोकरी होती. वकिलीची परीक्षा देऊन तोहि व्यवसाय करतां येत होता. हीं तीन वर्षें शिकून मास्तरकीची एक वर्षाची परीक्षा देऊन लगेच पुर्तुगेज प्राथमिक शाळेंतहि 'प्रोफेसर' म्हणून नेमणूक व्हायची. एवंच पुर्तुगेज लिसेव शिकणें म्हणचे आयुष्याचें कल्याण करणारा मार्ग होता. लिसेवचें शिक्षण सामान्य माणसाला परवडणारें नव्हतें; पण ऐपत नसली तरी कर्ज काढून, किडुनमिडुक विकून, नाना उपायांनीं आपल्या मुलाला एकदांचा

लिसेव्रमध्यें प्रवेश मिळावा म्हणून जो तो खटपटी करूं लागला. आणि एकदां प्रवेश मिळाल्यानंतर हिंदु विद्यार्थी आपल्या बुद्धिमत्तेनें तिथें चमकूं लागले. नेहमींच पहिल्या क्रमांकांत उभे राहूं लागले. निर्बुद्ध मेस्तिसांना आणि इतरांना हें वर्चस्व कधींहि सहन होणें शक्य नव्हतें. त्यांनीं मिळेल त्या मार्गांनीं हिंदु विद्यार्थ्यांचा तेजोभंग करायला सुरुवात केली. कुणाची शेंडी ओढ, कुणाची टोपी उडव, कुणाचें जानवें काप, हिंदूंच्या आचार-विचारांवर गलिच्छ टीका कर असे अत्याचार झाल्यावर हिंदु विद्यार्थी कंटाळत. नित्य भयभीत अवस्थेंत लिसेव्रमध्यें पदार्पण करीत.

अध्यापकांकडे तक्रार करायची छाती नव्हती. कारण राज्यकर्त्यांच्या मुलांना कोण दटावणार होता? हिंदूंना संघटना नव्हती. तशी ती करण्याचा पूर्वानुभव नव्हता. पण अशा असहाय परिस्थितींत देखील कांहीं बलदंडांनीं नकळत एकदां संघटित रीतीनें सणसणीत उत्तर दिलें. आणि तेव्हांपासून मेस्तीस किंवा दादागिरी करणाऱ्या अन्य ख्रिस्त्यांना वचक बसला.

पणजीच्या लिसेवला खूप पायऱ्या आहेत. उंच टेकडीवर लिसेवची इमारत बांधलेली असून जवळजवळ सत्तरऐंशीं पायऱ्या चढून विद्यालयांत प्रवेश करावा लागतो. एकदां पावसाळ्यांत धुवांधार पाऊस पडत असतांना एक सालस हिंदु विद्यार्थी उशीर होऊन गैरहजेरीची खूण आपल्या नांवापुढें पडूं नये म्हणून (कारण अशा तीन खुणा पडल्या कीं त्याला तिमाही परीक्षेंत नापास करीत असत) घाईघाईनें पायऱ्या ओलांडत होता. तांबड्या रस्त्यावरून चालत आल्यानें त्याची चप्पल लाल मातीचे थर चढून जड झाली होती. इतक्यांत एका मेस्तीस पोरानें आपल्या छत्रीच्या दांडीचा विळखा त्याच्या पायाला घालून त्याला खालीं पाडलें. बिचारा हिंदु विद्यार्थी....त्याला तें असह्य झालें. तो रागानें लाल झाला. त्या तिरमिरीसरशीं त्यानें आपल्या पायांतील चप्पल हातांत घेऊन त्या वात्रट पोराच्या पाठीवर दहाबारा कोरडे आवेशानें ओढले. तो मागें वळला आणि तडक विद्यालयांत शिरला. पुढें परिणाम काय होईल याकडे त्यानें लक्ष दिलें नाहीं. चपलेच्या डागांनीं लाल झालेली आपली पाठ

इतर विद्यार्थ्यांना दाखवीत तो वात्रट विद्यार्थी घरीं गेला. हिंदु विद्यार्थ्यानें घडलेली गोष्ट आपल्या इतर सहकाऱ्यांना सांगितली. आणि कुठल्यातरी प्रेरणेचा संचार होऊन सर्व हिंदु विद्यार्थ्यांची ताबडतोब एक संघटना तयार झाली. आणि त्यांनीं आपला वचक सर्व विजातीय विद्यार्थ्यांवर बसवला. अशा या संघटना, पुर्तुगेज गोमंतकांतून जाईपर्यंत चालू होत्या. आपले आजचे गोमंतकाचे मुख्य मंत्री हे अशाच एका संघटनेचे सूत्रधार होते. अनेक वात्रट मेस्तिसांना त्यांनीं पाणी पाजलेलें आहे. अन्यायाचा प्रतिकार केलेला आहे. मेस्तिसांचा उपद्रव आज संपलेला आहे; पण मच्छरांचा मात्र कायम आहे.

लिसेवचें शिक्षण घेऊनहि सर्व सरकारी कचेऱ्यांतून एखाद्या खिस्त्याच्या हाताखालीं कारकुनी करणें हेंच एक हिंदूंच्या नशिबीं होतें; पण नंतरच्या कालांत हिंदूंनीं पुर्तुगालपर्यंत जाऊन शिक्षण घेऊन खुद्द लिसेवचेच ते प्राध्यापक झाले. अशा पहिल्या प्राध्यापकांपैकीं प्रो. तळवलीकर, प्रो. खंवटे, हायकोर्ट जज्ज राव, बॅरिस्टर शिरवईकर इत्यादि स्वनामधन्य व्यक्ति होत्या. पुर्तुगेज शिक्षणांत फारसा राम नाहीं. पुर्तुगालनें प्रगतीच्या सर्व गोष्टींत फ्रेंचांची नक्कल केली. त्यांचें विज्ञानविषयक सर्व शिक्षण फ्रेंच भाषेंतून चालत होतें. खुद्द पुर्तुगेज राष्ट्रांत आपल्या बुद्धितेजानें जगांतील अन्य राष्ट्रांना दिपविणारा असा कुणी झालाच नाहीं. युरोपांतील बहुतेक सर्व राष्ट्रांतील बुद्धिमंतांनी 'नोबेल प्राइझ' मिळवून आपापल्या मातृभूमीला गौरवांकित केलेलें आहे; परंतु पुर्तुगालांतील विद्वानांच्या वांट्यास मात्र अजूनपर्यंत तें आलेलें नाहीं. पन्नास वर्षांपूर्वी 'गॅर्रा ज्युंकैरा' नांवाचा एक पुर्तुगेज कवि कविवर्य रवींद्रनाथांच्या विरुद्ध 'नोबेल प्राइझ' मिळविण्यासाठीं उभा होता; पण टागोरांच्या गीतांजलीलाच तें 'प्राइझ' मिळालें. फक्त तो टागोरांच्या विरुद्ध उभा होता एवढेंच पुर्तुगेज वाङ्मयीन इतिहासांत नमूद झालें. नाहीं म्हणायला 'डॉ. ऍगश नूनिश' या गृहस्थांना, क्ष किरणांनीं मेंदूच्या विशिष्ट भागाचें छायाचित्र घेण्याच्या संशोधनाबद्दल अलीकडेच वैद्यकी शास्त्रांतलें अर्धें बक्षीस मिळालेलें ऐकिवांत आहे.

"कुमेर, बेबेर इ दुर्मीर" (खाणें, पिणें आणि झोपणें) हा मंत्र आयुष्यभर जपत पुर्तुगेजांनीं गोव्याचें राज्य केलें. त्यामुळें पणजी ही सबंध गोव्याची राजधानी असून देखील ती झोपाळू आणि सुस्त वाटायची. पणजींत कधीं चैतन्य म्हणून दिसतच नसे. तिथला सगळा कारभार सदा मरगळलेला व थंड असायचा. क्षुल्लक कामाकरितां दिवस दिवस खर्च करावे लागायचे. लांबून लांबून आलेलीं माणसें वैतागलेले चेहरे करून सरकारी कचेऱ्यांच्या दारांत उभीं असलेलीं दिसायचीं. दिवाणी दाव्याचें कोर्ट हें या सर्वांत मुकुटमणि होतें. आजोबानें केलेल्या दाव्याचा निकाल इथें नातवाची पन्नाशी उलटल्यानंतर लागायचा. गोमंतकाच्या हद्दीबाहेर सावंतवाडीच्या आसपासच्या खेड्यांत 'गोंयचॉ 'दॅमांद' तुझ्या घरार पडूं' अशी एक शिवीच आहे. या दॅमांद प्रकरणांत सांपडलेल्या पांचपंचवीस लोकांचे भकास चेहरे या कोर्टाच्या दारांत सदैव दिसत असत. प्रत्येक कचेरींतला अधिकारी सबंध जगाचा नियंता असल्याच्या भूमिकेनें इथें शेवटपर्यंत वागला.

खाणावळी आणि चहाफराळाचीं दुकानें पणजींत फारच थोडीं होतीं. १९३० पर्यंत दोनतीनच होतीं. मध्यमवर्गांतील तरुण लोक आजूबाजूला कुणी नाहीं अशी खात्री करून घेऊन नंतरच हॉटेलांत शिरत असत. मला नक्की साल आठवत नाहीं, पण असहकारितेच्या चळवळींत भाग घेतलेला एक कारवारी सारस्वत तरुण एका इंग्लिश संस्थेंतली चांगली नोकरी सोडून गोमंतकांत आला आणि स्वावलंबना-साठीं त्यानें पहिल्याप्रथम एक बेकरी काढली. त्या बेकरीला जोडूनच त्यानें एक चहाचें दुकानहि काढलें, आणि या हुशार तरुणाभोंवतीं पणजींतील सुशिक्षित तरुणांचेंहि एक वलय निर्माण झाल्यानें '—बेकरी—' हें एक चांगल्या माणसाला भेटण्याचें केंद्रच झालें. या बेकरीनें आणि ती स्थापन करणाऱ्या तिच्या चालकानें हॉटेलबद्दलच्या पुष्कळशा कल्पना पालटल्या. नपेक्षां तत्पूर्वीं पणजींत खाणावळवाल्याला सामाजिक स्थान नव्हतें.

मळा, पाटो, पास, जार्दीन, सतिनेस (सांता इनेज), देऊळवाडा, आल्तीन,

कांपाल, गास्पार दीयश, मिरामार, पालास द इदालकांव, पुलीस, मार्केट आणि अशा कांहीं बारीकबारीक विभागांत पणजीची विभागणी आहे. हिंदूंचीं पांचसहा आद्य घराणीं सोडलीं तर मागाहून व्यापारानिमित्त किंवा नोकरीनिमित्त येऊन कायमची वस्ती करणाऱ्यांनीं आपल्या सुधारलेल्या परिस्थितींत पुढें घरें बांधलीं. अशीं पस्तीसचाळीस वर्षांतलीं घरें पणजींत पुष्कळ आहेत. इथला व्यापार सुरुवातीला गोमंतकीय हिंदूंच्याच हातांत होता. मागाहून कांहीं 'टोपण', 'दाभण', 'मगनलाल' असे कच्छी आले, हुसेनभाई, जव्हेरभाई, हबीबभाई असे मेमणहि आले. गुजरात्यांनींहि कांहीं व्यापारी ठाणीं काबीज केलीं, पण 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' हा मंत्र ओठावर घोळवणारा येथील हिंदु डगमगला नाहीं किंवा मत्सरानें पेटला नाहीं. ज्याचें नशीब त्याच्याकडे या शब्दांनीं त्यानें समाधान मानून घेतलें. पूर्वीं 'ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें' अशी वृत्ति सर्वत्र दिसून येत होती; मागाहून वाढत्या शहरी गरजांबरोबर पणजींतला पणजीकरहि बदलला. दुसऱ्या महायुद्धांत होती नव्हती ती व्यापारी नीति रसातळाला गेली. त्यांत अरबांनीं बराच हैदोस घातला. चोरट्या व्यापाराचें पणजी हें केंद्रस्थान करून पणजीला त्यांनीं पिचून काढली. कस्टमच्या साध्या शिपायापासून गव्हर्नरांपर्यंत लक्षावधि रुपयांचे मलिदे चारून पणजीचा सरळ व्यापारी मार्गच त्यांनीं पुसून टाकला.

पुर्तुगेज राज्यकर्त्यांचें वास्तव्य पणजींत असल्यानें पुर्तुगेज आचार-विचारांचा पणजीकर हिंदूंनीं आपल्या घरकुलाबाहेर स्वखुशीनें स्वीकार केला होता. आणि पुढें पुढें पुर्तुगेज सार्वभौमसत्तेचा तो अभिमानीहि झाला होता. कांहीं घराण्यांत तर वेश पुर्तुगेज, भाषा पुर्तुगेज, आणि समस्त वागणूकहि पुर्तुगेज होती. पुर्तुगेजांशीं कृतज्ञता व्यक्त करण्याची एकहि संधि न सोडण्याची हीं घराणीं अतिशय दक्षता बाळगीत असत. पुर्तुगेज ज्याप्रमाणें हिंदूंना 'ज्येंतीव' (जंगली) अशाच कल्पनेनें अखेरपर्यंत वागवीत राहिले त्याचप्रमाणें हेहि राजनिष्ठ लोक पणजीबाहेरून आलेल्या कुणाहि हिंदूकडे रानटी माणूस म्हणूनच पाहायचे. गरीब धाकट्याला छळण्याचा तर त्यांनीं विडाच उचललेला होता. एखाद्या अडचणींत

सांपडलेल्या माणसाबद्दल पुर्तुगेज साहेबाला दया यायची; 'जाऊं दे देवाचं गरीब लेकरूं आहे तें' असेहि उद्गार साहेब काढायचा, गरिबावर दया करायचा; पण पणजींतल्या कांहीं हिंदूंनीं आपल्या हातांत सांपडलेल्या अनेक अन्य हिंदूंचें वाटोळें केलेलें आहे. तशीं उदाहरणेंहि खूप आहेत. हे लोक आजच्या स्वतंत्र गोमंतकांत अजून जिवंत आहेत; पण वठणीला आलेल्या बैलांसारखी स्थिति झाल्यानें आपला जुना पुर्तुगेज 'ड्रेस' घालून नव्या जगाकडे वावरलेल्या मुद्रेनें पाहतांना केव्हां केव्हां दिसतात.

ध्येयवाद नांवाची गोष्टच या कुटुंबांतील मागल्या पिढींतहि नव्हती आणि त्यांच्या पुढच्या पिढींतहि नाहीं; 'येनकेन प्रकारेण' आपला आब टिकविणें हेंच त्यांचें जीवितकार्य राहिलें. पण अशीं कांहीं कुटुंबें सोडलीं तर प्रपंच संभाळून ललितकलांबद्दल आस्था बाळगणारीं, कलावंताची कदर करणारीं आणि शक्य त्या मार्गांनीं वाङ्मयसेवा करून सर्वांशीं प्रेमानें वागणारीं कुटुंबेंहि पणजींत आहेत. आपली आणि आपल्या गांवच्या समाजाची अनेक वेळां अब्रू वांचविल्याबद्दल पणजींतील 'केणी' घराण्याला दुवा देणारीं कित्येक सारस्वत घराणीं गोमंतकांत सांपडतील. रामनाथ केणी व पुंडलिक केणी हे जिवंत होते तोंपर्यंत कोणत्याहि हिंदु स्त्रीला भ्रतारानें केलेल्या चुकांमुळें कोर्टाच्या कैचींत सांपडलेली असून देखील, वरील दोन गृहस्थांच्या कृपेनें पुलीसकोर्टांची किंवा अन्य कोर्टांची पायरी चढावी लागली नाहीं. असंख्य अडचणींतूनहि हिंदूंनीं लहान लहान खेड्यांतले आपले उत्सव बिनधोकपणें पार पाडले. आमच्या गांवचा रामनवमीचा उत्सव कुणा दुष्टाच्या कवटाळामुळें त्या दिवशीं दहा वाजतांच बंद करण्याबद्दल हुकूम आला; पण पंचा नेसून आंघोळीला जात असलेल्या पुंडलिक केण्यांच्या कानावर ही हकीकत दीनवाणीनें घालतांच आंघोळदेखील न करतां तशाच स्थितींत पुर्तुगेज अधिकाऱ्यांची समजावणी करून टळटळीत दुपारीं रामराणा जन्मल्याचा सोहळा पाहण्याचें भाग्य आमच्या गांवच्या लोकांना त्या महाभागानें लाभूं दिलें होतें. लहानपणीं अशा अनेक गोष्टी मीं ऐकलेल्या अजून माझ्या लक्षांत आहेत.

केणी घराण्यांतील कै. अनंत रामनाथ ऊर्फ बाबा यांनींहि समाजहिताच्या अनेक गोष्टी केलेल्या आहेत. पणजीच्या श्रीमहालक्ष्मीच्या देवळांत होणाऱ्या चैत्रपौर्णिमेच्या उत्सवाचे ते सूत्रधार होते. हा उत्सव सर्वांग-सुंदर करण्यासाठीं बाबा केणी हे अविश्रांत श्रम करायचे. त्यांचे बंधु श्री. पुरुषोत्तम केणी हे पुर्तुगालच्या पार्लमेंटचे गोमंतकाच्या वतीनें मेंबर होते.

श्रीमहालक्ष्मीचें देवालय हें पणजींतलें श्रद्धास्थान. रथसप्तमी, चैत्र पौर्णिमा, श्रावणांतला सात दिवसांचा अखंड नामसप्ताह याशिवाय पणजी-पुरस्थ अन्य हिंदु समाजातर्फे वेळोवेळीं साजरे केले जाणारे नाट्योत्सवहि देवळांत होत असतात. मळ्यांतल्या देवळांतहि उत्सव साजरा केला जातो. रथसप्तमीकर आणि चैत्रपौर्णिमेकर एकाच सारस्वत समाजाचे दोन विभाग आहेत. आपआपला उत्सव चांगला व्हावा यासाठीं पूर्वीं चढा-ओढ असे आणि या चढाओढीमुळें उत्सवांत रंगतहि असे. अजूनहि चढाओढ आहेच; पण पूर्वींची उमेद नाहीं. रथसप्तमीकरांत कांहीं उपजत चांगले गायक कलावंत होते. चैत्रपौर्णिमेकरांत त्यांची उणीव होती. एकटे श्रीपादराव नेत्रेकर रथसप्तमीकरांचा पुष्कळसा भार हलका करीत. चैत्रपौर्णिमेकरांना बाहेरून नट आणावे लागत. श्री. गोविंद अग्नी, वसंत सावकार, सांबप्रसाद सावकार हे चैत्रपौर्णिमेकरांना साहाय्य करीत असत. अलीकडे नेत्रेकर किंवा सांबप्रसाद दोघेहि पेशानें नट असल्यानें पूर्वींसारखीं उत्सवाच्या नाटकांत कामें करीत नाहींत. जसे रथसप्तमीकरांचे तसेच चैत्रपौर्णिमेकरांचे कांहीं उत्तम नाट्यप्रयोग मीं पाहिलेले आहेत. अशा कांहीं ठराविक ज्ञातीपुरत्या मर्यादित उत्सवां-व्यतिरिक्त पणजीकर हिंदूंत अन्य सांस्कृतिक चळवळींचें वारें नव्हतें. मडगांवसारखे साहित्योत्सव पणजींत झालेले ऐकिवांत नाहींत आणि पाहिलेलेहि नाहींत. इथें पुर्तुगेजांचे राष्ट्रीय उत्सव फार होत आणि त्या उत्सवांत मात्र कांहीं पणजीकर अधिक रमत असत. एखाद्या थोर व्यक्तीच्या दर्शनापेक्षां पुर्तुगेज गव्हर्नराला पाहिल्याचा आनंद इथें दिवसभर पुरत असे.

श्री सरस्वतीमंदिर हें इथलें एक वच्यापैकीं वाचनालय. विजयादशमीच्या दिवशीं त्याच्या स्थापनेचा वाढदिवस असतो. त्या दिवशीं एक व्याख्यानहि असे; पण त्यालाहि कांहीं ठराविक लोक येत असत. महालक्ष्मी प्रासादिक हिंदु वाचनमंदिर ही दुसरी संस्थाहि तिथें होती. मुष्टिफंड संस्था ही एक आदरणीय अशी मराठी शिक्षण देणारी संस्था पन्नास वर्षांपूर्वी पणजींत उभी राहिली. प्रत्येकाकडून मूठमूठ तांदूळ घेऊन ही संस्था चालविण्यांत येत असे. पणजींतल्या गेल्या तीन पिढ्यांनीं इथें ज्ञानार्जन केलें. कालांतरानें तांदळांऐवजीं वर्गणी घेण्यांत येऊं लागली. आज या संस्थेच्या स्वतःच्या अशा दोन इमारती असून शेंकडों मुलें तिथें शिक्षण घेत आहेत.

पूर्वीं नगरपालिकेची एक स्वतंत्र मोठी इमारत होती. तिच्यासमोर एक लहानशी बाग आहे. तिलाच 'जार्दीन' असें म्हणतात. त्या बागेंत संध्याकाळ झाली कीं मेस्तीस जातींतल्या तरुणी आणि इतर क्षेत्रांत नालायक ठरल्यानंतर लष्करांत भरती झालेले पुर्तुगेज तरुण यांचे प्रेमालाप चालायचे. जसजशी रात्र चढत जाई तसतसा त्यांच्या कूजनाला रंग येत असे. वरेचसे बघे भयचकित नेत्रांनीं हें कूजन पाहण्याकरितां बागेच्या बाहेर उभे असत; पण सायंकाळच्या वेळेला तिथें आंत जाऊन बसायची कुणाचीहि छाती होत नसे. तिथें उंच स्तंभावर असलेल्या आफाँस द् आल्बुकॅर्कच्या पुतळ्याच्या साक्षीनें अत्यंत किळसवाणे प्रकार तर रोज घडत असत. आतां ती नगरपालिकेची इमारत तर दिसतच नाहीं; पण अनेक पापी गुपितें ऐकलेली आणि पाहिलेली ती छोटीशी बागहि करपून गेलेली आहे. तिचें पुनरुज्जीवन यापुढें होईलच. या बागेच्या पलीकडच्या फुटपाथवर 'ऍराल्दु' या गोमंतकांतील ख्यातनाम वृत्तपत्राची कचेरी होती; व त्याच्या डाव्या अंगाला असलेल्या एका विलायती औषधें विकणाऱ्या दुकानासमोर नित्य संध्याकाळीं पणजींतील कांहीं आदरणीय गृहस्थांची बैठक असे. त्यांत डॉ. व्यंकटेश सरदेसाई (हे या दुकानाचे मालक), शिवा फटु पै आंगले, विठ्ठल स. सुखटणकर, शांवाराव सरदेसाई, डॉ. साखरदांडे प्रभृति समाजोन्नतीची सतत चिंता

वाहणारे लोक असत. त्यांना ओळखणारे तरुण तिकडून जातांना हातांत सिगारेट असली तर तिथल्या तिथें चुरगाळून बाहेर फेकत असत किंवा वेषांत कांहीं भडकपणा असला तर दबून दुसऱ्या बाजूनें जात. हे लोक पणजींत होते म्हणून माझ्या पिढींतील तरुणांनीं सतत आपल्या निष्ठा राखून ठेवल्या. नांव घेण्यासारखें ते कांहीं करूं शकले. शांबाराव तर प्रत्येक ओळखीच्या तरुणाला 'तुझें ध्येय काय?' असें स्पष्ट विचारीत. आज तिथें कुणी कुणाला विचारीत नाहीं. आणि कुणी कुणाची विचार-पूसहि करीत नाहीं. डॉ. साखरदांडे ऊर्फ 'बुलबुल' यांच्यासारखा मोठ्यांत मोठा व लहानांत लहानांशीं मिळूनमिसळून वागणारा साहित्य-प्रिय व विनोदप्रिय गृहस्थ आतां दिसणार नाहीं. त्यांच्या दवाखान्यांतहि पणजींतील सामाजिक कार्यकर्त्यांची सदैव गर्दी असे. 'प्रदीप' या नांवाचें हिंदु समाजोन्नतीला वाहिलेलें वृत्तपत्र त्यांनीं कांहीं काळ चालविलें होतें. डॉक्टरसाहेबांच्या शरिराच्या आणि त्यांच्या पोशाखाच्या विशिष्ट ठेवणीमुळें बरेच चित्रकलाप्रेमी तरुण त्यांचें व्यंगचित्र एकदोन रेघांत सहज उभें करीत. डॉ. बुलबुलांच्या पिढींतले बरेचसे लोक आपल्या आदर्श व्यक्तिमत्त्वाची छाया पाठीमागें ठेवून गेले; पण मला मात्र त्यामुळें पणजींतलें बरेंचसें कांहीं हरवल्यासारखें वाटतें. बरेंचसें!!

मांडवीनें सागराजवळ जातांना लाजून इथें पदर सांवरला असल्यानें पणजीच्या किनाऱ्याला प्रमाणबद्ध अर्धवर्तुळ नैसर्गिकच लाभलेलें आहे. पुर्तुगेजांची बुद्धि आपला धर्म कसा वाढवावा यांतच अधिक खर्च झाल्याकारणानें विज्ञानशास्त्राच्या प्रगतींत ते मागेंच राहिले. साडेचारशें वर्षांच्या राजवटींत एखादी डोळे दिपवून सोडणारी भव्य वास्तु गोमंतकांत त्यांना उभारतां आली नाहीं. नगररचनेच्या दृष्टीनें, पणजी शहर सोडलें तर इतर शहरांना एक प्रमाणबद्ध अशी आंखणी नाहीं. 'मांडवी' हॉटेलसारखी दुसरी एकहि इमारत पणजींत आढळत नाहीं. पुर्तुगेजांनीं जिकडेतिकडे खुजट बांधावळ करून ठेवलेली असल्यानें नैसर्गिक सुबकपणा हेंच पणजीचें सौंदर्य ठरतें. आणि तेंच डोळ्यांत भरतें. आतांशा पणजींतली मध्यमवर्गांतली हिंदु स्त्री निश्चिंतपणें बाहेर हिंडतांना

दिसते; पण पूर्वीं महालक्ष्मीच्या देवळांतील उत्सवाखेरीज किंवा संक्रांतीच्या सणाखेरीज आपल्या घराचा उंबरठा ओलांडून ती कधीं बाहेर पडली नाहीं. पण पणजींत अजून कांहीं अशींहि माणसें आहेत कीं त्यांच्या पूर्वजांनीं त्यांची जन्माची ददात मिटवून ठेवलेली असल्यामुळें आणि शरिराला कांहींच हालचाल नसल्यामुळें बोटींच्या धक्क्यावर, मोटार-स्टँडवर किंवा मार्केट आदि वर्दळीच्या ठिकाणीं तासन्तास आंबटशोक करीत राहणें त्यांना आवडतें. डोळे, कान, नाक या तिन्ही इंद्रियांची हालचाल—किमान पक्षीं एकाची तरी हालचाल करायची संवय त्यांनीं लावून घेतलेली आहे. मिष्किल माणसें त्यांची ओळख त्यांच्या अंग-विक्षेपावरून करून देतात; पण खरीं निश्चिंत माणसें तीं हींच. कसलेंच सोयरसुतक त्यांना नाहीं.

पणजी जशी राजनिष्ठ होती तशी स्वार्थीहि होती. तिच्या मातीच्या कणाकणांत भिनलेले हे दोन्ही गुण पुर्तुगेजांचें पाऊल उखडतांच झडल्या-सारखे वाटले होते, पण दुर्दैवानें भारत सरकारनें अशी एक एक भयंकर माणसें तिथली शासनयंत्रणा चालवायला पाठविलीं कीं त्यांनीं पणजीला गांजलें, डिंवचलें, वैतागून सोडलें. आणि त्यामुळें निराशेचे निःश्वास सोडीत नाइलाजानें पणजीच्या तोंडून उद्गार निघतात, "खरंच पूर्वींची राजवट बरी होती!"




श्री महालक्ष्मी संस्थान बांदोडें



शिबिकोत्सव



श्री महालसा संस्थान म्हार्दोळ



ऐलथडी

पूर्वतयारी



# रंगेल आणि रंगेल म्हापसें

पेडणें, बारदेश, सांखळी, सत्तरी, तिसवाडी, फोंडें, सासष्टी, सांगें, केपें, काणकोण, व मुरगांव अशा अकरा महालांत गोमंतकाची विभागणी झालेली आहे. मुरगांव हें बंदर सासष्टी महालांतून काढून त्याला स्वतंत्र महालाचा दर्जा अलीकडच्या काळांत देण्यांत येऊन त्याचें मुख्य ठाणें 'व्हास्कु द गामा' हें ठरविण्यांत आलें. गोमंतकाच्या पूर्वींच्या नकाशांत या स्वतंत्र महालाचें अस्तित्व नाहीं. अकरा महालांपैकीं पांच महालांच्या मुख्य ठाण्याचीं किंवा राजधानींचीं नांवें वेगळीं आहेत. बाकीचीं त्या त्या महालांच्या नांवाप्रमाणेंच आहेत. बारदेश महालाचें मुख्य ठाणें म्हापसें, सत्तरीचें वाळपई, तिसवाडीचें पणजी किंवा नवीन गोवें, सासष्टीचें मडगांव व मुरगांवचें 'व्हास्कु द गामा'. सबंध गोमंतकांत मिळून खऱ्या बाजारपेठा तीनच आहेत : मडगांव, पणजी व म्हापसें. इतर महालांतील ठाण्यांना त्या त्या महालापुरताच मोठेपणा आहे. मुरगांव

हें आयातनिर्यातीला सोयीचें बंदर म्हणून महत्त्व. पूर्वीं तिथें आज आहे तशी बाजारपेठ वा लोकवस्ती नव्हती. कांहीं परदेशी कंपन्यांच्या मालाचीं कोठारें आणि परदेशाहून आलेल्या मालाच्या व उतारूंच्या बोटींसाठीं प्रचंड धक्का, कस्टम खातें, रेल्वेचें स्टेशन व विमानतळ यांमुळें तें थोडेंसें गजबजलेलें वाटत होतें. पणजी शहर वसवितांना मुरगांवला अधिक महत्त्व देऊन मुरगांव हीच गोमंतकाची राजधानी करावी अशी पुर्तुगेज सरकारची इच्छा होती. तिथें इमारती बांधण्यासहि सुरुवात झालेली होती; पण मागाहून ती योजना बारगळली.

दुसऱ्या महायुद्धानंतर मुरगांवची खूपच भरभराट झालेली आहे. श्री. जोयशी, साळगांवकर, चौगुले, मेहता इत्यादि प्रसिद्ध व्यापाऱ्यांनीं या बंदराला व्यापारी दृष्ट्याहि महत्त्व आणून अनेक तऱ्हेच्या व्यापाराच्या नाड्या मुरगांवच्या हातांत ठेवल्यानें मुरगांव हें सबंध गोमंतकाच्या व्यापार-कारणाचें जणुं गुप्त सूत्रधारच झालेलें आहे. भावी काळांत भारतांतील एक फार महत्त्वाचें बंदर म्हणून त्याची वाढ होईल. असें असलें तरी मडगांव, पणजी किंवा म्हापसें या शहरांसारखी मुरगांवला जुनी परंपरा किंवा उत्सवी इतिहास नाहीं. मडगांव आणि पणजी या शहरांसंबंधीं मीं पाहिलेल्या आणि ऐकिलेल्या कांहीं वैशिष्ट्यांचें यथामति विवरण केलें. आतां म्हापशासंबंधीं जें कांहीं थोडें पाहिलें आणि ऐकलें तें सांगतों.

म्हापसें ही बारदेश महालाची कर्तुमकर्तुम् राजधानी. बारदेश हा महाल तिसऱ्या क्रमांकाचा असला तरी अनेक बाबतींत त्याचा क्रमांक दुसरा किंवा पहिलाहि आहे. लोकसंख्येच्या बाबतींत त्याचा क्रमांक दुसरा आहे, उत्पन्नाच्या दृष्टीनेंहि दुसरा आहे; पण कर्तृत्वशक्तीचा विचार केल्यास त्याचा क्रमांक निश्चित पहिला लागेल. मोकळ्या दिलाचा म्हणून बार्देशकराची ख्याति आहे. बार्देशकर खिस्त्यांत जातिविषयक कडवेपणा कमी प्रमाणांत आढळतो. बुद्धिमत्तेनें बार्देशकर थोडासा कमीच, पण त्याच्या उद्यमशीलतेच्या पासंगाला कोणीहि पुरणार नाहीं. पुर्तुगेज भाषेपेक्षां बार्देसकरांचा इंग्रजी भाषा व इंग्रजी शिक्षणाकडेच ओढा पूर्वीं-पासून अधिक होता व आहे. गोमंतकाबाहेर जाऊन आपलें कार्यक्षेत्र

निवडणारे बारदेशकरच अधिक निघतील. बहुसंख्य बारदेशकर हे कधींहि रिकामे दिसणार नाहींत. नानातऱ्हेचे ग्रामोद्योग, शेती, अबकारी, मासेमारी इत्यादि उद्योगांत ते रात्रंदिवस गुंतलेले असतात. खालच्या वर्गांतील स्त्रिया या कुटुंबांतील एक घटकच असतात. आपल्या उपजीविकेचा भार त्या आपणच उचलतात. पुरुषांच्या बरोबरीनें त्या सारीं कामें करीत असतात; किंबहुना इथें स्त्रीच आपल्या प्रपंचासाठीं पुरुषाहून अधिक राबते. अशा या उद्योगरत बारदेश महालाच्या राजधानीचें नांव आहे म्हापसें.

म्हापसें ही बहुरंगी तितकीच भडक बाजारपेठ. 'कोणतीहि गोष्ट म्हापशाच्या बाजारांत खपते' असें पूर्वींचे लोक थट्टेनें म्हणत असत. पणजी, मडगांव किंवा गोमंतकांतील इतर लहानमोठ्या बाजारपेठांत गिऱ्हाइकाला हाक मारून कुणी बोलावणार नाहीं; पण म्हापशाच्या बाजारांतून पिशवी घेऊन विशिष्ट स्थळीं जायला निघावें—सतरा जण "बाब, किदें जाय रे तुका? हांगा यॉ; फुडँ वचूं नाका. म्हजेकडे सगळँ आसा! हांगा यॉ!" अशी काव काव करतील. नवा माणूस तिथें बावरून जातो. शुक्रवार हा म्हापशाचा बाजाराचा दिवस. या दिवशीं बारदेश महालांतील अठ्ठेचाळीस गांवांतील असंख्य लोक कांहीं ना कांहीं कामा-करितां म्हापशांत येतात. केवळ हा बाजार बघण्याकरितां आणि म्हापसेंकर गिऱ्हाइकाला कसें पटवितात हें पाहण्याकरितां त्या दिवशीं म्हापशांत जावें. पाहणारा आश्चर्यानें थक्क होईल; स्तिमित होईल; हसून हसून त्याच्या मुरकुंड्या वळतील.

नसता शिष्टपणा म्हापशांत नाहीं. खरें म्हणजे म्हापसें अत्यंत रसिक. रसिकतेच्या बाबतींत म्हापशाला सबंध गोमंतकांत जोड नाहीं. म्हापसें सदा गजबजलेलें. सदा आनंदी. इथल्या व्यापाऱ्यांची वृत्तीहि थोडीशी मिष्किल—म्हटलें तर पोक्त, म्हटलें तर इरसाल अशी; तशीच बरीचशी जिद्दीहि; पण हें सर्व असूनहि रसिकतेनें ओतप्रोत भरलेली. इथें शिवीशिवाय हांक नाहीं आणि ओवीशिवाय बात नाहीं. प्रेमाच्या गोष्टींत देखील दहा शब्दांच्या एका वाक्यांत तऱ्हेतऱ्हेच्या चार शिव्या

असायच्याच ! स्वतःच्या मुलाचें कौतुक सांगतांनाहि आरंभालाच त्याला एखादी इरसाल शिवी हांसडून मग त्याचा पराक्रम सांगतील; पण हें सर्व निर्व्याज अंतःकरणानें असल्यानें त्याचा विधिनिषेध कुणी बाळगत नाहीं. इथल्या व्यापाऱ्यांच्या आपआपसांत स्पर्धा आहेत पण कुठल्याहि सार्वजनिक कार्यांत हे सर्व व्यापारी एकाच कुटुंबांतील माणसांसारखी कंबर कसतील.

संगीत, चित्र आणि नाट्य या तिन्ही कलांचें आपल्या अभिजात रसिकतेनें म्हापशानें अपार कौतुक केलें. चांगले मूर्तिकार, चांगले पेंटर, चांगले वादनकार म्हापशाच्या परिसरांत सांपडायचे. नाटकांचे पडदे रंगविणारे, रंगभूमीला लागणारें पुराण-इतिहासापासून आधुनिक कालापर्यंतचें सर्व सामान भाड्यानें देणारे किंवहुना गॅसबत्तीपासून मांडव आणि खुर्च्यांचीहि व्यवस्था करणारे ठेकेदार म्हापशाशिवाय गोमंतकांत अन्यत्र सांपडणें कठीण. म्हापशाच्या आदराला पात्र झालेला कलावंत सबंध गोमंतकाच्या कौतुकाला पुरला हें निश्चित. म्हापसेंकर कीर्तनरंगांत जितक्या विरक्तीनें रंगतो तितकीच रतिरंगाची आसक्तीहि त्याला आहे. मळका सद्रा घालून आणि मातकट धोतर नेसून सकाळीं बाजारांत तो नव्या किंवा जुन्यापुराण्या वस्तूंचा व्यापार करील. आणि त्यांतून मुक्त होतांच सायंकाळीं सिल्कचा शर्ट, ब्लेझरचा कोट, पातळ फरची टोपी, धोतराचा काचा, पायांत पंपशू व हातांत जळती सिगारेट अशा ऐटींत तो बाहेर पडेल. हजाराचे लाख करणें आणि जिद्दीला पेटून लाखाचे बारा हजार करणें म्हापसेंकरांच्या हातचा मळ आहे. जिद्द हा गुण म्हापसेंकरांच्या रोमरोमांत भिनलेला आहे.

विदुरानें पांडवांना सांकेतिक संभाषणासाठीं 'बर्बरी' भाषा शिकविली. म्हापशाची अशी खास बाजारी भाषा आहे. ही भाषा म्हणजे कोंकणी भाषेला म्हापसेंकरांनीं वहाल केलेला एक अलंकार आहे. दोन रुपये खरेदीची एखादी वस्तु तीन रुपयांना विकून त्यावर एक रुपया नफा मिळविला ही गोष्ट सांकेतिक अशा तीनच शब्दांत वासू पानकर शाणू परीकरला हाक मारून सांगतो—"शाणू, उदाणुं सुब्यांक बारली !" हे तीनहि शब्द कोंकणी नाहींत; किंवा कुठल्याहि सद्यकालीन भारतीय

भाषेंतले नाहींत. ही भाषा खास म्हापसेंकरी. या वाक्यांतली फक्त 'शाणू' ही हांक तेवढी त्रयस्थाला कळते; पण पुढच्या शब्दांचे अर्थ केवळ पर्रीकर व पानकर यांनाच कळतात.

अशीं हीं भाषेनें आणि वृत्तीनें थोडींशीं तिरक्या वळणाचीं, पण अंतःकरणानें संगीत माणसें. मासे, नाट्य आणि संगीत या तीन गोष्टींचें त्यांना अपार वेड. जसा माशांसाठीं तसाच नाटकासाठीं आणि संगीता-साठीं म्हापसेंकर जीव टाकील. गद्यापेक्षां त्याला पद्याची ओढ अधिक. उत्तम निरूपण करणाऱ्या कीर्तनकारापेक्षां उत्तम संगीत जाणणाऱ्या हरिदासाबद्दल त्याला अधिक प्रेम आहे. नाटकांतील पदांच्या अर्थापेक्षां चालींतील चमत्कृतीचा अर्थ त्याला लवकर समजतो. व्यवहारांतील हिशेब पै-पाव-आण्यांत चुकला तरी त्याला त्याची पर्वा नाहीं; पण लयकारींतील पाव-अर्धी मात्रा इकडची तिकडे झालेली त्याला खपत नाहीं! म्हापशांत घडलेल्या एका कीर्तनांतील संघर्ष आठवतो—

लक्ष्मी-नारायणाचें देऊळ हें तिथलें सर्वांत मोठें देऊळ. या देवळांत विख्यात कीर्तनकार काशीकरबुवांचें कीर्तन होतें. काशीकर विद्वान् खरे, पण थोडेसे अहंकारी नी मस्तवाल वृत्तीचे. त्यांचा थाट दरबारी असे. दोन्ही हातांच्या बोटांत हिऱ्याच्या खड्याच्या बऱ्याच अंतरावरून सहज लक्षांत येतील अशा जाडजूड आंगठ्या, कंठीं रुद्राक्षाच्या माळा, केशरी रुमालाची पगडी, रेशमी कफनी, भरदार देह इत्यादि गोष्टींनीं बुवांचें व्यक्तित्व नजरेंत भरे. प्रवाही वक्तृत्वाप्रमाणेंच बुवांचें गाणेंहि बरेंच उजवें होतें. त्यामुळें बुवांच्या साथीला जसा वजनदार तबलावादक तसाच तज्ज्ञ असा पेटीवालाहि असावा लागे. आधल्या दिवशींच्या कीर्तनांत बुवांच्या साथीला बसलेल्या तबलजी व पेटीवाल्याला बुवांनीं भरसभेंत नालायक ठरविलें. आणि त्या दोघांचा एकापरीनें अपमान केला. झालें! अखिल बारदेश महालांतील अठ्ठेचाळीस गांवांत ही बातमी वाऱ्यासारखी पसरली, चर्चिली गेली; पण दुसऱ्या दिवशींच या अपमानाचें उट्टें म्हापसेंकरांनीं सव्याज फेडलें. दुसऱ्या दिवशीं आटोकाट प्रयत्न करून त्यांनीं बुवांच्या साथीला जीं दोन माणसें आणून

बसविलीं तीं लयकारीच्या कठीण समस्या सोडविणारीं तर होतींच; पण बुवांच्या कीर्तनापुरत्या गाण्याला पुरून उरणारीं होतीं. गोमंतकाबाहेर त्यांनीं अनेक मैफली मारलेल्या होत्या. हीं दोन माणसें म्हणजे ख्यातनाम हार्मोनियमवादक मधु पेडणेकर आणि सुविख्यात तबलावादक परशुराम कामुलकर ऊर्फ 'परीस'.

नमन-भजन झाल्यानंतर पूर्वरंगाच्या निरूपणाआधीं बुवा एखादा समयोचित राग गात असत. त्या रागाची ते मध्यलयींत चीज गायचे. त्या दिवशीं बुवांनीं 'पूरिया' रागांतील झपतालांतील एक चीज सुरू केली. अंतरा संपवून तिहायी घेऊन समेवर येतांना परशुरामबुवांच्या अनाघाती मात्रेनें समेवर येणाऱ्या मुखड्यांत काशीकरबुवांच्या चिजेचा मुखडा अडकला. बुवांना सम सांपडेना. सावकार, नाटेकर अशी म्हापशांतली जाणकार मंडळी समोर बसलेली; एकदोन वेळां 'बोलउपज' करून तबल्याचीं एकदोन आवर्तनें जाईपर्यंत बुवांनीं फिरवाफिरव करून पाहिली; पण परशुरामबुवा त्यांना सम दाखवीनात. तिकडे मधु पेडणे-करांनीं आवर्तनावर आवर्तनें घेऊन 'पूरिया' राग वातावरणांत भरून टाकला; पण तेहि बुद्ध्या चिजेचा मुखडा घेऊन समेवर येईनात. अखेर बुवांनीं शरणचिठी दिली! प्रतिष्ठित श्रोत्यांनीं परशुरामला विनंती केली; आणि एक सुंदर परान घेऊन परीसमामांनीं सम दाखविली. टाळ्यांचा पाऊस पडला. दुसऱ्या दिवसापासून पुढें जवळजवळ वर्षभर हा कौतुकाचा विषय म्हापशाला 'युद्धस्य कथा रम्या'सारखा चर्चेला पुरला. म्हापशांत रंगलेले असे अनेक मनोरंजक प्रसंग सांगतां येतील. असल्या गोड प्रसंगांत मी म्हापशांत अनेक वेळां रंगून गेलेला आहें.

वैश्य आणि सारस्वत या दोन जमातींचें म्हापशांत वर्चस्व. सारस्वतांत जोयशांचें घराणें हें आद्य श्रीमंत घराणें. तसेंच वैश्यांत खलपांचें घराणें हेंहि आद्य श्रीमंत घराणें. सारस्वतांत नरसिंह दलाल, काका दणाईत, दादा जोयशी, वासुदेव पै, विठू दलाल इत्यादि लोक शिरावर घेतलेलीं सार्वजनिक कार्यें जबाबदारीनें पार पाडीत. काका दणाईत हे म्हापशांतले सार्वजनिक काका होते. सारस्वत विद्यालयाचे ते एक संस्थापक. महाराष्ट्रांतले

विद्वान लोक काकांना शोधीत यायचे. पुढारलेल्या जगांतील सर्व गोष्टींचा पुरस्कार प्रथम काकांनीं केला. आपल्या घरांतील मुलींना आंग्लविद्या-विभूषित केलें प्रथम काकांनीं. त्यांचें संस्कृताचें अध्ययनहि उत्तम होतें. आणि विविध ग्रंथांच्या वाचनानें त्यांचे विचार परिपक्व झालेले होते. प्रसिद्ध लेखिका सौ. कमला वाघ या काकांची नात आहेत. म्हापशांतलें दुसरें प्रसिद्ध घराणें जोयशांचें. त्यांच्या घरांतील कचऱ्याचा देखील लिलांव व्हायचा अशी एक आख्यायिका लहानपणीं ऐकलेली होती. घरांतील भांडीं एवढीं मोठीं होतीं कीं त्यांच्या मोठ्या घराच्या दारांतून तीं बाहेर निघत नसत. घरांतून तीं बाहेर जाऊंच नयेत म्हणून त्यांच्या पूर्वजांनीं तीं तशीं करून घेतल्याचें लोक सांगत. म्हापशांतील सावकार घराणें आपल्या रसिकतेमुळें, नाट्यप्रियतेमुळें आणि प्रत्यक्ष नाटकाच्या धंद्यामुळें सर्वविख्यात आहे.

म्हापशांतला वैश्य समाज हा दिसायला सारस्वतांपासून मुळींच वेगळा नाहीं. आपण होऊन त्यांनीं जात सांगितली तरच वेगळेपणा कळावा. या समाजानें म्हापशाला अनेक अंगांनी रंग आणलेला आहे. त्यांच्यासारखे हिकमती कलावंत समस्त गोमंतकांत शोधून सांपडायचे नाहींत. 'नर्ज, नकळ, ना' हे तीन नन्नाकारी शब्द त्यांच्या कोषांत नाहींत. उत्तम मूर्तिकार, उत्तम रंगारी, उत्कृष्ट पक्वान्नें करणारे, हुशार व्यापारी या समाजांत पुष्कळ आहेत. नेपथ्यरचनेंत त्यांचा हात धरणारे अखिल हिंदुस्थानांत सांपडणें नोहे—असें मीं म्हटलें तर तें वस्तुस्थितीला सोडून नाहीं. 'कांगणे' आणि दिवकर बंधूंनीं या बाबतींत आपलीं नांवें अजरामर केलेलीं आहेत. कोणत्याहि तऱ्हेचें आधुनिक शिक्षण न घेतां केवळ स्वयंस्फूर्तीनें या समाजांतील कलावंतांनीं केलेल्या ज्या ज्या कलाकृति मीं पाहिलेल्या आहेत त्यांच्या खुणा माझ्या मनावर कायमच्या कोरलेल्या आहेत. शोभेचें दारूसामान विविध रंगांनीं करणें ही गोष्ट म्हणजे त्यांना 'करतलामलकवत्' आहे. या बाबतींत गोमंतकांत त्यांच्याशिवाय आणखी दुसरे कुणीहि नाहींत. नळे, चंद्रज्योति, भुईचक्रें, अग्निबाण, आकाशांत रंगीबेरंगी नक्षत्रें उडविणारे नक्षत्रबाण, तलवारींचा कोट....

कळसूत्री बाहुल्यांचे खेळ....ओ हो हो ! अशा अनंत गोष्टी म्हापसेंकरच दाखवूं जाणे.

वैश्य जसा रंगेल तसा रगेलहि आहे. तत्त्वासाठीं तो सर्वस्व गमावील; पण माघार घेणार नाहीं. पूर्वी लक्ष्मीनारायणाचें देऊळ हेंच एक सर्वांचें श्रद्धास्थान होतें. त्याच्या बाजूलाच मारुतीची एक लहानशी देवळी होती. पण त्या देवळीला देवळाचें रूप देऊन तें ख्यातनाम केलें सखाराम नाटेकरांनीं. या भानगडींत तीन नाटेकर बंधूंविरुद्ध सर्व म्हापसें उभें राहिलें; पण सखाराम नाटेकरांनीं माघार घेतली नाहीं. त्यांनी रामनवमीचा उत्सव नांवारूपाला आणला. ग्रामस्थांनीं बहिष्कार घातला आणि उत्सवा-प्रीत्यर्थ नाटकें होईनात तेव्हां 'महाराष्ट्र नाटक मंडळी'चें नाटक लावून तें हजारों लोकांना फुकट दाखविलें. या उत्सवांत देवळाच्या बाहेर एक फिरत्या अक्षरांचा आकाशदिवा टांगला होता. आणि त्यावर 'मारुतीचा सखाराम' अशीं द्व्यार्थी अक्षरें उमटविण्यासहि त्यांनीं कमी केलें नव्हतें. आज बांदेकर, कोचकर, शिरसाट, कवळेकर हीं घराणीं व्यापारांत उत्तम लौकिक मिळवून तीं सर्वमान्य झालेलीं आहेत.

पर्राहून म्हापशाला जातांना किंवा गिरवड्याहून म्हापशांत प्रवेश करतांना दोन्ही रस्त्यांला माडांच्या झावळ्यांनीं केलेली नैसर्गिक कमान अपूर्व आहे. अशी सुंदर प्रमाणबद्ध कमान गोमंतकांतील अन्य सडकांना नाहीं. म्हापशाच्या उजव्या हाताला 'खोली', डाव्या हाताला खाडी, पाठीमागें 'धुळेर' व 'अन्साभाट' हे दोन वाडे, मध्यभागीं 'पेठ' व 'आंगणी' अशा विभागांत म्हापसें नगरी वसलेली आहे. बोणगीचा कणकेश्वर बाबा हा म्हापसेंकरांचा आंगवणीचा देव. संकटकालीं लोक त्याला साद घालनात आणि हें दयाळू दैवत त्यांच्या हांकेला सदैव ओ देतें. डिसेंबर महिन्यांत या दैवताची प्रचंड जत्रा भरते. म्हापशाचें दुसरें साक्षात्कारी दैवत 'मिलाग्र'. गोमंतकांतल्या सप्तदेवतांतली ही एक देवता. पुर्तुगेजांनीं यांतील बऱ्याच देवतांना बाटवून त्यांचें ख्रिस्तीकरण करून त्यांच्या देवळांवर 'इगर्जी' (चर्चेस) बांधल्या. लयराय, मॉर्जाय, मिलाग्र अशीं या देवतांचीं नांवें आहेत. या बहिणींचीं सर्व नांवें आज

माझ्या माहितींत नाहींत. आणि तो भीषण इतिहास पुनरपि संशोधून सांगायची इच्छाहि नाहीं. या दैवतांनींहि साडेचारशें वर्षे परधर्मात राहण्यांत आनंद कां मानावा हें कोडें उलगडत नाहीं. यांपैकीं तीन बहिर्णींच्या जत्रा एका दिवशीं आल्या तर मात्र भयंकर उत्पात घडतो असें जाणतीं माणसें सांगतात.

'मिलाग्र' या शब्दाचा अर्थ साक्षात्कार. आणि हा साक्षात्कार म्हापसें आणि त्याच्या परगण्यांतील सर्व जमातींना होतो. कोणतेंहि दुखणेंखुपणें आलें कीं "मिलाग्री, सायबिणी पाव!" हें वाक्य प्रत्येकाच्या तोंडांत असतेंच. खोर्ली येथील सांतेरीचें देऊळ हें म्हापशाचें आणखी एक श्रद्धास्थान आहे. ज्ञानप्रसारक विद्यालय आणि त्याच नांवाचें वाचनालय, व सारस्वत विद्यालय व वाचनालय या संस्था मराठी भाषेचें ज्ञान देणाऱ्या; शिवाय दैवज्ञ ब्राह्मणसमाजाचेंहि एक वाचनालय कित्येक वर्षांपासून म्हापशांत व्यवस्थित चालू आहे. इतरांसारखें म्हापसें सुस्त नाहीं किंवा पणजीसारखें शिष्ट व अति प्रौढहि नाहीं. म्हापसें जसें रंगेल तसें रगेलहि आहे. चैतन्याचे ओहोळ तिथें खळखळां वाहात असतात. 'करून सवरून' ढोंगाचा सोवळा बुरखा म्हापसें पांघरत नाहीं. इथें सगळा खुला बाजार. आणि म्हणूनच म्हापसें मला आवडतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३६५४३ वि: ...
क्रमांक ३३५ नों. दि: २५.८.६४.

# माझें गोवें

उत्तरेस तेरेखोलची नदी व सावंतवाडी संस्थान, पूर्वेस सह्याद्रि, दक्षिणेस कारवार व पश्चिमेस अरबी समुद्र अशा पांसष्ट मैल लांबीच्या गोमंतकांत पेडण्यापासून काणकोणपर्यंतचे अकराहि महाल पाहण्याचा योग व्यवसायाच्या निमित्तानें मला आला. लांकूड, बांबू आणि कौलांचा आमचा पूर्वापार व्यापार असल्यानें गोव्यांत जिथें हें उत्पन्न असेल तिथें तिथें मला जावें लागलें. सूर्लहून पाळी, पाळीहून वाळपई, वाळपईहून सांखळी, डिचोलीहून मावळिंगें, अस्नोडें ते डिचोली, सात्ई वेऱ्याहून माशेल, माशेलहून पणजी, कुंभारजुवें ते पणजी असा सर्व प्रवास मला पायीं घडलेला आहे. सत्तरी महालांतील बारीक सारीक खेड्यांत मी हिंडलेलों आहें. तेथील दाट वनश्री मी डोळे भरून पाहिलेली आहे. वर्षांतले सहाहि ऋतु मला गोव्यांतल्या चारहि दिशांना हिंडावें लागलें. त्यामुळें गोमंतकांतील निसर्गाचें ऋतूऋतूंत पालटणारें भव्योदात्त स्वरूप पाहून मी मुग्ध झालेला आहें.

कुठें उन्मादक गंध, कुठें लाडिक गंध, कुठें उग्र पण सुखकारक असा गंध; अशा गंधांचे वारे कापीत एकटयानें मैलन्‌मैल चालतांना त्या विविध सुगंध घेऊन येणाऱ्या मरंदाच्या संगतीनें एकसारखें चालतच राहावें असें वाटतें. चालतां चालतां थकवाहि येतो; पण भोंवतालच्या दाट झाडींतून अचानक वाऱ्याची एक लहानशीच झुळुक अंगांगाला स्पर्शून जाते. त्या झुळुकीच्या स्पर्शानें थकवा नाहींसा होतो. चालायला दुप्पट अवसान येतें. उत्तेजन देणाऱ्या एखाद्या वनौषधीचा गंध तर ती झुळुक घेऊन येत नसावी ना? असे विचार मनांत उमटतात. डिचोलीहून मावळिंग्याला जातांना किंवा सूर्लेहून पाळीला जातांना अनेक वेळां मला तसा अनुभव आलेला आहे. एका गांवाहून दुसऱ्या दूरच्या गांवाला जातांना रानच्या आडवाटा जवळच्या असतात. या आडवाटांना मैलामैलाच्या अंतरावर एखादा वाटसरू भेटला तर भेटतो. नाहींतर या वाटा निर्जन; पण निसर्ग मात्र आपल्याला अखंड साथ करीत राहतो.

पानांफुलांनीं डंवरून आलेल्या वृक्षवेलींचें दर्शन घेत आणि मनांतल्या मनांत त्यांच्याशीं हितगुज करीत जावें. आपल्या पानांच्या पताका नाचवीत उभीं असलेलीं पिंपळाचीं झाडें, एखाद्या जटाधारी तपस्व्यासारखीं जरादेखील हालचाल न करतां विश्वाची चिंता वाहात स्तब्ध बसल्यासारखीं वाटणारीं विशाल वडाचीं झाडें, या भांडखोर मानवांचा आपल्याला स्पर्शसुद्धां होऊं नये म्हणून आपलें सर्वांग कंटकमय करून घेतलेलीं सांवरीचीं झाडें, सरपणाला उपयोग होणाऱ्या शेंगांनीं बहरलेला पण आपल्याच गुमींत उभा असलेला एखादा पांगारा, शेंड्यावर-खोचल्यासारखे-पांढऱ्या फुलांचे तुरे लावून वेडावांकडा पसरलेला एखादा बोडका चांफा, अशीं हीं झाडें आपल्या रूप-रस-गंधाच्या वैभवाच्या तंद्रींतच मग्न असल्यासारखीं दिसतात.

सांवरीच्या उंच शेंड्यावर कांहीं घारी गिरक्या घेत असतात, मध्येंच एखादा कोतवाल पक्षी आपली दोन बाजूंना विभागलेली शेपटी भिंगरीसारखी फिरवत भुर्रकन्‌ डोळ्यासमोरून निघून जातो. शुभ्र बलाक पक्ष्यांची एक भली मोठी माळ लगबगीनें कुठें तरी एखाद्या सभेला हजर राहण्यासाठीं

जात असलेली दिसते. मधूनच एक डोमकावळा, शेपटीचा तुरा फुलवून धांवणाऱ्या एका खारीला बघून कर्कश आवाज काढतो. नीरव शांततेचा भंग करणारा तो कर्कश आवाजहि कर्णकटु वाटत नाहीं. मध्येंच एखादा हातानें सारवल्यासारखा जमिनीचा तुकडा हारीनें लावलेल्या आंब्याच्या कलमांनीं त्या गर्द नैसर्गिक भूभागाला विसंगति आणतो. त्याच्या एका बाजूला माडांचें कुंपण आहे. या खुरट्या माडांनीं कुठें कुठें चेंडूएवढीं फळें धरलेलीं आहेत. वाटेंत आणखी कितीतरी झाडेंझुडपें लागतात. हांसाळी, करवंदी, चुरणी, कुडे, घाणेरी....कुणी पालवताहेत, कुणी फुलताहेत, कुणी फळताहेत. हें काजूचें झाड फळलेलें आहे. त्याचे शेंदरी पिवळे बोंडू तहानेल्यानें खुशाल तोडून खावे, रानचा मालक कांहीं प्रतिबंध करणार नाहीं. फक्त खालचा काजू तेवढा तिथेंच टाकून द्यावा, कारण त्याला महत्त्व आहे तें त्या काजूचें. जवळपास काजूची दारू गाळणारी भट्टी असली तर मात्र विचारून त्या बोंडूला हात घालावा लागेल. सृष्टीचें तें मनोहारी वैभव बघतां बघतां रानवाट संपते.

आंबेगाळीचा हमरस्ता ओलांडून पलीकडच्या डोंगराच्या घोंसावर उभें राहून आसपासचा परिसर पाहावा, जिकडे तिकडे लाल हिरव्या रंगाचा साक्षात्कार होत राहतो. क्षितिजापर्यंत पसरलेला तो हिरवाजर्द रंग भेदून एक पांढरेंशुभ्र चर्च आपली सत्ता मिरवीत डोकें वर काढून उभें असल्यासारखें दिसतें; आणि खालीं नागमोड्या वळणानें उसगांवला भिजवीत जात असलेल्या निळ्या नदीच्या किनाऱ्याला असलेल्या पोफळीच्या छत्रांत आपलें अर्धें अंग लपविलेला देवळाचा कळसहि दिसतो. डाव्या हाताला भादय नदीच्या पल्याड गांजें गांव वसलेलें आहे. आणि अल्याड थोड्याशा उंचवट्यावर पंधरावीस घरें असलेलें आंबेशी गांव आहे. आंबेशींत उतरलें कीं निसर्गाच्या सान्निध्यांत प्राप्त झालेली सुषुप्ति संपते. आणि आपण माणसांत येतों....!

परंतु गोव्यांतील निसर्गाचें याहून सुंदरतम स्वरूप पाहायचें असेल, तर मोठ्या होडींतून किंवा वापोरांतून (लहानशा वाहतुकीच्या बोटींतून) मांडवी, जुवारी, बेतुल इत्यादि नद्यांच्या चक्रव्यूहांतून प्रवास केला पाहिजे.

पणजीहून सांवर्डें हा वापोरांत बसून साडेसहा तासांचा प्रवास, पणजी ते वळवई, पणजी ते हळदोणें, पणजी ते 'दोनापाउल' हा अनुक्रमें तीन व दोन तासांचा प्रवास करतांना ज्या अनुपम सृष्टिसौंदर्याचें दर्शन होतें त्याला तुलना नाहीं. सृष्टीचा तो लावण्यमहोत्सव डोळे भरून पाहतांना हर्षाच्या मूर्तिमंत लहरी ज्याच्या अंगांगांतून उठणार नाहींत तो रसिक कसला? सांवर्ड्याला जातांना जुन्या गोव्याचा धक्का सुटला कीं कुंभारजुवें, कुंडई, डोंगरी, मडकई, उंडी, दुर्भाट हीं बंदरें करीत हा वापोर सायंकाळीं सूर्यास्ताच्या सुमाराला सांवर्ड्याला पोहोंचतो. गगन-चुंबी वृक्षराजी ज्याला पाहायची असेल, हरितवर्ण पर्णबहार कशी असते हें ज्याला पाहायचें असेल, सौंदर्याची भव्यता आणि तेवढाच नखरा यांचा संगम ज्याला अवलोकायचा असेल, त्यानें दोनदोन–तीनतीन तासांचा हा वापोरांतला प्रवास केलाच पाहिजे.

नदीच्या पात्रांत किंचित् कलून स्वतःचें प्रतिबिंब पाहात उभे असलेले जीवनदाते असंख्य माड "या आम्ही तुमचें स्वागत करीत आहोंत!" असे शब्द उच्चारीत असल्याचा भास होतो. हे माड म्हणजे गोमंतकाचें वैभव आहे. माडाच्या मुळापासून शेंड्यापर्यंतचा प्रत्येक अवयव संसारी माणसाचें धन आहे. डोंगरी हवेला माड खुरटतो, त्याची विशेष वाढ होत नाहीं. ती हवाच त्याला आवडत नाहीं. त्याच्या फळांना पुष्टपणा येत नाहीं. माडांना 'खारोणी' जमीन प्रिय असते. त्याला खारा वारा आवडतो. समुद्रकिनारा जवळ असलेल्या गांवांतले माड पाहावे. त्यांची उभें राहण्याची ऐट, त्यांची मस्ती, सर्वच कांहीं न्यारें आहे. इथें माड दिग्मंडळाला स्पर्श करूं पाहात आहेत असें वाटतें. माडाला सदैव समुद्राचें दर्शन हवें; निदान समुद्रावरून आलेले वारे तरी हवेच. हे वारे त्याच्या शेंड्याशीं हितगुज करतात. माडाला आपल्या अवतींभोंवतीं माणसांची जाग हवी. असें वातावरण लाभलें तरच माड तरारतो. पुष्ट श्रीफळांच्या पेंड्यांच्या पेंड्या त्याच्या चारहि बाजूंना लटकूं लागतात. माडाला कल्पवृक्ष म्हणतात. या कल्पवृक्षानें गोमंतकावर अमित उपकार केलेले आहेत.

माडाप्रमाणें आंब्यालाहि खारी जमीन आवडते. तसा आंबा हा भारतीय फळांतील राजा आहे. तें राष्ट्रीय फळ आहे. फ्रान्सचीं द्राक्षें, स्पेनचीं अंजिरें, समरकंदचीं सफरचंदें, बसऱ्याचा खजूर, तसा भारताचा आंबा. भारतांत आंब्याच्या अंदाजें पांचशें जाती आहेत असें सांगतात. भारताच्या सर्व दिशांना आंब्याची लागवड होते; पण समुद्रकिनाऱ्यालगत असणाऱ्या प्रदेशांतील आंब्याची जात सर्वश्रेष्ठ असावी. उत्तरेकडचे प्रसिद्ध लगडा, माल्डा, किशनभोग, सफेदा वगैरे आंबे मीं पाहिलेले आहेत; पण त्या आंब्यांना कोंकणांतील किंवा वलसाडच्या हपूस आंब्यांची देखील सर नाहीं. मद्रासला, कलकत्त्याला आंब्यांच्या नाना जाती आहेत; पण गोव्याच्या आंब्याचा लौकिक भारतांतील इतर कोणत्याहि प्रदेशांतील आम्रफलापेक्षां अधिक आहे. पुर्तुगेजांनीं आंब्याच्या झाडावर अनेक प्रकारचीं कलमें करून प्रयोग केले. आणि सुदैवानें ते सर्व यशस्वी झाले. संगीतांत जशा दोन रागांच्या छटांचें बेमालूम मिश्रण करून अनेक अवघड पण सुंदर नवे राग निर्माण केले गेले तसेंच पुर्तुगेजांनीं आंब्यांच्या बाबतींत केलें. या मिश्रणाला त्यांनीं आपापलीं नांवें देऊन तीं अजरामर करून ठेवलीं. आफॉंस, निकलावआफॉंस, कुलासु, फॅर्नान्दीनु, कॉरादु (मानकुराद), पीरिश (पायरी), गॅस्तु, मुसॉराति इत्यादि आंबे ही खास पुर्तुगेजांची देणगी आहे. आंब्याला त्यांनीं 'मांग' हें नांव देण्यांत मात्र आपली पिढीजात वृत्ति दाखविली. आंब्यांची सुधारलेल्या पद्धतीनें लागवड कशी करावी या बाबतींत हल्लीं अनेक तज्ज्ञांनीं संशोधनें चालविलेलीं आहेत; गोमंतकालाहि त्याचा फायदा करून घेतां येईल. फणसांच्या बाबतींत मात्र संशोधनें वगैरे झालेलीं फारशीं ऐकिवांत नाहींत. त्या देवाघरच्या फळाचें कंटकमय शरीर पाहून पुर्तुगेज घाबरले असावेत. गोव्यांत फणसांचें उत्पन्न देवाच्या दयेनें बरेंच होतें. फणसांत कापा आणि रसाळ अशा दोनच जाती आहेत.

प्रथमच मीं कुळागर पाहिलें तो प्रसंग आठवतो. भाणस्तारीहून मी

'भॉमा' येथें आलों आणि तिथून खालीं उतरून पलीकडच्या परिसरांत पाऊल टाकलें मात्र, एका रम्य उपवनाचें दर्शन मला झालें. अजून तें दृश्य आठवलें कीं पुनःपुन्हा मला रघुनाथपंडिताच्या नलदमयंती स्वयंवरांतील एक 'दिंडी' आठवते—"पनस जंबू जंबीर विविध निंबें। कुंद चंदन माकंद सुदाडिंबें ॥ तुंग नारिंगें विकसलीं कदंबें। वसति तेथें शुकसारिका कदंबें ॥....अनंतानेंच ही मनोरथांची सृष्टि रचली. इथें सारें पोफळींचें राज्य. पोफळींचे हे सहस्रावधि खांब, आणि त्यांचे छत्रासारखे शेंडे एकालगत एक जोडून आपोआप निर्माण झालेलें छत पाहून—कुणा ऋषिमुनींचा याग तिथें व्हायचा असल्यानें—इंद्रदेवांनीं आज्ञा केली आणि विश्वकर्म्यानें हा मांडव घातला असें वाटूं लागतें. रंगरंगांनीं हें उपवन फुललेलें आहे. बकुळीच्या नक्षत्रांसारख्या मंदगंधी फुलांनीं सडा घातलेला आहे. जांबाच्या झाडांनीं आपल्या गुलाबी फुलांची रांगोळी घातलेली आहे. यज्ञाला येणाऱ्या तपस्व्यांच्या स्वागता-साठीं सुवासिनीसारख्या मर्यादेनें उभ्या राहिलेल्या परिपुष्ट केळी, नाना रंगांचे पक्षीगण चित्रविचित्र आवाजानें स्वागतगीताची तालीम करताहेत. आणि हें सुंदर दृश्य पाहण्यासाठीं त्या मांडवाच्या छतांतून चोरून डोकावणारीं सूर्यकिरणें पाहून सौंदर्याच्या एका अद्भुत विश्वांत वावरत असल्यासारखें वाटतें.


खानदानी अस्ताई ऐकायची असेल तर अभिजात संगीतज्ञ अशा गवय्याकडूनच ती जशी ऐकली पाहिजे, ताजमहालाचें चिरस्थायी सौंदर्य पाहायचें असेल तर तें जसें आग्र्याला जाऊनच चांदण्यांत पाहिलें पाहिजे तसेंच कुळागरांचें सौंदर्यभांडार पाहायचें असेल तर प्रियोळच्या 'व्हाळांतून' पायीं चालत केरीला गेलें पाहिजे....जो सूर्लेहून सावईवेऱ्याला आणि सावईहून चालत खांडोळेंच्या मार्गानें भाणस्तारीला गेला नाहीं, म्हार्दोळ-हून वेलींग आणि वेलींगहून नागेशीं, बांदोडें, कवळें येथें पायीं चालत जो गेला नाहीं, जांबावलीहून रिवण येथें जो गेला नाहीं, त्याला कुळा-गरांच्या सौंदर्याचा साक्षात्कार होणार नाहीं. सृष्टिमाउलीनें देवांच्या प्रसन्नतेसाठीं काढलेली ती कुसरी आहे. गोंयांतले झरे तळीं व धबधबे

मीं पाहिलेले आहेत. अरवलेंचा धबधबा मला आवडतो. एखाद्या ऋषीनें कमंडलूंतलें पाणी तृषार्ताच्या ओंजळींत ओतावें तशी ती एकेरी धार आहे; पण दुधसागराचें तसें नाहीं. महादेवाच्या जटेंतून फुटणाऱ्या गंगातुषारां-सारख्या अनेक प्रवाहांनीं आणि कितीतरी उंचावरून तो खालीं वाहतो. दुधसागराचें दर्शन अतिभव्य आहे. अरवलेंच्या धबधब्यांत तेवढी भव्यता नसली तरी जवळच असलेल्या शिवालयाच्या पायरीजवळ उभें राहून त्याच्याकडे पाहिल्यानंतर चिरंतनाचें दर्शन घडत असल्यासारखें वाटतें.

गोमंतक स्वतंत्र झाल्यानंतर माझा एक रसिक मित्र नुकताच तिकडे जाऊन आला. पणजी, म्हापसें, मडगांव हीं शहरें तो हिंडला आणि एका चकचकीत मोटारींत बसून मंगेश, शांतादुर्गा व आणखी एकदोन देवळांना भेट देऊन आला. मला तो भेटल्यानंतर म्हणतो—"गड्या, कसलं सृष्टिसौंदर्य आणि कसलं काय, मला तर कांहीं दिसलंच नाहीं!" मला हंसूं आलें. मी त्याला कांहीं बोललों नाहीं. मात्र माझ्या त्या मित्राला गोव्यांतली एक गोष्ट अत्यंत आवडली. तो म्हणाला, "तुमच्या तिकडची जीं कांहीं सहासात देवळं मीं पाहिलीं तीं देवळं आणि तिथली एकंदर व्यवस्था मात्र मला खूप आवडली. हिंदुस्थानांतल्या इतर कोणत्याहि क्षेत्रीं जा— बापरे! तिथले पंडे, तिथले पुजारी, तिथले आसपासचे लोक एखादं सावज तावडींत सांपडल्यासारखे तुटून पडतात, पण इथं तसं नाहीं. इथल्या पुजाऱ्याला बोलावून आणावा लागतो. कोणत्याहि देवळांत जा. त्या देवळाच्या महाजनांनीं नेमलेली कमिटी सारी व्यवस्था पाहात असते. देवळांतले पुजारी लाचारीनें बोलत नाहींत, कीं अव्वाच्या सव्वा चमत्काराच्या कांहीं गोष्टीहि सांगत नाहींत. जें कांहीं देवकृत्य करायचें असेल त्याचा तक्ता महाजन कमिटीच्या कचेरींत, देवळांत लावलेला असतो; व कुणाहि गरीब धाकल्याला परवडतील अशींच हीं देवकृत्यें आहेत. ज्याची ताकद व भावना मोठी असेल त्यानें आणखीन कांहीं संकल्प करावे; परंतु सारं कसं चोख आणि व्यवस्थित वाटलं. अशी सुरेख व्यवस्था भारतांत अन्यत्र कुठेंहि असेल असें वाटत नाहीं. एक मात्र आढळलं; तें असं, कीं गोव्यांतलीं हीं सर्व देवळं एकाच तऱ्हेचीं व



श्री मंगेश, संस्थान मंगेशी




'दॉना पावला'

जेथं सु-शीतळ
मही-तळ
सांद्र साई





श्री रामनाथ
दीपमाळ व देवालय



श्री कामाक्षा देवीचं
देवालय, शिरोडें

एकाच बांधावळीचीं दिसतात. त्या वास्तूंत फरक असा आढळला नाहीं. सूर्लें इथं मात्र हेमाडपंथी बांधणीचं एक देवालय आहे म्हणतात; पण मीं तें पाहिलं नाहीं. पण जें जें पाहिलं तें तें स्वच्छ आणि सुंदर! केवळ तें मांगल्यानं थबथबलेलं वातावरण पाहण्यासाठीं कितीहि वेळां गोव्यांत जायची माझी तयारी आहे! आयुष्यांत पहिल्यांदाच गोव्यांत जाऊन आलों गड्या, पण गोव्याबद्दल जी कल्पना होती ना—तसं कांहीं गोव्यांत दिसलं नाहीं रे!"

"तसं म्हणजे कसं?" असा मीं उलट सवाल करतांच माझा मित्र थोडासा कचरला; परंतु आम्ही समवयस्क असल्यानें त्यानें आपला मतितार्थ स्पष्टपणें मला सांगितला. तो म्हणाला—"तुमच्याकडच्या कांहीं कथाकादंबऱ्या वाचून तो एक रंगलाल देश आहे अशी आमची भलतीच समजूत झाली होती. आणि तिकडे पाहावं तर 'तसं' कांहींच आढळलं नाहीं!" त्याला काय म्हणायचं होतं तें मी समजलों होतों. मीं मुद्दाम खंवचटपणानें म्हटलें—"तूं तसा खोल तपास केला असतास तर तुला जें हवं होतं तें तिथं आढळलं असतं!" यावर तो म्हणतो, "हात्तिच्या, त्यांत काय विशेष. तसा खोल तपास केला तर जें आढळेल तो अपवाद ठरेल. नियम नव्हे!" मीं त्याला उत्तर दिलें नाहीं. मात्र विषण्णपणें हंसलों; पण त्याचा तरी बिचाऱ्याचा काय दोष होता! गोमंतकांतल्याच कांहीं मान्यवर लेखकांनीं आपल्या लोकमान्य कथा-कादंबऱ्यांतून पुराणांतील स्त्रीराज्याप्रमाणें तें देवदासींनीं गजबजलेलें राज्य असून सर्व शारीरिक भुका तिथें तृप्त होतात अशी प्रसिद्धि केली. या अशा प्रसिद्धीमुळें कांहीं वर्षांपूर्वीं तिथें सहज मुशाफरीला म्हणून गेलेल्या एका प्रथितयश साहित्यिकानेंदेखील दिसेल त्या बाईला डोळे मिचकवायला सुरुवात केली. त्याच्या तिथल्याच एका मित्रानें त्याला वेळींच सावध केल्यानें पुढें होणारा प्रसंग टळला आणि तो सुखरूप आपल्या गांवीं परतला ही गोष्ट वेगळी!

वास्तविक मीन, मदिरा आणि मदिराक्षींचा तो प्रदेश आहे अशी जरी अतिशयोक्तीची समजूत पसरविलेली असली तरी वस्तुस्थिति तशी नव्हती.

कामांध माणसाला सर्व जगच कामुक दिसतें किंवा दुष्ट वृत्तीच्या माणसाला सारीं माणसेंच दुष्ट वाटावीं त्यापैकींच हा प्रकार होता. जपानांत गेशा, पॅरिसला नाइट-क्लब, दिल्लीला चांदणी चौक, तशींच गोव्यांत जिकडे तिकडे वेश्यागारें असतात अशीहि कित्येकांची समजूत आहे. गोमंतक स्वतंत्र झाल्यानंतर कित्येक नियतकालिकांतून 'आतां गोव्यांत ती गंमत उरणार नाहीं !' किंवा 'गोव्यांतलें गोवेंपण गेलें !' असे दीर्घ उसासे सोडले गेले. जणूं 'मॉनॅको' नांवाच्या केवळ जुगाराचा व वेश्या-व्यवसायाचा मुख्य धंदा करणाऱ्या राज्यासारखें तें एक राज्य आहे अशा अपसमजानें गोमंतकाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एका अत्युत्साही लेखकानें —'आतां गोव्यांतली वेश्या भारतांतून येणाऱ्या श्रीमंत यजमानाच्या स्वागतासाठीं सज्ज होऊन राहील' असें लिहायलाहि कमी केलें नाहीं, छे, छे ! हिंदुस्थानांतल्या किंवा जगांतल्या लहानमोठ्या शहरांत व शहरवजा गांवांत कुंटणखाने आणि वेश्यागारें अगणित असतील पण या बाबतींत अशापैकीं कांहींहि नसतांना मराठी वाङ्मयांत गोव्याबद्दल जी बदनामी झालेली आहे त्याला जगांतल्या अन्य वाङ्मयांत तोड नसावी.

एक गोष्ट मात्र जिवाला लागते. जाचते. स्वातंत्र्यपूर्व काळांत गोव्यांत चोरीमारी, दरोडे असल्या गोष्टी नव्हत्या. लोक निश्चिंतपणें आपल्या घराचीं दारें-खिडक्या उघड्या टाकून झोपत असत. माणसांचा माणसांवर विश्वास होता. पण आज मात्र माझ्या गोव्यांत ती परिस्थिति राहिली नाहीं. सगळीं माणसें भीतिग्रस्त झालेलीं आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या शासनसंस्थेनें गोमंतकांतला राज्यकारभार पाहण्याकरितां पाठविलेल्या अधिकारीवर्गानें जी लूट केली, त्याबद्दलची चौकशी चालू आहे. त्यांना जन्माची आठवण राहील असें शासन झालें पाहिजे. लोकांना दिलासा मिळाला पाहिजे. पुर्तुगेजांच्या काळांत असल्या लोकांना क्षमा नव्हती. चोरीमारी वगैरे कृष्णकृत्यें करणारांना पुन्हा तीं कृत्यें करतां येऊं नयेत असें कडक शासन होत असे. दुष्टांना दंडण आणि सुष्टांना संरक्षण असेंच त्यांचें सदैव धोरण राहिलें. एका धर्मप्रचाराच्याच कार्यांत त्यांनीं अक्षम्य, अनन्वित अशीं कृत्यें केलेलीं असलीं तरी आपल्या प्रजेला इतर बाबतींत

निश्चित ठेवणें ही गोष्ट मात्र पुर्तुगेजांनीं अखेरपर्यंत पाळली. त्यामुळें गोव्यांत एखाद्या मोटारस्टँडवर, धक्क्यावर, किंवा कोणत्याहि सार्वजनिक ठिकाणीं अनवधानानें विसरून राहिलेली गोष्ट कधींहि नाहींशी होत नव्हती. चप्पल, छत्र्या अशा गोष्टी तर राहोतच, पण पैशांचें पाकीट देखील जशाचें तसेंच परत मिळत असे. दुसऱ्याच्या झाडावरच्या पिकलेल्या फळाला—तें तिथें सडून गेलें तरी—कुणी हात लावीत नव्हता. आज गोव्यांत घडणाऱ्या असल्या गुन्ह्यांसाठीं एखाद्या दैनिकाची सायंकाळची आवृत्ति निघेल कीं काय अशी भीति वाटूं लागलेली आहे. शासनसंस्थेनें गोव्याचें तें निश्चित वातावरण पुन्हा प्रस्थापित करावें आणि ‘पूर्वींची राजवट बरी होती’ असे उद्गार कुणाहि गोमंतकीयाच्या मुखांतून न निघतील याबद्दलची दक्षता घ्यावी एवढीच नम्रपणें प्रार्थना.

# इये मराठीचिये नगरीं

गोमंतकांतील मराठी साहित्य-निर्मितीची सव्वाचारशें वर्षांची परंपरा दाखल्याच्या रूपानें सांपडते. त्याहि आधीं म्हणजे तेराव्या शतकापासून गोमंतकांत मराठींत साहित्य-निर्मिति झालेली असावी. पुर्तुगेजांनीं आपल्या धर्मकांडांत शेंकडों हिंदु ग्रंथांची होळी केल्याचें इतिहासांत नमूद आहे. हे ग्रंथ मराठी भाषेंत होते कीं आणखी कोणत्या भाषेंत होते, हा वादाचा मुद्दा आहे; पण नैसर्गिक प्रेरणेनें होऊं घातलेल्या एखाद्या गोष्टीच्या विकासाला एखाद्या विरोधी शक्तीनें खीळ घालायचा प्रयत्न केला, तरी त्या गोष्टींतलें अंतःप्रेरणेचें मूळ कांहीं नष्ट होत नाहीं. स्वभावतःच गतिमान् असलेली यंत्रणा त्या मुळाचा आविष्कार घडवीत राहते; किंबहुना कालांतरानें त्या निर्मितीच्या रूप-रस-गंधाचें सौष्ठवहि आपोआप वाढत जातें. याच नियमाला अनुसरून सोळाव्या शतकाच्या आरंभीं झालेली कृष्णदास शामा यांची 'कृष्णचरित्रकथा' ही निर्मिति,

किंवा सतराव्या शतकाच्या सुरुवातीला झालेली जुवें येथील तुकारामबाबा वर्दे या गृहस्थांची साहित्यनिर्मिति हा मागील कित्येक शतकांचा वारसा आहे, असें विधान करतांना संदेह वाटत नाहीं.

तुकारामबाबांनीं भर्तृहरीच्या शतकत्रयाचें समश्लोकी मराठी भाषांतर 'सुभाषितरत्नावली' या नांवानें केलेलें आहे. त्यांचा हाच एक ग्रंथ प्रकाशित आहे; पण वर्दे कवींची बरीचशी अप्रकाशित कविता अनेक जाणत्या गोमंतकीयांना मुखोद्गत आहे. १६१४ सालीं ख्रिस्तदास तोमास स्टीफन्स या सासष्टी येथील ख्रिस्ती कुलपतींनीं—त्या काळांतील बाटविलेल्या ब्राह्मणांनीं "जुन्या हिंदुधर्माचे ग्रंथ वाचण्यास आम्हांस प्रतिबंध केला, तरी नव्या ख्रिस्ती धर्माचीं मराठी प्रतिपुस्तकें तयार करावीं" असा आग्रह केल्यावरून—'क्रिश्चनपुराण' हा ग्रंथ लिहिला. त्यांत त्यांनीं मराठी भाषेची जी ओवीबद्ध स्तुति केलेली आहे त्या ओव्या सर्व सुबुद्ध लोकांना अवगत आहेत. "जैसी पुस्पांमाजि पुस्प मोगरी। किं परिमळामाजि कस्तुरी। तैसी भासांमाजि साजिरी। मराठिया॥" अशी मराठी भाषेची वरीचसी स्तुति केल्यावर फादर स्टीफन्स म्हणतात: "तारांमध्यें बारा राशी। सप्तवारांमाजि रवि ससी। या दिपिचेआं भासांमधें तैसी। मराठिया॥" म्हणजे गोमंतकांत त्या काळांत मराठी भाषा किती लोकप्रिय होती हें खुद एका पाद्रीनेंच सांगितलें असल्यानें वेगळ्या विस्ताराची गरज नाहीं. फादर स्टीफन्सच्यानंतर पुढच्या चाळीस वर्षांत एका फ्रेंच पाद्रीनें हिंदु देवदेवतार्चनाचें खंडण करण्याकरितां 'सेंट पीटर पुराण' म्हणून जो ग्रंथ लिहिला तो मराठी भाषेंतच. आणि त्याहि पुढें 'आंतोनियु द साल्दान्य' या पाद्यानें 'सांतु आंतॉनिची जीवितकथा' नांवाचें जें पुराण लिहिलें तेंहि मराठींतच.

तुकारामबाबा वर्दे यांच्यानंतरच्या पुढच्या कालांत नायकस्वामी, विठ्ठल केरीकर, पांडोबा कैसरे, हरिपंडित, पांडोबा दुभाषी, लक्ष्मण पांडुरंग केंकरे प्रभृतींनीं महानुभाव पंथांतील प्राचीन मराठी संत व पंतांच्या कवितेचा मागोवा घेत साहित्य निर्माण केलें. या सर्वांनीं निर्माण केलेलें तें साहित्य ओज, प्रसाद, माधुर्य इत्यादि गुणांनीं परिपूर्ण होतें; किंबहुना

तत्कालीन कोणाहि मराठी संत किंवा पंतांच्या कवितेच्या बरोबरीला तें उणें पडलें नसतें. ("घनश्यामसुंदरा श्रीधरा" ही सुप्रसिद्ध भूपाळी होनाजी बाळाची नसून विठ्ठल केरीकरांची आहे, असाहि एक दावा आहे.) हिंदु समाजाचें लक्ष आपल्या उच्च संस्कृतीकडे वेधणें आणि परधर्मीयांच्या गांजणुकीला धैर्यानें तोंड देण्याची शक्ति त्यांच्यांत निर्माण करणें हें कार्य या कविमंडळींनीं अविरतपणें केलें. या कविमंडळींत सोहिरोबानाथ आंबिये यांच्यासारखे नाथपंथी योगमार्गी साधूहि होते. सोहिरोबानाथांना योगसिद्धि प्राप्त झालेली होती. त्यांची बरीच कविता गोमंतकीय आबालवृद्धांच्या ओठीं खेळली. "हरिभजनावीण काळ घालवूं नको रे" एवढेंच सोहिरोबांनीं सांगितलें नाहीं; तर "अंतरिंचा ज्ञान-दिवा मालवूं नको रे" असा दिव्य अक्षयबोधहि त्यांनीं केला. त्यांच्या 'सिद्धांतसंहिता' व 'अद्वैतानंदपूर्णेश्वरी' इत्यादि काव्यकृति संकलित रूपानें प्रसिद्ध झालेल्या आहेत. गोमंतकांतील बऱ्याच घराण्यांत या पुस्तकांचें भक्तिभावानें नियमितपणें वाचन होतें.

कृष्णभट बांदकरांनीं आपल्या स्फुट रचनेनें अमाप लोकप्रियता मिळविली. ज्याला बांदकरांचें एक तरी पद येत नाहीं असा एकहि हिंदु माणूस गोमंतकांतल्या मागल्या पिढींत शोधून सांपडला नसता. गोमंतकांतील प्रत्येक देवळांत देवाच्या शिबिकोत्सवप्रसंगीं बांदकरांनीं रचलेले 'झुले' आणि त्यांनीं त्या देवतेचीं केलेलीं स्तुतिपर पदें म्हटलीं जातातच. त्यांचे अभंग म्हटल्यानंतर मग कलावंतिणीचें गाणें-नाचणें किंवा संगीत भजन होतें. "श्रीसद्गुणगणमंडित राघवराया। अवतरला तूं सज्जनताप हराया। तुजविण कोणि न मज भवपार कराया। तारक निजपदभक्तजगासि तराया॥ जय जय रघुवीर समर्थ" हा झुला नेहमीं आमच्या गांवच्या देवळांत रामनवमीच्या उत्सवप्रसंगीं शिबिकोत्सवाला प्रारंभींच म्हटला जातो. बांदकरांनीं, 'कवितारस झडकरि मनांत यावा' हीच दृष्टि ठेवून आपली समग्र कविता रचलेली आहे. त्यांच्या कवितेंत विशेषसें गूढगुंजन नाहीं. त्यामुळें सामान्यांतला सामान्य माणूसहि त्यांचीं रसाळ पदें समंजसपणें म्हणूं शकतो. विसाव्या

शतकांतील कित्येक प्रसिद्ध गोमंतकीय कवींच्या आरंभींच्या कांहीं कवितांत बांदकरांचे व सोहिरोबानाथांचे संस्कार स्पष्ट दिसतात.

मुद्रणयंत्राचा गोमंतकांत प्रवेश झाल्यानंतर मडकईचे श्री. हिरबा नायक सरदेसाई, केरी येथील भिषग्वर्य रामचंद्र पांडुरंग ऊर्फ दादा वैद्य व माशेल येथील रामचंद्र वामन नायक करंडेशास्त्री यांच्यापासून असोळणें येथील श्री. विष्णु रंगाजी शेळडेकरांपर्यंत अनेक कवींनीं आपआपल्यापरी काव्यनिर्मिति केली. पण त्याचवेळीं पद्याबरोबर बरेंचसें गद्यहि गोमंतकांतील सरस्वतीभक्त निर्माण करूं लागले. त्यांची कविता भक्ति-ज्ञान-वैराग्याचा पुरस्कार करणारीच होती; पण गद्य मात्र सामाजिक दोषांचें सडेतोड विवेचन करणारें होतें.

मानवी जीवनाला सर्वांगांनीं स्पर्श करणारी कविता गोमंतकीय कवींनीं विसाव्या शतकाच्या पहिल्या पावशतकांत निर्माण करायला सुरुवात केली. गोमंतकांत भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या पंधराव्या अधिवेशनाच्या वेळीं पणजी येथील एक व्यासंगी गृहस्थ श्री. शिवा फटू पै आंगले यांनीं 'काव्यकुंज' या नांवानें गोमंतकांतील कांहीं नामवंत कवींच्या वेंचक कवितांचा एक संग्रह प्रसिद्ध केला. या संग्रहांत यशवंतराव सरदेसाई, अ. का. प्रियोळकर, सौ. लीलावती तारकर, सां. घ. कंटक, बा. अ. बाळे इत्यादि कवींची कविता आढळते. तसें गोमंतकांत कवींचें पीक अमाप आलें; आणि कविताहि 'गवताऐसी उदंड झाली'; परंतु अर्वाचीन मराठी कवींत मानाचें स्थान दोघांच गोमंतकीय कवींना मिळालें. एक कवि दामोदर अच्युत कारे आणि दुसरे कविवर्य बाळकृष्ण भगवंत बोरकर. कार्‍यांनीं बर्‍याच वर्षांपासून जवळजवळ लेखनसंन्यास घेतलेला आहे. त्यांचें फारच थोडें साहित्य गेल्या पंधरा वर्षांत प्रसिद्ध झालेलें आहे; परंतु बोरकरांनीं मात्र महाराष्ट्रशारदेच्या दरबारांत अनन्यसाधारण यश मिळविलें. महाराष्ट्रांतील प्रथितयश अशा मोजक्याच कवींत आज त्यांचें स्थान आहे.

गोमंतकीयांना कवन विशेष प्रिय आहे. बसल्या बैठकीला सहज एकदोन कवनें रचणारे लोक गोमंतकांत खेडोपाडीं सांपडतील. 'कवनी'

हें विशेषण सर्व थरांतले स्त्रीपुरुष उपरोधानेंहि एखाद्याला लावतात. अशा कवन्यांनीं 'येतां जातां उठत-बसतां' रचलेलीं अनेक विडंबनात्मक कोंकणी व मराठी कवनें गोमंतकांतील बऱ्याच स्त्रीपुरुषांच्या तोंडीं खेळतात.

"तूं खैंचॉ फॉणँ गांवचॉ खैं वता कुंडै लग्नाङ् कॉणागेर तळ्यान ।
कामतीगेर कँदँ वेळचें लग्न आमोरेर गोंधळिक वडाच्या मुळान ॥"

ही शार्दूलविक्रीडितांतील लग्नघरांतील गडबडीचें वर्णन करणारी विडंबनात्मक प्रश्नोत्तरी कविता "अवतार जालॅ जायतॅ । रामाक पावना तॅ ॥" अशासारखीं वडिलांच्या जिवावर चैन करणाऱ्या उपटसुंभ मुलांच्या स्वभावाचें वर्णन करणारीं व "कॅस्तांव करुंक तयार जालॅ, पठाण आमचॅ सगळॅ भॉवॅ" हें समस्त भोबे कुटुंबाच्या स्वभावाचें वर्णन करणारीं अशीं कवनें कोंकणी भाषेंत किती तरी आहेत. तशींच मराठी भाषेंतहि रचलेलीं अनेक आढळतात. विशेषेंकरून ओवी छंदांत भरपूर आहेत. वि. का. प्रियोळकरांचें 'दॅमांद माहात्म्य', वा. भा. नाइकांचें 'मानिर्फॅस्त पुराण' या ओवी छंदांतील खंडकाव्यानें एके काळीं कमालीची लोकप्रियता मिळविलेली होती. अतिरेकी सामाजिक चालीरीतींचें विडंबन गोमंतकीय खिस्त्यांनींहि आपल्या 'कांतारां'तून केलेलें आहे. सुशिक्षितां-पेक्षां अशिक्षित खेडवळाची रचना अधिक रसाळ आणि खदखदून हंसविणारीहि आहे. मात्र हीं सारीं लहान लहान कवनें ग्रंथांतर्गत केलेलीं नाहींत. ती एकाकडून दुसऱ्याकडे आणि दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे अशींच चालत आलेलीं आहेत. गोमंतकीय हिंदूंनीं निर्माण केलेलें कोंकणी साहित्य मर्यादित आहे. कै. वर्दे वालावलीकर आणि कै. रामचंद्र शंकर नायक यांनीं पायाशुद्ध साहित्य निर्माण करून तरुण पिढीला स्फूर्ति दिली. ही तरुण पिढी कोंकणी भाषेंत रसरशीत वाङ्मय निर्माण व्हावें म्हणून आज खटपट करीत आहे. बा. भ. बोरकरांच्या 'गीताय' किंवा 'पांयजणां' या पुस्तकांच्या तोडीचें एकहि पुस्तक दिसत नाहीं. बोरकरांनीं कोंकणी भाषेचें वैभव वाढावें म्हणून मोलाची भर घातलेली आहे यांत संदेह नाहीं.

गेल्या पन्नास वर्षांत धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास, चरित्र, शास्त्र (वैद्यक, ज्योतिष व संगीतासह), कथा, कादंबरी, नाट्य, नैबंधिक व बालवाङ्मय

अशा साहित्याच्या विविध दालनांत अनेक गोमंतकीयांनीं मोलाची भर घातलेली आहे. श्रीसुब्रह्मण्यानंदतीर्थ, श्रीमद् इंदिराकांतस्वामी, रामचंद्र कृष्ण कामत, शांबाराव सरदेसाई, पालीभाषेचे विद्वान धर्मानंद कोसंबी, बहुगुण सदाशिव कामत वाघ, अ. का. प्रियोळकर, दत्तात्रय व्यंकटेश पै, बाळकृष्ण वामन सांवर्डेकर, गोपिनाथ कृष्ण कुराडे, व्यंकटेश विष्णु वैद्य, वि. स. सुखटणकर, सां. घ. कंटक, जयवंतराव सरदेसाई, काशीनाथ दामोदर नायक, ज. घ. मळकर्णेकर, पुरुषोत्तम मंगेश लाड, ना. के. शिरोडकर, सखाराम पांडुरंग बर्वे, महाबळेश्वर सरदेसाई, शांताराम पांडुरंग केणी प्रभृति लेखकांनीं आपापल्यापरीनें साहित्यनिर्मिति केलेली आहे. साहित्यावर आणि ललित कलांवर मनापासून प्रेम करणारे श्री. काशीनाथ केंकरे यांनीं गेल्या दोन वर्षांत गोमंतकीय लेखक आणि त्यांची ग्रंथसंपदा हा विषय घेऊन बरेंच संशोधन केलें. नुकतेंच ते मला भेटले असतां त्यांनीं जो आपला निर्णय मला सांगितला तो मुद्दाम इथें उद्धृत करतों. श्री. केंकरे म्हणाले कीं, १८०५ ते १९६३ या कालखंडांत ३५० गोमंतकीय लेखकांनीं एकंदर अकराशें पुस्तकें लिहिलेलीं आहेत. महादेवशास्त्री जोशी आणि चंद्रकांत काकोडकर यांची ग्रंथसंपदा संख्येनें सर्वांत अधिक आहे. अधूनमधून विविध विषयांवर विचारपरिप्लुत असें स्फुट लेखन करणाऱ्यांची यादी काढली तर अशीं आणखी शंभर तरी नांवें निघतील; परंतु गेल्या पंधरावीस वर्षांत नांव घेण्यासारखी साहित्य-निर्मिति केलेल्यांत महादेवशास्त्री जोशी, बा. भ. बोरकर, लक्ष्मणराव सरदेसाई, बा. द. सातोस्कर आणि चंद्रकांत काकोडकर यांचींच नांवें अग्रभागीं चमकतील. ललित साहित्यकार म्हणून आज महाराष्ट्रांत त्यांना जो लौकिक आहे तो इतरांना नाहीं. महादेवशास्त्री जोशांनीं भारतीय संस्कृतिकोषाचें प्रचंड काम हातीं घेऊन त्याचा पहिला खंडहि प्रसिद्ध केलेला आहे. गोमंतकाच्या शिवसंस्कृतीचें दर्शन महाराष्ट्राला घडविण्यांत शास्त्रीबुवांचा सिंहाचा वांटा आहे.

'देशसुधारणेच्छु' हें गोमंतकांतलें पहिलें नियतकालिक. १८७२ सालीं त्याचा जन्म झाला. हें पहिलें नियतकालिक जन्माला घालायचें श्रेय गोमंतकांतील हिंदु समाजाची दयनीय अवस्था पाहून द्रवणाऱ्या आणि त्या समाजाचें कांहीं तरी चांगलें व्हावें म्हणून झटणाऱ्या एका जमीनदार ख्रिस्ती इसमाकडे जातें. रायबंदर येथील रहिवासी असलेल्या या इसमाचें नांव 'बारांव द कुंभारज्यूअ' कुंभारजुवें येथें त्याचा बराच मोठा जमीनजुमला होता. जीवनभर सामाजिक कार्यांत रत राहिल्यानें या सज्जन माणसानें प्रपंचदेखील केला नाहीं. 'देशसुधारणेच्छु' पुर्तुगेज व मराठी अशा दोन विभागांत प्रसिद्ध होत होतें. पुर्तुगेज विभाग स्वतः 'बारांव' संपादन करीत, आणि मराठी विभाग त्यांचे एकमेव सहकारी श्री. यशवंत फोंडबा नायक दणाईत हे पदवीधर गृहस्थ संपादन करीत असत. हें पत्र फक्त दोन वर्षें चाललें; पण त्यानंतर 'गोवामित्र', 'गोवात्मा', 'गोवापंच', 'गोमांतक', 'श्रीखंड', 'आर्यबंधु', 'न्यायचक्षु', 'कालिकादर्शन', 'सुविचार', 'हितचिंतक', 'सुदर्शन', अशीं चौदा-पंधरा नियतकालिकें निघालीं. एकोणिसाव्या शतकाची अखेर 'सुदर्शन'नें केली.

१९०१ सालीं खास स्त्रियांसाठीं एका स्त्रीनें संपादन केलेलें 'सौभाग्य-मंभार ऊर्फ हळदकुंकू' या नांवाचें एक मासिक निघालें. सौ. सरस्वतीबाई वैद्य (भिषग्वर्य दादा वैद्य यांच्या पत्नी) या मासिकाच्या संपादिका होत्या. त्यानंतर १९०२ सालीं निघालेलें 'सत्संग' हें त्या काळांतील सर्व बाबतींत चांगलें असें मराठी मासिक होतें. या मासिकाचे संपादक श्री. रा. वा. करंडेशास्त्री हे होते. हे गृहस्थ अत्यंत बुद्धिमान व अष्टपैलू असल्यानें, गोमंतकांत तोंपर्यंत निघालेल्या सर्व मासिकांतील उणीवा लक्षांत घेऊन सत्संगाची त्यांनीं आदर्श अशी रचना केली होती. गोमंतकांतील कांहीं विचारवंत लोक या मासिकांत नियमितपणें लिहीत असत. सहा वर्षांनंतर सरकारी रोषाला बळी पडून हें मासिक बंद पडलें. पण त्याची आठवण अजूनहि मागल्या पिढींतले लोक काढतात; व 'विविधज्ञानविस्तारासारखेंच हें मासिक भारदस्त होतें' असें सांगतात.

'सत्संग' मासिकाची स्फूर्ति घेऊन पुढें एकामागून एक अशीं चौदा नियतकालिकें निघालीं. त्यांतील कांहीं सरकारी अवकृपेमुळें बंद पडलीं; तर कांहीं व्यावसायिक अडचणीमुळें गोत्यांत आलीं. १९१२ सालीं निघालेल्या 'भारत' या पत्राची कामगिरी उल्लेखनीय आहे. 'भारत-मंडळ' या नांवाच्या संस्थेनें तें पत्र काढलें. आठ वर्षांनंतर त्या पत्रांत निष्ठेनें कार्य करणारे एक उपसंपादक श्री. गो. पुं. हेगडेदेसाई यांनीं स्वतःच्या जबाबदारीवर तें चालवायला घेतलें, आणि पुर्तुगेज सरकारच्या वक्रदृष्टीला शह देत देत, कित्येक वेळां तुरुंगवासहि पत्करून, एकोणतीस वर्षेंपर्यंत तें चालविलें. भारतकार हेगडेदेसायांनीं गोमंतकीय हिंदुसमाजाची या पत्रद्वारें अमोलिक सेवा केलेली आहे. निष्ठावंत पत्रकाराला भोगाव्या लागणाऱ्या सर्व यातना भारतकारांनीं एकट्यानें भोगल्या; पण अखेरपर्यंत त्यांचा ताठ कणा वांकलेला दिसला नाहीं. १९२१ सालीं निघालेलें 'भारतमित्र' हें मासिक गेलीं ४३ वर्षें अखंडितपणें चालू आहे. साहित्यभूषण नारायण भास्कर नाईक यांनीं रिवण येथें छपाईला लागणारी कोणत्याच तऱ्हेची आधुनिक सोय नसतांनाहि मराठी भाषेवरील आत्यंतिक प्रेमानें आजपर्यंत तें चालविलेलें आहे. जन्माला येऊन आजपर्यंत तग धरून राहिलेलें असें हें एकमेव मासिक. मधल्या कष्टमय अशा राजकीय अवस्थेंत नारायण भास्कर नाइकांनीं तें कसें चालविलें तेच जाणे! या प्रसंगीं त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतांना मन भरून येत आहे.

आधुनिक काळाचीं पावलें ओळखून नव्याजुन्याची सुरेख सांगड घालून अंतर्बाह्य वैशिष्ट्यपूर्ण असें 'कला' या नांवाचें मासिक एफ. बाबुराव आगशीकर यांनीं १९३५ सालीं काढलें. तब्बल नऊ वर्षें या 'कले'चा संसार यातायात सहन करीतच त्यांनीं चालविला. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीला अनेक अडचणींना तोंड देतां देतां आगशीकरांना तें बंद करावें लागलें. गोमंतकाबाहेरील बरेच प्रथितयश साहित्यिक या मासिकांत लिहीत असत. पुर्तुगेजांनीं गोमंतकाची नाकेबंदी केल्यानंतर-देखील आगशीकरांनीं आपली धडपड चालू ठेवली होती. वेगवेगळ्या

नांवांनीं त्यांनीं कांहीं मासिकें काढलीं. 'अर्चना' नांवाचें एक वार्षिक गेलीं तीन वर्षें ते प्रसिद्ध करीत आहेत. सध्यां त्या वार्षिकाला त्यांनीं मासिकाचें स्वरूप दिलेलें आहे. गोमंतक स्वतंत्र झाल्यानंतर श्री. श्रीराम पांडुरंग कामत या हुशार तरुणानें अस्नोडें येथें 'मांडवी' या नांवाचें एक मासिक सुरू केलेलें आहे. गेलीं दोन वर्षें मांडवीचा प्रपंच कामतांनीं व्यवस्थित मांडलेला आहे. चालू घडीला तरी गोमंतकांत चालणारें हें एकमेव भारदस्त असें मासिक आहे. त्याला आपुलकी दाखवून त्याचें वय वाढविणें आणि त्याला स्वतःच्या पायावर उभें करणें हें गोमंतकीयांचें कर्तव्य आहे.

गोमंतकाबाहेर मुंबईसारख्या विश्वजनीन संस्कृतीच्या एका बलाढ्य शहरांत राहूनहि आपल्या असामान्य बुद्धिमत्तेनें मराठी साहित्य-विश्वांत कर्तबगारी गाजविणारे डॉ. भाऊ दाजी लाड, डॉ. नारायण दाजी, सर्वश्री माधव चंद्रोबा दुकळे, गोविंद नारायण माडगांवकर, न्यायशास्त्री सुखटणकर प्रभृति अनेक कृतिपुरुष होऊन गेले. आणि ज्यांच्या कारकीर्दीची दखल भावी इतिहासांत नमूद होईल असेहि आज अनेक आहेत. पांच उत्तम साप्ताहिकांचे व दोन नमुनेदार मासिकांचे संपादक व एक यशस्वी नाटककार म्हणून केरी गोव्याचे श्री. मोतीराम गजानन रांगणेकर यांच्या वाङ्मयसेवेबद्दल महाराष्ट्राला अधिक परिचय करून द्यायची गरज नाहीं. पेडण्याचे श्री. हरि विठ्ठल देसाई यांची संपादकीय कर्तबगारी आणि नाटककार म्हणून त्यांनीं केलेली रंगभूमीची सेवा सकळांना विदित आहे. चित्रकार दलालांच्या 'दीपावली' वार्षिकानें एक नवा संप्रदाय निर्माण केला. आणि त्यांच्या मासिकानें मराठी रसिकांच्या मनांत केवढें आदराचें स्थान निर्माण केलेलें आहे हेंहि साहित्याशीं संबंध असलेले लोक जाणतातच. गोमंतकाबाहेर राहून वृत्तपत्रसृष्टींत सन्माननीय स्थान मिळ-विणारे 'स्वराज्य', 'फाइनॅन्शियल एक्सप्रेस' आदि पत्रांचे संपादक व अर्थकारणाचे एक जाणते विद्वान म्हणून श्री. गो. मं. लाड, 'हिंदुस्थान टाइम्स' पत्राचें भूषण म्हणून समजले जाणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संपादक श्री. एस्. मुळगांवकर, पूर्वीं 'टाइम्स ऑफ इंडिया' व आज

'इंडियन एक्सप्रेस' या पत्रांचे संपादक श्री. फ्रँक मॉराइश हे तिघेजण म्हणजे पत्रसृष्टींतली गोमंतकाची विजयध्वजा आहे. श्री. रामचंद्र माधव पै यांनीं आपलें जीवन पत्रव्यवसायाला वाहून घेऊन पस्तीस वर्षें लोटलीं असावीं. तरुण पत्रकारांत दास बोरकर, बोर्डेकर, लाड, महात्मे इत्यादि लोक आपलें बस्तान जमवून आहेत. श्री. बा. द. सातोस्कर हे प्रकाशक, ग्रंथलेखक, साप्ताहिक व मासिकाचे संपादक अशा यशस्वी भूमिका करीत 'गोमंतक' दैनिकाचे संपादक झाले; व त्यांतहि त्यांनीं आपलें प्रभुत्व दाखविलेलें आहे. प्रो. वेलिंगकरांनीं संशोधित केलेला 'ज्ञानेश्वरीचें शब्दभांडार' हा ग्रंथ मराठी वाङ्मयाचें भूषण आहे. ॲ. सुशील कवळेकर कायदेविषयक आणि इतर विषयांतहि विपुल लेखन करीत असतात. काणकोणचे डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांच्या 'सतराव्या शतकांतील गोमंतकी बोली' या संशोधित ग्रंथाचा जरूर उल्लेख करावा लागेल. नुकताच महाराष्ट्र सरकारनें ह्या ग्रंथाचा गौरव केला. गोमंतक स्वतंत्र झाल्यानंतर गेल्या तीन वर्षांत दर्जेदार अशीं चार मराठी दैनिकें एकामागून एक निघालीं. नव्या आणि जुन्या पिढीच्या सुप्त प्रतिभेला चैतन्याची पालवी फुटून त्यांची धारदार लेखणी अनेक विषयांना स्पर्श करीत आहे. गोमंतकांत मराठी भाषा दाही दिशांनीं संपन्न होऊं लागलेली आहे.

गोमंतकीयांनीं उत्स्फूर्तपणें केलेल्या मराठी साहित्यसेवेचा हा धांवता आढावा घेतांना तो अत्यंत अपुरा असून त्यांत अनेक उणीवा राहिलेल्या आहेत याची जाणीव मला आहे. वास्तविक या सर्व वाङ्मयसेवकांची आणि त्यांनीं निर्माण करून ठेवलेल्या साहित्याची नोंद यापूर्वीं झालेली आहे. ती ग्रंथिलीहि गेलेली आहे. या सर्व सरस्वतीभक्तांबद्दल मला अतिशय आदर असल्यानें आणि मराठी साहित्यनिर्मितीचा प्रवाह कसा फोफावला, कसा रुंदावत गेला, गोमंतकांतील हिंदुजीवन तो कसा व्यापून राहिला हेंच केवळ प्रामुख्यानें सांगायचें असल्यानें हें प्रकरण लिहावें लागलें.

गेल्या पंचवीस वर्षांच्या कालखंडांत गोमंतकांतील जीवन बरेंच गुंतागुंतीचें झालेलें आहे. जुन्या वळणाचा कौटुंबिकपणा विस्कळीत

झालेला असून, ध्येयाच्या कल्पना, निष्ठेबद्दलच्या कल्पना पार बदलून गेलेल्या आहेत. एके काळीं विशाल असलेली जीवनदृष्टि आज अधुरी, उथळ, तशीच थिटीहि झालेली आहे. या सर्व परिवर्तनाचें स्पष्ट प्रतिबिंब गोमंतकीयांच्या साहित्यनिर्मितींत पडलें पाहिजे. संचिताच्या विकासाला तें कारणीभूत झालें पाहिजे.

# संगीत आणि साधना

गोमंतकीयांची ललितकलांची तपोनिष्ठ परंपरा फार मोठी आहे. सृष्टिदेवतेनें निसर्ग-सौंदर्याच्या वरदानाबरोबरच कलेंतलें सौंदर्य टिपून घेण्याचें मार्मिक दृष्टीचें वरदान गोमंतकी-याला उपजतच दिलेलें आहे. गोमंतकांत जशीं आंबे, फणस, नारळादि रसाळ फळें पिकतात, तशीच कलाहि पिकते असें म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें वाटूं नये. ज्या ज्या वेळीं मी गोमंतकासंबंधीं विचार करतों, त्या त्या वेळीं मला असें वाटतें कीं, पूर्वकालीं यक्ष, किन्नर, सिद्ध, चारणादिकांच्या वसतीची ती तपोभूमि असावी. इथल्या एकंदर सांस्कृतिक जीवनाच्या मूलभूत प्रवृत्तीकडे विहंगम दृष्टीनें पाहिलें तर एक गोष्ट ठळकपणें नजरेंत भरते ती ही कीं, इथलें साहित्य, इथली संस्कृति, इथली कला ही प्रथमपासूनच भक्तिनिष्ठ आहे. या जन्मीं संचित करून ठेवायचें तें ऐहिक सुखासाठीं नाहीं तर पारलौकिक सुखासाठीं. ही गोमंतकी-याची दृढ कल्पना होती व आहे.

परसत्तेनें त्याचा अनंतकाळपर्यंत छळ केला, पण तन-धनापेक्षां आपल्या देव्हाऱ्याच्या संरक्षणाची त्याला अधिक महत्ता वाटली. उपजत कलांचा उपयोग त्यानें देवाच्या सख्यत्वासाठीं केला, त्या ईश्वरदत्त देणगीचा जीवनासाठीं व्यापार करणें हें पाप आहे अशीच त्याची समजूत होती. तीस-पस्तीस वर्षांपूर्वीदेखील तिथल्या त्या परिस्थितींत फरक पडला नव्हता.

माझ्या लहानपणांतली गोष्ट. नामसप्ताहांना गोव्यांत त्यावेळीं ऊत आला होता. घराघरांतला चोवीस तासांचा नामसप्ताह वेगळा, पंधरावीस हिंदु घरें असलेल्या वाड्याचा ७२ तासांचा वेगळा व सबंध गांवचा सात दिवसांचा वेगळा, असे हे नामसप्ताह असत. हरिनामाच्या संगीत गजराचे गांवांत पाट वाहात असत. समाजांतल्या सर्व थरांतल्या लोकांनीं आपली संगीत भूक या नामसप्ताहांत भागवून घ्यायची. वसंतांत जसा कोकिळेला कंठ फुटतो, तसा प्रतिष्ठितांना इथें एकाएकीं कंठ फुटायचा. ज्ञानेश्वरां-पासून कृष्णभट वांदकरांपर्यंत सर्व संतांची अभंगवाणी वातावरणांत भरून राहिलेली असायची.


मखरांत ठेवलेल्या एका मोठ्यांत मोठ्या, नक्षीदार समयीभोंवतीं फेर धरून अखंडितपणें भजनें चालत. सबंध गांवचा म्हणून जो सप्ताह असे तो गांवच्या मध्यवस्तीच्या ठिकाणीं एखाद्या वडाच्या किंवा पिंपळाच्या पाराजवळ मोठा मांडव घालून साजरा केला जात असे. त्या सप्ताहाच्या भजनाच्या पाळ्या वाड्यावाड्यांत वांटलेल्या असत. याशिवाय प्रत्येक वाड्याला एकेका रात्रीचा उत्सव वांटलेला असे. या वाड्यांतून पाळी-प्रमाणें ज्या दिंड्या येत त्याला आमच्याकडे 'पार' असें म्हणतात. या 'पाराला' विशेष महत्त्व रात्रीचें असे.

पुराणकालीन रथाप्रमाणें शृंगारलेल्या एका बैलगाडीवर रामायण-महाभारतांतील प्रसंगांवर आधारित कळसूत्री मूर्ति बसविलेल्या असत. द्रौपदी भीष्माचार्यांना नमस्कार करते. नमस्कार करतांना तिच्या हातांतल्या बांगड्या वाजतात. ध्यानस्थ भीष्मांचे हात आशीर्वादासाठीं आपोआप उचलतात. मग ते डोळे उघडतात. आपण कुणाला आशीर्वाद दिला हें



जीवन संगीत

चित्रकार : दीनानाथ दलाल



दौलत



आकांक्षा

त्यांच्या लक्षांत येतें; व एवढ्या अपरात्रीं द्रौपदीला आपल्या शिबिरांत आणून आपल्याकडून 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असें आशीर्वचन घेऊन 'निःपांडवी पृथ्वी करीन' या प्रतिज्ञेला अडथळा आणणारें हें कृत्य दुसऱ्या कुणाचें नसून त्या लीलानाटक्याचें आहे हें ते ओळखतात. क्रोधानें त्यांचे डोळे विस्फारतात, आणि त्यांची मान सहजगत्या उजव्या बाजूला वळते, तोंच बाजूचा झिरझिरींत पडदा आपल्या दोन्ही हातांनीं बाजूला करून हास्यमुख असा श्रीकृष्ण आपलें मुखकमल भीष्मांना दाखवितो.

एवढ्या या दृश्यानें सारें महाभारत डोळ्यांसमोर उभें राही. त्या शृंगारलेल्या रथापुढें सुस्वर भजन करीत दिंडी चाललेली असे. सुस्वर भजनाकडे कान लावून आणि डोळ्यांनीं रथावरचें दृश्य पाहात लोकांच्या झुंडीच्या झुंडी चाललेल्या असत. रात्रीं नऊ वाजतां आपल्या वाड्यांतून निघालेली ही दिंडी सप्ताहाच्या मांडवांत पोंहोचेपर्यंत मध्यरात्रीचे तीन वाजत. आणि मग सकाळपर्यंत मांडवांत भजनाची बैठक होई. असे सात दिवस व सात रात्री सुस्वर, सुडौल असा नामसंकीर्तनाचा जल्लोष चाललेला असे. प्रत्येक गांवांत कमीअधिक प्रमाणांत हा नामसप्ताह होई.

आपल्या गांवचें वेगळें असें वैशिष्ट्य दिसावें म्हणून चढाओढी फार असत. एकाचें महाभारताचें दृश्य लोकप्रिय झालें कीं दुसरा रामायणांतला असाच एखादा चित्तवेधक प्रसंग रंगवी. एकाचें भजन विशेष रंगून गांवांत त्याची चहा झाली तर मत्सरानें दुसरे जळफळत. आपल्या गांवांत चांगले गायक नसले तर मोठा खर्च करून दुसऱ्या गांवांतले भजनी बोलावीत. ही चढाओढ इतकी वाढली कीं पुढें बेळगांव-मिरजकडून गायक-वादक आणले जाऊं लागले; व नामसंकीर्तनाऐवजीं या सप्ताहांतील भजनांना संगीत बैठकीचें स्वरूप येऊं लागलें.

महाराष्ट्रांतून केवळ भजनासाठीं म्हणून येणाऱ्या त्या गायक-वादकांमुळें एक गोष्ट अवश्य झाली, स्थानिक लोकांना आपले गुण-दोष कळूं लागले. याशिवाय देवळांतल्या मुख्य उत्सवासाठीं महाराष्ट्रांतून नामांकित हरिदास येऊं लागले. त्यांतले कांहीं खानदानी गायन शिकलेले होते. या

हरिदासांनींहि मुळांतल्या संगीतप्रेमांत पुष्कळ भर घातली; परंतु गायन, चित्र किंवा शिल्प या उपजत कलांचा उपयोग केवळ ईश्वर-सेवा याव्यतिरिक्त होत नव्हता. व्यवसाय म्हणून तो स्वीकारण्यास मध्यमवर्ग तयार नव्हता. चित्र-शिल्प-कला ही फक्त देव्हारे सजविण्यापुरती आली, आणि संगीत-नाट्य-कला ही प्रभुमहिमा गाण्यापुरती आली कीं पुरे— असाच गोव्यांत समज होता. सुरुवातीला सांगितलेल्या भीष्मपर्वांतील कळसूत्री मूर्तींचें यथातथ्य चित्रण ज्या कलावंतानें केलें होतें तो व्यवसायानें हलवाई होता. ज्या गांवीं जत्रा असे त्या गांवांत फराळाच्या जिनसांचीं दुकानें तो काढी व त्या धंद्यांत पैसा मिळवून त्यानें बरीच प्रतिष्ठा मिळविली होती. त्याच्या एका मुलांत मूर्तिकला उपजत होती. गणपतीच्या दिवसांत तो मुलगा पुराण-प्रसंगांवर आधारित अशीं विलक्षण चित्रणें करी, कीं लोक त्याचें फार कौतुक करीत, त्याला या कलेचें चांगलें शिक्षण मिळालें तर अल्पावधींतच तो नांव काढील असें वारंवार म्हणत. पण आपल्या चार मुलांपैकीं एकाहि मुलाला त्यानें या विषयांत घातलें नाहीं. उत्तम अर्थार्जन होणाऱ्या मिठाईच्या धंद्याचीच दीक्षा दिली. याला कारणेंहि तशींच बळकट होतीं.

गोमंतकांतला मुमुक्षु मध्यमवर्ग हा आपलें घरदार, मुलेंबाळें या सगळ्या फापटपसाऱ्यांच्या जंजाळांत गुंतलेला. 'हरि उरांत रिझवित, सदनीं फुलबागा रचविणाऱ्या' गृहस्थांचें तें विश्व. कलेचें विश्व हें आपल्या विश्वापासून कांहींसें वेगळ्या तऱ्हेच्या माणसांचें—माणसांत राहिलेल्या अवलियांचें—अशी त्यांची पक्की कल्पना होती, व या कल्पनेमुळें त्यांच्यांतल्या उपजत थोर कलावंतांची अवस्था त्यांनीं प्रवाहपतितासारखी केली.

या मुमुक्षुवर्गाहून आणखी एक वर्ग गोव्यांत आहे. वास्तविक हाहि सामान्यपणें मध्यम वर्गच; परंतु केवळ वित्तसंचयांत आजीव गुंतलेला. वित्ताच्या जोरावर त्यांनीं प्रतिष्ठा काबीज केली. बाकीचा समाज या समाजाभोंवतीं रुंजी घालूं लागला. आदर्श जीवनाचे सारे संकेत त्यांच्या आचरणावरून ठरवूं लागला. वाङ्मय-गायन-वादन-चित्र इत्यादि कलांचा

आस्वाद केवळ विलासपर्यंकावर लोळतांना घ्यायचा असतो या तत्त्वाचा त्या वित्तदासांनीं प्रचार केला आणि त्यांना महाजन मानणाऱ्या बाकीच्या समाजानें त्यांच्याच तत्त्वाची री ओढली. त्यामुळें कित्येक उपजत थोर देणगीचे कलात्मे त्याखालीं गाडले गेले. पुन्हा कधींहि वर आले नाहींत. कुठल्याहि आधुनिक तंत्राचा स्पर्श झाला नसतांना किंवा अद्ययावत् साधनांची जाणीव झालेली नसतांना केवळ चिकणमाती घेऊन राजसभेपासून समरभूमीपर्यंतच्या पुराणप्रसंगाचें यथातथ्य चित्रण करणारे मूर्तिकार, खारीच्या शेपटीचे केस कापून घेऊन कुंचले बनवून मोठमोठे पडदे, घरें, देवळें आदि रंगविणारे चित्रकार मीं बालपणीं पाहिले; पण प्रपंचाचा भार पडल्यावर पुढें कोणीं व्यवसाय म्हणून त्या कलेचा स्वीकार केला नाहीं. समाजानें त्याला करूं दिला नाहीं. तसें करणाऱ्याचा उपहास झाला, उपेक्षा झाली.

नवविधाभक्तींत तन्मय झालेली ती पिढी वृत्तीनें संस्कृतिपरायण व पापभीरु होती, पण नवविचारांची कास धरणारी नव्हती. या बाबतींत प्रथम आघाडीवर राहिला तो गोमंतक मराठा समाज. त्यानें सीमोल्लंघन केलें. कष्टांचें जीवन पत्करलें. स्थितिकर्त्याच्या वरदानानें प्राप्त झालेल्या उपजत कलांचा विकास करण्याकरितां कलावंत साधना करूं लागले; त्यांत यशस्वीहि होऊं लागले. आसमंतांत त्यांचें नांव दुमदुमूं लागलें. बाकीच्या समाजाला जाग आली ती यानंतर. शैत्य, माधुर्य, सौंदर्य आणि शुचिता या चार गुणांची खैरात प्रभूनें आपल्या चारहि हातांनीं केल्यानें आरोग्य आणि समृद्धि हातांत हात घालून नांदली. त्यामुळें गोमंतकांतील प्रत्येक व्यक्तिमात्रांत एकप्रकारचा उत्साह होता. त्या उत्साहांतूनच संगीत स्फुरलें, पण त्या स्फूर्तीचा विकास घडविण्याच्या प्रतिज्ञेनें गोमंतकाबाहेर पहिलें पाऊल टाकलें तें मुरारबा पेडणेकरांनीं. त्या काळांत संगीत विद्या मिळविणें ही गोष्ट सर्पमणि मिळविण्याइतकीच कठीण होती. कलेला आजच्यासारखी बाजारी सुलभता नव्हती. घरंदाज कलावंताला आपली विद्या दुसऱ्याला देणें म्हणजे पंचप्राणच दिल्यासारखें वाटत असे; पण एकदां गांवची हद्द ओलांडल्यानंतर साध्य सांपडल्याशिवाय माघार

घेणें ही गोष्ट लाजिरवाणी होती. त्यासाठीं हटयोग करावा लागणार होता. मुरारबांनीं तोच मार्ग पत्करला. त्यांनीं लखनौपर्यंत पायीं भ्रमंती केली. एका ठिकाणीं त्यांनीं सहा वर्षें सेवा केली तेव्हां कुठें त्यांना त्रितालांतल्या दोन गति सांपडल्या. अशा रीतीनें कुणाचेंहि पाठबळ नसतांना मुरारबा उत्तर हिंदुस्थानांतील मुरब्बी उस्तादांकडून अनेक तऱ्हेचें शिक्षण सेवा-भावानें घेत राहिले.

संगीतविश्वाचा शोध घेण्याकरितां मुरारबा गोव्यांतून जाईपर्यंत शास्त्रीय संगीत ही काय चीज आहे हें गोमंतकांतील उपजत कलावंतांना माहीत नव्हतें; परंतु अचानक एक घटना अशी घडली कीं, आपल्याच नादाच्या गुंगींत राहणाऱ्या आणि त्याच्यांतच सारें विश्व सामावल्याच्या कल्पनेच्या तंद्रींत असलेल्यांना एक जबरदस्त धक्का मिळाला. आपण समजतों त्यापेक्षां संगीत हा एक वेगळ्या प्रकारचा विषय आहे याची जाणीव त्यांना झाली. घटना अशी घडली कीं, ग्वाल्हेर घराण्याची गायकी आत्मसात् करून तिचा प्रसार करण्याकरितां देशभ्रमण करीत असलेले मालवणचे विठोबाअण्णा हडप हे सावंतवाडीमार्गें गोव्यांत आले; आणि बांदोड्याच्या महालक्ष्मीच्या देवळांत त्यांचा पहिला कार्यक्रम झाला. त्यांचें तें गाणें ऐकून तेथील श्री. सरस्वतीबाई बांदोडकरांना आपण गाण्याचें शास्त्र शिकलें पाहिजे अशी प्रेरणा झाली. त्यांनीं बिठोबाअण्णांना आपल्याला शिकविण्यासंबंधीं विनंती केली. बुवांनीं ती तत्काळ मानली आणि सरस्वतीबाईंना ते शिकवूं लागले.

गोमंतकांत शास्त्रीय संगीत शिकली ती हीच पहिली बाई असें जाणते लोक सांगतात. सरस्वतीबाईनंतर रामनाथीं येथील शाणेबाई रामनाथकर यांनीं बुवांचें शिष्यत्व पत्करलें. सरस्वतीबाईंची परंपरा त्याच घराण्यांतील श्रीमती केशरबाई बांदोडकर, गिरजाबाई केळेकर, ज्योत्स्नाबाई भोळे पुढें चालवीत आहेत आणि रामनाथकरांची परंपरा श्री. रघुवीर रावजी रामनायकर पेटीवादनाच्या रूपानें, आणि रत्नकांत रामनाथकर गायनवादनाच्या रूपानें, चालवीत आहेत. शास्त्रीय संगीताचा पाया ज्या शुभमुहूर्तावर विटोबाअण्णांनीं घातला तो शुभमुहूर्त अमृतसिद्धियोगाचाच

असें म्हटलें पाहिजे. कारण तेव्हांपासून त्यांनीं शिंपलेलें तें रोपटें हळूहळू वृक्षरूप व्हायला लागलें. हडपांनंतर अनंतबुवा आले. तेहि ग्वाल्हेर घराण्याचेच होते. त्यांनीं आपलें प्रस्थान कपिलेश्वरीच्या बाजूला वळवून रामूबाई कपिलेश्वरींना शिकविलें. मग बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे शिष्य दत्तुबुवा भिडे आले. त्यांनीं ख्याल गायकी हा प्रकार प्रचारांत आणला, व तो चालू असतांना मुरारबा पेडणेकर उस्ताद मुरारबा अशी पदवी घेऊन ठिकठिकाणीं दिग्विजय करीत गोमंतकांत परत आले. मुरारबांकडे केवळ गाणेंच नव्हतें; नृत्य, गायन व वादन या तिन्ही कलांत ते पारंगत होते. गोव्यांत पडलेलें त्यांचें पाऊल आमूलाग्र क्रांतीचें ठरलें. अनेक स्त्री-पुरुष त्यांचे शिष्य बनले. मुरारबांच्या आगमनानंतर गायनवादनकलेला रसाळपणा आला. कालांतरानें मुरारबांची 'पूना गायन समाज' या संस्थेंत शिक्षक म्हणून नेमणूक झाली. १८८७ सालीं त्यांनीं 'संगीत संजीवनी' नांवाचें एक पुस्तक लिहिलें होतें. अनेक रागांचे आरोह-अवरोह व स्वरलिपीसह चिजा त्यांत त्यांनीं दिलेल्या आहेत. अनेक तालांचें स्पष्टीकरणहि या पुस्तकांत आहे.

मुरारबांनंतर थोड्याच अवधींत आणखी एका गोष्टीनें या सर्वांवर ताण केली. गायनप्रांतांतल्या ज्या एका बहुश्रुत विद्वानांचें आगमन याच वेळीं गोव्यांत झालें, त्यांचें नांव रामकृष्णबुवा वझे. ध्रुपद, धमार, ख्याल, प्रबंध इत्यादि गायनप्रकार तर ते जाणतच होते; पण या सर्व प्रकारांच्या पोतडीबरोबरच आपल्या दुसऱ्या काखोटींत टप्पा, ठुमरी, दादरे असेहि प्रकार त्यांनीं आणले होते. मनमिळाऊ वृत्तीनें व बहुश्रुतपणामुळें त्यांनीं प्रतिष्ठितांपर्यंत आपली वर्णी लावली. त्यामुळें गाणें शिकणें ही गोष्ट जिथें निषिद्ध मानली जात होती तिथें तिथें जागृति होऊं लागली; व केवळ षोकासाठीं म्हणून असो कीं स्वतःचें मनरंजन करण्यासाठीं म्हणून असो, 'लामगांवकर देसाई', 'कुंडईकर' यांच्यासारख्या प्रतिष्ठित घराण्यांत गाणें शिरलें.

विठोबाअण्णा हडप, दत्तुबुवा, अनंतबुवा, मुरारबा आणि वझेबुवा यांनीं निर्माण केलेल्या शास्त्रीय संगीताच्या वातावरणांत तयार झालेल्या

कलावंतांचें कौतुक, खुद्द गोमंतकांत अत्यंत मर्यादितपणें होऊं लागलें. तें संकुचित विश्व मानी कलावंताला मानण्यासारखें नव्हतें. पंख शक्तिमान झाले कीं मोठी झेप घ्यावीशी वाटणें स्वाभाविक होतें. म्हणून ज्यांना शक्य होतें, ज्यांची ज्ञानपिपासा मोठी होती त्यांनीं आपल्या उत्कर्षासाठीं घरदार, मायामोह सोडून कष्टांचें जिणें स्वीकारलें. कित्येक स्त्रियांनीं, कित्येक पुरुषांनीं अनंत हालअपेष्टा सहन करीत ईप्सित प्राप्त करून घेतलें, असामान्य असा लौकिक मिळविला आणि स्वतःबरोबरच आपल्या मायभूमीलाहि गौरवांकित केलें. गोमंतकांतील या प्रत्येक कलावंताला स्वतंत्र असें व्यक्तिमत्त्व आहे. या सर्वांनीं कायावाचामनेंकरून कलेची उपासना केली. 'कलेसाठींच जीवन' अशा निश्चयानें उद्दिष्ट साध्य होईपर्यंत या कलावंतांनीं माघार घेतली नाहीं.

बाबलीबाई पालकर (कांसारपाली) यांचें नांव हिंदुस्थानी संगीताच्या दुनियेंत मोठ्या आदरानें घेतलें जातें. संगीताची उपासना करतां करतां ही बाई त्यांत इतकी विलीन झाली कीं, तिला प्रपंचाचेंच काय, पण स्वतःच्या देहाची काळजी घेण्याचें देखील भान राहिलें नाहीं. गाण्यासाठीं अखेरपर्यंत ही बाई ब्रह्मचारिणी राहिली. विद्येचें ऐश्वर्य असें होतें कीं बाबलीबाई गायल्यानंतर जलसा समाप्त होत असे. मोठमोठे उस्ताद तिची साथ करतांना अत्यंत जागरूक राहात. आणि तिचें गाणें ऐकायला संगीतांतलें सारें खानदान जमा होत असे. बाईनीं एकदां आपले गुरु खांसाहेब नत्थनखां (आग्रेवाले) यांना 'दावत' दिली. या समारंभाला मुंबापुरस्थ मोठमोठे गवय्ये-बजवय्ये हजर होते. गुरूंच्या आज्ञेनें बाई गायला बसली; आणि गाणें रंगांत आलें असतांना मध्येंच तंबोरे थांबवून तिनें आव्हान केलें––"इथें बसलेल्या गवय्यांत माझ्या गुरूशिवाय कुणाची ताकद असेल तर माझ्यानंतर गाऊन जलशांत रंग भरावा; मी त्यांचें शिष्यत्व पत्करायला तयार आहे!" बाबलीबाईंच्या त्या आव्हानाला कुणींहि उत्तर दिलें नाहीं. फक्त त्यानंतर खांसाहेब अल्लादियाखां नत्थनखांसाहेबांच्या विनंतीवरून गायले, पण केवळ जलशाला शोभा यावी म्हणून!

श्रीमती ताराबाई शिरोडकर, दुलूबाई पर्वतकर, तानीबाई, सरस्वतीबाई

फातर्पेकर, विठाबाई काकोडकर या सर्व स्त्री-कलावंतांनीं कमीअधिक प्रमाणांत नांव मिळविलेलें आहे. सरस्वतीबाई वेलिंगकर यांचें नांव ठुमरी-दादरा गाणारे लोक मोठ्या अभिमानानें सांगतात. ठुमरींतला भावार्थ 'आदा' करून व्यक्त करतांना ही बाई आपल्या श्रोत्यांना हंसवायची, रडवायची, उन्माद उपन्न करायची. 'कित गयो बावरी बना' ही सुप्रसिद्ध ठुमरी वेलिंगकरबाईंनीं मुंबापुरींत तरी अमर करून ठेवलेली आहे. अंजनीबाई मालपेकरांना 'ललितकला ॲकेडेमी' या मान्यवर संस्थेनें दोन वर्षांपूर्वीं मानपत्र देऊन सदस्य करून घेतलें. या बाईंनीं अकालीं गाणें सोडलें नसतें तर फार मोठें नांव कमावलें असतें. सुखासीन परिस्थिति असतांना अनलस वृत्तीनें साधना करून जी भावी पिढीचा आदर्श ठरली, व जिचें कौतुक कवींद्र रवींद्रांनीं स्वहस्ताच्या गौरवपत्रानें केलें, त्या सुरश्री केसरबाईंचें नांव आज भारतवर्षांत गाजत आहे. केसरबाईंनीं गोमंतकाच्या संगीत परंपरेला आगळा उजाळा दिलेला आहे. भारतांतील चव्वेचाळीस कोटि लोकांची संगीतसृष्टींतील प्रतिनिधि म्हणून भारताच्या राष्ट्रपतींनीं तिला मानपत्र दिलेलें आहे. केसरबाईंनीं केलेल्या संगीतसाधनेला तोड नाहीं. संगीतांतील 'नायकी' मिळावी म्हणून बाईंनीं केलेल्या परिश्रमांचा इतिहास ऐकतांना आदरानें मस्तक नम्र होतें.

श्रीमती मोगुबाई कुर्डीकरांनीं, प्रसंगीं एकभुक्त राहून, संगीतकला आत्मसात् केली. मोगुबाईंची शिष्यपरंपरा आहे. आणि बहुधा स्त्रियांनीं गाणें शिकविण्याबाबतचा व अनेक स्त्री-पुरुष शिष्य निर्माण करून आपल्या घराण्याची परंपरा वाढविण्याच्या कांहीं अपवादांपैकीं तो एक अपवाद आहे. त्यांची मुलगी सौ. किशोरी आमोणकर आईच्या घराण्याची परंपरा राखण्याइतपत आज तयार झालेली आहे. तिच्याइतकी लोकप्रिय आणि तरुण गायिका गोमंतकांतल्या नव्या पिढींत तरी दिसत नाहीं. श्रीमती आवडाबाई सांगेकर, वत्सलाबाई पर्वतकर, मेनका शिरोडकर, कमल सांगेकर, अंजनीबाई लोलयेकर, मीनिका शिरोडकर इत्यादि स्त्रियांनींहि गायिका म्हणून बराच लौकिक मिळविलेला आहे. नृत्य-कलेविषयींहि मागल्या पिढीला आस्था होती. मेनकाबाईंनीं नृत्याची खूप

साधना केली आणि प्रसिद्धीहि खूप मिळविली. नव्या पिढींतील कांहीं मुली नृत्य-साधना करतांना दिसत आहेत. नृत्य-साधना ही एक प्रखर साधना आहे. त्या साधनेला आयुष्य अर्पण करावें लागतें. नव्या पिढींतील प्रविणी नाईक हिच्यासारख्या मुलींत ती जिद्द दिसते आहे. तिच्याबद्दल अपेक्षा बाळगायला हरकत नाहीं. लता मंगेशकर व आशा भोंसले या दोघींचा आवाज आज अलम दुनिया व्यापून राहिलेला आहे. चित्रपटसृष्टीचें त्या दोघींशिवाय पानदेखील हलूं शकत नाहीं अशी परिस्थिति श्रीमंगेशाच्या कृपेनें त्यांना लाभलेली आहे. या दोघींनीं गोमंतकाचें नांव दिगंत गाजविलें.

गोमंतकीय कलावंतांची वृत्ति 'अस्सल' शोधणाऱ्यांची आहे; नक्कल नव्हे. कलेची उपासना अशी करायची, कीं जीवनाची शोभा तर वाढवायचीच पण स्वतःच्या कलागुणाला चिरंजीव करण्यासाठीं जिवाचें रान करायचें. स्वीकार करायचा तो अभिजाताचा, सवंगाचा नव्हे. अभिजाताच्या शोधांत लक्ष ठेवायचें तें प्रथमश्रेणीकडे. आणि अनेक अनुभवांचे दाणे टिपत टिपत आपलें उद्दिष्ट गांठायचें. ही वृत्ति आजी-माजी कलावंतांत प्रामुख्यानें दिसते. श्री. रत्नकांत रामनाथकर यांच्याकडे अनेक कलागुण होते. उत्तम हार्मोनियम-वादक म्हणून त्यांचें नांव आहे. जलतरंग, सतार हीं वाद्यें तर ते वाजवितातच, पण तार जुळविणारा त्यांच्यासारखा सिद्धहस्त कलावंत विरळा. या एवढ्या गुणांवर संतुष्ट राहून त्यांना व्यवस्थित प्रपंच करतां आला असता. मुंबईच्या उपनगरांत 'श्रमसाफल्य' नांवाचें एक लहानसें घरहि बांधून राहतां आलें असतें; पण शास्त्रीय संगीतांत प्रावीण्य मिळविण्याच्या नादांत या कलावंतानें जिवाची मुंबई केली नाहीं. विलायतखांसारख्या मातब्बर गवय्याचें शिष्यत्व पत्करून खरी गायकी प्राप्त व्हावी या इच्छेनें ते साधना करीत राहिले. एक गवय्या निर्माण करण्याइतपत त्यांनीं ज्ञान मिळविलेलें आहे. त्यांनीं नव्या चिजा बांधलेल्या आहेत. नवे रागहि निर्माण केलेले आहेत.

श्री. सीताराम फातर्पेकर यांनीं संगीतकला मिळविण्यासाठीं ज्या आपत्ति भोगल्या त्या ऐकतांना डोळे भरून येतात. आपला उद्धार करून

घेण्यासाठीं या तरुणानें आजवर सुखाचा असा एकहि दिवस पाहिला नाहीं. सीतारामांनीं संगीतासाठीं जें जें केलें, जीं संकटें भोगलीं तीं ऐकतांना पाषाणालासुद्धां पाझर फुटावे. सीताराम म्हणजे अलीकडील गोमंतकीय संगीतांतील कलावंतांच्या परंपरेंतला चालता-बोलता इतिहास आहे. कलादेवतेनें त्याला उदंड सुख द्यावें! गोविंद अग्नि, श्रीपाद नेवरेकर, सुरेश हळदणकर, जितेंद्र अभिषेकी यांनीं संगीतकलेला वाहून घेऊन साधना आणि लौकिक दोन्हीहि गोष्टी मिळविलेल्या आहेत. कोणत्याहि तऱ्हेचें पाठबळ नसतांना या कलावंतांनीं गोव्याबाहेर पाऊल टाकलें आणि स्वतःची बुद्धि आणि शक्ति पणाला लावून विद्या मिळविली. रजतपटावर संगीत दिग्दर्शक म्हणून मानाचें स्थान मिळविणारे श्री. एन्. दत्ता व श्री. दत्ताराम हे दोघेहि तरुण गोमंतकीय आहेत. एका वेळीं गोमंतकांतील लोकसंगीतानेंहि चित्रपटशौकिनांना वेड लावलें होतें, ही गोष्ट इथें नमूद करण्यासारखी आहे. तें सादर करणाऱ्या संगीत दिग्दर्शकांचें नांव त्रिखंडांत गाजलें.

मरहूम खांसाहेब विलायतखां आग्रेवाले यांनीं एकदां माझ्याजवळ जे उद्गार काढले ते ऐकून मी स्तिमित झालों. खांसाहेब म्हणाले होते, कीं "भाई, तुमच्या गोव्यांतल्या जागृत संगीत व्यासंगानें, एक काळ आम्हां सर्व खानदानी गवय्यांना मुंबईंत आधार मिळाला आणि आम्हांला जगविलें. संगीतासाठीं सर्वस्व अर्पण करणाऱ्या आणि गुरूला परमेश्वर मानणाऱ्या गोमंतकीय स्त्रियांसारख्या स्त्रिया मला अन्यत्र आढळल्या नाहींत!" खांसाहेबांचे हे उद्गार म्हणजे एकप्रकारें गोमंतकाच्या कलोपासनेचा गौरव आहे! अशी ही गोमंतकाची गायनपरंपरा आणि ती घडविणारे तिचे मानकरी—जे "झाले आहेत! पुढें होणार! देणें ईश्वराचें!"

'अकादेमीय द मूझिक' ही संस्था संगीतकलेच्या अभिवृद्धीसाठीं पुर्तुगेज अमदानींत गोव्यांत स्थापन झाली होती; पण भारतीय संगीत पद्धतीचा व्यासंग करणाऱ्या हिंदूंना तिची कांहींएक मदत होत नव्हती. ही संस्था जिवंत आहे. आणि गोव्याच्या स्वातंत्र्यानंतर तिला केंद्र

सरकारकडून गेलीं दोन वर्षें पन्नास हजारांचें अनुदानहि देण्यांत आलेलें आहे. परंतु त्या संस्थेंत भारतीय संगीताचा एक स्वरहि अजून शिकविण्यांत आलेला नाहीं. ग्वाल्हेरनंतर गोवें हें संगीताचें आगर मानलें जातें; पण अचानक एखादा संगीतप्रेमी असा प्रतिष्ठित पाहुणा गोव्यांत आला तर त्याला प्रत्यक्षांत कांहीं दिसणार नाहीं. गोव्यांतील कलावंत गोव्याबाहेर शेंकडों मैलांवर आहेत. 'अकादेमीय द मूझिक' या संस्थेच्या धुरीणांनी आतां तरी या गोष्टीचा विचार केला पाहिजे. संगीताचा विकास कोणत्या रीतीनें घडवितां येईल, गोमंतकाचीं अशीं खास वैशिष्ट्यें त्यांत कशीं दिसतील आणि असामान्य कलावंत कसे निर्माण करतां येतील यावर विचारविनिमय करून संथेस्चीं नवीं धोरणें ठरविलीं पाहिजेत. ती एक लोकमान्य अशी संस्था झाली पाहिजे. किंवा ही संस्था जर केवळ पाश्चात्य–संगीताचाच पुरस्कार करणारी असेल तर भारतीय संगीताचा विकास घडविण्यासाठीं दुसरी संस्था निर्माण केली पाहिजे. भारतांतील इतर कोणत्याहि प्रांतापेक्षां गोमंतकांत संगीताचें बीज अधिक आहे. त्याला अंकुर फुटले पाहिजेत. तसें झालें तरच गोमंतकाचें नांव संगीतांत राहील; नपेक्षां कालांतरानें त्याचा वासहि शिल्लक राहाणार नाहीं.

गोवा ग्रंथ संग्रहालय, डॉ. ... पणजी
अनुक्रम ३६७४३ ... दि ... अभ्यास ...
क्रमांक ...३३५... दि. २५.८.६४

# नादलुब्ध गोमंतक

संगीतज्ञ अशा माझ्या एका मित्रानें मला विचारलें, "गोमंतकांतील कलावंत लयकारींत इतके पक्के कसे?" प्रश्न लहान होता, पण त्याचें उत्तर देतांना मला फार मोठा आढावा घ्यावा लागला. कारण 'तें ईश्वरी देणें आहे' एवढ्याच उत्तरावर समाधान मानणारी ती व्यक्ति नव्हती. 'तेथील वातावरणाचा तो परिणाम आहे' असें म्हटलें, कीं 'तें वातावरण कोणतें आणि त्यानें अणुरेणु कसा व्यापतो' याचें सूक्ष्म विश्लेषण करणें प्राप्त झालें असतें; परंतु विश्लेषण केल्याशिवाय मला गत्यंतर नव्हतें. माझें मन खोल विचार करूं लागलें. तें एका न संपणाऱ्या चक्राकार गतींत सांपडलें. गोमंतक आणि लयकारींतील पक्केपणा याविषयीं तें विचार करूं लागलें. त्या अभेद्य संबंधाचें नातें शोधूं लागलें. आणि विचार करतां करतां मला त्याचें उत्तर सांपडलें. मीं त्याला उत्तर दिलें—

"गोमंतकीय कलावंत लयीचा पक्का असतो याचें कारण त्याच्यावर बाल्यावस्थेपासून

झालेल्या अक्षयनादाचा तो परिणाम आहे. हा अक्षयनाद रूपसौंदर्यानें वेष्टित आहे. येथील निसर्गाचें रचनासौष्ठव सुंदर आणि मनोहर आहे. अदृश्य अशा सुरेल नादानें ही मंगलभूमि परिवेष्टित आहे....!"

"असें अलंकारिक उत्तर नको. नादाचा परिणाम कसा होतो तें सांगा!"

मी पुन्हा बोलूं लागलों: "ब्रह्मा-विष्णु-महेश नादरूप आहेत. पंचमहाभूतें नादरूप आहेत. नाद नसेल तर सृष्टि अचेतन होईल. नादानेंच सृष्टींतील जीवमात्रांना चेतना मिळते. हा चैतन्यदायी नाद दोन प्रकारचा आहे. एक 'आहत नाद' व दुसरा 'अनाहत नाद'. आहत म्हणजे जो ऐकूं येतो तो व अनाहत म्हणजे जो ऐकूं येत नाहीं, पण जो दिग्मंडळ व्यापून आहे आणि ज्यापासून समस्त जीवमात्रांवर अदृश्यरूपानें परिणाम होतो तो नाद! आहताची उत्पत्ति देखील अनाहतापासूनच झालेली आहे. नादाच्या परिणामाचीं साधीं सोपीं उदाहरणें सांगतों.

"गोव्यांतील देवळांतून अवसर येण्याची पद्धत आहे. अवसर येणें म्हणजे मानवकुडींत प्रत्यक्ष त्या कुलदैवतानं संचार करणें होय. अवसराच्या मुखांतून जें आशीर्वचन येईल तें सत्य असें मानायचा आपला कुलाचार आहे; परंतु हा अवसर कुडींत येईपर्यंत आपल्याला त्या देवतेच्या नांवानें प्रचंड साद घालावे लागतात. नाना तऱ्हेचीं तंतुवाद्यें, नाना तऱ्हेचीं सुषिर वाद्यें व नाना तऱ्हेचीं घनवाद्यें वाजवून आपण त्या देवतेला आवाहन करीत राहतों. वाद्यांचे गजर घडूं लागतात. त्याची लय वाढत जाते आणि जसजसा महानाद व्यापूं लागतो तसतसा मानवकुडींत अवसर संचारूं लागतो. देवता त्याच्या मुखांतून बोलूं लागते. अज्ञाताचें भूत, भविष्य, वर्तमान सांगूं लागते.

"बिगूल वाजलें कीं सैनिकांच्या अंगांत वीरश्री संचारूं लागते. पूर्वी रणशिंगें वाजलीं, कीं शिपायांच्या अंगांत रक्त सळसळूं लागे. घोडे खिंकाळत आणि हत्तींच्या चीत्कारांनी आसमंत दुमदुमत असे. रणवाद्यांच्या नादानं अंबर कोंदलें कीं एकमेकांचीं सैन्यें एकमेकांना भिडत असत. खड्गाच्या खणखणाटाचा नाद मृत्यूची पर्वा न करतां बेभान करीत

असे! अर्थातच विशिष्ट वातावरणानें विशिष्ट तऱ्हेची अनुभूति निर्माण होते हें विचार सत्य आहे. ही अनुभूति कसाला लावली कीं तिचा विकास घडतो. गोमंतकीयांना लयीचें वरदान हें तेथील नैसर्गिक शुचिर्भूत शुचिष्मंत वातावरणानें दिलें!"

माझ्या या उत्तरानें माझ्या त्या मित्राचें बरेंचसें समाधान झालें.

एक मात्र खरें, कीं लयकारीच्या पक्केपणांत, तालज्ञानांत व तत, वितत, घन आणि सुषिर वाद्यप्रकारांत ज्या ज्या गोमंतकीयांनीं नांव घेण्यासारखें कांहीं तरी केलें ते ते सर्व एखाद्या देवालयाच्या परिसरांत व सनई-चौघड्याच्या मंगलनादांत वाढलेले आहेत. अनादिकालापासून गोमंतकांत चौघडा व स्वारी हीं समूह-वादनें वाजत आलेलीं आहेत. याशिवाय वसंतोत्सव साजरा करतांना मागासलेल्या जमातींत 'रॉम्बट' या नांवानें जो उत्सव साजरा केला जातो त्यांतसुद्धां जो वाद्यसमूह असतो तो नसानसांत लयकारी भिनविणारा आहे. (आतां हा उत्सव केवळ मागासलेल्या जमातींचाच राहिला नसून त्याला सार्वजनिक स्वरूप आलेलें आहे.) 'रॉम्बट' या शब्दाचा सरळ अर्थ 'धांगडधिंगा'; आणि थोड्याशा अलंकारिक भाषेंत सांगायचें झाल्यास 'कैफांत येऊन नाचणें' असा अर्थ सांगतां येईल. शिमगोत्सवाला दोन-दोन तीन-तीन दिवस प्रथेप्रमाणें हें रॉम्बट नाचलें जातें; पण हा धांगडधिंगा घालायचा तो देखील तालांत. त्यांतील वाद्यें अशीं: दोन डब (म्हणजे नगारे), दोन ढोल, दोन ताशे, एक मोठें कांसाळें, आणि तिकटें (टूँगल). असा हा साज असतो. हा साज जरी रणवाद्यासारखा असला तरी लयकारी हा जो गोमंतकांतल्या वादनकलेचा प्राण तो त्यांत असतोच.

रोम्बटाचा उत्सव ज्या दिवशीं संपतो त्या दिवसाला 'धूळभेट' असें म्हणतात. थोडीशी सोमरसाची मात्रा चढवलेले लोक नाचून नाचून थकले म्हणजे आडवे होऊन धुळीची आणि त्यांची भेट होते म्हणून त्या दिवसाचें नांव धूळभेट पडलें असावें. त्या दिवशीं नगाऱ्यांची आणि ढोलांचीं चामडीं साजूक तुपानें रगडून त्यांना वडाच्या चिकाची शाई घालून (तबल्यासारखी) त्याची विशिष्ट घुमी तज्ज्ञांकडून तपासली जाते. त्या दिवशीं

सोम्यागोम्यानें एकाहि वाद्याला हात घालायचा नसतो. नमनाला गांवच्या जाणत्या माणसानें गत म्हणायची आणि समेच्या अक्षरावर दोन वेळां ट्रँगलवर सम पकडली कीं सारा साज एकाच वेळीं तिहायी घेऊन समेवर आदळतो. त्यावेळीं त्या नादानें संचारलेल्या उन्मादानें नाचणाऱ्या जमावाकडून होऽऽऽऽ असा साद उमटतो. आणि पुढें सुतासारख्या लयींत गत सुरू होते, व त्या गतीवर सारा जनसंमर्द बेहोश होऊन नाचतो. हा रोम्बटाचा उत्सव संपला, कीं तालथ्ये ज्ञाते आणि त्यांच्या रसिक श्रोत्यांच्या हृदयांत नादब्रह्माचा साक्षात्कार घडविणाऱ्या 'स्वारी'चा उत्सव सुरू होतो.

स्वारीचा अर्थ 'सवारी' असा आहे. पूर्वीं या वाद्यसमूहांत 'सवारी' हा ताल अत्यंत लोकप्रिय होता. आणि या विषम मात्रांच्या अवघड तालांत वाजवितांना जो वादक टिके त्यालाच त्या वाद्यसमूहांत मान मिळे. जेव्हां तेव्हां सवारी तालांतच रियाज केल्यानें 'सवारी' हें नांवच त्या वाद्यसमूहाला मिळालें. पुढें त्या सवारीचें 'स्वारी' झालें. या वाद्यसमूहांत वाजविलीं जाणारीं वाद्यें अशीं : चार घुमटें, एक समेळ, कांसाळें (मोठी झांज), मृदंग आणि ट्रँगल. या प्रत्येक वाद्याचा वादक लयींत मुरलेला, लयकारीचीं बारीक सारीक अंगें जाणणारा तसाच कसबीहि असावा लागतो. घुमट हें तळ कापलेल्या कळशीसारखें असतें. तळाचे कांठ तोंडासारखेच वाढविलेले असतात व या कांठाला घोरपडीच्या चामड्यानें मढविलेलें असतें. आकार एखाद्या मंदिर मिनाराच्या घुमटा-सारखा असल्यानें त्याला घुमट हें नांव दिलेलें असावें. किंवा जें घुमणारें तें घुमट असाहि अर्थ असावा. घुमट वाजविणारा ताकदवानहि असावा लागतो. सवारीची स्थायी गत वाजवितांना किंवा आदितालाची आवर्तनाची गत पुरी करतांना मुरब्बी वादक समेवर येतो तो घामाघूम होऊन !

फाल्गुन कृष्ण पंचमीला स्वारीच्या उत्सवाला सुरवात होण्याची पूर्वीं पद्धत होती. (आतां त्याला काळवेळ राहिलेला नाहीं.) चौदा वातींचा एक प्रचंड लामणदिवा चौदा सुवासिनींनीं पेटवायचा; आसपासचे मुरब्बी वादक सन्मानानें बोलवायचे, गांवांतल्या माननीय

वयस्कांनीं त्यांच्या गळ्यांत घुमट बांधायचें, आणि देवाला आवाहनाचा साद घालून एखाद्या तालज्ञ अशा माणसानें हातानें ताल देत अत्यंत ठाय लयींत नमनाचा पहिला चरण म्हणायचा—"नमन रे बा गणेशा प्रथम नमन रे बा गणेशा." हें नमन संपल्यावर 'चंद्रावळी'चा पहिला चरण त्यानेंच सुरू करायचा—"श्री भगवंता यादवांच्या राया हे देवा आऽऽऽऽऽहो." चंद्रावळ म्हणजे स्वारी वाजवितांना म्हणायचें गीत. चंद्रावळीचा चरण वेगवेगळ्या आवर्तनांनीं वाजवून गत संपविली व ती संपतांना मृदंगाचें आवर्तन संपलें कीं पुन्हा चंद्रावळीचा दुसरा चरण सुरू होतो. अशा रीतीनें वाढत्या रंगतीच्या गतीनें चंद्रावळ चालत राहते. समेळ वाजविणाऱ्याला सुद्धां घुमटावरील संपूर्ण बोल यावे लागतात. घुमटावरची परान कुठें थांबेल याचा बरोबर समज त्याला असावा लागतो. दुपटीनें किंवा चौपटीनें समेळावर फिरणाऱ्या त्याच्या काठ्या 'ब्रेक' लागल्यासारख्या समेच्या शेवटच्या मात्रेवर थांबल्या पाहिजेत. दहा वाजतां सुरू झालेली चंद्रावळ पहाटपर्यंत चालते.

सोळा मात्रांच्या त्रितालांत दहा मात्रा, पुन्हा त्याच्यांत बारा मात्रा, चौदा मात्रा असे एकाच तालांत अनेक मात्रा भरण्याचे प्रकार चालतात. त्यांत हारजीतहि असते. वादहि निर्माण होतात; व तज्ज्ञांकडून ते सोडविले जातात. पेडणें महालांत स्वारीच्या साथीला समेळ घेण्याची पद्धत नाहीं. सावई वेरें, डोंगरी व बारदेश महालांतील नेरूल, कांदोळी, कळंगुट, हडफडें, कांयसूव, शिवोली, वागाळी इत्यादि गांवें स्वारीसाठीं प्रसिद्ध होतीं. गोमंतकांत कांहीं प्रसिद्ध घुमट्यांचीं नांवें जीं मीं ऐकलीं त्यांचा नामोल्लेख करणें मी कर्तव्य समजतों. इरनोडें येथील अर्जुन, सगूण, वागाळीचे व्यंकटेश नायक, नेरूल येथील कुट्ट नाईक, आराब्यावरचे विठ्ठल व चंद्रु हे दोन बंधु, लयभास्कर खांप्रूजी पर्वतकर हे प्रथम घुमटवादनांतूच पुढें आले. खांप्रूजींनीं पुढें सारंगींत लक्ष घातलें; पण लयकारीच्या हिशोबाच्या नादांत ते इतके विलीन झाले कीं त्यांनीं आपलें सारें जीवन लयीच्या पाव-अर्ध्या मात्रांच्या हिशोबांत घालविलें. लयकारीचें सूक्ष्म-अतिसूक्ष्म गणित जाणणारा असा तालग्या

ज्ञाता हिंदुस्थानांत कुणी झाला नाहीं आणि होणारहि नाहीं. लयकारीचे जे अनंत चमत्कार खांप्रूजींनीं केले ते पाहून भारतांतील तालज्ञांनीं तोंडांत बोटें घातलीं आणि 'नेति नेति' म्हणून हात टेकले. लयभास्कर खांप्रूजींनीं जें केलें तें गोमंतकांच्या अनेक पिढ्यांना अभिमानानें मान ताठ ठेवायला पुरेसें आहे. त्यांचें स्वतंत्र चरित्र मीं लिहिलेलें असल्यानें त्याची इथें पुनरावृत्ति करीत नाहीं.


अशा या नादमय वातावरणानें नसानसांत लयकारी भिनलेले गोमंतकीय आपलें नांव काढण्याकरितां गोव्याबाहेर पडले. त्यांनीं साधना केली आणि ते कीर्तिवंत झाले. गोमंतकांतील बहुतेक महालांनीं आपले अनेक कलावंत सुपुत्र भारताला दिले. उस्ताद मुरारबा पेडणेकर, दत्ताराम नांदोडकर, विष्णुपंत शिरोडकर, कामुराव मंगेशकर, हरिश्चंद्र बांदोडकर, विनायक म्हार्दोळकर, शांबामाम पर्वतकर अशा मागल्या पिढींतील लोकांनीं चारहि तऱ्हेच्या वाद्यांचा अभ्यास करून साऱ्या भारतांत नांव कमावलें; आणि अनेक शिष्य निर्माण करून ते अमर राहिले. त्यानंतरच्या पिढींतील पंढरीनाथ नागेशकर व यशवंत केरकर यांनीं तबल्याचा उत्तम अभ्यास करून तेहि शिष्य निर्माण करीत आहेत. श्रीपाद नागेशकर, गुरुदास बोरकर, नावेलकर हे साथसंगतींत उत्कृष्ट म्हणून वाखाणले जातात. कै. गोविंद माशेलकर, विनायक साखळकर हे दोघे रसीले वादनकार गोमंतकाच्याच नव्हे तर सर्व महाराष्ट्राच्या परिचयाचे आहेत. नाटकाची उत्तम साथ करण्यांत दत्ताराम नांदोडकरांनंतर त्यांचा क्रमांक लागत होता. मनोहर शिरगांवकर तबला, पखवाज, हार्मोनियम, सनई हीं चारहि वाद्यें वाजविण्यांत वाकबगार आहेत. तंतकारांत आज दत्ताराम पर्वतकर ख्यातनाम आहेत.

व्हायोलिन-वादनांत श्रीधर पार्सेकरांनीं साऱ्या भारतवर्षांत एकमेव रंजक व सुरेली वादक म्हणून नांव मिळविलें. मागल्या पिढींतील सारंगी-वादनकारांत हरिराम व भिकाजी नागेशकर यांनीं आकाशवाणी व हिज मास्टर्स व्हॉइससारख्या नामवंत संस्थांचीं उद्‌घाटनें केलीं. कित्येक वर्षें ते या संस्थांत काम करीत होते. हार्मोनियमवादनांत मधुकर पेडणे-करांची बरोबरी करील असा कुणीहि नाहीं. तुळशीदास बोरकरहि



तित्तरवाली

चित्रकार: दीनानाथ दलाल




इग्रेज द् बाँ जेजूस्



शांतीचे प्रेषित

नाटकांची तशीच बैठकीच्या गाण्यांची उत्तम साथ करतात. बलवंत संगीत मंडळीची नाटकांची साथ करणारे हार्मोनियमवादक बाबी बोरकर व यशवंत बांदोडकर यांचें नांव महाराष्ट्रांत मशहूर आहे. खांप्रूजींच्या शिष्यांपैकीं विश्वंभर पर्वतकर यांनीं गोव्यांत तबलावादनाचें शिक्षण देणारें विद्यालय चालविलें. त्यांचा एक शिष्य नंदकुमार पर्वतकर सुरेख वाजवितो. करामतीचें वादन करण्यांत उत्तरहिंदुस्थानी लोक पटाईत आहेत; परंतु ताल-शास्त्राच्या अंतरंगाचा कीस काढण्यांत आणि विषम मात्रांच्या तालाचीं गणितें करीत बसण्यांतच आयुष्य वेंचल्यामुळें गोमंतकीय तबलावादकांनीं सवंग लोकप्रियतेकडे दुर्लक्ष केलें. दिवसेंदिवस परिस्थिति मारक व बेताल होत चालली आणि त्यामुळें गोमंतकांतील उपजत तालज्ञांना आपला व्यासंग थांबवावा लागला. 'पोटापुरतें थोडेंसें शिक्षण मिळालें कीं झालें; करायचे आहेत काय ते ब्रह्मतालाचे आणि रुद्रतालाचे हिशोब?' असा प्रश्न स्वाभाविक केला जाऊं लागला आहे!

आपल्या पुढच्या पिढीनें या विषयांत लक्षदेखील घालूं नये असें आज गोमंतकांतील अनेक विद्यमान कलावंतांना वाटतें. दत्ताराम पर्वतकरां-नंतर त्यांच्या घराण्यांत त्यांच्यासारखी कसून मेहनत न केल्यास सारंगी ही शोभेची वस्तू होईल, आणि मधु पेडणेकर कदाचित् आपल्या मुलांना पेटी-तबल्याला हात देखील लावूं देणार नाहींत; असें आज वातावरण निर्माण झालेलें असल्यानें त्याचा दोष कुणावर लादावा, त्याबद्दल कुणाला जबाबदार धरावें, या प्रश्नार्थक विचारानें मति गुंग होते. ज्या नियतीनें जन्माला घालतांनाच गोमंतकीयांना नादब्रह्माचा साक्षात्कार घडविला त्या नियतीनेंच यापुढें त्याचा विकास घडवावा या मागण्याव्यतिरिक्त दुसरें काय सांगणार?



इग्रेज द् बाँ जेजूस्



शांतीचे प्रेषित

नाटकांची तशीच बैठकीच्या गाण्यांची उत्तम साथ करतात. बलवंत संगीत मंडळीची नाटकांची साथ करणारे हार्मोनियमवादक बाबी बोरकर व यशवंत बांदोडकर यांचें नांव महाराष्ट्रांत महशूर आहे. खांप्रूजींच्या शिष्यांपैकीं विश्वंभर पर्वतकर यांनीं गोव्यांत तबलावादनाचें शिक्षण देणारें विद्यालय चालविलें. त्यांचा एक शिष्य नंदकुमार पर्वतकर सुरेख वाजवितो. करामतीचें वादन करण्यांत उत्तरहिंदुस्थानी लोक पटाईत आहेत; परंतु ताल-शास्त्राच्या अंतरंगाचा कीस काढण्यांत आणि विषम मात्रांच्या तालाचीं गणितें करीत बसण्यांतच आयुष्य वेंचल्यामुळें गोमंतकीय तबलावादकांनीं सवंग लोकप्रियतेकडे दुर्लक्ष केलें. दिवसेंदिवस परिस्थिति मारक व बेताल होत चालली आणि त्यामुळें गोमंतकांतील उपजत तालज्ञांना आपला व्यासंग थांबवावा लागला. 'पोटापुरतें थोडेंसें शिक्षण मिळालें कीं झालें; करायचे आहेत काय ते ब्रह्मतालाचे आणि रुद्रतालाचे हिशोब?' असा प्रश्न स्वाभाविक केला जाऊं लागला आहे!

आपल्या पुढच्या पिढीनें या विषयांत लक्षदेखील घालूं नये असें आज गोमंतकांतील अनेक विद्यमान कलावंतांना वाटतें. दत्ताराम पर्वतकरां-नंतर त्यांच्या घराण्यांत त्यांच्यासारखी कसून मेहनत न केल्यास सारंगी ही शोभेची वस्तू होईल, आणि मधु पेडणेकर कदाचित् आपल्या मुलांना पेटी-तबल्याला हात देखील लावूं देणार नाहींत; असें आज वातावरण निर्माण झालेलें असल्यानें त्याचा दोष कुणावर लादावा, त्याबद्दल कुणाला जबाबदार धरावें, या प्रश्नार्थक विचारानें मति गुंग होते. ज्या नियतीनें जन्माला घालतांनाच गोमंतकीयांना नादब्रह्माचा साक्षात्कार घडविला त्या नियतीनेंच यापुढें त्याचा विकास घडवावा या मागण्याव्यतिरिक्त दुसरें काय सांगणार?

# जीवनाचें अंग नाटक

चैत्र महिन्यापासून फाल्गुनांतल्या अमावास्ये-पर्यंत, पंचांगांतले तसेच स्वयंस्फूर्त असे निरनिराळे उत्सव गोमंतकांत होतात.

एकोणिसाव्या शतकांतलें पहिलें अर्धशतक-पर्यंत तरी, केवळ धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जतन करण्याच्या चढाओढीपलीकडे, दुसरी कुठलीही ईर्ष्या शेंकडों देवालयें असलेल्या गोमंतकांत नव्हती. केवळ परंपरेनें आणि "वडील आचरले जो धर्म। तोचि चालविशी कीं नेम।" म्हणून ठराविक आणि सांचेबंद असे, नवविधाभक्तीचे, दानें, हवनें, अवसर, शिबिकोत्सव इत्यादि प्रकारांनीं व पंचपक्वान्नांच्या समाराधनांनीं युक्त असे त्यावेळचे उत्सव असत.

पुढल्या पंचवीस वर्षांत अधिक करमणुकीची जोड म्हणून हरिकीर्तनाबरोबरच भजनीभारुड-वजा—ज्याला 'ललित' असें सुबक आणि संगीत नांव दिलें तो—करमणुकीचा नवा प्रकार रूढ झाला. समाराधनेनंतर उत्सव

संपला म्हणून ढेकर देत घरोघरीं परतणाऱ्यांना कधीं कधीं पहाटे पर्यंत जागायला एक नवें साधन मिळालें होतें. हरिकीर्तनांत वृत्ति-रंगे, तशीच किंबहुना अधिकच ती ललितांत रंगायला लागली होती. कालांतरानें भारुडांत आख्यानांचा समावेश झाला. पहिल्यापेक्षां याला अधिक लोकप्रियता लाभूं लागली. कोंकणांतून आलेल्या दशावतारी खेळानांहि ललितांत आश्रय मिळूं लागला. हळूहळू ललितांत नाट्य शिरूं लागलें होतें.

हें सारें होत होतें, लोकांचें क्षणाचें रंजन करीत होतें, पण त्याला बांधेसूदपणा नव्हता, सुसूत्रता नव्हती. विस्कळीतपणा आणि कदाचित् अर्थशून्यताहि असल्यानें त्याच्या खुणा शिल्लक राहात नव्हत्या. ज्ञानेश्वर-मुक्तेश्वर-एकनाथांच्या वाङ्मयांतलें अमृत रोज प्राशन करणाऱ्या आणि अंतरींचा ज्ञानदिवा तेवत ठेवणाऱ्यांना तें मोहवूं शकत नव्हतें; परंतु त्यांना फार वेळ वाट बघावी लागली नाहीं. तीं भजनी भारुडें, आख्यानें, ते दशावतारी खेळ इत्यादि साऱ्या प्रकारांची स्फूर्ति घेऊन प्रमाणबद्ध आणि नाट्यपूर्ण अशा ज्या एका नव्या ललितकाराचा जन्म याच वेळीं झाला त्याचें नांव 'कृष्णभट बांदकर'. सद्गुरूच्या कृपाप्रसादानें आणि अनुग्रहानें आपल्या 'डोंगरी' गांवीं त्यांनीं श्रीरामाचें देवालय स्थापिलें, आणि श्रीराम-नवमीच्या उत्सवाप्रीत्यर्थ होणाऱ्या करमणुकीच्या कार्यक्रमासाठीं त्यांनीं नाट्यपूर्ण ललितें रचलीं.

शुक-रंभा, कैकयी-मंथरा आदि पौराणिक कथानकांच्या आधारावर थोड्याशा संवादांबरोबर प्रासादिक पदें, साक्या-दिंड्या आदि वृत्तांचीहि योजना या ललितांत होती. ओज, प्रासाद, पदलालित्य इत्यादि गुणांनीं युक्त अशा त्या कविता, सुबोध आणि अर्थपूर्ण असल्यानें, त्याकाळीं घरोघरीं गुणगुणल्या जाऊं लागल्या, लोकप्रियहि झाल्या!

गोमंतकाच्या नाट्य-परंपरेचा हा उगम असें मानायला हरकत नाहीं. असें सांगतात कीं, अण्णासाहेब किर्लोस्करांनाहि कृष्णभट बांदकरांचीं हीं ललितें पाहून स्फूर्ति झाली. मिठाच्या खरेदीसाठीं क्रॉफर्डसाहेबांबरोबर अण्णासाहेब गोव्यांत गेले होते. तिथल्या मुक्कामांत त्यांनीं हीं ललितें

पाहिलीं होतीं; इतकेंच नव्हे तर त्यांनीं बांदकरांना "तुम्ही आपल्या संचासह महाराष्ट्रांत चला—तिथें तुम्हांला पैसाहि खूप मिळेल" असें सांगितलें होतें; ईश्वरी सेवेसाठीं रचलेल्या ह्या ललितांचा आपण व्यापार करणार नसल्याचें बांदकरांनीं सांगितल्यावरून, निदान हस्तलिखितें तरी मिळावीं असा अण्णासाहेबांचा आग्रह होता; पण केवळ मुखोद्गत असलेल्या ह्या ललितांचीं हस्तलिखितेंहि नाहींत असें कळल्यावर, स्वतः रचण्याबद्दल आशीर्वाद मागितला. तो श्रीरामाचा प्रसाद अंगाऱ्यासह मिळाला! असें वांदकरांचे चरित्रकार लिहितात.

इथून स्फूर्ति घेऊन गेलेल्या अण्णासाहेबांनीं आपल्या 'सौभद्र', 'शाकुंतल', 'रामराज्यवियोग' या नाटकांसह 'किर्लोस्कर संगीत मंडळी' गोव्यांत नेली तो काल एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीचा होता. अण्णासाहेबांच्या या नाटकांनीं गोमंतकाला एक नवी दृष्टि दिली, आणि उत्सवांतील ललितांबरोबरच अशीं साग्रसंगीत नाटकें करण्याची प्रथा गांवोगांवीं निर्माण होऊं लागली.

अर्थातच संतवाङ्मयाचा गाढा व्यासंग असलेल्यांना ही क्रांति स्वस्थ वसूं देईना. त्यांना स्फूर्ति झाली आणि खुद्द गोमंतकांत किर्लोस्कर-सांप्रदायी असे नाटककार उदयाला आले. म्हापसें येथें खलप-धावजेकर, कर्पे-नाटेकर यांनीं संयुक्त प्रयत्नानें नाटकें लिहिलीं. त्यासाठीं संच स्थापन केले. या संचांकडून त्यांचीं नाटकें गांवोगांवीं व्हायला लागलीं.

लोकप्रिय असा पौराणिक प्रसंग निवडावा, थोड्याशा संवादांनीं युक्त असें संगीतिकावजा नाटक लिहावें आणि गांवांतल्याच संचाकडून उत्सवाप्रीत्यर्थ तें प्रयोगरूपानें करून घ्यावें, असेहि प्रकार खूप व्हायला लागले. कारण आतां तंत्र समजलें होतें, नाटकाचीं छापील पुस्तकें हाताशीं आलीं होतीं, वेषभूषा-नेपथ्य आदि गोष्टी कळूं लागल्या होत्या—नाट्य आतां हाडींमांसीं खिळूं लागलें होतें. जसजशा नव्या गोष्टी कळूं लागल्या तसेतसे नवनवे लेखक उदयाला येऊं लागले. माधवराव हेदे, मणेरीकर, सांवर्डेकर वगैरेंनीं आपल्या नाटकांत थोडासा नव्या तंत्राचा अवलंब केला आणि गोमंतकाच्या नाट्यपरंपरेची प्रगति होऊं लागली.

लेखक निर्माण झाले एवढ्यावरच थांबलें नाहीं, तर किर्लोस्करांसारख्या नाटकमंडळ्याहि स्थापन झाल्या. 'गोवा संगीत मंडळी' ही नाट्यसंस्था त्याच सुमारास निघाली, कीं ज्या कंपनींतून महाराष्ट्राला सुपरिचित असलेल्या दत्तोपंत हल्याळकर ह्या पल्लेदार आवाजाच्या नटाच्या गुणांचा विकास झाला. याच कालांत स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीं केल्या. शिवाय तोडीस तोड म्हणून फक्त स्त्रियांचीच अशीहि एक नाटक कंपनी निघाली, ज्यांत पुरुष भूमिकाहि स्त्रियाच करीत.

ललितांची आणि काल्यांची जागा नाटकांनीं घेतली. नाटकें करायचीं म्हटलीं, कीं तीं देवालयांतील उत्सवाप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चांत भागेनात. पेटीवाला, तबलजी, गॅसबत्ती, मांडव, वेषभूषा, नेपथ्य आणि इतर खर्च आवांक्याबाहेर जायला लागला. मग वर्गण्या निघाल्या. त्याच्यांतहि भागेना, तेव्हां पारंपरिक रूढ अशा बाबी—कांहीं भोळ्या म्हणून, तसेंच फालतू खर्च नको म्हणून, कांहीं तत्कालीन सुशिक्षितांना अमान्य म्हणूनहि —बाद होऊं लागल्या. कांहीं कांहीं ठिकाणीं तर आज मूळ उत्सवाच्या केवळ खुणा म्हणून कांहीं बाबी राहिलेल्या आहेत. आणि नाटकें म्हणजेच उत्सव असा स्वाभाविक अर्थ होऊन बसला आहे. आज गोमंतकांत वर्षांतल्या सर्व उत्सवाप्रीत्यर्थ साडेसहाशें, सातशें नाट्य-प्रयोग होतात. सारस्वत, दैवज्ञ, भंडारी, वैश्य आणि गाबित हे समाज ही परंपरा चालवीत आहेत. प्रत्येक गांवांत सारस्वतांचीं निराळीं, दैवज्ञांचीं निराळीं, भंडारी व गाबितांचींहि निरनिराळीं अशीं नाटकें होतात.

उत्सव म्हटला, कीं मतभेद आले, भांडणें आलीं. नवे पक्षोपपक्ष निर्माण झाले. कुणीं सत्यनारायणाच्या निमित्तानें किंवा देवचाराच्या आंग-वणीच्या उत्सवाच्या निमित्तानें नव्या नव्या नाट्यप्रयोगांचा पायंडा पाडला, आणि प्रथा घालून दिली. आज आमच्या एका गांवांत बावीस नाटकें होतात. नाट्यप्रेमाची ही रग एवढी आहे कीं ऐन वेळेला वाटेल तीं साहसाचीं कामें करायलाहि उत्साही माणसांची तयारी असते. एका रात्रींत हजार लोकांना बसतां येईल असा मांडव घालण्यापासून तों सीनमध्यें

त्यावेळीं लागणाऱ्या जिवंत सापाला धरून आणण्यापर्यंत सर्व कामें उत्साही अंतःकरणानें हे लोक करतील.

सुराच्या सच्चेपणाबरोबर लयीच्या पक्केपणाचें वरदान गोमंतकाला लाभलें असल्यानें संगीत नाटकेंच तिथें जास्त प्रिय आहेत. महाराष्ट्रांतल्या चांगल्या संगीत नाटकमंडळ्यांचें स्वागत मुक्त हस्तानें गोमंतकांत होतें तें याच कारणानें. नाट्यप्रियतेबरोबर श्रद्धेबद्दलहि इथें थोडेंसें सांगावेंसें वाटतें. तालीममास्तर म्हटला, कीं तो परमगुरु; मार्गशीर्षांत तालीममास्तर गांवांत यायचा आणि गांवचे उत्सव पूर्ण करून ज्येष्ठ-अखेरीला तो जायचा. गांव सुपीक असल्यानें आंबे-फणसांपासून कांदे-मिरच्यांपर्यंत गाडी भरून भेटी घेऊन धमनींतून तो गांव सोडी त्यावेळीं साश्रुनयनांनीं गांवच्या सीमेपर्यंत पोंचवायला गेलेली मंडळी कांहीं तरी हरवल्यासारखी परत येत.

प्रत्येकाला अथपासून इतिपर्यंत नाटक पाठ असायचें. सौभद्रांतल्या 'नमुनी ईशचरणा' पासून 'रणधीरा श्रीवरवरद' पर्यंत सगळीं पदें संवादासकट तोंडपाठ म्हणून दाखविणारे शंभरीला आलेले कांहीं लोक अजून आहेत.

पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकें गोमंतकाला जास्त प्रिय आहेत. त्याखालोखाल सामाजिक. सरकारी बंधनांत पूर्वीं ऐतिहासिक नाट्यप्रयोग होऊं शकत नव्हते. नवीं पुस्तकेंहि जात नसत, तरी पण अत्यंत कष्टसाध्य रीतीनें तीं पैदा करून, उत्सवप्रिय गोमंतकीयांनीं आपली नाटयप्रियता नंदादीपासारखी तेवत ठेवली. भारतांतल्या इतर कुठल्याहि मराठी-भाषिक प्रांतापेक्षां गोमंतकांत नाट्यवाङ्मयाचा खप दसपट अधिक आहे हें कुठ-लाहि प्रकाशक कबूल करतो. पौराणिक नाटकांत श्री. स. अ. शुक्लांचीं 'सिंहाचा छावा', 'सत्याग्रही', व 'स्वर्गावर स्वारी' हीं नाटकें सर्व समाजाला अतिशय प्रिय आहेत. 'सिंहाचा छावा' या नाटकाचे तर शेंकडों प्रयोग झाले असतील. कालचा अभिमन्यु आज अर्जुनाचें व त्यानंतर द्रोणाचार्यांचेंहि काम करतांना दिसतो. कै. खाडीलकरांचीं तीनचार, देवलांचीं एकदोन, वरेरकरांचीं 'सत्तेचे गुलाम' व 'सोन्याचा कळस',

कै. औंधकरांचीं सगळीं, टिपणिसांचीं सगळीं, आचार्य अत्रे यांचीं सगळीं, अशीं नाटकें ठराविक समाजाला ज्यास्त प्रिय आहेत. मध्यमवर्ग सोडून बाकी समाजांत सामाजिक नाटकें विशेष प्रिय नाहींत.

या उत्सवाच्या नाटकांमुळेंच महाराष्ट्राच्या रंगभूमीवर आपल्या गानाभिनयानें आज कीर्तिवंत झालेल्या आणि होऊन गेलेल्या अनेक कलावंतांचे गुण उजेडांत आले. कै. रघुवीर सावकार व मास्टर दीनानाथांपासून आजच्या तरुण प्रसाद सावकारांपर्यंत आणि सरस्वती पेडणेकरांपासून सौ. ज्योत्स्नाबाई भोळ्यांपर्यंत प्रत्येकानें आपल्या गांवच्या उत्सवी रंगभूमीवरच पहिलीं पावलें टाकलेलीं आहेत. मराठी रंगभूमीला गोमंतकानें किती स्त्री-पुरुष कलावंत दिले याची यादी देण्याचें हें स्थळ नाहीं; पण इतर कोणत्याहि प्रांतापेक्षां संख्येनें ते ज्यास्त आहेत हें मात्र प्रतिज्ञेवर सांगतां येईल. ज्यावेळीं महाराष्ट्राच्या चित्रपटसृष्टींत स्त्रिया आजच्याइतक्या बहुसंख्येनें पदार्पण करीत नव्हत्या, त्यावेळीं गोमंतकांतील अभिनयसंपन्न स्त्रियांनीं चित्रपटसृष्टीच्या उत्कर्षाला बराच हातभार लावलेला आहे. मिस् दुलारी, रत्नप्रभा, जयश्री, मीनाक्षी या नांवांची कुणाला विस्मृति होईल?

नाट्यलेखनांतली गोमंतकीयांची परंपरा मंदगतीची असली तरी गेल्या पन्नास वर्षांत ज्यांचें नाट्यवाङ्मय प्रसिद्ध झालेलें आहे असे निदान पन्नास लेखक तरी निघतील; परंतु रंगभूमीशीं आणि तिच्या बदलत्या तंत्राशीं यांतील बहुतेकांचा विशेष परिचय नसल्यामुळें त्यांनीं निर्माण केलेलें नाट्यवाङ्मय पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध झालें एवढेंच! श्री. मो. ग. रांगणेकर व श्री. हरि विठ्ठल देसाई या दोन प्रसिद्ध नाटककारांनंतर श्री. वसंत कामत या तरुण नाटककाराचीं कांहीं अनुवादित नाटकें मुंबईंतील एक प्रसिद्ध संस्था आय. एन. टी. नें रंगभूमीवर आणलीं, व त्यांचा बराच गाजावाजा झाला. बबन प्रभूंनीं प्रहसनांत केलेली क्रांति रंगभूमीच्या इतिहासाचा ओघ बदलणारी ठरली. त्यांचीं 'झोपी गेलेला जागा झाला', 'दिनूच्या सासूबाई राधाबाई' आणि इतर प्रहसनें अप्रतिम गणलीं गेलीं आहेत. स्त्रीलेखिकांत हिराबाई पेडणेकरांनंतर

(‘जयद्रथविडंबन’ व ‘यामिनी’) सौ. ज्योत्स्नाबाई भोळे यांनीं ‘आराधना’ हें नाटक लिहून स्वतःच उत्तम तऱ्हेनें सादर केलें होतें. बालरंगभूमीच्या उत्कर्षासाठीं सौ. सुधा करमरकरांनीं केलेले प्रयत्न आणि लिहिलेलीं नाटकें यांची नोंद गोमंतकाच्या नाट्येतिहासांत अवश्य नमूद होईल. रंगभूमीचें बदलतें तंत्र संभाळून चांगली संगीत नाटयरचना श्री. सखारामपंत बर्वे यांनीं केली. त्यांचीं ‘प्रणयी कीटक’, ‘बलिदान’, ‘नवी दृष्टि’, ‘नंदकिशोर’ हीं नाटकें प्रायोगिक दृष्ट्याहि चांगलीं आहेत. सखारामपंत उत्कृष्ट हार्मोनियमवादक, नट, नाट्यसंस्थांचे चालक व संगीतरचनाकार असल्यानें त्यांनीं निर्माण केलेलें नाट्यवाङ्मय सध्याच्या काळांत मागें पडलेलें असलें तरी तें दर्जेदार आहे. बर्वे ललितकलादर्श नाट्यसंस्थेंत कांहीं वर्षें पेटीवादक म्हणून होते. ख्यातनाम नट श्री. दत्ताराम, गोमंतकांतील एक उत्तम नाट्यशिक्षक, गायक व ललितकलांतील अनेक अंगें ज्ञात असलेले श्री. मनोहर शिरगांवकर, कलाविकास या नाटयसंस्थेंत मुख्य भूमिकेंत वावरणाऱ्या कै. नलिनी बर्वे इत्यादि कलावंत बर्व्यांच्या नाट्यसंस्थेंत शिकून तयार झालेले आहेत. गोमंतकांतील आमच्या पिढींतील तरुण वर्गाला बर्वे यांच्यापासून नाट्य व संगीताचे बरेच धडे मिळालेले आहेत. गोमंतकाच्या स्वातंत्र्यालाहि बर्वे यांचा बराच हातभार लागलेला आहे.

नाट्यशिक्षक व विनोदीनट म्हणून श्री. वसंत सावकार जसे गोमंतकाला तसेच महाराष्ट्रालाहि सुपरिचित आहेत. त्यांचे बंधु गोपिनाथ सावकार गेलीं बावीस वर्षें स्वतःची नाट्यसंस्था यशस्वी रीतीनें चालवीत आहेत. माशेल येथील श्री. वसंत आमोणकर हे नाट्यदिग्दर्शन, संगीतदिग्दर्शन, व पेटीवादन या तीन अंगांनीं कित्येक वर्षें गोव्यांत रंगभूमीची सेवा करीत आहेत. कै. राजा शेटये या तरुण व रसिक गृहस्थांनीं गोमंतकांतील नाट्यकलेच्या विकासासाठीं आपल्या आयुष्याचा होम केला. नाटक म्हटलें कीं त्यासाठीं सर्वस्व अर्पण करणारे राजा शेटये यांच्यासारखे गृहस्थ गोमंतकांत फार थोडे आहेत. दुर्दैवानें हा नाटयोत्साही माणूस अकालीं गेला; परंतु त्यांनीं अनेक प्रकारांनीं केलेली नाट्यसेवा गोमंतकीयांच्या स्मरणांत कायमची राहील.

महाराष्ट्रांत अशी एकहि नाट्यसंस्था नसेल, कीं जिचा यशस्वी मुक्काम गोव्यांत झाला नाहीं; आणि असा एकहि ख्यातनाम नट नसेल कीं ज्याच्या गुणाचें कौतुक गोमंतकानें आपला जीव ओवाळून केलें नाहीं! महाराष्ट्राच्या नव्या रंगभूमीवर गोमंतकांतील अनेक तारे आज आपआपल्या तेजानें चमकत आहेत. श्री. बबन प्रभू, श्री. दामू केंकरे, सौ. नलिनी बोरकर, सौ. ललिता केंकरे, सौ. ललिता जोगळेकर, सौ. आशालता वाबगांवकर, रामदास कामत, भिकू पै आंगले, सौ. सुधा करमरकर, श्री. पै प्रभृति तरुण, महाराष्ट्राच्या रंगभूमीवर नांव घेण्यासारखी कामगिरी करीत आहेत. किसन कामतसारख्या कांहीं ताज्या दमाच्या रक्तांत नाट्यलेखनाचा विकास दिसून येत आहे. आज गोमंतकांतील घरंदाज मुली मोकळ्या मनानें नाटकांत भाग घेऊं लागलेल्या आहेत. नाट्यकला हें जीवनाचेंच एक अंग आहे हें आज कळून येऊं लागलेलें आहे. भावी उदयकालाचीं हीं शुभचिन्हेंच आहेत असें मानायला हरकत नाहीं.

# चित्रकार आणि शिल्पकार

गायन, वादन, नाट्य, व साहित्य या चार कलांचा गोमंतकांत थोडाथोडा का होईना पण विकास होत होता; परंतु चित्र व शिल्प कलांना अजिबात वाव नव्हता. फक्त धार्मिक कार्यापुरती चित्र-शिल्प-कलेची जरुरी होती. ती तात्पुरती पुरीहि होत होती. समाज तेवढ्यापुरता या कलांना आश्रय देत होता, पण महत्त्व देत नव्हता. मध्यमवर्गांतील मुलांनीं यांपैकीं एखाद्या गोष्टीकडे वळणें म्हणजे त्याला भिकेचे डोहाळे लागलेले आहेत असा दृढ समज समाजांतील सर्व सुबुद्ध घटकांमध्यें होता, कारण व्यवसाय म्हणून या कलांचा स्वीकार केल्यानें दोन वेळ पोटाला मिळण्याचा सुतराम् संभवहि नव्हता. त्यामुळें अंगांत तो नैसर्गिक गुण असून देखील त्या बाजूला वळणें म्हणजे आपण होऊन सबंध समाजाचा रोष ओढवून घेणें अशी स्थिति असल्यावर चित्र-शिल्पकलेकडे वळणार कोण? परंतु समाजाच्या इतिहासांत असाहि एखादा कालखंड येतो, कीं

त्यावेळीं अखंड विरोध असलेल्याच गोष्टींचा विकास होत जातो, आणि हा विकास इतक्या झपाट्यानें होतो कीं पूर्वीं जाचक असलेलीं सर्व बंधनें पटापट तुटतात. अनुकूल वातावरण अचानक निर्माण होतें.

चित्रकला व शिल्पकला हे गुण अंगांत असलेला गोमंतकीय तरुण, त्या कलांचा विकास घडवायला एकाकी बाहेर पडला. कोणत्याच प्रकारचें उत्तेजन त्याला मिळालें नाहीं. मागच्या पिढींतल्या कीर्तिवंत चित्रकाराच्या किंवा शिल्पकाराच्या चरित्राकडे पाहिल्यास अत्यंत दारुण परिस्थितींतूनच त्यांनीं आयुष्य घडविल्याचें प्रत्ययास येतें. मूर्तिकलेंत उपजत अंग असलेलीं दोन मुलें, मुंबईस जाऊन पुढील शिक्षण घ्यावें हा हेतु मनांत धरून बरेच दिवस धडपडलीं, पण त्यांच्या विचारांशीं कुणीहि सहमत होईना. अखेरीस आपसांत कट करून हीं दोन्ही मुलें मुंबईला पळून जायच्या इराद्यानें पणजीला आलीं. थोड्याच वेळांत त्यांचा कट उघडकीस येऊन त्यांना शोधीत गांवची मंडळी पणजी येथें आली. त्या मुलांपैकीं एकानें भिऊन पाठ फिरविली; पण दुसरा लपत छपत बोटींत बसून मुंबईला गेला. घरच्यांनीं रागानें त्याला कपर्दिकेचीहि मदत केली नाहीं, पण त्यानें पर्वा केली नाहीं. आणि कालांतरानें तोच मुलगा शिल्पकलेंत प्रवीण होऊन जगांतील अत्युच्च असें मानाचें पदक मिळवून ख्यातनाम झाला. त्याचें नांव शिल्पकार राम कामत.

राम कामतीसारखें आयुष्य घडविलेले गोमंतकांतले अनेक नामवंत चित्रकार, शिल्पकार, छायाचित्रकार आज मुंबईंत आहेत. त्यांपैकीं कांहींनीं स्वतःचा संप्रदायहि निर्माण केलेला आहे. चित्रकार भोंसुले, चित्रकार दलाल, चित्रकार मुळगांवकर, छायाचित्रकार प्रभू, व्यंगचित्रकार मारियो, छायाचित्रकार पांडुरंगराव नाईक, चित्रकार लक्ष्मण पै, गायतोंडे प्रभृति कलावंतांना आंतर्राष्ट्रीय ख्याति लाभलेली आहे. पाव्वशतकापूर्वीं गोव्यांत चित्रकला शिकविणारीं दोन-तीन खाजगी कलागृहें होतीं. त्यांत कै. शंकरराव मुळगांवकर यांच्या कलागृहांत जिज्ञासू विद्यार्थ्यांना प्राथमिक ज्ञान मिळविण्यापुरती सोय होती. कै. शंकरराव मुळगांवकर हे जसे चित्रकलेचे मार्गदर्शक होते तसेच वाङ्मयाचा व्यासंग केलेले बहुश्रुत

गृहस्थ होते. गोव्यांत विशेष लोकप्रिय नसलेल्या त्या विषयाची आवड बहुजनसमाजांत उत्पन्न करून कांहींतरी भरीव कार्य करण्याची त्यांची इच्छा होती; पण ऐन वेळीं त्यांच्यावर वज्राघात झाला. ज्याच्यावर त्यांची सारी भिस्त होती तो त्यांचा मुलगा चित्रकार प्रभाकर, चित्रकलेंतली पदवी-परीक्षा पास होऊन व नांवारूपाला येऊन अकालीं गेला आणि शंकररावांनीं हाय खाल्ली; पण त्यांच्या सुप्त आकांक्षांचें फल त्यांचे तिसरे चिरंजीव चित्रकार रघुवीर मुळगांवकर यांना मिळालें. चित्रकार मुळगांवकरांचें कर्तृत्व आणि लौकिक साऱ्या भारताला परिचित आहे.

मुळगांवकरांच्या कलागृहाच्या मडगांव व पणजी इथें दोन शाखा होत्या. याशिवाय पणजींत चित्रकार नरसिंह खंवटे आणि त्यांचे बंधु मिळून एक कलागृह चालवीत असत. मडगांवांत श्री. चोडणकर यांचेंहि एक लहानसें कलागृह होतें. कोणत्याच तऱ्हेचीं सरकारी वा अन्य अनुदानें नसतांना केवळ थोड्याच लोकाश्रयावर ते तीं चालवीत होते. बरेच विद्यार्थी तिथें प्राथमिक शिक्षण घेऊन गोव्याबाहेर पडले व लौकिकवान झाले. अलीकडच्या कांहीं वर्षांत पुर्तुगेज सरकारनें कलेचें सर्वांगीण शिक्षण देण्यासाठीं निरनिराळ्या संस्था काढायचा प्रयत्न केला होता, पण बेफाट पगार देऊन पूर्वानुभव नसलेलीं माणसें नेमणें आणि असला केवळ देखावा उभा करणें याव्यतिरिक्त कांहीं घडलें नाहीं; किंवा या खटाटोपांतून एखादा कलावंतहि निर्माण होऊं शकला नाहीं. असलें कांहीं शिकून अंगभूत गुणांचा विकास करून घेण्यापेक्षां थोड्याशा श्रमांनीं लक्षाधीश होण्याचे मार्ग पुर्तुगेज अमदानीच्या शेवटच्या वीस वर्षांत अधिक होते. त्यामुळें कला, साधना, ध्येय असले शब्द हास्यास्पद वाटत होते. 'मिळेल त्या मार्गांनीं' वित्तसंचय करणें हाच एक ध्येयवाद ठरला. त्यामुळें कशींबशीं जीव धरून राहिलेलीं, थोडेंसें प्राथमिक ज्ञान देणारीं कलागृहेंहि बिचारीं बंद झालीं. गोव्यांतल्या तिन्ही शहरांत मिळून कांहीं छायाचित्रगृहेंहि आहेत, पण तींहि मामुली स्वरूपाचीं. शिल्पकलेला तर किंचितहि वाव नाहीं. एखाद्या मूर्तिकारानें गणपतीच्या दिवसांत हातपाय हलवावे तेवढेच. नपेक्षां बाकीच्या वेळीं त्याला अन्य

धंदा करून योगक्षेमाची तरतूद करावी लागते. सार्वजनिक ठिकाणीं एखादें शिल्प उभारायचें बहुमतानें ठरल्यास तें काम अर्थातच एखाद्या पुर्तुगेज कलावंताच्या सुपूर्द व्हायचें हें ठरलेलें होतें.

फोंडें येथें हमरस्त्यांच्या मध्यभागीं गोमंतकांतील एक थोर कृतिपुरुष भिषग्वर्य रामचंद्र पांडुरंग ऊर्फ दादा वैद्य यांचा एक पुतळा उभारण्यांत आलेला आहे. संबंध गोमंतकांत पुर्तुगीज राजवटींत उभारलेला एका हिंदु सज्जनाचा हा एकमेव पुतळा. तो उभारायचा ठरविल्यानंतर त्याचें कंत्राट एका पुर्तुगेज शिल्पकाराला देण्यांत आलें आणि पुर्तुगालहून तो पुतळा तयार होऊन आला. झालें. उद्‌घाटनाचा दिवस ठरला व त्याप्रमाणें गोव्यांतल्या प्रतिष्ठित लोकांसमवेत अधिकाऱ्यांनीं तो पुतळा त्याचें आवरण सोडवून उघडून पाहिला...आणि हाय रे दैवा! तो पुतळा पाहून सर्वांनींच डोक्याला हात लावले. त्या पुतळ्याचें धोतराचें नेसण उलटें नेसविण्यांत आलें होतें. म्हणजे कासोटा पुढें आणि पुढच्या निऱ्या मागें असा उलटा कारभार झाल्यानें तो पुतळा परत करण्यांत येऊन पुन्हा त्याच्यासाठीं हजारों रुपये खर्च करण्यांत आले व उद्‌घाटनहि ठरल्यावेळीं न होतां बऱ्याच कालावधीनंतर झालें.

अशा या अंदाधुंदीच्या राजवटींत गोमंतकीय शिल्पकाराला आपलें भवितव्य गोव्याबाहेरच राहून ठरविण्यापलीकडे गत्यंतर नव्हतें. आज बरेच गोमंतकीय शिल्पकार हिंदुस्थानांत व परदेशांत फार मोठें नांव मिळवून राहिलेले आहेत. शिल्पकार नावेलकर, कामत, पै, फॅर्नान्डिश, आनंद पै, धुंगट इत्यादि शिल्पकारांच्या खूप कलाकृति वाखाणल्या गेलेल्या आहेत. वास्तुशास्त्रविशारदांत अनेक नांवें आहेत. मुंबईंतील 'टाउन हॉल' या भव्य वास्तूचें आरेखन एका गोमंतकीयानें केलेलें आहे. गेल्या पन्नास वर्षांत त्रिंदाद, शिरोडकर, मयेकर, घोटिंग, सांवर्डेकर इत्यादि कलावंतांनीं मुंबईंत व मुंबईबाहेरील अनेक भव्य वास्तूंचें आरेखन केलेलें आहे.

चित्रकला-विश्वांत ज्या ज्या गोमंतकीयांनीं पाऊल टाकलें त्यांनीं त्यांनीं आपल्या स्वतंत्र निर्मितीनें संप्रदाय निर्माण केलेले आहेत. ज्यांना 'रॅंब्रांट

ऑफ ईस्ट' अशी पदवी युरोपांतील चित्रकारांनीं दिली ते आंतोनियु शाव्हियॅर त्रिंदाद हे अस्नोड्याचे. बॉंबे आर्ट सोसायटीचें सुवर्णपदक मिळविणारे हे पहिले गोमंतकीय चित्रकार. मुंबईच्या 'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट' मध्यें हे शिक्षक होते. त्यांची मुलगी 'अँजेला' वडिलांची परंपरा चालवीत आहे. ख्रि. त्रिंदादांनंतर गेल्या पिढींत अनेक चित्रकार झाले. कै. गणपतराव लाड, थळी, सांवर्डेकर, घोटिंग इत्यादि. या सर्वांनींच आपल्या क्षेत्रांत थोर कामगिरी करून पुढच्या पिढीला मार्ग मोकळा करून ठेवला. भारतीय चित्रकलापद्धतींत चित्रकार रघुवीर चिमुलकरांच्या मागून त्यांच्याइतका थोर चित्रकार आज महाराष्ट्रांत कुणी झालेला नाहीं. त्याच पिढींतले श्री. विश्वनाथराव नागेशकर हे पॅरिस येथें पुढचें शिक्षण घेऊन परदेशांतच स्थायिक झाले. श्री. अनंतराव भोंसुले नांवाजलेले 'पोर्ट्रेटपेंटर' आहेत. जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे ते प्राध्यापक होते.

यानंतरच्या पिढींत फार मोठें नांव केलेले चित्रकार म्हणजे दीनानाथ दामोदर दलाल. मराठी वाङ्मयाला दलालांनीं जी साथ दिली ती मराठी वाङ्मयाच्या भावी इतिहासांत चिरस्थायी होईल. या ठिकाणीं फक्त एवढेंच सांगायचें कीं दलालांसारखा चतुरस्र चित्रकार शतकांत एखादाच निर्माण होतो असे उद्गार काढायचा मोह आवरत नाहीं. नवचित्रकलेंत संप्रदाय निर्माण करणाऱ्या गोमंतकीय चित्रकारांत लक्ष्मण पै आणि वासुदेव गायतोंडे यांचीं नांवें भारतांतच नव्हे तर पांचहि खंडांत दुमदुमत आहेत. नवचित्रकलेंत 'सौजा' यांच्या कलेनेंहि मोठमोठ्या टीकाकारांना मंत्रमुग्ध केलेलें आहे. कुमारी प्रफुल्ला जोशी ही गोमंतकीय सुकन्या केवळ चित्रकलेंतच नव्हे, तर ललितकलांच्या सर्व क्षेत्रांत सारखेंच यश मिळवीत आहे. प्रफुल्लानें आपल्या कलेचा झेंडा अटकेपर्यंत लावून ती यशस्वी होऊन आलेली आहे. मुंबईतील अत्युच्च थरांतील सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांत तिचा क्रम अग्रभागीं असतो.

व्यापारी चित्रकलेच्या प्रांगणांत शेंकडों गोमंतकीय चित्रकार आप-आपल्या वैशिष्ट्यानें चमकत आहेत. रंगभूमीवरील नेपथ्यांत तसेंच चित्रकलेंतील अन्य विभागांत नवनवे उन्मेष घडवून आणणारे दामू केंकरे,

प्रकाश मळकर्णेकर, किसन कामत, हीं नावें सदैव दृष्टीसमोर असतात. चित्रकार हेदे, चित्रकार रतन देसाई, जुवारकर, खलप, कंटक, हे नियत-कालिकांत व प्रसिद्धिविभागांत नेहमीं आघाडीवर आहेत. छायाचित्रकलेंत रायू रवळनाथ प्रभू यांचें यश असाधारण आहे. रायू प्रभूंना अंतर्राष्ट्रीय ख्याति मिळालेली आहे. मुंबईंतील प्रचंड व्यापारी संस्थांच्या समारंभांचीं छायाचित्रें, रायू प्रभू अन्य ठिकाणीं गुंतलेले असल्यास दुसऱ्यांकडून घेतलीं जात नाहींत. 'रायू प्रभू मिळत असले तरच समारंभाचीं छायाचित्रें घेतलीं जावींत' असा कंपनीच्या वरिष्ठांकडून शेरा येतो. याहून अधिक काय सांगावें? श्री. र. वि. पंडित यांचें नांव हौशी छायाचित्रकारांत असलें तरी त्यांनीं या कलेंत प्रावीण्य मिळविलेलें आहे. त्यांचीं छायाचित्रें तज्ज्ञांकडून गौरविलीं गेलेलीं आहेत.

रजतपटावरील छायाचित्रकलेंत पांडुरंग नाइकांनंतर, तरुण पिढींत केवळ किसन कामत घाणेकर व वैकुंठ कुंकळ्येकर यांनींच अत्यंत चिकाटीनें परिश्रम करून आज यशस्वी छायाचित्रकार म्हणून लौकिक मिळवलेला आहे.

गोमंतकांतील एक पिढीच्या पिढी आज चित्रकला-विश्वांत वावरत आहे. प्रत्येकाचें वैशिष्ट्य वेगळें आहे. गोमंतकाच्या नांवाला त्यांनीं स्वदेशांत व परदेशांत महत्त्व प्राप्त करून दिलेलें आहे.

मराठी ग्रंथ ... ठाणे
९०६२५५
मराठी ... ग्रंथक्रमांक
अनु. ३८५७३ ... भूषणाट
... ३३५ ... नों. दि. २५.८.६८

त्यावेळीं लागणाऱ्या जिवंत सापाला धरून आणण्यापर्यंत सर्व कामें उत्साही अंतःकरणानें हे लोक करतील.

सुराच्या सच्चेपणाबरोबर लयीच्या पक्केपणाचें वरदान गोमंतकाला लाभलें असल्यानें संगीत नाटकेंच तिथें जास्त प्रिय आहेत. महाराष्ट्रांतल्या चांगल्या संगीत नाटकमंडळ्यांचें स्वागत मुक्त हस्तानें गोमंतकांत होतें तें याच कारणानें. नाट्यप्रियतेबरोबर श्रद्धेबद्दलहि इथें थोडेंसें सांगावेंसें वाटतें. तालीममास्तर म्हटला, कीं तो परमगुरु; मार्गशीर्षांत तालीममास्तर गांवांत यायचा आणि गांवचे उत्सव पूर्ण करून ज्येष्ठ-अखेरीला तो जायचा. गांव सुपीक असल्यानें आंबे-फणसांपासून कांदे-मिरच्यांपर्यंत गाडी भरून भेटी घेऊन धमनींतून तो गांव सोडी त्यावेळीं साश्रुनयनांनीं गांवच्या सीमेपर्यंत पोंचवायला गेलेली मंडळी कांहीं तरी हरवल्यासारखी परत येत.

प्रत्येकाला अथपासून इतिपर्यंत नाटक पाठ असायचें. सौभद्रांतल्या 'नमुनी ईशचरणा' पासून 'रणधीरा श्रीवरवरद' पर्यंत सगळीं पदें संवादासकट तोंडपाठ म्हणून दाखविणारे शंभरीला आलेले कांहीं लोक अजून आहेत.

पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकें गोमंतकाला जास्त प्रिय आहेत. त्याखालोखाल सामाजिक. सरकारी बंधनांत पूर्वीं ऐतिहासिक नाट्यप्रयोग होऊं शकत नव्हते. नवीं पुस्तकेंहि जात नसत, तरी पण अत्यंत कष्टसाध्य रीतीनें तीं पैदा करून, उत्सवप्रिय गोमंतकीयांनीं आपली नाट्यप्रियता नंदादीपासारखी तेवत ठेवली. भारतांतल्या इतर कुठल्याहि मराठी-भाषिक प्रांतापेक्षां गोमंतकांत नाट्यवाङ्मयाचा खप दसपट अधिक आहे हें कुठलाहि प्रकाशक कबूल करतो. पौराणिक नाटकांत श्री. स. अ. शुक्लांचीं 'सिंहाचा छावा', 'सत्याग्रही', व 'स्वर्गावर स्वारी' हीं नाटकें सर्व समाजाला अतिशय प्रिय आहेत. 'सिंहाचा छावा' या नाटकाचे तर शेंकडों प्रयोग झाले असतील. कालचा अभिमन्यु आज अर्जुनाचें व त्यानंतर द्रोणाचार्यांचेंहि काम करतांना दिसतो. कै. खाडीलकरांचीं तीनचार, देवलांचीं एकदोन, वरेरकरांचीं 'सत्तेचे गुलाम' व 'सोन्याचा कळस',

कै. औंधकरांचीं सगळीं, टिपणिसांचीं सगळीं, आचार्य अत्रे यांचीं सगळीं, अशीं नाटकें ठराविक समाजाला ज्यास्त प्रिय आहेत. मध्यमवर्ग सोडून बाकी समाजांत सामाजिक नाटकें विशेष प्रिय नाहींत.

या उत्सवाच्या नाटकांमुळेंच महाराष्ट्राच्या रंगभूमीवर आपल्या गानाभिनयानें आज कीर्तिवंत झालेल्या आणि होऊन गेलेल्या अनेक कलावंतांचे गुण उजेडांत आले. कै. रघुवीर सावकार व मास्टर दीनानाथांपासून आजच्या तरुण प्रसाद सावकारांपर्यंत आणि सरस्वती पेडणेकरांपासून सौ. ज्योत्स्नाबाई भोळ्यांपर्यंत प्रत्येकानें आपल्या गांवच्या उत्सवी रंगभूमीवरच पहिलीं पावलें टाकलेलीं आहेत. मराठी रंगभूमीला गोमंतकानें किती स्त्री-पुरुष कलावंत दिले याची यादी देण्याचें हें स्थळ नाहीं; पण इतर कोणत्याहि प्रांतापेक्षां संख्येनें ते ज्यास्त आहेत हें मात्र प्रतिज्ञेवर सांगतां येईल. ज्यावेळीं महाराष्ट्राच्या चित्रपटसृष्टींत स्त्रिया आजच्याइतक्या बहुसंख्येनें पदार्पण करीत नव्हत्या, त्यावेळीं गोमंतकांतील अभिनयसंपन्न स्त्रियांनीं चित्रपटसृष्टीच्या उत्कर्षाला बराच हातभार लावलेला आहे. मिस् दुलारी, रत्नप्रभा, जयश्री, मीनाक्षी या नांवांची कुणाला विस्मृति होईल ?

नाट्यलेखनांतली गोमंतकीयांची परंपरा मंदगतीची असली तरी गेल्या पन्नास वर्षांत ज्यांचें नाट्यवाङ्मय प्रसिद्ध झालेलें आहे असे निदान पन्नास लेखक तरी निघतील; परंतु रंगभूमीशीं आणि तिच्या बदलत्या तंत्राशीं यांतील बहुतेकांचा विशेष परिचय नसल्यामुळें त्यांनीं निर्माण केलेलें नाट्यवाङ्मय पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध झालें एवढेंच ! श्री. मो. ग. रांगणेकर व श्री. हरि विठ्ठल देसाई या दोन प्रसिद्ध नाटककारांनंतर श्री. वसंत कामत या तरुण नाटककाराचीं कांहीं अनुवादित नाटकें मुंबईंतील एक प्रसिद्ध संस्था आय. एन. टी. नें रंगभूमीवर आणलीं, व त्यांचा बराच गाजावाजा झाला. बबन प्रभूंनीं प्रहसनांत केलेली क्रांति रंगभूमीच्या इतिहासाचा ओघ बदलणारी ठरली. त्यांचीं 'झोपी गेलेला जागा झाला', 'दिनूच्या सासूबाई राधाबाई' आणि इतर प्रहसनें अप्रतिम गणलीं गेलीं आहेत. स्त्रीलेखिकांत हिराबाई पेडणेकरांनंतर

('जयद्रथविडंबन' व 'यामिनी') सौ. ज्योस्नाबाई भोळे यांनीं 'आराधना' हें नाटक लिहून स्वतःच उत्तम तऱ्हेनें सादर केलें होतें. बालरंगभूमीच्या उत्कर्षासाठीं सौ. सुधा करमरकरांनीं केलेले प्रयत्न आणि लिहिलेलीं नाटकें यांची नोंद गोमंतकाच्या नाट्येतिहासांत अवश्य नमूद होईल. रंगभूमीचें बदलतें तंत्र संभाळून चांगली संगीत नाटयरचना श्री. सखारामपंत बर्वे यांनीं केली. त्यांचीं 'प्रणयी कीटक', 'बलिदान', 'नवी दृष्टि', 'नंदकिशोर' हीं नाटकें प्रायोगिक दृष्टयाहि चांगलीं आहेत. सखारामपंत उत्कृष्ट हार्मोनियमवादक, नट, नाट्यसंस्थांचे चालक व संगीतरचनाकार असल्यानें त्यांनीं निर्माण केलेलें नाट्यवाङ्मय सध्याच्या काळांत मागें पडलेलें असलें तरी तें दर्जेदार आहे. बर्वे ललितकलादर्श नाट्यसंस्थेंत कांहीं वर्षें पेटीवादक म्हणून होते. ख्यातनाम नट श्री. दत्ताराम, गोमंतकांतील एक उत्तम नाट्यशिक्षक, गायक व ललितकलांतील अनेक अंगें ज्ञात असलेले श्री. मनोहर शिरगांवकर, कलाविकास या नाटयसंस्थेंत मुख्य भूमिकेंत वावरणाऱ्या कै. नलिनी बर्वे इत्यादि कलावंत बर्व्यांच्या नाट्यसंस्थेंत शिकून तयार झालेले आहेत. गोमंतकांतील आमच्या पिढींतील तरुण वर्गाला बर्वे यांच्यापासून नाट्य व संगीताचे बरेच धडे मिळालेले आहेत. गोमंतकाच्या स्वातंत्र्यालाहि बर्वे यांचा बराच हातभार लागलेला आहे.

नाट्यशिक्षक व विनोदीनट म्हणून श्री. वसंत सावकार जसे गोमंतकाला तसेच महाराष्ट्रालाहि सुपरिचित आहेत. त्यांचे बंधु गोपिनाथ सावकार गेलीं बावीस वर्षें स्वतःची नाट्यसंस्था यशस्वी रीतीनें चालवीत आहेत. माशेल येथील श्री. वसंत आमोणकर हे नाट्यदिग्दर्शन, संगीतदिग्दर्शन, व पेटीवादन या तीन अंगांनीं कित्येक वर्षें गोव्यांत रंगभूमीची सेवा करीत आहेत. कै. राजा शेटये या तरुण व रसिक गृहस्थांनीं गोमंतकांतील नाट्यकलेच्या विकासासाठीं आपल्या आयुष्याचा होम केला. नाटक म्हटलें कीं त्यासाठीं सर्वस्व अर्पण करणारे राजा शेटये यांच्यासारखे गृहस्थ गोमंतकांत फार थोडे आहेत. दुर्दैवानें हा नाटयोत्साही माणूस अकालीं गेला; परंतु त्यांनीं अनेक प्रकारांनीं केलेली नाट्यसेवा गोमंतकीयांच्या स्मरणांत कायमची राहील.

महाराष्ट्रांत अशी एकहि नाट्यसंस्था नसेल, कीं जिचा यशस्वी मुक्काम गोव्यांत झाला नाहीं; आणि असा एकहि ख्यातनाम नट नसेल कीं ज्याच्या गुणाचें कौतुक गोमंतकानें आपला जीव ओवाळून केलें नाहीं! महाराष्ट्राच्या नव्या रंगभूमीवर गोमंतकांतील अनेक तारे आज आपआपल्या तेजानें चमकत आहेत. श्री. बबन प्रभू, श्री. दामू केंकरे, सौ. नलिनी बोरकर, सौ. ललिता केंकरे, सौ. ललिता जोगळेकर, सौ. आशालता वाबगांवकर, रामदास कामत, भिकू पै आंगले, सौ. सुधा करमरकर, श्री. पै प्रभृति तरुण, महाराष्ट्राच्या रंगभूमीवर नांव घेण्यासारखी कामगिरी करीत आहेत. किसन कामतसारख्या कांहीं ताज्या दमाच्या रक्तांत नाट्यलेखनाचा विकास दिसून येतं आहे. आज गोमंतकांतील घरंदाज मुली मोकळ्या मनानें नाटकांत भाग घेऊं लागलेल्या आहेत. नाट्यकला हें जीवनाचेंच एक अंग आहे हें आज कळून येऊं लागलेलें आहे. भावी उदयकालाचीं हीं शुभचिन्हेंच आहेत असें मानायला हरकत नाहीं.

# चित्रकार आणि शिल्पकार

गायन, वादन, नाट्य, व साहित्य या चार कलांचा गोमंतकांत थोडाथोडा का होईना पण विकास होत होता; परंतु चित्र व शिल्प कलांना अजिबात वाव नव्हता. फक्त धार्मिक कार्यापुरती चित्र-शिल्प-कलेची जरुरी होती. ती तात्पुरती पुरीहि होत होती. समाज तेवढ्यापुरता या कलांना आश्रय देत होता, पण महत्त्व देत नव्हता. मध्यमवर्गीतील मुलांनीं यांपैकीं एकाद्या गोष्टीकडे वळणें म्हणजे त्याला भिकेचे डोहाळे लागलेले आहेत असा दृढ समज समाजांतील सर्व सुबुद्ध घटकांमध्यें होता, कारण व्यवसाय म्हणून या कलांचा स्वीकार केल्यानें दोन वेळ पोटाला मिळण्याचा सुतराम् संभवहि नव्हता. त्यामुळें अंगांत तो नैसर्गिक गुण असून देखील त्या बाजूला वळणें म्हणजे आपण होऊन सबंध समाजाचा रोष ओढवून घेणें अशी स्थिति असल्यावर चित्र-शिल्पकलेकडे वळणार कोण ? परंतु समाजाच्या इतिहासांत असाहि एखादा कालखंड येतो, कीं

त्यावेळीं अखंड विरोध असलेल्याच गोष्टींचा विकास होत जातो, आणि हा विकास इतक्या झपाट्यानें होतो कीं पूर्वीं जाचक असलेलीं सर्व बंधनें पटापट तुटतात. अनुकूल वातावरण अचानक निर्माण होतें.

चित्रकला व शिल्पकला हे गुण अंगांत असलेला गोमंतकीय तरुण, त्या कलांचा विकास घडवायला एकाकी बाहेर पडला. कोणत्याच प्रकारचें उत्तेजन त्याला मिळालें नाहीं. मागच्या पिढींतल्या कीर्तिवंत चित्रकाराच्या किंवा शिल्पकाराच्या चरित्राकडे पाहिल्यास अत्यंत दारुण परिस्थितींतूनच त्यांनीं आयुष्य घडविल्याचें प्रत्ययास येतें. मूर्तिकलेंत उपजत अंग असलेलीं दोन मुलें, मुंबईस जाऊन पुढील शिक्षण घ्यावें हा हेतु मनांत धरून बरेच दिवस धडपडलीं, पण त्यांच्या विचारांशीं कुणीहि सहमत होईना. अखेरीस आपसांत कट करून हीं दोन्ही मुलें मुंबईला पळून जायच्या इराद्यानें पणजीला आलीं. थोड्याच वेळांत त्यांचा कट उघडकीस येऊन त्यांना शोधीत गांवची मंडळी पणजी येथें आली. त्या मुलांपैकीं एकानें भिऊन पाठ फिरविली; पण दुसरा लपत छपत बोटींत बसून मुंबईला गेला. घरच्यांनीं रागानें त्याला कपर्दिकेचीहि मदत केली नाहीं, पण त्यानें पर्वा केली नाहीं. आणि कालांतरानें तोच मुलगा शिल्पकलेंत प्रवीण होऊन जगांतील अत्युच्च असें मानाचें पदक मिळवून ख्यातनाम झाला. त्याचें नांव शिल्पकार राम कामत.

राम कामतीसारखें आयुष्य घडविलेले गोमंतकांतले अनेक नामवंत चित्रकार, शिल्पकार, छायाचित्रकार आज मुंबईंत आहेत. त्यांपैकीं कांहींनीं स्वतःचा संप्रदायहि निर्माण केलेला आहे. चित्रकार भोंसुले, चित्रकार दलाल, चित्रकार मुळगांवकर, छायाचित्रकार प्रभू, व्यंगचित्रकार मारियो, छायाचित्रकार पांडुरंगराव नाईक, चित्रकार लक्ष्मण पै, गायतोंडे प्रभृति कलावंतांना आंतर्राष्ट्रीय ख्याति लाभलेली आहे. पावशतकापूर्वीं गोव्यांत चित्रकला शिकविणारीं दोन-तीन खाजगी कलागृहें होतीं. त्यांत कै. शंकरराव मुळगांवकर यांच्या कलागृहांत जिज्ञासू विद्यार्थ्यांना प्राथमिक ज्ञान मिळविण्यापुरती सोय होती. कै. शंकरराव मुळगांवकर हे जसे चित्रकलेचे मार्गदर्शक होते तसेच वाङ्मयाचा व्यासंग केलेले बहुश्रुत

गृहस्थ होते. गोव्यांत विशेष लोकप्रिय नसलेल्या त्या विषयाची आवड बहुजनसमाजांत उत्पन्न करून कांहींतरी भरीव कार्य करण्याची त्यांची इच्छा होती; पण ऐन वेळीं त्यांच्यावर वज्राघात झाला. ज्याच्यावर त्यांची सारी भिस्त होती तो त्यांचा मुलगा चित्रकार प्रभाकर, चित्रकलेंतली पदवी-परीक्षा पास होऊन व नांवारूपाला येऊन अकालीं गेला आणि शंकररावांनीं हाय खाल्ली; पण त्यांच्या सुप्त आकांक्षांचें फल त्यांचे तिसरे चिरंजीव चित्रकार रघुवीर मुळगांवकर यांना मिळालें. चित्रकार मुळगांवकरांचें कर्तृत्व आणि लौकिक साऱ्या भारताला परिचित आहे.

मुळगांवकरांच्या कलागृहाच्या मडगांव व पणजी इथें दोन शाखा होत्या. याशिवाय पणजींत चित्रकार नरसिंह खंवटे आणि त्यांचे बंधु मिळून एक कलागृह चालवीत असत. मडगांवांत श्री. चोडणकर यांचेंहि एक लहानसें कलागृह होतें. कोणत्याच तऱ्हेचीं सरकारी वा अन्य अनुदानें नसतांना केवळ थोड्याच लोकाश्रयावर ते तीं चालवीत होते. बरेच विद्यार्थी तिथें प्राथमिक शिक्षण घेऊन गोव्याबाहेर पडले व लौकिकवान झाले. अलीकडच्या कांहीं वर्षांत पुर्तुगेज सरकारनें कलेचें सर्वांगीण शिक्षण देण्यासाठीं निरनिराळ्या संस्था काढायचा प्रयत्न केला होता, पण बेफाट पगार देऊन पूर्वानुभव नसलेलीं माणसें नेमणें आणि असला केवळ देखावा उभा करणें याव्यतिरिक्त कांहीं घडलें नाहीं; किंवा या खटाटोपांतून एखादा कलावंतहि निर्माण होऊं शकला नाहीं. असलें कांहीं शिकून अंगभूत गुणांचा विकास करून घेण्यापेक्षां थोड्याशा श्रमांनीं लक्षाधीश होण्याचे मार्ग पुर्तुगेज अमदानीच्या शेवटच्या वीस वर्षांत अधिक होते. त्यामुळें कला, साधना, ध्येय असले शब्द हास्यास्पद वाटत होते. 'मिळेल त्या मार्गांनीं' वित्तसंचय करणें हाच एक ध्येयवाद ठरला. त्यामुळें कशींबशीं जीव धरून राहिलेलीं, थोडेंसें प्राथमिक ज्ञान देणारीं कलागृहेंहि बिचारीं बंद झालीं. गोव्यांतल्या तिन्ही शहरांत मिळून कांहीं छायाचित्रगृहेंहि आहेत, पण तींहि मामुली स्वरूपाचीं. शिल्पकलेला तर किंचितहि वाव नाहीं. एखाद्या मूर्तिकारानें गणपतीच्या दिवसांत हातपाय हलवावे तेवढेच. नपेक्षां बाकीच्या वेळीं त्याला अन्य

धंदा करून योगक्षेमाची तरतूद करावी लागते. सार्वजनिक ठिकाणीं एखादें शिल्प उभारायचें बहुमतानें ठरल्यास तें काम अर्थातच एखाद्या पुर्तुगेज कलावंताच्या सुपूर्द व्हायचें हें ठरलेलें होतें.

फोंडें येथें हमरस्त्यांच्या मध्यभागीं गोमंतकांतील एक थोर कृतिपुरुष भिषग्वर्य रामचंद्र पांडुरंग ऊर्फ दादा वैद्य यांचा एक पुतळा उभारण्यांत आलेला आहे. संबंध गोमंतकांत पुर्तुगीज राजवटींत उभारलेला एका हिंदु सज्जनाचा हा एकमेव पुतळा. तो उभारायचा ठरविल्यानंतर त्याचें कंत्राट एका पुर्तुगेज शिल्पकाराला देण्यांत आलें आणि पुर्तुगालहून तो पुतळा तयार होऊन आला. झालें. उद्‌घाटनाचा दिवस ठरला व त्याप्रमाणें गोव्यांतल्या प्रतिष्ठित लोकांसमवेत अधिकाऱ्यांनीं तो पुतळा त्याचें आवरण सोडवून उघडून पाहिला...आणि हाय रे दैवा! तो पुतळा पाहून सर्वांनींच डोक्याला हात लावले. त्या पुतळ्याचें धोतराचें नेसण उलटें नेसविण्यांत आलें होतें. म्हणजे कासोटा पुढें आणि पुढच्या निऱ्या मागें असा उलटा कारभार झाल्यानें तो पुतळा परत करण्यांत येऊन पुन्हा त्याच्यासाठीं हजारों रुपये खर्च करण्यांत आले व उद्‌घाटनहि ठरल्यावेळीं न होतां बऱ्याच कालावधीनंतर झालें.

अशा या अंदाधुंदीच्या राजवटींत गोमंतकीय शिल्पकाराला आपलें भवितव्य गोव्याबाहेरच राहून ठरविण्यापलीकडे गत्यंतर नव्हतें. आज वरेच गोमंतकीय शिल्पकार हिंदुस्थानांत व परदेशांत फार मोठें नांव मिळवून राहिलेले आहेत. शिल्पकार नावेलकर, कामत, पै, फर्नान्डिश, आनंद पै, धुंगट इत्यादि शिल्पकारांच्या खूप कलाकृति वाखाणल्या गेलेल्या आहेत. वास्तुशास्त्रविशारदांत अनेक नांवें आहेत. मुंबईतील 'टाउन हॉल' या भव्य वास्तूचें आरेखन एका गोमंतकीयानें केलेलें आहे. गेल्या पन्नास वर्षांत त्रिंदाद, शिरोडकर, मयेकर, घोटिंग, सांवर्डेकर इत्यादि कलावंतांनीं मुंबईत व मुंबईबाहेरील अनेक भव्य वास्तूंचें आरेखन केलेलें आहे.

चित्रकला-विश्वांत ज्या ज्या गोमंतकीयांनीं पाऊल टाकलें त्यांनीं त्यांनीं आपल्या स्वतंत्र निर्मितीनें संप्रदाय निर्माण केलेले आहेत. ज्यांना 'रँब्रांट

ऑफ ईस्ट' अशी पदवी युरोपांतील चित्रकारांनीं दिली ते आंतोनियु शाव्हियॅर त्रिंदाद हे अस्नोड्याचे. बॅांबे आर्ट सोसायटीचें सुवर्णपदक मिळविणारे हे पहिले गोमंतकीय चित्रकार. मुंबईच्या 'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट' मध्यें हे शिक्षक होते. त्यांची मुलगी 'अँजेला' वडिलांची परंपरा चालवीत आहे. ख्रि. त्रिंदादांनंतर गेल्या पिढींत अनेक चित्रकार झाले. कै. गणपतराव लाड, थळी, सांवर्डेकर, घोटिंग इत्यादि. या सर्वांनींच आपल्या क्षेत्रांत थोर कामगिरी करून पुढच्या पिढीला मार्ग मोकळा करून ठेवला. भारतीय चित्रकलापद्धतींत चित्रकार रघुवीर चिमुलकरांच्या मागून त्यांच्याइतका थोर चित्रकार आज महाराष्ट्रांत कुणी झालेला नाहीं. त्याच पिढींतले श्री. विश्वनाथराव नागेशकर हे पॅरिस येथें पुढचें शिक्षण घेऊन परदेशांतच स्थायिक झाले. श्री. अनंतराव भौंसुले नांवाजलेले 'पोर्ट्रेटपेंटर' आहेत. जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे ते प्राध्यापक होते.

यानंतरच्या पिढींत फार मोठें नांव केलेले चित्रकार म्हणजे दीनानाथ दामोदर दलाल. मराठी वाङ्मयाला दलालांनीं जी साथ दिली ती मराठी वाङ्मयाच्या भावी इतिहासांत चिरस्थायी होईल. या ठिकाणीं फक्त एवढेंच सांगायचें कीं दलालांसारखा चतुरस्र चित्रकार शतकांत एखादाच निर्माण होतो असे उद्गार काढायचा मोह आवरत नाहीं. नवचित्रकलेंत संप्रदाय निर्माण करणाऱ्या गोमंतकीय चित्रकारांत लक्ष्मण पै आणि वासुदेव गायतोंडे यांचीं नांवें भारतांतच नव्हे तर पांचहि खंडांत दुमदुमत आहेत. नवचित्रकलेंत 'सौजा' यांच्या कलेनेंहि मोठमोठ्या टीकाकारांना मंत्रमुग्ध केलेलें आहे. कुमारी प्रफुल्ला जोशी ही गोमंतकीय सुकन्या केवळ चित्रकलेंतच नव्हे, तर ललितकलांच्या सर्व क्षेत्रांत सारखेंच यश मिळवीत आहे. प्रफुल्लानें आपल्या कलेचा झेंडा अटकेपर्यंत लावून ती यशस्वी होऊन आलेली आहे. मुंबईंतील अत्युच्च थरांतील सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांत तिचा क्रम अग्रभागीं असतो.

व्यापारी चित्रकलेच्या प्रांगणांत शेंकडों गोमंतकीय चित्रकार आप-आपल्या वैशिष्ट्यानें चमकत आहेत. रंगभूमीवरील नेपथ्यांत तसेंच चित्रकलेंतील अन्य विभागांत नवनवे उन्मेष घडवून आणणारे दामू केंकरे,

प्रकाश मळकर्णेकर, किसन कामत, हीं नावें सदैव दृष्टीसमोर असतात. चित्रकार हेदे, चित्रकार रतन देसाई, जुवारकर, खलप, कंटक, हे नियत-कालिकांत व प्रसिद्धिविभागांत नेहमीं आघाडीवर आहेत. छायाचित्रकलेंत रायू रवळनाथ प्रभू यांचें यश असाधारण आहे. रायू प्रभूंना अंतर्राष्ट्रीय ख्याति मिळालेली आहे. मुंबईंतील प्रचंड व्यापारी संस्थांच्या समारंभांचीं छायाचित्रें, रायू प्रभू अन्य ठिकाणीं गुंतलेले असल्यास दुसऱ्यांकडून घेतलीं जात नाहींत. 'रायू प्रभू मिळत असले तरच समारंभाचीं छायाचित्रें घेतलीं जावींत' असा कंपनीच्या वरिष्ठांकडून शेरा येतो. याहून अधिक काय सांगावें? श्री. र. वि. पंडित यांचें नांव हौशी छायाचित्रकारांत असलें तरी त्यांनीं या कलेंत प्रावीण्य मिळविलेलें आहे. त्यांचीं छायाचित्रें तज्ज्ञांकडून गौरविलीं गेलेलीं आहेत.

रजतपटावरील छायाचित्रकलेंत पांडुरंग नाइकांनंतर, तरुण पिढींत केवळ किसन कामत घाणेकर व वैकुंठ कुंकळ्येकर यांनींच अत्यंत चिकाटीनें परिश्रम करून आज यशस्वी छायाचित्रकार म्हणून लौकिक मिळवलेला आहे.

गोमंतकांतील एक पिढीच्या पिढी आज चित्रकला-विश्वांत वावरत आहे. प्रत्येकाचें वैशिष्ट्य वेगळें आहे. गोमंतकाच्या नांवाला त्यांनीं स्वदेशांत व परदेशांत महत्त्व प्राप्त करून दिलेलें आहे.

ठाणे
०८२५५
मराठी ग्रंथसंग्रहालय
अनु. ३८५८३
ता. २५.८.६८
३३५

REFBK 0014256

REFBK-0014256